म. ग्रं सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. ३५८०
३५८०

# शोध आधुनिक भारताचा

'महाराष्ट्राची शोकांतिका'चा उत्तरार्ध

अरुण सारथी

REFBK-0027081

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

27 OCT 1993

10 NOV 1993

21 MAY 1994

21 FEB 1996

6 MAR 1996

9 MAR 1996

( क्र. मा. पहा )
१००००-११-८९

संदर्भ
निबंध
३५६०
२७०८१

# शोध आधुनिक भारताचा

REFBK-0027081

अरुण
सारथी

निबंध ३५६०
२७०८१

रविराज
प्रकाशन

प्रकाशक
ज्योत्स्ना बेहेरे
रविराज प्रकाशन
४५८/२, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

●

©
अरुण सारथी

●

पहिली आवृत्ती
मे १९९३

●

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

●

मुद्रक
वैभव ग. बर्वे
श्री वेदविद्या मुद्रणालय प्रा. लि.,
४१, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

●

मूल्य
ऐंशी रुपये

# अनुक्रम

प्रास्ताविक / ४

शोध प्रस्थान / ९

भारतीय व्यक्तिमत्त्व / १७

भारताचे आधुनिकीकरण / ४६

भारतीय प्रतिसाद / ५७

आधुनिक भारताच्या समस्या / ७३

महात्मा गांधी जिना आणि फाळणी / १२८

महात्मा गांधी - सत्य आणि सत्याग्रह / १५३

जातीयवाद / १८३

# अनुक्रम


प्रास्ताविक / ४

शोध प्रस्थान / ९

भारतीय व्यक्तिमत्त्व / १७

भारताचे आधुनिकीकरण / ४६

भारतीय प्रतिसाद / ५७

आधुनिक भारताच्या समस्या / ७३

महात्मा गांधी जिना आणि फाळणी / १२८

महात्मा गांधी - सत्य आणि सत्याग्रह / १५३

जातीयवाद / १८३

# प्रास्ताविक

'महाराष्ट्राची शोकांतिका' १९८८ मध्ये प्रसिद्ध झाली. थोड्याच अवधीत दुसरी सुधारित आवृत्ती काढण्याचाही योग आला. तथापि सुधारित आवृत्तीच्या मर्यादामुळे काही संकल्पना, इच्छा असूनही अधिक विस्ताराने मांडता आल्या नाहीत. त्यामुळे प्रस्तुत पुस्तकाचा प्रपंच. 'शोकांतिके'त महाराष्ट्राच्या आणि अनुषंगाने भारताच्या दुरवस्थेचे वर्णन केले होते, त्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला होता. 'शोकांतिके'च्या प्रास्ताविकात मी म्हटले होते की आजच्या परिस्थितीला कारणीभूत आहे, मी आणि माझी संस्कृति. त्या दिशेने चिंतन चालूच होते. त्याच सुमारास 'इंडिया-ड्रीम अँड रिॲलिटी' हे पुस्तक वाचण्यात आले. त्यात लेखकाने आजच्या परिस्थितीचे अतिशय नेमकेपणाने दर्शन घडविले होते. तथापि त्यातील विश्लेषण मात्र मला वरवरचे आणि ठराविक साच्याचे वाटले. आजकाल अशा तऱ्हेच्या लिखाणात स्वातंत्र्यपूर्व काल, विशेषत: गांधीयुग, आणि स्वातंत्र्योत्तर काल, यांची तुलना करून आपल्या ऱ्हासाचा संबंध स्वातंत्र्योत्तर कालातील घडामोडींशी लावण्यात येतो. ही पद्धत मला चुकीची वाटते. कारण स्वातंत्र्यानंतर आपल्यापुढे एवढ्या समस्या आणि आव्हाने उभी होती की स्वाभाविकत:च आपल्यात जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन स्वातंत्र्यपूर्व कालापेक्षाही अधिक ईर्षेने आणि स्वार्थत्यागाच्या ऊर्मीने आपण कार्यरत व्हावयास हवे होते. कारण समस्या आणि आव्हानेच माणसामध्ये जे उत्कृष्ट असते त्याला साद घालतात. पण प्रत्यक्षात मात्र विपरीत घडले. भारतीयांच्यात जे उत्कृष्ट असेल त्याचे दर्शन घडण्याऐवजी त्यांच्यात जे हीण होते त्याचा तवंग आणि दुर्गंधी मात्र सर्वच क्षेत्रात पसरलेली आढळते. केवढे हे आक्रीत घडले, या विचाराने निरनिराळ्या क्षेत्रातील भाष्यकार दिग्मूढ

झाले आणि आपापल्या परीने अधोगतीचा शोध घेऊ लागले. त्यांनी केलेल्या विश्लेषणाचा महत्तम साधारण विभाजक म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी आपण स्वार्थत्यागाच्या उर्मीने भारले गेलो होतो तर स्वातंत्र्यानंतर आपण स्वार्थप्रेरित झालो. मला स्वत:ला अशा विश्लेषणाचा अर्थच समजू शकत नाही. कारण आपण तर तेच होतो. बदलली होती फक्त परिस्थिती. बदललेल्या परिस्थितीमुळे आपल्यात बदल का व्हावा या प्रश्नाला नेमके उत्तर कोणाकडेच नव्हते. धर्मसंस्थापकांच्या, संतांच्या, आध्यात्मिक परंपरा लाभलेल्या या देशात स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर अधोगतीच्या दिशेने घोडदौड सुरु व्हावी, याच्या मागचे रहस्य उलगडत नव्हते. कोणी म्हणे नैतिक मूल्यांचा ऱ्हास सुरु झाला. आपल्यापुढे गांधी, टिळक यांच्यासारखे आदर्श नाहीत हा काही जणांचा शोध. चारित्र्याचा पेचप्रसंग (Crisis of character) नेतृत्वाचा पेचप्रसंग (Crisis of leadership) श्रद्धेचा पेचप्रसंग (Crisis of conviction) अशा निरनिराळ्या पेचप्रसंगांच्या सहाय्यानेही विश्लेषण करण्यात येऊ लागले. तथापि आपण का बदललो या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळत नव्हते. साहजिकच अनेकजण म्हणतात त्याप्रमाणे स्वातंत्र्यानंतर आपण खरोखरीच बदललो होतो का हा प्रश्न मला पडला आणि या प्रश्नाचे उत्तर शोधू लागलो. मतामतांच्या गलबल्यात ज्याचे विचार आजही दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत त्या न्या. रानडे यांच्या लेखनात अखेर माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले. शंभराहून अधिक वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या सर्व समस्यांचा वेध घेतला होता. आणि भारतीय व्यक्तिमत्वात योग्य तो बदल, हे त्या समस्यांवरील उत्तरही दिले होते. तथापि न्या. रानडे यांना अभिप्रेत असलेला बदल अजूनही घडून आलेला नाही. स्वातंत्र्यापूर्वी जे भारतीय व्यक्तिमत्वात होते ते स्वातंत्र्योत्तर कालातही तसेच राहिल्यामुळे आपल्या समस्या निर्माण झाल्या आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या समस्यांना तोंड देण्यासाठी ज्या व्यक्तिमत्वाची आवश्यकता होती ते आपण स्वातंत्र्यपूर्व कालात विकसित करू न शकल्यामुळे देशाची अधोगती सुरु झाली. आपल्यात कोणताच बदल झाला नसल्यामुळे साहजिकच स्वातंत्र्यपूर्व काल आणि स्वातंत्र्योत्तर

काल अशी विभागणीच त्यामुळे तर्कदुष्ट होते. अशी विभागणीच करावयाची असेल तर १९२० पूर्वीचा काल आणि नंतरचा काल अशी करावी लागेल. कारण १९२० पर्यंत आपणास व्यक्तिमत्वात बदल करण्याची गरज तरी भासत होती. परिस्थितीची सम्यक् जाण आणि तिला अनुरुप असा प्रतिसाद यातून व्यक्तिमत्वातील बदलाची प्रक्रिया सुरु होती. १९२० पर्यंत काय परिस्थिती होती? तोपर्यंत परिस्थितीचे भान सुटले नव्हते. पाश्चात्य शिक्षण, पाश्चात्य राजकीय संस्था, आर्थिक प्रगती इत्यादी संबंधी जाणीव निर्माण झाली होती. नवे प्रवाह आत्मसात करण्याच्या दिशेने प्रयत्नही सुरु होते. परंतु १९२० नंतर बहिष्काराच्या युगात हे सर्व संपले. ताबडतोबीने आपण काही गमावले असेल तर आपल्या समस्यांचे भान. १९२० ते १९६७ या कालखंडातील राजकीय घडामोडी आपली वास्तवापासून संपूर्ण फारकत झाली होती याचेच दर्शन घडवतात. आपली खरी समस्या होती आर्थिक प्रगतीची. त्याच्याकडे न्या. रानडे यांनी अतिशय जोरकसपणे लक्ष वेधले होते. तथापि संपत्तीच्या ओघाचा सिद्धान्त मांडून दादाभाई नौरोजींनी इंग्रजांना आपल्या दारिद्र्याबद्दल जबाबदार धरले आणि आर्थिक प्रगतीकडे आपले दुर्लक्ष झाले. शिक्षण क्षेत्राचा विस्तार होत होता, सामाजिक सुधारणांबद्दल पोटतिडिकेने लिहिले जात होते, राजकीय हक्कांसाठी अर्ज विनंत्या, आंदोलने चालू होती. पण आर्थिक आघाडीवर मात्र सामसूम होती. १९२० नंतर आश्रम संस्कृतीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर आर्थिक प्रगती आणि त्याच्याच बरोबरीने शिक्षण प्रसार, राजकीय संस्था राबवणे इत्यादींबद्दलही, बहिष्काराच्या ऊर्मीमुळे, आपण संपूर्ण उदासीन झालो, आणि भारतीय व्यक्तिमत्त्व खुरटलेलेच राहिले. या खुज्या व्यक्तिमत्वाला स्वातंत्र्योत्तर आव्हाने पेलवली नाहीत. त्यातून सार्वत्रिक ऱ्हासाला सुरुवात झाली. खिलाफत चळवळ किंवा मिठाचा सत्याग्रह यामुळे आपल्या आर्थिक अथवा कोणत्याही समस्या कशा सुटणार होत्या याचा मला अजूनही उलगडा होत नाही. भारताची खरी समस्या होती दारिद्र्य. त्यासाठी मोसमी पावसावरील शेतीचे परावलंबित्व कमी करणे, लोकसंख्या आटोक्यात ठेवणे, शिक्षणाचा आणि साक्षरतेचा प्रसार करणे, सहकारी

संस्थांतर्फे कुटिरोद्योग आणि लघु उद्योग सुरु करून शेतीवरील भार कमी करणे, कुळ कायदे, धरणे आणि पाटबंधारे यासाठी आंदोलन, आपण आपला आर्थिक अभ्युदय करून घेऊ शकतो अशी ऊर्मी रंजल्या गांजलेल्यात निर्माण करणे, इत्यादि उपाय होते. अशा तऱ्हेने सहकारातून आर्थिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला असता तर नव्या मनूला आवश्यक असे बदल भारतीय व्यक्तिमत्वात घडून आले असते व अशा संपन्न व्यक्तिमत्वाच्या भारतीयांच्या हाती भारताचे भवितव्य स्वातंत्र्योत्तर कालात सुरक्षित राहिले असते. पण आपल्याला ती दृष्टीच नव्हती. अवनत भारतीयत्वाच्या कोशात आपण आपल्याला बंदिस्त करुन ठेवले होते. आणि परकीय विचारवंत प्रशंसा करतात म्हणून आपली अवनती हेच आपल्याला आपले बलस्थान वाटत राहिले. १९२० ते ४७ या कालखंडात आपली राजकीय जागृती झाली असेही नेहमी म्हटले जाते. राजकीय जागृती म्हणजे राजकीय हक्कांची जाण आणि ते राबविण्याची इच्छा आणि क्षमता. त्याची नाम निशाणीही या काळात आढळत नाही. या ठिकाणी राजकीय जागृतीबाबतचे माझे अनुभव देणे वावगे होणार नाही. १९४४ ची गोष्ट आहे. प्रति सरकारने प्रचंड जागृती घडवून आणली असे म्हणतात. त्यांचा राबता होता त्या भागात आलेला हा अनुभव आहे. सेवादलाच्या शाखा सुरु कराव्या म्हणून मी आणि माझे सहकारी आजूबाजूच्या खेड्यातून हिंडत होतो. पण लोकांचा प्रतिसाद इतका थंड होता की आमचा उत्साह जागच्या जागीच जिरला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र अल्पावधीतच ही सर्व खेडी कॉंग्रेसमय झाली आणि आजतागायत ती तशीच आहेत. 'राजकीय जागृती' बाबतचा दुसरा अनुभव स्वातंत्र्योत्तर कालातील आहे. १९७१ च्या भारत-पाक युद्धात अनेक जवान कामी आले. त्यावेळी, अशिक्षितपणामुळे 'मुकी बिचारी कुणी हाका' अशा अवस्थेतील, त्यांच्या तरुण विधवांना ट्रकमध्ये घालून हुतात्म्यांच्या पत्नी म्हणून सातारा जिल्ह्यात गावोगाव हिंडवण्यात आले होते. 'हुतात्मा' या शब्दाचा अर्थही माहीत नसलेल्या, पतिनिधनामुळे सैरभैर झालेल्या आणि आपण आता सर्वस्वी निराधार झालो या एकाच भावनेचा मनावर पगडा असलेल्या या विधवांना अशा

तऱ्हेने प्रदर्शनीय वस्तु म्हणून मिरविण्याच्या प्रकाराची आठवण झाली म्हणजे आजही अस्वस्थ होतो. यात पुढाकार घेणारे काँग्रेसचेच कार्यकर्ते होते.

स्वातंत्र्यपूर्व पंचवीस वर्षातील स्थितिशीलता हेच आपल्या स्वातंत्र्योत्तर कालातील दुरवस्थेचे खरे कारण आहे. त्याचा वेध भारतीय व्यक्तिमत्वाच्या अनुरोधाने या प्रदीर्घ लेखात घेतला आहे. पहिल्या भागात शोध पद्धतीचे विवरण आहे. दुसऱ्या भागात भारतीय व्यक्तिमत्त्वाची वैगुण्ये विशद केली आहेत. तिसऱ्या भागात भारताच्या आधुनिकीकरणाचा शोध घेतला आहे. नंतरच्या भागात आधुनिकीकरणाला आपला काय प्रतिसाद होता याचे विवेचन केले आहे. शेवटच्या भागात आपल्या समस्यांचा आपल्या व्यक्तिमत्वाशी कितपत संबंध जुळतो याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या निरनिराळ्या भागातील प्रतिपादनाची एकमेकांशी सुसंबद्धता राखण्याच्या आवश्यकतेमुळे लेखाची मांडणी मला जटिल वाटत होती आणि त्यात मला कितपत यश आले याबद्दल मी जरा साशंक होतो. साहजिकच लेखाची तपासणी एखाद्या अधिकारी व्यक्तिकडून करुन घेण्याची आवश्यकता वाटत होती. सुदैवाने महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध विचारवंत प्रा. मे. पु. रेगे यांनी त्याबाबतीत सहकार्य दिले. अतिशय कार्यमग्न असतानाही वेळ काढून त्यांनी लेख वाचून काढला आणि त्यातील आशयाशी बहुश: सहमत असल्याचे कळविण्याचीही मोठी मेहेरबानी केली. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील.

- अरुण सारथी

# १

# शोध प्रस्थान

'भारत पुनरुज्जीवित होत आहे, उत्थित होत आहे, जागृत होत आहे आणि जगाच्या प्रगतीसाठी व संस्कृतीसाठी त्याने जगाला द्यावयाचे दान देण्यास तो सिद्ध होत आहे... आपल्यापैकी प्रत्येकाच्या हे लक्षात यावयास हवे, की आता योग्य वेळ आलेली आहे. सर्वत्र शुभशकून दिसत आहेत. सर्व ठिकाणी आपल्याला अनुकूल चिन्हे दिसत आहेत. भारताच्या तत्त्वज्ञानात्मक आणि आध्यात्मिक भावांनी पुन्हा एकदा जगभर संचार करून जग जिंकले पाहिजे.

'जगाला याची गरज आहे. त्याशिवाय जगाचा नाश ओढावेल. अवघे पाश्चात्य जग जणू एका ज्वालामुखीच्या तोंडावर बसले असून उद्याच त्या ज्वालामुखीचा स्फोट होऊन जगाचे तुकडे उडू शकतील.

'भारत पुन्हा उठेल यात संदेहच नाही पण जडाच्या शक्तीने नव्हे, चैतन्याच्या शक्तीने. विध्वंस-विनाशाचा झेंडा नाचवीत नव्हे, तर शांतिविजयाची पताका नाचवीत.

'आपल्याला मोठमोठी कामे करायची आहेत. अद्भुत शक्ती प्रकट करायची आहे. इतर जातींना कितीतरी गोष्टी शिकवायच्या आहेत... आपल्याला सगळ्यांनाच आता कठोर परिश्रम करावे लागतील, खूप झटावे लागेल.

'एक जिवंत दृश्य माझ्या दृष्टीला दिसत आहे. आपली ही प्राचीन भारतमाता पुनश्च जागृत झाली आहे. नवसंजीवन लाभून पूर्वीपेक्षाही अधिक महिमाशाली होऊन आपल्या सिंहासनावर गौरवाने

अधिष्ठित झाली आहे.'

– स्वामी विवेकानंद

'आज अद्यापही आपण जगाच्या इतिहासातील संक्रमणावस्थेतच राहात आहोत. तथापि आता हे आधीच स्पष्ट होत आहे की, (जगाच्या इतिहासातील) ज्या अध्यायाला पश्चिमेने सुरुवात केली तिचा शेवट मात्र भारतीय पद्धतीनेच होण्याची गरज आहे. अन्यथा त्याचा शेवट मानवजातीच्या आत्मघाताने होणार हे निश्चित आहे.'

– आर्नोल्ड टॉयन्बी

'अध्यात्माने जग जिंका' हा संदेश विवेकानंदांनी भारताला दिला. भारत पुन्हा चैतन्याच्या शक्तीने उठेल असा अशावादही व्यक्त केला. आर्नोल्ड टॉयन्बी यांनी आत्मघात टाळावयाचा असेल तर जगाला अखेर भारताच्याच मार्गाने जावे लागेल असा इशारा दिला. त्यांच्याप्रमाणेच भारताच्या उज्ज्वल आध्यात्मिक परंपरेने भारावून गेलेल्या अनेक विचारवंतांनी भारताबद्दल अत्यंत गौरवाने लिहिले आहे. या पार्श्वभूमीवर आज भारतात जे आढळते ते विलक्षण धक्कादायक आणि भेसूर आहे. हुंडाबळी, भ्रष्टाचार, लाचलुचपत, दहशतवाद, जातीयवाद, अकार्यक्षमता, दैन्य, लाचारी आणि मुजोरी, श्रीमंतीचे किळसवाणे प्रदर्शन, काळा पैसा, तस्करी, गुंडगिरी, निवडणुकीतील पैसा आणि बल यांचा अनिर्बंध वापर, भ्रष्ट राज्यकर्ते आणि असहाय्य जनता, कणाहीन आणि बेपर्वा नोकरशाही, बेशिस्तपणा, सामाजिक बेफिकिरी अशा अनेक गोष्टींनी थैमान घातले आहे. ही यादी आणखीही वाढविता येईल. या सर्वांचा भारतीय अध्यात्माबरोबर कसा ताळमेळ घालायचा ?

वस्तुस्थिती अशी आहे, की भारतीय जीवनातील ज्या अनिष्ट पैलूंचा उल्लेख वर केला आहे त्यांना स्वातंत्र्यानंतर अधिकच बल प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्यापूर्वी असे प्रकार होत नसत असे नव्हे; पण अशा अपकृत्यांत गुंतलेल्या लोकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन भिन्न होता. त्यांना अध:पतित समजले जात असे. पण आज यापैकी अनेक गोष्टींना सामाजिक प्रतिष्ठा लाभली आहे, तर काहींच्या बाबतीत समाज उदासीन आहे. भ्रष्टाचार आणि लाचलुचपत शिष्टाचार झाले आहेत. दहशतवाद्यांना हुतात्मे समजले जाते. जातीयवाद्यांना राजकीय आसरा मिळत आहे. उदा. शाही इमाम बुखारी यांचा अनुनय पुरोगामी राजकीय पक्ष करीत आहेत. काळा पैसावाले, तस्कर, गुंड यांना साधनशुचिता मानणारे पक्षही निवडणुकीचे तिकीट देत आहेत. स्त्रीचा विनयभंग करणारा मंत्री बनतो आणि अनेक ठिकाणांहून त्याला उद्घाटनाची वगैरे आमंत्रणे येतात. एखाद्या मुख्यमंत्र्याने १०० कोटी जमवले की अधिक, याची

चर्चा मोठ्या चविष्टपणे चालते आणि त्याच्या संघटनकौशल्याची वाखाणणी भाडोत्री संपादक करीत असतात. हुंडाबळीला कारणीभूत झालेल्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जात नाही किंवा त्याला दुसरी पत्नी मिळण्यास अडचण पडत नाही. दैन्य, बेशिस्तपणा इत्यादींबद्दल आध्यात्मिक वारशाचा अभिमान बाळगणारे संपूर्णपणे उदासीन आहेत. आपण या सर्व बाबतीत काहीच लागत नाही अशी स्थितप्रज्ञता समाजाने अंगी बाणवली आहे. या सगळ्या गोष्टींची खंत बाळगणारे समाजात नाहीत असे नाही; पण उत्तरोत्तर त्यांचा संप्रदाय कमी कमी होत आहे.

हे असे का ? वास्तविक स्वातंत्र मिळाल्यानंतर भारताच्या आध्यात्मिक वारशाचे दर्शन सर्व क्षेत्रांत घडावयास हवे होते. पण त्याऐवजी अधोगतीच्या मार्गाने आपली घसरण अधिकाधिक वेगाने होत आहे आणि त्याचा विचार करण्यासाठी कोणाला वेळ नाही. प्रत्येकजण कोणत्याही मार्गाने जास्तीत जास्त पैसा मिळविण्याच्या धडपडीत असताना दिसतो. वास्तविक राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील होणे यात काहीच गैर नाही. पण ते करत असताना नीतिमूल्यांचा बळी देणे हा आता सर्वमान्य मार्ग झाला आहे. डॉक्टर, वकील, इंजिनिअर, प्राध्यापक, शिक्षक इत्यादींना आपला व्यवसाय हे जीवितकार्य (मिशन) आहे असे वाटत नाही. केवळ पैसा मिळवण्याचे साधन म्हणूनच ते त्याकडे पाहात असतात. एवढेच नव्हे, तर तो प्रामाणिकपणे केला पाहिजे याचीही त्यांच्यापैकी अनेकांना चाड नसते.

पाश्चात्य जगाकडे जडवादी म्हणून उणेपणाने पाहण्याची एक फॅशन आपल्यात रुढ झाली आहे; पण वास्तवात आपण त्यांच्यापेक्षाही अधिक उपभोगवादी झालो आहोत. आणि आपला उपभोगवाद अधिक भयावह आहे. कारण अनीती आणि सामाजिक बेफिकिरी या पायावर तो उभा आहे. कोसळणारे पूल आणि इमारती, अन्न आणि औषधातील भेसळ, रोग्यांबद्दलची बेफिकिरी ही त्याची काही उदाहरणे आहेत आणि आपण अशा गोष्टींना सरावलो आहोत. हे सर्व प्रकार नजरेआड करून एखाद्या पंचतारांकित हॉटेलमध्ये परिसंवादात भाग घेतला आणि भारताच्या आध्यात्मिक वारशाचे गुणगान केले म्हणजे भारताच्या प्राचीन परंपरेचे झेंडे विश्वात नाचवल्याचे समाधानही मिळवता येते. पंचतारांकित संस्कृती भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीशी कितपत सुसंगत आहे हा प्रश्नही मग आपल्याला पडत नाही.

वस्तुतः पाश्चात्य देश जडवादी असूनही सार्वजनिक जीवनात तेथे नीतिमूल्ये पाळली जातात. निवडणुकीत आपल्यासारखे गैरप्रकार होत नाहीत. आध्यात्मिक वारशाचा अभिमान बाळगणाऱ्या नेहरूंनी निवडणुकीचे जादूगार म्हणून अनेक गणंगांना

जवळ केले होते, त्याप्रमाणे तेथे केले जात नाही. प्रेसिडेंट निक्सन यांनी असला गोतावळा जमा केला तर त्यांनाच जावे लागले. तेथील कर्मचारी वेळेवर कामावर जातात आणि कार्यालयात काम करतात. प्राध्यापक ज्ञानार्थी आहेत. याउलट, आपण सामाजिक जीवनात कोणतीही नीतिमूल्ये पाळत नाही. पाश्चात्य देश जडवादी असतीलही, आपण मात्र जिभेवर अध्यात्म ठेवून निखळ उपभोगवादी झालो आहोत.

भारताला अत्यंत उज्ज्वल असा आध्यात्मिक वारसा लाभला आहे हे निस्संशय ! पण आपण आज त्याचे वारसदार नाही हे तितकेच खरे. आध्यात्मिक वारसा आणि आजची नैतिक दिवाळखोरी यांची सांगड कशी घालावयाची ? रात्री झोपण्यापूर्वी तुकारामाची गाथा, ज्ञानेश्वरी किंवा दासबोध वाचायचाच, असा नेम कटाक्षाने पाळणारे, सकाळ झाली की स्नानाबरोबरच या ग्रंथातून प्रतीत झालेले अध्यात्मही धुऊन काढतात, हा विसंवाद का ? ब्रह्म आणि माया यावर अत्यंत भाविकतेने निरूपण करणारे प्रवचनकार, प्रवचन संपले की व्यवहार वेगळा आणि परमार्थ वेगळा असे अत्यंत कृतार्थपणे का सांगतात ? अपरिग्रहाचा संदेश देणाऱ्या महावीराच्या अनुयायांतच आर्थिक साहसखोरी अतिरिक्त प्रमाणात का, आणि आपल्या संपत्तीचे किळसवाणे प्रदर्शन ते का करतात ? सत्य आणि अहिंसेचा संदेश देणाऱ्या भारतात गुंडगिरी आणि दहशतवाद यांचे थैमान का ? हे आणि असे अनेक प्रश्न. त्यांची उत्तरे मिळण्यासाठी भारताच्या आध्यात्मिक वारशाचे स्वरूप प्रथम नेमकेपणाने समजावून घेऊन नंतर भारतीय संस्कृतीचा वेगळ्या दिशेने शोध घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

## भारताचा आध्यात्मिक वारसा

अध्यात्म आणि आध्यात्मिक वारसा या संज्ञा आपण अतिशय सैलपणाने वापरतो. पाश्चात्य देश जडवादी आहेत आणि त्यांच्या विरोधात आपण आध्यात्मिक आहोत हा एकंदर भावार्थ. अध्यात्म म्हणजे औपनिषदिक तत्त्वज्ञान, बुद्ध आणि महावीर यांची शिकवणूक, संतांनी सांगितलेला भक्तिमार्ग, त्यांनी दिलेला आध्यात्मिक समतेचा संदेश वगैरे, वगैरे, अशी काहीतरी संदिग्ध खूणगाठ आपण बांधलेली असते. थोर तत्त्ववेत्ते आणि संत यांची आपल्याला फक्त नावे माहीत असतात. शिकवणूक थोड्यांनाच समजलेली असते आणि उमजलेले तर अत्यल्प. ही अवस्था सुशिक्षित वर्गाची. अडाणी वर्गाबद्दल तर बोलायलाच नको. या विधानाने अनेकजण रुष्ट होतील हे मला माहीत आहे. कारण भारतीय अध्यात्म गरिबांच्या झोपडीतच आढळते, असा अनेकांचा गोड गैरसमज आहे आणि त्याबद्दल ते अगदी गहिवरून बोलत असतात. वस्तुस्थिती अशी आहे, की दारिद्र्याने शिकवलेले शहाणपण हेच झोपडीतले

अध्यात्म असते. असहाय्य परिस्थितीशी जमवून घेण्यासाठी कोणत्यातरी तत्त्वज्ञानाची नेहमीच गरज असते. कुठेतरी ऐकलेली चार संतवचने तोंडी असतात. ती ही गरज भागवतात. अध्यात्माचे असे उत्स्फूर्त प्रदर्शन बघून ऐकणारा भारावून जातो. आणि अशा गरीब व्यक्तीवरील अध्यात्माच्या प्रभावाने पुलकित होतो. खरोखर दारिद्र्याशी त्याची जी तडजोड असते त्यालाच आपण अध्यात्म समजतो. याच लोकांच्या हातात चार पैसे खेळू लागले म्हणजे त्यांचा जो कायापालट घडून येतो तो पाहिला म्हणजे त्यांच्या अध्यात्मामागचे इंगित उलगडते. गेल्या चाळीस वर्षांत खेड्यातील जीवनात जो बदल घडून येत आहे त्याच्याशी परिचित असलेल्या प्रत्येकाला झोपडीतील अध्यात्म ही काय चीज आहे हे पूर्णपणे जाणवलेले आहे. ग्रामीण भागात आज टगेगिरी करणाऱ्यांपैकी अनेकजण तथाकथित आध्यात्मिक परंपरा असलेल्या कुटुंबातील आहेत. श्रीमंतवर्गाचा अध्यात्माशी संबंध केवळ करमणूक म्हणूनच असतो. कामाच्या दगदगीतून सुटका म्हणून त्यांच्यापैकी काहीजण सुखोपभोग, काहीजण क्लबमध्ये तर काहीजण प्रवचनात आपले मन गुंतवतात.

त्याशिवाय, कोंबडी, बोकड यांचा बळी देण्याची प्रथा ठिकठिकाणी आढळते. तंत्रमंत्र, जारण-मारण, दगडाची पूजा असे अनेक प्रकार आढळतात. देवदासीची प्रथा चालू आहे, दलितांवर अत्याचार होत आहेत. हे सर्व भारतीय आध्यात्मिक वारशाशी कितपत सुसंगत आहे. अनेक आदिवासी जमाती आहेत. त्यांचा भारतीय अध्यात्माशी कसा काय संबंध जुळवून आणायचा ? भारतीय मुसलमान आणि ख्रिश्चन हे आपल्याला भारतीय अध्यात्माचे कितपत वारसदार समजतात ? सारांश भारतीय अध्यात्म हा आज संपूर्णपणे विसरला गेलेला वारसा आहे. सद्यःकालच्या भारताचा त्याच्याशी काहीही संबंध उरलेला नाही.

खरे तर भारताचा आणि अध्यात्माचा खरोखरीच कधी काही संबंध होता का याची शंकाच वाटते. बुद्ध, महावीर, औपनिषदिक तत्त्ववेत्ते, गीता आदी धर्मग्रंथ यांचा अध्यात्माशी संबंध होता. पण इतरत्र सर्व आनंदच होता. अनेक बायका केल्या जात होत्या. रखेल्या ठेवल्या जात होत्या, गणिकांकडे जाणे निषिद्ध नव्हते. लढाया होत होत्या, राज्ये जिंकली जात होती, सुखोपभोग आणि विलास यात कमतरता नव्हती. हे झाले सत्ताधारी आणि सुखवस्तू वर्गाबाबत. जनसामान्य गतानुगतिक जीवन जगत होते. दुष्काळ पडला म्हणजे अनेकजण मरत होते. सुबत्ता असली म्हणजे हर्षभरित होत होते आणि कथाकीर्तन, भजने, सणवार यांत समरसून भाग घेत होते. त्यातून ऐहिक जीवनात जी कमतरता असेल त्याचे तत्त्वज्ञान करण्यास

भरपूर वाव मिळत होता. एक स्थितिशील समाज आणि त्याला अनुरूप असे भारतीय व्यक्तिमत्त्व तयार होत होते. आणि या स्थितिप्रियतेलाच अध्यात्म समजण्यात येऊ लागले. त्यातून भारत हा आध्यात्मिक देश आहे ही 'मिथ' तयार झाली. त्यालाच कवटाळून आपली पारंपरिक मूल्ये नष्ट झाली अशी हाकाटी करण्यात येऊ लागली. ही पारंपरिक मूल्ये म्हणजे असहाय्यतेतून निर्माण झालेली तडजोड होती. आपण अहिंसक होतो, कारण हिंसा करण्याची आपल्याला हिंमत नव्हती; पण कोंबड्या, बकरीचा देवाला बळी देण्यास हरकत नव्हती. 'देवो दुर्बल घातक:' असे आपण त्याचे तत्त्वज्ञान बनविले. आपण परधर्मसहिष्णू होतो, कारण एखादा बाटला तर त्याचे आपल्याला सोयरसुतक नव्हते. उलट, त्याला अध:पतित समजून समाधान पावत होतो. आपण शांतताप्रिय होता; कारण शांततेचा भंग कशासाठी करावयाचा हेच आपणास माहीत नव्हते. आपल्याला धर्मप्रसार करावयाचा नव्हता की साम्राज्यविस्तार करावयाचा नव्हता. कारण आपल्याला ती दृष्टीच नव्हती. आपल्याला फक्त वतने हवी होती. आणि त्यासाठी इतिहासात गाजावाजा न झालेल्या लढाया, तंटेबखेडे, रक्तपात चालूच होते. वेळप्रसंगी त्यासाठी स्वत्त्वही गमावण्याची आपली तयारी होती. शांतता का हवी असते आणि ती केवळ सामर्थ्याच्या भूमिकेतूनच टिकविता येते हे जाणणारा अशोक आणि स्वराज्य म्हणजे विस्तारित वतन नव्हे, तर ते एक संगठन असते हे उमजलेला शिवाजी, हे केवळ अपवाद होत. इतर केवळ गतानुगतिकत्वाने अहिंसक, धर्मसहिष्णू आणि शांतताप्रिय होते. हीच आपली पारंपरिक मूल्ये आणि आपले अध्यात्म. परकीयांना तीच लोभसवाणी वाटली आणि टॉयन्बीसारखे विचारवंत त्याने भारावून गेले. कोणताही जोम नसलेल्या समाजाची ही लक्षणे आहेत, हे त्यांना कधीच उमगले नाही. पाश्चात्य विचारवंतांच्या स्तुतीने आपण नेहमीच हुरळून जातो. परिणामी भारत हा आध्यात्मिक देश आहे असा आपण आपल्यावर आरोप करून घेऊ लागलो. या सर्व प्रदर्शनाच्या मागे वास्तव काय दडले आहे हे जाणून घेण्यासाठी भारतीय व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे आवश्यक आहे. आणि त्यातच आपल्या आजच्या दुरवस्थेची बीजे आढळून येतील. तसेच आपण आध्यात्मिक वारसा विसरलो म्हणून आजची दुरवस्था नव्हे हेही स्पष्ट होईल.

**शोधपद्धती**

उत्पादनाच्या साधनात झालेल्या बदलांच्या अनुषंगाने इतिहासाची उपपत्ती लावणे ही मार्क्सप्रणीत ऐतिहासिक पद्धती. या पद्धतीचा कदाचित इतिहासाचा दीर्घकालीन वेध घेण्यास उपयोग होत असेल, पण अल्पकालीन इतिहासाचा अन्वयार्थ लावण्यास

मात्र ही पद्धत उपयुक्त नाही. हा अल्पकाळ कधी कधी हजार वर्षेदेखील असू शकतो. या अल्पकालात बलवत्तर असते ती समाजाची संस्कृती. उत्पादनाची साधने आणि पर्यावरण यांच्या संयोगातून संस्कृतीची निर्मिती होते. अधिक नेमकेपणाने म्हणायचे तर जीवनसंघर्षातून संस्कृती उद्‌भवते. संस्कृतीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे परिस्थिती बदलली तरी संस्कृतीचा प्रभाव काही काल कायम राहतो. साहजिकच एखाद्या प्रदेशाचा विशिष्ट कालातील इतिहास तेथील संस्कृतीच्या अनुरोधानेच नेमकेपणाने समजू शकतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. अमेरिकेचा इतिहास जेमतेम तीनशे वर्षांचा. तेथील वसाहतीची निर्मिती झाली ती साहसातून. अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध हे साहसच होते. यादवी युद्ध हाही साहसाचाच प्रकार. देशाची फाळणी होऊ नये म्हणून अमेरिका चार वर्षांहून अधिक काल यादवी युद्धात गुंतली गेली. याउलट, भारताने किती सहजपणाने फाळणीचा स्वीकार केला ! संस्कृतीचा देशाच्या इतिहासावर कसा परिणाम होतो याचे हे एक उदाहरण. १९ व्या शतकात अमेरिकेचा पश्चिमेकडे जो विस्तार झाला त्याचा इतिहास म्हणजे विलक्षण चित्तथरारक अशी साहसगाथाच आहे. वैराण असा अलास्का हा भूप्रदेश अमेरिकेने रशियाकडून विकत घेतला तेही एक साहसच होते. अमेरिकेचा इतिहास अशा साहसाने भरलेला असल्यामुळे तिच्या सर्वच धोरणात साहसखोरपणा आढळतो. तारकायुद्ध, विएतनाम युद्ध, दक्षिण अमेरिकन राज्यातील अमेरिकेची ढवळाढवळ, वैयक्तिक जीवनातील स्वैराचार, समलिंगी संभोग हे सर्व साहसखोरीतूनच निर्माण झाले आहे. अमेरिकेच्या साहसवादाचे अगदी अलीकडील उदाहरण म्हणजे इराक-युद्ध. कुवेतवर आक्रमण करून इराकने पेट्रोलच्या जागतिक पुरवठ्याचा तोल संपूर्णपणे बिघडवून टाकला होता व जागातील सर्वच देशांना त्याचे परिणाम जाणवणार होते. त्यासाठी कुवेतचे सार्वभौमत्व पुनर्प्रस्थापित करण्याची निकड त्या सर्वांनाच भासत होती. पण इराककडे अण्वस्त्रे आहेत या धास्तीखाली इराकवर प्रति-आक्रमण करण्याची कोणत्याच देशाची मानसिक ताकद नव्हती. सर्वच युद्धे साम्राज्यवादी असतात असा साम्यवाद्यांचा आवडता सिद्धांत. पण आर्थिक हितसंबंध अत्यंत अनिष्टपणे दुखावले जाणार असूनही त्यासाठी युद्ध करण्याची कोणत्याही देशाची तयारी नव्हती. वस्तुस्थिती अशी होती की, आर्थिक हितसंबंधांच्या रक्षणाच्या निकडीपेक्षा युद्धासाठी अधिक गरज होती ती धोका पत्करण्याची आणि ते साहस फक्त अमेरिकाच दाखवू शकत होती. साहसवाद हा तिच्या संस्कृतीचा अविभाज्य असा घटक आहे. त्यामुळे अमेरिकेने पुढाकार घेतला नसता तर इतर देशांनी सबुरीचेच धोरण स्वीकारले असते. आणि इराक युद्ध झालेच नसते. याचा सरळ अर्थ असा

की, आर्थिक हितसंबंधांपेक्षा अमेरिकेचा साहसवाद हेच युद्धाचे मूळ कारण होते. इतर कोणत्याही घटकांपेक्षा अखेर संस्कृती हीच बलवत्तर ठरते. अमेरिकेच्या इतिहासाचा अन्वयार्थ तेथील आर्थिक प्रगतीच्या संदर्भात लावता येतो. पण आर्थिक प्रगतीदेखील साहसखोरीचाच आविष्कार आहे. याउलट, इंग्लंडचा इतिहास, तिने ज्या व्यापारी संस्कृतीचे संवर्धन केले तिच्या संदर्भातच समजून घ्यावा लागतो. आर्थिकदृष्ट्या परवडेनासे झाल्याबरोबर इंग्लंडने साम्राज्याचे ताबडतोब विसर्जन करून टाकले. रशियातील स्टॅलिनची राजवट ही झारशाहीच्या क्रौर्याचे आणि निरंकुश सत्तेचे परिपूर्ण रूप होय. हिटलरचा जर्मनी हा जर्मन लष्करवादाची परिणती होती. अशाच तऱ्हेने इतर देशांचाही इतिहास तेथील संस्कृतीच्या संदर्भातच उमजून घ्यावा लागतो. पाकिस्तान, इराण व इतर मुस्लिम देशांचा इतिहास इस्लामी संस्कृतीच्या अनुरोधानेच तपासता येतो. आफ्रिकेतील नव्याने स्वतंत्र झालेल्या कित्येक देशांच्या इतिहासाचा शोध तेथील टोळीवादी संस्कृतीच्या अनुषंगानेच अवगत करून घ्यावा लागतो. भारतीय इतिहासाच्या बाबतीतही त्याच पद्धतीचा अवलंब करावा लागेल. भारतावर अनेक आक्रमणे झाली. भारताचा इतिहास म्हणजे मुख्यत्वेकरून या आक्रमणांना भारताने दिलेल्या प्रतिसादाचा इतिहास होय. आपल्या परकीयांशी आलेल्या संपर्काचा शेवटचा टप्पा म्हणजे इंग्रजी राज्याची भारतात स्थापना. आधुनिक भारताचा इतिहास म्हणजे भारतीय संस्कृतीने किंवा तिने साकार केलेल्या भारतीय व्यक्तिमत्त्वाने इंग्रजी राजवटीला दिलेला प्रतिसाद. इंग्रजांशी आलेल्या संबंधामुळे भारताने पाश्चात्य लोकशाही संस्थांचा स्वीकार केला. स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास म्हणजे भारतीय व्यक्तिमत्त्व, या आव्हानाला कशा तऱ्हेने सामोरे गेले त्याचा इतिहास. साहजिकच आधुनिक भारताचा शोध घेताना भारतीय व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करणे अपरिहार्य ठरते.

# २

# भारतीय व्यक्तिमत्त्व

●

गेल्या तीन हजार वर्षांत आपली जी अवनती होत आली आहे तिला जबाबदार असणाऱ्या कल्पना किंवा अंत:प्रवृत्ती काय असाव्यात ? त्या थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येतील. १) अलिप्तपणा किंवा आत्मसंतुष्टता, २) सदसद्विवेक बुद्धीच्या सांगणीपेक्षा सत्ता अथवा शक्ती यांच्यापुढे मान तुकवणे, ३) वंश आणि जन्म यांच्यावरून माणसामाणसात काल्पनिक भेद मानणे, ४) अन्यायाला अथवा अपराधाला मुकाट्याने मान्यता देणे आणि आंधळ्या दैववादापर्यंत मजल जाईल एवढे ऐहिक कल्याणाकडे सर्वसाधारण दुर्लक्ष. आपल्या समाजव्यवस्थेच्या बुडाशी या वृत्ती आहेत. साहजिकच त्यांचा परिणाम सध्याच्या कौटुंबिक व्यवस्थेतही झालेला दिसतो. तीमध्ये स्त्री ही सर्वस्वी पुरुषाच्या आणि खालच्या जाती वरच्या जातींच्या दास्यात राहात आहेत. इतक्या की मनुष्यत्वाविषयीचा स्वाभाविक आदरही त्यांच्याबद्दल उरला नाही.

शिस्त आणि नियंत्रित सत्ता यांविषयीची आवड ज्या गुणांची द्योतक असते असे अनेक गुण हिंदू आणि मुसलमान या दोघांतही नाहीत. तसेच स्थानिक स्वराज्याची आस्था, सामुदायिक जीवनास आवश्यक असणाऱ्या गुणांचे आचरण, यांत्रिक कौशल्याकडे स्वाभाविक कल, शास्त्रे आणि संशोधन यांचे प्रेम, साहसपूर्ण शोधांची हौस व त्यास लागणारी धडाडी, अडचणींचा परिहार करण्याचा निर्धार आणि स्त्रीदाक्षिण्य या गुणांची दोघांतही वाण आहे. जुनी हिंदू संस्कृती अथवा जुनी मुसलमान संस्कृती यांपैकी एकीमध्येही लोकांना या गुणांचे शिक्षण

देऊन युरोपच्या पायरीवर भारतीय जनतेस आणून सोडण्याचे सामर्थ्य नव्हते. म्हणून शिक्षणाचे कार्य पुन्हा आरंभावे लागेल.

'चिकाटी हा इंग्रजांच्या अंगी अमोलिक गुण आहे. तो हिंदूंनी आपल्या अंगी बाणवला पाहिजे. धीमेपण आणि निश्चयाचे बळ हे आणखी दोन गुण हिंदूंनी आपल्या स्वभावात रुजविण्याची आवश्यकता आहे. हिंदू समाजात निरुत्साह, निराशा, उदासीनता वगैरे दोष वसत आहेत, ते घालविणे जरूर आहे... हिंदूंमध्ये अशा गुणांचा मिलाफ आढळत नाही. कोणी अतिशय विलासमग्न आढळतील. तर कोणी सर्वसंग परित्यागी सापडतील. युरोपियन व देशी गुणांचे माफक प्रमाणात मिश्रण झाले तर दुसरे वरचढ इष्ट ते काय असू शकणार ? आपल्याला युरोपियनांसारखे बहुगुणी शिक्षक लाभले म्हणून हिंदूंनी आनंद मानला पाहिजे.'

– न्या. रानडे.

न्या. रानडे यांनी भारतीय व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर उलगडून दाखविले आहेत, तथापि प्रस्तुत विवेचनासाठी काही पैलूंचा अधिक विस्ताराने परामर्ष घेण्याची जरूर आहे.

सुरुवातीलाच हे स्पष्ट केले पाहिजे, की भारतीय व्यक्तिमत्त्वाची काही वैशिष्टचे खाली विशद केली आहेत, याचा अर्थ असा नव्हे की, ती भारतीयांचीच मक्तेदारी आहे. ती इतरत्रही आढळू शकतात. दुसरे म्हणजे भारतीय व्यक्तिमत्त्व म्हणजे सर्वसाधारणपणे हिंदू व्यक्तिमत्त्व. येथे मी फक्त त्यांच्या वैगुण्यांचाच उल्लेख केला आहे.

१) भारतीय व्यक्तिमत्त्वात परमार्थासाठी एक आणि व्यवहारासाठी दुसरा असे स्वतंत्र कप्पे (कंपार्टमेंटलायझेशन) आढळतात, आणि त्यांचा एकमेकांशी संबंध येत नाही. त्यामुळे परमार्थात अनुस्यूत असलेल्या शाश्वत नैतिक मूल्यांच्या प्रभावाने संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे उन्नयन होण्याऐवजी, व्यवहार आणि परमार्थ संबंधहीन राहिल्यामुळे, हिंदू व्यक्तिमत्त्वावर बाजारी मूल्यांचाच वरचष्मा राहिला आहे. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मीयांमध्ये मात्र नैतिक मूल्यांचा प्रभाव व्यावहारिक आचरणावर पडलेला दिसतो. समता हे इस्लामचे एक मूलतत्त्व. त्यामुळे मुसलमान आपल्या नोकराबरोबर एकाच मेजावर जेवताना कधी आढळू शकतो. धर्मनिष्ठ मुसलमान कुराणाच्या आदेशाप्रमाणे व्याज घेत नाही. बँकांमधून किंवा इतर काही कारणाने अनायासे व्याज खात्यावर जमा झालेच तर त्याचा विनियोग धर्मार्थ केला जातो. शासकीय नोकरीतील चातुर्वर्ण्याबाबत हिंदू फार कडवा असतो. पण मुसलमान अधिकाऱ्यांच्या ती बाब

लक्षात येत नाही. आतिथ्यशीलता हा इस्लामचा आणखी एक गुणविशेष. वेदकालापासून अतिथी धर्माचे महत्त्व सांगितले असूनही हिंदूंच्या घरात शिरले तर बऱ्याच वेळा मालकाच्या कपाळावर एक सूक्ष्मशी आठी आढळते. काही वेळेला दरवाजातच आपले काम निपटून टाकले जाते. अर्थात झोपडीत अजूनही आतिथ्यशीलता आढळते, पण त्याची कारणे वेगळी आहेत. १) आतिथ्य हा कृषिसंस्कृतीचा एक विशेष आहे. शेतकऱ्याला माणसाची नेहमीच जरुरी असते. झोपडीत राहणाऱ्यांचे कृषिसंस्कृतीशी अजून पाश तुटलेले नाहीत. २) झोपडीत राहणाऱ्याला गप्पागोष्टी हीच प्रमुख करमणूक असते. ३) कित्येक वेळा सुखवस्तू माणसाने आपल्या घरी पायधूळ झाडली याचे त्याला अप्रूप असते. पण या सर्वांचा धर्माशी संबंध नाही. 'अतिथी देवोभव' या विश्वासापोटी त्याची अगत्यशीलता निर्माण झालेली नसते. झोपडीतून फ्लॅटमध्ये जर त्याचे स्थलांतर झाले तर त्याची आतिथ्यशीलता आटते. आरोग्यसेवा ही मुळात ख्रिश्चन धर्मामध्ये चर्चच्या अखत्यारीत होती. त्यामुळे ख्रिश्चन डॉक्टर विशेषत: कॅथॉलिक आपल्या पेशाकडे जीवितकार्य म्हणूनच पाहतात. एक प्रसंग आठवतो. माझे एक परिचित एका मिशन हॉस्पिटलमध्ये तपासून घेण्यासाठी गेले होते. नंतर सहज बोलत असताना डॉक्टरांना, परिचितांचे वडील डॉक्टर असल्याचे समजले. निघताना परिचिताने बिलाबाबत विचारले. तेव्हा डॉक्टर सात्त्विक संतापाने उद्गारले, 'तुम्हाला मला नरकात धाडायचे आहे का ?' डॉक्टरच्या कुटुंबियांकडून पैसे घ्यायचे नाहीत हे मूल्य त्यांनी कटाक्षाने पाळले होते. आपल्याकडे याच्या नेमका उलटा अनुभव येतो. काही वेळेला हिंदू डॉक्टरही हे तत्त्व पाळताना दिसतात. पण त्याच्यामागे धंद्याची दृष्टी असते. हिंदू व ख्रिश्चन नर्सेसच्या वागणुकीतली तफावत तर सहज लक्षात येण्यासारखी असते.

हिंदूंच्या बाबतीत व्यवहार आणि परमार्थ याची संपूर्ण फारकत झालेली असल्याने हिंदू समाजात कोणतेही सामाजिक मूल्य उत्क्रांत झाले नाही. आपली सर्व पुराणे चाळली तरी समाजासाठी झिजल्यामुळे एखादा स्वर्गात गेला असा बोध करणारी गोष्ट सापडत नाही. व्यवहार आणि परमार्थ यांची सांगड आपल्या समाजाला केव्हाच घालता आली नाही. त्यामुळे मुंग्यांना भूतदया म्हणून मूठभर साखर घालणारा व्यापारी, चणचण झाली असताना पोतेभर साखरेचा काळाबाजार सदसद्विवेकबुद्धीची कोणतीही टोचणी न लागता करतो. भूतदयेचे हे खूळ कोणत्या अवस्थेला पोहोचले होते, याचे वर्णन एका परदेशी प्रवाशाने केले आहे. ढेकूण उपाशी राहू नयेत म्हणून ढेकणांनी भरलेल्या खाटेवर रात्रभर झोपण्याकरिता माणसे भाड्याने घेण्याची पद्धत होती. पण

ही भूतदया जिवंत माणसांच्या मात्र कामी येत नसे. मारवाडी त्यांच्या मंदिरात जे केशर वापरतात ते भेसळरहित असावे याबद्दल अत्यंत दक्ष असतो. पण तेवढे केल्यानंतर अन्नात भेसळ करण्यास त्याला अधिकच बळ प्राप्त होते. एकनाथांनी गाढवाला गंगाजल पाजले तेव्हा सर्वांनाच त्यामुळे अचंबा वाटला. खरी भूतदया आपण समजूच शकत नाही. त्यामुळे एकनाथांसारख्या संतांच्या भूतदयेची बाधा इतरांना होऊ नये म्हणून त्या घटनेला, ते गाढव म्हणजे परमेश्वरच होता, अशी पुस्ती जोडली गेली. संतांनी मानवधर्म शिकवला. पण ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, दासबोध यांचे नित्यपठण करणारांपैकी कितीजणांच्या व्यावहारिक आचरणात किंवा मनोवृत्तीत मानवतेचे प्रतिबिंब आढळते ? अडल्यानडल्यांच्या बाबतीत कितीजण सहानुभूती दाखवितात ? तुलसीरामायण मुखी असणाऱ्याला 'दया धरम का मूल है' हे वचन सहसा भावत नाही. तो 'अभिमान' आत्मसात करून पापमार्गानेच जातो. भाविकपणे यथासांग पूजाअर्चा करणारा, अध्यात्मिक गुरूंना घरी बोलावून त्यांचा आदरसत्कार केल्यामुळे पुनीत झालो असे वाटणारा, आध्यात्मिक प्रवचने न चुकता ऐकणारा, धंद्याच्या बैठकीवर बसला की खोटे कागदपत्रही करण्यास तयार असतो. असे प्रकार इतर धर्मीयांत आढळत नाहीत असे नाही; पण त्या कृत्याचे निदान समर्थन तरी केले जात नाही. आणि काहीजणांना तरी आपण गैरकृत्य केल्याची बोचही असते. हिंदू समाजात मात्र अशा कृत्याचे व्यवहार वेगळा आणि परमार्थ वेगळा म्हणून समर्थन केले जाते.

परमार्थ हा अखेर एक नैतिक विचार असतो. त्याची व्यवहारापासून फारकत झाल्यामुळे हिंदू समाजावर एक फार दूरगामी परिणाम घडून आला. तो म्हणजे विचार आणि आचार यांतील विसंवाद. ख्रिश्चन समाजात स्वत:च्या मताच्या पुरस्कारासाठी यातना सोसणाऱ्या, वेळप्रसंगी सुळी जाणाऱ्या किंवा जिवंतपणी जाळून घेणाऱ्या विचारवंतांची एक परंपरा येशू ख्रिस्तापासून निर्माण झाली. हिंदू समाजात मतस्वातंत्र्यासाठी किंवा नवविचारासाठी अशी जबरदस्त किंमत मोजावी लागत नसे. काही वेळा स्वार्थावर पाणी सोडावे लागत असे अथवा सामाजिक बहिष्कारास तोंड द्यावे लागत असे. पण तेवढेही करू शकणाऱ्या विचारवंतांची परंपरा येथे निर्माण झाली नाही. त्यांचा संप्रदाय अस्तित्वात आला नाही. आगरकर किंवा र. धों. कर्वे यांची परंपरा पुढे कोणी चालविली नाही. ते एकाकीच राहिले. पुढे त्यांचे कौतुकही झाले, पण त्यांना वारसदार मिळाले नाहीत. आजही विचार आणि आचार यांची सांगड समाजात कोठेच आढळत नाही. त्यातूनच मध्ययुगीन युरोपात आढळणाऱ्या

भाडोत्री सैनिकांप्रमाणे भाडोत्री विद्वान, विचारवंत, संपादक यांचे उदंड पीक भारतात उगवले आणि कित्येक क्षेत्रात त्यांनी आपले राखीव हितसंबंध निर्माण केले. त्यांच्यामधूनच अनेक समित्या आणि आयोग यांचे अध्यक्ष, विद्यापीठाचे कुलगुरू, इत्यादींच्या नेमणुका होत असतात. स्वत:च्या विचारांवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्याप्रमाणे आचरण करणाऱ्या विचारवंतांच्या कार्यामधून जी चळवळ निर्माण होते तिचा नैतिक प्रभाव समाजजीवनावर नेहमीच पडत असतो. तर त्याच्या अभावी समाजजीवन निस्तेज आणि चेतनाहीन होते. भारतात नेमके हेच घडत आहे. त्यामुळे हताशपणा, परावलंबित्व, स्वार्थपरायणता आणि आत्मसंतुष्टता यांचे साम्राज्य भारतभर आढळते. परिणामी एकूणच सार्वजनिक क्षेत्र सडलेले आढळते. या वाळवंटात वैयक्तिक स्तरावर आचार आणि विचार यांत समवाय साधून कार्य करणाऱ्या काही व्यक्तींची हिरवळ अधूनमधून आढळते. तेवढीच एक समाधानकारक जागा.

२) भारतीय व्यक्तिमत्त्वाचा यानंतरचा जो विशेष आहे त्याचा निर्घृण कळसाध्याय म्हणजे हुंडाबळी. हुंडाबळीच्या घटनेची नीट छाननी केली म्हणजे या विशेषाचे स्वरूप नीट उलगडेल. या घटनेत पुढील गोष्टी अंतर्भूत असतात -
१) नववधू आणि तिचे मातापिता यांची असहायता, २) त्या असहायतेचा फायदा उठविणारे त्या मुलीचा नवरा, सासू, सासरे, नणंद, इत्यादी, ३) अशा तऱ्हेने दुसऱ्याला अडचणीत गाठून त्याच्या पैशावर मौजमजा करण्याची मनीषा बाळगण्याची बेशरम प्रवृत्ती, ४) अशा घटनेबाबतची समाजाची बेफिकिरी. थोडक्यात, एका व्यक्तीची असहायता, तिचा दुसऱ्या व्यक्तीने घेतलेला फायदा, दुसऱ्याच्या पैशावर जगण्याची अपप्रवृत्ती आणि त्याबद्दलची सामाजिक उदासीनता हे घटक हुंडाबळीच्या घटनेत आढळतात. या किंवा त्यापैकी काही घटकांचे थैमान आपल्या सामाजिक जीवनात आढळते. हुंडाबळी घडवून आणणारा मोठा चोर असेल तर बाकीचे छोटे चोर, पण त्यांची जातकुळी एकच. रोग्याची पिळवणूक करणारा डॉक्टर, अशिलाची नाडणूक करणारा वकील, नफेबाजी करणारा व्यापारी, हे तर सर्वांच्याच परिचयाचे आहेत. कच्चे काम करणारा कंत्राटदार, त्याच्या कामाला प्रमाणपत्र देणारा अभियंता, हे दोघेही नंतर बांधकाम कोसळल्यामुळे झालेल्या प्राणहानीला तितकेच जबाबदार असतात. वाममार्गाने पैसा मिळविताना त्यांनी घेतलेले बळी आणि हुंडाबळी यांत काय फरक आहे ? अशा तऱ्हेने पैसा मिळवून बांधलेल्या बंगल्याच्या वास्तुशांतीला नैतिक मूल्ये मानणारेही कौतुकाने उपस्थित राहतात. औषधात भेसळ करून मानवी जीवनाशी जीवघेणा खेळ करणारे उद्योजक हेही याच सामाजिक अपप्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात.

हरामाचा पैसा मिळविण्याची प्रवृत्ती किती दूरवर आणि खोलवर पसरली आहे याची अनेक उदाहरणे हरघडी प्रत्ययाला येतात.

पैसे घेऊन पास करणारा किंवा पेपर फोडणारा परीक्षक, नगरपालिका, आयकर खाते, विक्रीकर खाते, अबकारी खाते येथील कर्मचारी. ही यादी कितीतरी लांबवता येईल. या सर्वांनाच दुसऱ्याची नाडणूक करून पैसा मिळविण्यात धन्यता वाटते. आपण काहीतरी गैर करीत आहोत असे वाटायला लावणारी त्यांची जाणीवच नष्ट झालेली असते. अगदी खालच्या आर्थिक स्तरावरही हे प्रकार पाहावयास मिळतात. एकटी वयस्क बाई दिसली की हमालही दोन रुपये वाढवून सांगतो. रिक्षाचालक, टॅक्सीवाला यांचा अनुभव सर्वांनाच येत असतो. याच प्रवृत्तीचा कळसाध्याय म्हणजे हुंडाबळी !

या ठिकाणी एक शंका उपस्थित होण्याची शक्यता आहे. दुसरा अडचणीत आहे हे पाहून त्याला मदत करून त्याबद्दल कमिशन घेण्याची प्रवृत्ती पाश्चात्य देशात नाही का ? मदत आणि नाडणूक यांतील फरक लक्षात घेतला म्हणजे या शंकेचे समाधान होईल. मनुष्य हा स्वभावत:च साधू नाही. त्यामुळे दुसऱ्यासाठी कष्ट घेतले तर त्याचा मोबदला कोणालाही हवाच असतो. घेतलेले कष्ट आणि त्यासाठी मिळविलेला मोबदला असे दलालीचे स्वरूप असते. तर दुसऱ्याला अडचणीत टाकून किंवा पाहून, त्याला त्रास न देण्यासाठीचा मोबदला, असे नाडणुकीचे स्वरूप असते. एका उदाहरणावरून हे स्पष्ट होईल. कार्यालयीन औपचारिकता लवकर पूर्ण करून घेण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाला जो पैसा दिला जातो त्याला दलाली म्हणता येईल. याउलट, 'तुमची सर्व कागदपत्रे, भरावयाचे तक्ते, सर्व काही व्यवस्थित आहेत, पण तुमच्या सल्लागारासह तुम्हाला मी दहा हेलपाटे मारायला लावू शकतो. त्याचा किती खर्च होईल तो लक्षात घ्या. आणि ते टाळावयाचे असेल तर मला पाचशे रुपये द्या' असे एखादा सरकारी अधिकारी सांगतो तेव्हा ती नाडणूक होते. पाश्चात्य देशात दलाली दिली जाते तर आपल्याकडे नाडणुकीवर भर असतो. परवाने आणि परवानग्या देणारी सर्व सरकारी खाती, नगरपालिका यांतील भ्रष्टाचार नाडणूक या स्वरूपात मोडतो. 'तुमच्याकडे भ्रष्टाचार नाही का ?' या प्रश्नाला उत्तर देताना एका परकीय लेखकाने म्हटले आहे की, लवकर काम व्हावे म्हणून त्यांच्याकडे दलाली दिली जाते, तर भारतात कोणत्याही कामाला लागणारा जो वाजवी वेळ असतो त्यात दिरंगाई करू नये, म्हणून लाच द्यावी लागते. म्हणजेच दुसऱ्याची छळणूक न करण्यासाठी आपल्याकडे पैसा मोजावा लागतो. ही परंपरा किती प्राचीन

आहे याबद्दल निश्चित मत व्यक्त करणे शक्य नाही. तथापि उत्तरपेशवाईमध्ये पेंढारी, ठग आणि मराठ्यांच्या आश्रयाने राहणारे बाजारबुणगे यांनी लुटमारीचा धुमाकूळ घातला होता, तितकी जुनी तरी निश्चित आहे. हुंडाबळी घेणारे ठगांची परंपरा चालवत असतील तर बाजारबुणगे आणि पेंढारी यांचा बुजबुजाट सरकारी कचेऱ्यांत, कामगारक्षेत्रात, सहकारी चळवळीत, रोजगार हमी योजनेत, कर्ज मेळाव्यात, नगरपालिकांत आणि इतरत्र आढळतो. स्वतंत्र भारतात छळणुकीचा धंदा विलक्षण तेजीत आहे. आणि त्यातून निराधार स्त्रिया, सरकारी मोफत वसतिगृहातील मुले, अपंग, वृद्ध निवृत्तिवेतनधारक यांपैकी कोणाचीही सुटका नाही. 'सारांश' या चित्रपटात या छळणुकीचे दर्शन नेमकेपणाने घडविले आहे. एका वृद्ध गृहस्थाचा मुलगा परदेशी मरतो. त्याच्या अस्थी विमानाने पाठविलेल्या असतात. त्या सोडवून घेण्यासाठीही त्याच्याकडे लाच मागितली जाते. हीच हृदयशून्यता सर्वत्र आढळते. आणि तेवढ्यासाठीच सर्वसाधारण भ्रष्टाचार आणि छळणूक यात फरक करणे आवश्यक आहे.

३) छळणुकीकडे समाजाचा कल असण्याचे मूळ कारण म्हणजे न्यायाच्या संकल्पनेचा अभाव. दुसऱ्याला न्याय देण्याचे उत्तरदायित्व आपल्यावर आहे किंवा आपल्यावर अन्याय होत असेल तर त्याविरुद्ध बंड केले पाहिजे, या दोन्ही कल्पना आपल्याला अजूनही परक्या आहेत. दुसऱ्या महायुद्धातील गोष्ट. बंगालमध्ये भयंकर दुष्काळ पडला होता. लक्षावधी लोक मृत्युमुखी पडले. पण अन्न असेल या खोट्या आशेनेदेखील एकही दुकान फोडले गेले नाही. त्याच वेळी काळाबाजारही तेजीत होता. म्हणजे आपण अन्याय मुकाटपणे सहन करतो, तसेच ज्यांना अन्याय करण्याची संधी असेल ते ती सोडीत नाहीत. अन्यायापुढे शरणागती पत्करणे, तसेच न्यायाचे इंद्रिय नसणे हा भारतीय स्वभावविशेष आहे. अनेक आक्रमणे झाली, अत्याचार झाले, बाटवाबाटवी झाली, स्त्रियांवर जुलूम झाला. त्यांना जनानखान्यात घालण्यात आले. हे सर्व आपण सहन केले. काही वेळा प्रतिकार केला, पण तो अत्यंत तुरळक होता. सर्वसाधारण प्रवृत्ती अन्याय सहन करण्याचीच. असा अन्याय सहन करीत असताना आपणही अन्याय करीतच होतो. जमीनदार कुळांवर, पुरुष स्त्रियांवर, उच्चवर्णीय खालच्या जातींवर, सरदार दरकदार रयतेवर जुलूम करीत होते. इंग्रजी राजवटीत इंग्रज आपल्याला हलके लेखीत होते आणि सवर्ण दलितांना. अन्यायाची एक उतरंडच तयार झाली होती. त्याविरुद्ध अनेकांनी ओरड केली. तथापि परिस्थिती अजूनही तीच आहे. फक्त अन्यायाचे स्वरूप काही क्षेत्रात बदलले आहे. दलितांना आता

सवलती मिळू लागल्या आहेत. पण त्यांच्यातील पांढरपेशे सर्व सवलती हडप करून त्यांच्यातील खऱ्याखुऱ्या दलितांना त्यापासून वंचित करीत आहेत. मंडल आयोगाने त्याचा उल्लेख आणि समर्थनही केले आहे. म्हणजे अन्यायनिवारणासाठी नेमलेला आयोगही अन्यायाचीच तरफदारी करीत आहे. बिहारसारख्या मागासलेल्या विभागात जमीनदार दलितांवर, बडे शेतकरी लहान शेतकऱ्यांवर आणि भूमिहीन मजुरांवर, भांडवलदार कामगारांवर, संघटित कामगार इतर घटकांवर असे अन्यायाचे सूत्र चालूच आहे. असे एकही क्षेत्र नाही की जेथे प्रबळ घटकाला दुर्बल घटकाशी न्यायाने वागण्याची ओढ आहे.

### ४) श्रमसंस्कृतीचा अभाव

श्रमसंस्कृतीचा अभाव हे भारतीय व्यक्तिमत्वाचे आणखी एक वैशिष्ट्य. आपण श्रम करूनच उदरनिर्वाह केला पाहिजे, तसेच मिळणारा मोबदला आणि केलेले श्रम यांचा मेळ राहिला पाहिजे याबाबतच्या जाणिवेला मी श्रम-संस्कृती म्हणतो. या जाणिवेतूनच कार्यक्षमताही निपजते. ही संस्कृती भारताला अनोखी आहे. समाजाची दया आणि धर्मादाय यांवर जगणाऱ्या बैरागी, गोसावी, याचक यांची परंपरा फार प्राचीन काळापासून असावी असे दिसते. अशांचा आदरसत्कार केला असता पुण्य लाभते अशी समजूत होती. त्यामुळे त्यांना समाजात मान्यता होती. त्यामुळे बसून किंवा फुकटात खाणे यात काही अप्रतिष्ठा आहे ही भावनाच नष्ट झाली. 'तू तुझी भाकरी आपल्या निढळाच्या घामाने मिळवशील' असे वचन बायबलमध्ये आहे. ही वृत्ती भारतीय संस्कृतीने केव्हाच आत्मसात केली नाही. त्यामुळे श्रम आणि उदरनिर्वाह यांतील कार्यकारणभावच नष्ट झाला. यानंतरची पायरी म्हणजे श्रम न करता उदरनिर्वाह झाला तर ते भूषणास्पदच वाटणे. यदाकदाचित काम करावे लागलेच तर आपल्याला मिळणाऱ्या मेहेनतानाच्या मोबदल्यात त्या प्रमाणात श्रम केले पाहिजेत ही जाणीवच राहात नाही. साहजिकच काम हे आपले आहे, आपण कामासाठी आहोत आणि काम समरसतेने केले पाहिजे ही भावना कामकऱ्यांमध्ये निर्माण होत नाही. उलट, काम आपल्यासाठी आहे, आपला उदरनिर्वाह चालावा म्हणून आपणास कामावर नेमण्यात आले आहे अशा वृत्तीने ते काम करतात. श्रम आणि मेहेनताना यातील प्रमाणबद्धता एकदा नाहीशी झाली म्हणजे तेवढ्याच कामासाठी अधिक मोबदला मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू होतात किंवा तेवढ्याच मोबदल्यात कमी काम केले जाते. यातून प्रथम वरकड कमाईची प्रथा सुरू होते आणि त्यानंतर अशी कमाई न देणाऱ्या व्यक्तीच्या छळणुकीची पद्धत निर्माण होते. एका दृष्टीने श्रमसंस्कृतीचा

अभाव ही नाडणूक करण्याच्या प्रवृत्तीचीच दुसरी बाजू आहे. काम हे वैयक्तिक उदरनिर्वाहाची गरज भागवणारे साधन, असे समीकरण तयार झाल्यानंतर सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये आपणास सामाजिक गरज भागविण्यासाठी नेमण्यात आले आहे आणि ती गरज पुरी करणे हे आपले कर्तव्य आहे, या वृत्तीला थाराच उरत नाही. साहजिकच वक्तशीरपणाचा अभाव, काम गलथानपणे करणे किंवा कसेतरी निपटून टाकणे, कामासाठी येणाऱ्या व्यक्तीशी बेपर्वाईची आणि उद्धटपणाची वागणूक हे प्रकार सर्वच कचेऱ्यांतून आढळतात. रोजंदारीवर काम करणारे मजूर आणि कारागीर यांचा कामचुकारपणा सर्वपरिचित आहे. सुतार लाकडावर नुसता रंधाच किती वेळ मारीत असतो ते पाहण्यासारखे असते. शारीरिक श्रम करणाऱ्यांची गोष्ट सोडा, पण समाजाचे वैचारिक नेतृत्व करावे अशी ज्यांच्याबद्दल अपेक्षा असते असे प्राध्यापक आणि शिक्षकदेखील वर्गात तास न घेण्यात भूषण मानतात. श्रमसंस्कृतीच्या अभावातून निर्माण होणाऱ्या बेफिकिरीने आता सर्वच क्षेत्रांना ग्रासले आहे. न्यायाधीश आणि वकील न्यायालयात वेळेवर हजर असतातच असे नाही. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना लोकनियुक्त संस्थांच्या सभांना नियमितपणे उपस्थित राहण्याची आणि तेथील कामकाजात रस घेण्याची गरज भासत नाही. या ठिकाणी माझा एक अनुभव देण्यासारखा आहे. माझ्या एका मित्राने एका स्विस प्रवाशाशी रेल्वे प्लॅटफॉर्मवर ओळख करून दिली. गाडी यावयास वेळ होता म्हणून बोलत उभे राहिलो. बोलत असता स्विस गृहस्थाने मला माझी कार्यालयात पोचण्याची वेळ विचारली. मी साडेदहा म्हणून सांगितले. त्या वेळी पावणेअकरा वाजले होते. मला संध्याकाळी कार्यालय सोडताना कधीकधी आठही वाजत. त्यामुळे मला उशिरा जाण्याची सवलत होती. त्याने घड्याळात पाहिले आणि एकदम प्रतिक्षिप्त क्रियेने तो उद्गारला 'सो यू आर लेट !' माझे कार्यालयात उशिरा जाणे त्याच्या कार्यालयीन सदसद्विवेकबुद्धीला विलक्षण धक्कादायक वाटले होते. आपल्याकडे कार्यालयीन सदसद्विवेकबुद्धी हा शब्दच आता हद्दपार झाला आहे. त्याबद्दल लिहावे तेवढे थोडेच.

श्रमसंस्कृतीच्या अभावाने सेवाभावी वृत्तीचे लोकही कसे ग्रस्त झाले आहेत हे पाहण्यासारखे आहे. माझ्या परिचयाचे अनेक लोक एखाद्या पक्षाचे अथवा संस्थेचे काम कोणतेही मानधन न घेता संध्याकाळी कार्यालयाच्या वेळेनंतर नियमितपणे आणि निरलसपणे करीत असतात. पण कार्यालयातील कामाबाबत मात्र ते तशी वृत्ती दाखवीत नाहीत. उशिरा जाणे, सर्व नैमित्तिक रजा प्रामाणिकपणे संपविणे, कार्यालयीन वेळात टिवल्याबावल्या करणे, इत्यादी प्रकार सुरू होतात. वास्तविक

ही माणसे सेवाभावी वृत्तीची आहेत; समाजासाठी आपण काही तरी केले पाहिजे याची त्यांना ओढ आहे. प्रसंगी पदराला खार लावून ती सामाजिक कार्य करीत असतात. मग कार्यालयीन कामाबद्दल त्यांची एवढी बेफिकिरी का ? आपली नेमणूक ही आपला उदरनिर्वाह व्हावा म्हणून आहे, या कार्यालयीन गृहीतकाने त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीचा एवढा कब्जा घेतला आहे, की कार्यालयात आपण करीत असलेले काम हीही समाजसेवाच आहे हे त्यांना कधी जाणवतच नाही. वास्तविक प्रत्येक कार्यालयात नेमल्या गेलेल्या प्रत्येक नोकराची नेमणूक सामाजिक गरजेतूनच होत असते आणि असा नोकर जितक्या कार्यक्षमतेने काम करील तेवढी सामाजिक सेवाच त्याच्याकडून घडत असते. पण या वास्तवाला आपण संपूर्णपणे पारखे झालो आहोत. त्यामुळे सेवावृत्तीचे लोकदेखील इतरत्र मोफत काम करतात, पण ज्या कामावर त्यांचा आणि कुटुंबीयांचा निर्वाह अवलंबून आहे आणि ज्याच्याशिवाय त्यांची उपासमार होईल, त्या कामाबाबत मात्र ते बेफिकीर असतात.

श्रमसंस्कृतीच्या अभावी श्रम आणि मेहेनताना यातील प्रमाणबद्धता नष्ट होते. त्यामुळे तेवढ्याच कामासाठी अधिक मोबदला मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू होतात हे वर पाहिले. पण काही परिस्थितीत त्याचा नेमका उलट परिणामही आढळून येतो. म्हणजे आपणास केलेल्या श्रमाच्या मानाने, योग्य तो मेहेनताना मिळत नाही याची जाणीव समाजातील काही घटकांत आढळून येत नाही. एखाद्या खानदानी कुटुंबात पिढ्यान् पिढ्या काम करणारे चाकर, आदिवासी ही या वृत्तीची उदाहरणे. लग्नासाठी अथवा अन्य कारणाने घेतलेल्या कर्जासाठी आदिवासी संपूर्ण आयुष्य अन्नवस्त्रावारी राबण्यास तयार असतो व तसे तो करारपत्रही लिहून देतो. याच वृत्तीचा दुसरा भाग म्हणजे गुंतवणूक व त्यापासून मिळणाऱ्या मोबदल्याची प्रमाणशीरता लक्षात न येणे. श्रम हीही एक प्रकारची गुंतवणूक असते. त्याचप्रमाणे पैसा ही दुसऱ्या प्रकारची गुंतवणूक. गुंतवणूक व मोबदला यांच्या प्रमाणशीरतेची जाणीव नसल्यामुळे पुष्कळ वेळा शेतकरी कितीही पैसा मोजून अधिकाधिक जमीन खरीदण्याच्या मागे असतो. उदा. एक लाख रुपये गुंतवून १५००० रुपये कोणतेही कष्ट न करता घरी बसून मिळत असतील तरीही शेतकरी ते पैसे घालून जेमतेम १०००० रुपये सुटतील अशी जमीन खरेदी करतो. त्या जमिनीवर त्याचे कुटुंबीय राबतात. त्यांच्या श्रमशक्तीचा मोबदला तो कधी विचारात घेत नाही. या वृत्तीमुळे कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त उत्पादन काढण्याची ईर्षा त्याच्यात कधीच निर्माण होत नाही. परिणामी उत्पादकतेवर अनिष्ट परिणाम होतो. हा प्रकार महाराष्ट्रात विशेषकरून आढळतो.

त्यामुळे शेतीउत्पादनाच्या क्षेत्रात महाराष्ट्र खूपच मागे राहिला आहे. याच्या उलट गुंतवणूक आणि मोबदला यांच्यातील संबंधांची जेथे जाणीव निर्माण झाली आहे त्या हरियाणा आणि पंजाबमध्ये कृषिउत्पादनाचे नवे नवे उच्चांक प्रस्थापित होत आहेत.

५) पुनरुक्ती (रिपिटीशन), अनुकरण (इमिटेशन) आणि नवोपक्रमशीलतेचा (इनोव्हेशन) अभाव हे भारतीय व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक अंग. जे परंपरेने चालून आले आहे त्याची पुनरुक्ती करीत राहणे हा आपल्या स्वभावाचा स्थायीभाव कित्येक शतकांपासून झाला आहे. नवी वाट मळणे, नवे प्रयोग करणे या कल्पनांना आपण सर्वस्वी पारखे झालो आहोत. काही वेळा परिस्थितीच्या दडपणाखाली बदल आढळतो, पण तो सर्वस्वी अनुकरणाच्या स्वरूपात असतो. अनुकरण हे नेहमी बाह्यांगाचे असते. त्यानुसार पाश्चात्य कल्पनांचे मर्कटचेष्टित आपण नेहमीच करीत असतो. त्या कल्पनांच्या मागे जी चेतना (स्पिरिट) असते ती मात्र आपण केव्हाच आत्मसात करीत नाही. त्यामुळे अनुकरणाला अखेर एका धार्मिक विधीचे (रिच्युअल) स्वरूप प्राप्त होते. आर्थिक, सामाजिक, राजकीय, इत्यादी सर्वच क्षेत्रात पुनरुक्ती किंवा अनुकरण आढळते. नवोपक्रमशीलता मात्र अभावानेच तळपते.

शिक्षणक्षेत्र खरे तर नवोपक्रमशीलतेची गंगोत्री. पण त्याचे आज डबके झाले आहे. बालशिक्षणापासून ते संशोधनक्षेत्रापर्यंत पाश्चात्यांचे अनुकरण आणि नंतर त्याची पुनरुक्ती एवढेच फक्त शिक्षणक्षेत्रात आढळते. किंडरगार्टन आणि मॉंटेसरी या पद्धती पाश्चात्य. के. जी. चे लोण जर्मनीतून आले. कुटुंबात एकारलेल्या मुलांना सामाजिक जुळवणी (सोशल ॲडजस्टमेंट), खेळ आदींच्या साहाय्याने शिकविणे हा त्या पद्धतीचा प्रधान हेतू. वाचन आणि लेखन यांना त्यात स्थान नाही. मॉंटेसरी पद्धतीत बोटांच्या स्नायूंमध्ये पुरेशी ताकद येईपर्यंत हातात पेन्सिल द्यावयाची नाही, हा नियम. पण आपल्याकडे मुलाला के.जी.त घातले की अंक आणि अक्षरे लिहिणे, हा प्रमुख अभ्यासक्रम. पुष्कळ शाळांत तर खेळाची साधने आणि खेळायला जागाही नसते. पण आपल्या ऐहिक महत्त्वाकांक्षेचे साधन म्हणूनच मुलाकडे पाहणारे पालक हा सर्व अत्याचार आनंदाने सहन करीत असतात. माझे एक नातेवाईक जर्मनीत होते. त्यांचा अनुभव या ठिकाणी देण्यासारखा आहे. त्यांची मुलगी तेथल्या शाळेत शिकत होती. एक दिवस विद्यार्थ्यांना गृहपाठ म्हणून एक अवघड गणित सोडवून आणण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी त्या मुलीनेच फक्त गणित सोडवून आणल्याचे शिक्षकांना आढळले. तेव्हा तिच्या पालकांना शाळेत बोलावून घेतले आणि त्यांनी

मुलीला गणित सोडविण्यास मदत केली होती का याची चौकशी केली. त्यांनी होकारार्थी उत्तर देताच त्यांना समज देण्यात आली की जोपर्यंत मुलगी शाळेत शिकत आहे तोपर्यंत तिच्या पालकांना घरी मुलीला शिकवून शाळेची जी शिक्षणयोजना आहे त्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही आणि जर घरी शिकवायचे असेल तर तिचे नाव शाळेतून काढून घेण्यात यावे. बालशिक्षणाप्रमाणेच प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे ही सर्व पद्धती पश्चिमेकडून आयात केलेली. पण विद्यार्थी हा केंद्रबिंदू धरून शिक्षणाची पुनर्रचना करणे हा प्रकार आपल्याला केव्हाच समजला नाही. मुले प्रत्यक्षात काय शिकतात, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा कितपत विकास होतो याकडे कोणाचेही लक्ष नसते. केवळ ११ + ४ च्या ऐवजी १० + २ + ३ हा आकृतिबंध अमलात आणला म्हणजे आपले घोडे गंगेत न्हाले. संलग्न महाविद्यालयांची पद्धत पाश्चात्य. त्यांच्याकडे ट्युटोरिअल पद्धती. म्हणून आपल्याकडेही तिची सुरुवात झाली. पण वास्तवात ही पद्धती म्हणजे प्राध्यापकांची रोजगार हमी योजनाच झाली आहे. कारण ट्युटोरिअल्समध्ये प्राध्यापक, विद्यार्थी, महाविद्यालय आणि विद्यापीठ यांपैकी कोणालाच स्वारस्य नसते. व्याख्यानांना विद्यार्थी हजर राहात नाहीत. पुस्तके वाचत नाहीत. ग्रंथालयातील बहुतेक पुस्तके आजन्म कुंवारच राहतात. महाविद्यालयात सारे महत्त्व राजकारण आणि गुंडगिरी यांनाच. विद्यापीठेही अनेक निघाली आहेत. पण एका तरी विद्यापीठाने केंब्रिज, ऑक्सफर्ड, हार्वर्ड अशासारख्या विद्यापीठांचा दर्जा संपादन केला आहे का ? एका बाबतीत मात्र शिक्षणक्षेत्रात आपण नवोपक्रमशीलता दाखविली आहे. विनाअनुदान संस्था काढून धनदांडग्यांना बक्कळ पैसा कमवण्याची संधी देऊन आपण केवढी तरी क्रांती केली आहे.

सहकारी चळवळ पाश्चात्य. तिला स्वाहाकारक्षेत्र बनवण्यातच आपली नवोपक्रमशीलता. उद्योगधंदे आणि कामगार चळवळ पाश्चात्य. आपण त्यांची जशीच्या तशी उसनवारी केली. ते करीत असताना त्यात भारतीय हीण मिसळले. पण संप, टाळेबंदी, घेराव यांना काही पर्याय शोधता येईल का याचा विचारही कोणाच्या मनात येत नाही. त्यामुळे मुजोरी, लाचारी, दहशतवाद यांचेच साम्राज्य तेथे पसरलेले. समाजवाद पाश्चात्य. त्याला अनुसरून मूलभूत उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्याचे धोरण उचलले. पण राष्ट्रीयीकृत उद्योगधंद्यात उत्पादन वाढवण्यात रस मात्र कोणासही नाही. एकूण सोळा कामगार कायदे करण्यात आले आहेत, तरीही औद्योगिक अशांतता का ? याच्याकडे लक्ष देण्यास कोणास वेळ नाही.

स्वातंत्र्यानंतर चाळीस वर्षे झाली तरी न्यायालयांचे कामकाज जुन्याच दीर्घसूत्री पद्धतीने चालू आहे. भारतीयांच्यात फूट पाडण्यासाठी म्हणून जातींचे वर्गीकरण इंग्रजांनी केले. आपणही तीच प्रथा चालू ठेवली आहे आणि घटनेतही अशा वर्गीकरणास स्थान दिले. त्यामुळे जातिभेद नष्ट होणे दुरापास्त झाले आहे. गणपतीचा छाप करतात, त्याप्रमाणे प्रत्येक जातीचा छाप करून त्यातून काढून परमेश्वराने प्रत्येक जातीला जन्मास घातले असावे अशा तऱ्हेने आपला व्यवहार चालू असतो.

नवोपक्रमशीलतेचा अभाव सर्वात जाचक ठरला असेल तर तो घटनानिर्मितीच्या संबंधात. भारताच्या घटनेचे आपण कौतुक करतो. ती तयार करणाऱ्या डॉ. आंबेडकरांना आपण आधुनिक मनू असे संबोधतो. तथापि घटना तयार होताना भारताच्या गरजा लक्षात घेतल्या गेल्या होत्या की घटनाकार अखेर अनुकरणाचेच बळी ठरले, याचा विचार होणे आवश्यक आहे. १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, इंग्लंडच्या घटनात्मक प्रथा आणि अमेरिकेची घटना अशा तिहेरी जंजाळात घटनाकारांनी गुंतवून घेतले का, आणि त्यांच्या कितीशा अनुकरणातून भारताची घटना तयार झाली, त्याची प्रस्तुत ठिकाणी सविस्तर चर्चा करणे शक्य नाही. पण ज्या तरतुदींमुळे भारतीय लोकशाहीच्या भवितव्याबद्दलच शंका निर्माण व्हावी त्यांचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. सार्वत्रिक प्रौढ मतदान ही त्यांपैकी एक तरतूद. भारताला सार्वत्रिक मतदानाचा हक्क मानवेल किंवा नाही याचा विचारच झाला नाही. प्रगत पाश्चात्य देशात प्रौढ मतदान आहे ना, मग करा त्याचे अनुकरण, हाच विचार प्रभावी ठरला. इंग्लंडमध्ये मताधिकाराची व्याप्ती हळूहळू वाढवण्यात आली. साहजिकच राजकीय जागृती आणि मताधिकार यांची सांगड घातली गेल्यामुळे तेथे लोकशाही सुदृढ पायावर उभी राहिली. आपल्याकडे सर्वांनाच मताधिकार दिला गेला. त्यांपैकी बहुसंख्य निरक्षर असल्यामुळे लोकशाही अडाणी बनली. त्यातून निवडणुकीतील अपप्रकारांना सुरुवात झाली. मताधिकारासाठी निदान साक्षरता आणि उमेदवारासाठी शैक्षणिक पात्रता या अटी ठेवण्यात आल्या असत्या तर अनेक गैरप्रकारांना आळा बसला असता. घटना-निर्मिती चालू असतानाच भारतात बहुपक्षीय संसदीय पद्धती अंमलात येणार याची सर्वांनाच पूर्ण कल्पना होती. अशा पद्धतीत राजकीय अस्थैर्य अनुस्यूत असते. तेव्हा स्थैर्यासाठी ज्या वेळेस कोणत्याच पक्षास निर्विवाद बहुमत नसेल तेव्हा सर्वात मोठा राजकीय पक्ष असेल त्यास पाच वर्षे पूर्ण राज्यकारभार करण्याचा अधिकार राहील, अशासारखी काहीतरी तरतूद करणे आवश्यक होते. धार्मिक अल्पसंख्याकांच्या बाबतीतही इतर देशांचेच अनुकरण करण्यात आले. वास्तविक धर्माच्या नावावर

फाळणी झाल्यानंतर 'धार्मिक अल्पसंख्य' हा शब्दच घटनेत यावयाला नको होता. तथापि सर्व भारतीय, भारताचे समान नागरिक असून त्यांना समान अधिकार असतील, अशी तरतूद करण्याऐवजी धार्मिक अल्पसंख्याकांना निरपवाद शैक्षणिक नि सांस्कृतिक अधिकार देऊन भारताच्या दुसऱ्या फाळणीचा पाया घातला गेला. घटना केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून ती त्या देशाच्या भवितव्याची चौकट निश्चित करीत असते, ही वस्तुस्थिती, अनुकरणाच्या सवयीमुळे घटनाकारांना उमगलीच नसावी असे दिसते.

६) सामाजिक जीवनात परस्परांबद्दलचा अविश्वास हा भारतीय व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू. हाही तसा जुनाच आहे हे वाक्प्रचार आणि म्हणी यावरून सिद्ध होते. वाक्प्रचार आणि म्हणी यात समाजाचा अनुभव प्रतिबिंबित होत असल्यामुळे त्यांचे खास असे महत्त्व असते. 'शिंप्याचा करा, सोनाराचा मासा आणि दळणारणीचा पसा', 'सोनार, शिंपी, कुलकर्णी अप्पा अशांची संगत नको रे बाप्पा' किंवा 'विश्वासराव केव्हाच पानिपतावर मेला' या म्हणी आणि वाक्प्रचारावरून व्यावसायिक फसवेगिरी आणि जनसामान्यांचा 'विश्वासा'वरील अविश्वास यांचे दर्शन घडते. व्यावसायिक फसवेगिरीचा उल्लेख तर कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सापडतो. गवळी दुधात पाणी घालणार, व्यापारी खोटी वजने वापरणार किंवा भेसळ करणार, भाजीवाला तराजूच्या एका पारड्याला धक्का देणार, या गोष्टी आपण गृहीतच धरलेल्या असतात. आज तर परिस्थिती अशी आहे, की कोणीच कोणावर विश्वास ठेवावयास तयार नसतो. ही वस्तुस्थिती आपल्या सार्वजनिक जीवनाची अधोगती स्पष्ट करते. वकील नि अशील, डॉक्टर आणि रोगी हे संबंध तर संपूर्ण विश्वासावरच आधारलेले असावयास पाहिजेत, पण त्यातही अविश्वासच आढळतो. मालक-भाडेकरू, सार्वजनिक संस्था-देणगीदार, मालक-मजूर, मतदार-लोकनियुक्त प्रतिनिधी, जनता-शासन यांचेही संबंध अविश्वासावरच आधारलेले आहेत. क्रिकेटपटू आणि क्रिकेट नियामक मंडळ यांच्यातील अविश्वासाचे नाटक मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयापर्यंत गाजले. इतर खेळांच्या बाबतीतही तेच वातावरण आढळते.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल, की जो समाज उदरनिर्वाहाच्याही पातळीखाली (सबसिस्टन्स लेव्हल) जगतो त्या समाजात फसवेगिरी अधिक प्रमाणात आढळते. कारण तेथील जीवनसंघर्ष इतका कडवा असतो, की कोणास तरी फसविल्याखेरीज जगणेच अशक्य असते. आपल्या नेहमीच्या अनुभवातील उदाहरण म्हणजे घरगुती नोकर. त्याला योग्य ते वेतन देण्याइतकी आपलीही न्यायबुद्धी जागृत

नसते. सोनार, शिंपी, कुलकर्णी यांचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांच्याप्रमाणेच इतर कारागीर, कसबी कामगार अथवा मजूर यांनाही फसवणूक केल्याखेरीज उदरनिर्वाह करणे अशक्य असते. शेतकऱ्याचीही तीच गत. वाट्याने तो जेव्हा जमीन कसत असतो, त्यावेळी त्याने पिकलेल्या धान्याचा प्रामाणिकपणे हिशेब दिला तर मालकाकडून फार तर त्याला शाबासकी मिळेल. पण त्याने त्याचे पोट भरणारे नसते. अशा तऱ्हेने समाजातील बहुसंख्य वर्गास गरजेपोटी फसवेगिरीचा मार्ग चोखाळावा लागतो. हळूहळू त्याचे सवयीत रूपांतर होते आणि पुढे सुबत्ता आली तरी फसवेगिरी मात्र टिकून राहते. कालांतराने ती सार्वत्रिक होते. ज्यांना गरज नाही तेही फसवेगिरी करू लागतात. परिणामी सबंध समाजच अविश्वासाच्या भावनेने ग्रस्त होतो.

परस्परांवरील अविश्वास आणि फसवणुकीची वृत्ती ही दोन भारतीय वैशिष्ट्ये इंग्रजी अमलाचा प्रत्यक्ष परिणाम होत. बहुसंख्य भारत खेड्यातून राहात होता आणि तेथील एकंदर व्यवहारावर समाजाचे नियंत्रण असे. त्यामुळे सर्व व्यवहारांची माहिती सर्वांनाच असे. त्यामुळे त्यात फसवणुकीला वाव नव्हता. परंतु खेड्यातील व्यावहारिक जीवनाचा हा एकसंधपणा इंग्रजी कायद्याने मोडीत काढला. व्यक्तिस्वातंत्र्यावर अतिरिक्त भर देणाऱ्या इंग्रजी कायद्यांमुळे प्रत्येक व्यक्ती समाजाच्या नियंत्रणापासून मुक्त झाली आणि तिला कायद्याचे संरक्षण मिळू लागले. फसवणूक करूनही कायद्याच्या कचाट्यातून सुटता येते हे ज्ञान भारतीयांनी झटदिशी आत्मसात केले. सामाजिक नियंत्रणाचा अभाव आणि फसवणुकीची वृत्ती यांच्यातील अन्योन्य संबंधावर अनेकांनी प्रकाश टाकला आहे.

बंगालचे लेफ्ट. गव्हर्नर सर चार्ल्स इलियट आपल्या 'द पीपल ऑफ इंडिया' या पुस्तकात लिहितात,

"हिंदुस्थानचे रहिवासी सत्याला पूर्णपणे पारखे असतात असे पुष्कळ वेळा म्हटले जाते. पण मला तसे आढळले नाही. न्यायमंदिरात मात्र लाचखाऊ किंवा हितसंबंधी साक्षीदार लबाडीच्या भराऱ्या अशा काही मारतात, की त्यामुळे थक्कच व्हावे. ते त्यांच्या गावातील लोकमतापासून दूर असतात तेव्हा असे घडते. पण जेव्हा ते आपल्या खेड्यात, आपल्या लोकांमध्ये असतात तेव्हा सत्यवचनामुळे स्वत:ची हानी होण्याचे भय असतानाही ते असत्य बोलत नाहीत असे मला माहीत आहे."

या संदर्भात कर्नल स्लीमन यांचा हवाला देऊन मॅक्समुलर म्हणतात,

"कर्नल स्लीमन असे सांगतात, की हिंदी लोक आपल्या पंचायतीमध्ये सवयीने व धर्मश्रद्धेने दृढ सत्यनिष्ठा प्रकट करतात. ते म्हणतात, "असे शेकडो खटले माझ्यापुढे

आले आहेत की, जेव्हा खोटे बोलण्याने माणसाची ज़िंदगी, स्वतंत्रता व जीवित सुरक्षित राहिले नसते, पण त्यांनी खोटे बोलण्याचे नाकारले."

महात्मा गांधींनाही या वस्तुस्थितीची जाणीव होती. ते लिहितात, "जेव्हा जेव्हा म्हणून सत्यावर पूर्णपणे दृढ राहण्यामध्ये चूक झालेली दिसून येते तेव्हा बहुधा त्याचे कारण हे असते, की नैतिक नियंत्रणाच्या स्थानापासून हिंदी लोक दूर असतात. खरोखर सर जॉर्ज कॅंबेल यांनी तर असे उद्‌गार काढले आहेत की, हिंदुस्थानातील एका प्रांतावर आमची सत्ता जितका अधिक काल असेल तितकी तेथील लबाडी अधिक भयावह व सार्वत्रिक असते."

आज भारताला ज्या अनेक समस्या भेडसावत आहेत त्यांपैकी काहींचे मूळ सामाजिक नियंत्रणाच्या अभावातच शोधावे लागले. मध्यंतरी विठ्ठलराव गाडगीळ यांनी पाश्चात्य देशातील राजकारणीही आपल्याकडील राजकारण्यांप्रमाणेच मदिराक्षी वगैरे लफड्यात गुंतलेले असतात, असे एका लेखाने निदर्शनास आणले होते. मनुष्यस्वभाव सगळीकडेच सारखाच हे त्यांच्या लेखाचे पालुपद. तथापि ज्यांचा त्यांनी उल्लेख केला त्यांपैकी बहुतेकांना राजकीय आणि सामाजिक विजनवासात जावे लागले. याउलट, आपल्याकडे अनेक लफडेबाज, उच्च पदाधिष्ठित आहेत याकडे मात्र त्यांनी कानाडोळा केला होता. सामाजिक नियंत्रणाच्या अभावी असे घडते याची नोंद त्यांनी घेतली नाही.

सार्वत्रिक अविश्वासाच्या वातावरणाचे दोन परिणाम सार्वजनिक जीवनात आढळून येतात. १) मध्यमवर्ग सामाजिक जीवनात मूल्यांचा आग्रह धरणारा असतो. परंतु अविश्वासाच्या वातावरणात आपला मूल्यांबाबतचा आग्रह हे अरण्यरुदन आहे हे त्याला पटलेले आहे. त्यामुळे सार्वजनिक जीवनातून जुना मध्यमवर्ग जवळजवळ निवृत्त झाला असून तो अलिप्तपणाचे जीवन व्यतीत करीत आहे. त्यांच्यातील नैतिक मूल्ये अजूनही जपणाऱ्यांना एकाकीपणाच्या (एलिअनेशन) भावनेने ग्रासलेले आहे. २) सामाजिक सद्‌भावाने काम करणाऱ्या संस्थांचा सार्वजनिक जीवनावर काही प्रमाणात वचक असतो आणि त्यामुळे सार्वजनिक जीवन शुद्ध राहण्यास मदत होते. परंतु आता अशाही संस्था संशयातीत राहिल्या नसल्यामुळे नैतिक मूल्ये मानणाऱ्या व्यक्ती अशा संस्थांपासून दूर राहू लागल्या आहेत. त्यामुळे भारतातील संस्थात्मक जीवनाला मरगळ आली असून नैतिक शक्ती म्हणून अशा संस्थांचे स्थान शिल्लक राहिलेले नाही. इंग्रजी राजवटीत सार्वजनिक सभा, डेक्कन सभा, अनेक शिक्षणसंस्था, भारत सेवक समाज, इंडियन असोसिएशन, राष्ट्रीय सभा, ठिकठिकाणी सुरू करण्यात आलेली

अभ्यासमंडळे, अशा अनेक संस्थांमुळे निकोप सार्वजनिक जीवन बहराला आले होते. सामान्य माणसाचीही त्यात गुंतवणूक होत होती. देशस्थिती सुधारण्यासाठी 'मंडळीकरण करा' असा राजवाड्यांचा सतत आग्रह असे. पण स्वातंत्र्यानंतर ते सर्व संपले. आता मंडळे स्थापन होतात, पण ती चालकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी.

७) सामाजिक उदासीनता आणि त्यातून निर्माण होणारी बेफिकिरी हा आपला आणखी एक विशेष. हिंदुधर्म पितृऋण, देवऋण आणि आचार्यऋण अशी तीन ऋणे मानतो. पण त्यात समाजऋणाला स्थान नाही. त्यामुळे आपण समाजाचे काही देणे लागतो ही भावना हिंदू मनाला अनोखी आहे. इस्लाममध्ये धर्मादायासाठी आपल्या उत्पन्नाच्या अडीच टक्के उत्पन्न खर्च करावा असा आदेश आहे. त्याप्रमाणे धर्मनिष्ठ मुसलमान देणग्या देतात. अगदी गरीब मुसलमान देखील धर्मादाय करतात. अशा देणग्यांमधून मुस्लिम समाजात कितीतरी विश्वस्त निधी उभे राहिले आहेत. मानवाची सेवा (त्यात धर्मप्रसारही येतो) या भावनेने भारलेल्या ख्रिश्चन मिशनरींनी सबंध जगभर निरनिराळ्या संस्थांचा केवढा तरी प्रचंड पसारा उभा केला आहे. कुठल्यातरी कानाकोपऱ्यात, मायदेशापासून दूर संपूर्ण जीवन व्यतीत करणारे किती तरी मिशनरी आहेत. त्यांच्या कार्याच्या पसाऱ्याशी रामकृष्ण मिशनच्या मर्यादित व्यापाची तुलना केली म्हणजे आपण सामाजिक बांधिलकी किती मानतो याचे दर्शन घडते. आपल्याकडेही देणग्यांमधून काही संस्था उभ्या राहिल्या आहेत. पण त्याच्यामागे आयकरात सवलती मिळवणे हा देणगीदाराचा प्रधान हेतू असतो. भारताच्या स्वातंत्र्यचळवळीतही अनेकांनी आत्मबलिदान देऊन सर्वोच्च त्याग केला. पण एखाद्या क्षेत्रात स्वत:ला झोकून देऊन सर्व जीवन समर्पण करणे त्यांना जमले नसते. समाजासाठी झिजण्यापेक्षा पतंगाप्रमाणे ज्योतीवर झेप घेऊन जळून जाणेच त्यांनी पसंत केले. लिव्हिंग्स्टन किंवा श्वाइट्झर यांची परंपरा आपल्याकडे नाही. समाजाचा आपण एक घटक आहोत, आपण समाजाचे काही देणे लागतो, आणि या नात्याने आपण समाजाबाबतची आपली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत याची जाणीव नसल्यामुळे राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक संस्था वैयक्तिक हिताच्या दृष्टिकोनातून, आणि तो साधत नसेल तर संपूर्ण बेफिकिरीने चालविल्या जातात. समाजाचा विचारही केला जात नाही. जनतेचे सेवक म्हणवून घेणारेही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेनेच प्रेरित झालेले असतात. व्यक्तिगत जीवनातही स्वच्छता, काटकसर, टापटीप, शिस्त इत्यादी स्वत:च्या घरापुरतीच पाळतो. घराबाहेर पडले म्हणून रस्त्यावर घाण करू नये, रांगेत उभे राहावे, कार्यालयातील सामग्रीचा काटकसरीने उपयोग करावा, कामात नीटनेटकेपणा असावा, अशा गोष्टी आपल्या

लक्षातही येत नाहीत. समाज आपल्या कधीच खिजगणतीत नसतो.

सामाजिक बेफिकिरीचा उगम आढळतो तो हिंदू समाजाच्या वैयक्तिक मोक्षाच्या संकल्पनेत. धर्माचरण करून प्रत्येकाने आपला उद्धार करून घ्यावयाचा असतो, त्याच्याशी समाजाचा संबंध नाही हा विश्वास मोक्षवादाच्या मुळाशी असतो. बौद्ध धर्मातील महायान पंथाने त्याचा प्रतिवाद करण्याचा दुबळा प्रयत्न केला. स्वत:च्या उद्धाराकडे दुर्लक्ष करून इतरांचा उद्धार करावा ही त्या पंथाची शिकवणूक. परंतु पुढे बौद्धधर्माला हिंदुधर्माने सामावून घेतल्यानंतर समाजाच्या उद्धाराची संकल्पना मागे पडली ती कायमचीच. व्यक्तिगत देवतेच्या कृपाप्रसादाने आपण आपला उद्धार करून घ्यावा हीच भावना भक्तिमार्गाने वाढीला लावली. वैयक्तिक उद्धाराची संकल्पना व्यावहारिक स्तरावर उतरली म्हणजे काय होते याचे नेमके वर्णन एका संस्कृत सुभाषितात सापडते :

**आपदर्थे धनं रक्षेत, दारात रक्षेत धनैरपि ।**
**आत्मानं सततं रक्षेत दारैरपि, धनैरपि ॥**

आपत्तीत धनाचे रक्षण करावे. धनापेक्षाही अधिक पत्नीचे रक्षण करावे. कोणत्याही परिस्थितीत धन किंवा पत्नी यापेक्षाही आधी स्वत:चे रक्षण करावे. 'आत्मानं सततं रक्षेत' हा हिंदूंचाच नव्हे, तर प्राणिमात्राचा धर्म आहे, पण संस्कारांनी हा क्रम बदलता येतो. हिंदुधर्मात मात्र स्वत:लाच प्राधान्य दिले आहे. वैयक्तिक उद्धारासाठी आतिथ्य, दान, सत्यवचन, गुरुजनांचा आदर, वडीलधाऱ्यांचा मान असे अनेक पुण्यप्रद मार्ग घालून दिले आहेत. त्यामुळे उद्धार कसा होतो हे स्पष्ट करणाऱ्या अनेक कथा पुराणात आढळतात. तथापि हे सर्व वैयक्तिक सद्‌गुण आहेत. त्यांना सामाजिक संदर्भ नाही. त्यातून समाजाचे भले झाले तर ते आनुषंगिक असते, तो प्रधान हेतू नव्हे. धर्मक्षेत्रात याचक, महारोगी वगैरेंना दान केले जाते ते त्यांच्या कल्याणासाठी नव्हे, तर त्यापासून दात्याला पुण्यप्राप्ती होते म्हणून. साहजिकच अशा तऱ्हेने पुण्यसंचय झाल्यानंतर समाज-हिताच्या दृष्टीने अनिष्ट अशी कृत्ये करण्यास संकोच वाटण्याचे कारण नसते. हिंदू समाजात सामान्य माणसापेक्षा समाजहितविरोधी कृत्ये करणाऱ्यांमध्ये धार्मिक भावना अधिक प्रज्वलित असते असेच आढळून येते.

प्रतिकात्मक कृती करून संपूर्ण योगदान दिल्याच्या समाधानात राहणे ही हिंदू व्यक्तिमत्त्वाची आणखी एक खासियत. माझ्या एका लेखात हिंदू संस्कृतीचे वर्णन 'अक्षदां समर्पयामि' संस्कृती म्हणून केले आहे. सुवर्णाऐवजी अक्षदां समर्पयामि, गोदानाऐवजी अक्षदां समर्पयामि, वस्त्रालंकाराऐवजी अक्षदां समर्पयामि, या संस्कृतीतच

हिंदूंच्या मनाची जडणघडण होत असते. याच्या उलट धर्माज्ञेप्रमाणे मुसलमान अडीच टक्के जकात देतो किंवा देत नाही. त्याच्या धर्मात खोटया समाधानाला स्थान नाही. खोटया समाधानात राहण्याच्या प्रवृत्तीचा रस्ता अखेर माणसाला दांभिकतेकडे नेतो, याची अनेक उदाहरणे सापडतात. स्वातंत्र्यलढयात फक्त सूत कातून राष्ट्रकार्य केल्याच्या समाधानात राहणाऱ्या अनेक व्यक्ती मला माहीत आहेत. आजही दांभिकता हा हिंदू व्यक्तिमत्त्वाचा विशेष आहे व आपणास त्याचा हरघडी अनुभव येतो. एक उदाहरण देण्यासारखे आहे. मध्यंतरी श्री. अंतुले यांनी प्रतिभा प्रतिष्ठानसाठी देणग्या घेतल्याचे प्रकरण गाजले होते. अंतुलेंनी देणग्या इतक्या उघडपणे घेतल्या होत्या की दूरदर्शनवरही त्याची प्रसिद्धी होत होती. त्यांच्यावर टीका करणारेही देणग्या घेत होते, आजही घेत आहेत. पण त्या छुपेपणाने. आणि त्यांच्या जोरावर त्यांनी प्रतिष्ठाही मिळविली. हा हिंदू आणि मुस्लिम संस्कृतीतील फरक आहे. मुसलमान सर्वसाधारणपणे कोणतीही कृती बेधडकपणे करतो, तर कर्मठ हिंदूदेखील आजूबाजूला कोणी पाहत नाही ना याची खात्री करून कुत्र्याने विटाळलेली पोळीही वेळप्रसंगी खातो.

वैयक्तिक सद्गुणांबरोबरच व्यक्तिमात्राने टाळावेत असे दुर्गुणही सांगितले आहेत. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे ते षड्रिपू होत. त्यांनाही व्यक्तिगत जीवनाचा संदर्भ आहे. षड्रिपूंचे दमन हा भारतीय अध्यात्माचाच एक भाग असल्यामुळे त्याची चर्चा आवश्यक आहे. सामाजिक जीवनावर त्याचा काय परिणाम झाला याचाही त्यातून शोध लागेल. वस्तुत: ज्यांना षड्रिपू समजले जाते ते सामाजिक जीवनाचाच आधार आहेत. आणि त्यांच्या अभावी संसार शून्य होऊन जाईल. षड्रिपू या सहजप्रेरणा असून त्यांचे सामाजिकीकरण होऊन त्यांना विधायक वळण मिळाले तर त्यातून समाजाचा उद्धारच होतो. कामाचे रूपांतर अशा रीतीने केवळ शारीरिक नव्हे, तर कला आणि साहित्य यांतील सर्जनशीलतेत, क्रोधाचे अन्यायाविरुद्धच्या संघर्षात, लोभाचे समाजाला आवश्यक असलेल्या उत्पादनासाठीच्या धनसंचयात, मोहाचे सामाजिक सद्भावात, मदाचे राष्ट्राभिमानात, आणि मत्सराचे रूपांतर निकोप स्पर्धेत होते. तथापि हिंदूसमाजात षड्रिपूंचे दमन वैयक्तिक स्तरावरच राहिले. असे दमन अनैसर्गिक असून त्यातून व्यक्तिगत विकृती निर्माण होण्याचीच शक्यता जास्त. कामाअभावी विकृत ब्रह्मचर्य, क्रोधाअभावी संघर्षहीनता, लोभाअभावी निष्क्रियता, मोहाअभावी अर्थशून्य विरक्ती, मदाअभावी स्वाभिमानशून्यता आणि मत्सराअभावी आत्मतुष्टता निर्माण होते. इंद्रियदमन करणारी व्यक्ती स्वत:तच गुरफटलेली अथवा आत्मरत असल्यामुळे समाजाच्या बाबतीत संपूर्ण बेफिकीर असते. जेव्हा केव्हा अशा

व्यक्ती समाजाच्या संपर्कात येतात, त्यावेळी त्यांच्या अहंकाराचेच दर्शन घडते. आणि समाजात त्या नैतिक शक्ती म्हणून उभ्या राहू शकत नाहीत. अनेक गांधीवाद्यांची ही शोकांतिका झाली आहे. षड्रिपूंच्या आहारी जाणे याला वैयक्तिक आणि सामाजिक असे दोन्ही स्तर लाभले आहेत. पण त्यांना विधायक वळण मिळाले नाही. त्यामुळे अशा व्यक्तींच्या बाबतीत कामाचे रूपांतर विषयलोलुपतेत, क्रोधाचे हिंसाचारात, लोभाचे आर्थिक शोषणात, मोहाचे लालसेत, मदाचे माजोरीपणात आणि मत्सराचे रूपांतर द्वेषात होते. आणि अशा व्यक्ती स्वार्थापोटी समाजाविषयी बेफिकीर असतात. अशा तऱ्हेने एका बाजूने नैतिक शक्तींचा अभाव, आणि दुसऱ्या बाजूला सहजप्रेरणांना विधायक वळण न मिळणे, यामुळे वैयक्तिक आणि सामाजिक दुर्गुणांना मोकळे रान मिळाले असून हिंसाचार, शोषण, लालसा, माजोरीपणा, विषयलोलुपता आणि द्वेष यांनी सार्वजनिक जीवनात थैमान घातले आहे. आणि त्यात सत्ताधाऱ्यांपासून अनेकजण सहभागी झाले असून सार्वजनिक जीवन विलक्षण दुर्गंधीमय झाले आहे. एकंदर भारतीय अध्यात्माचा भारतीय व्यक्तिमत्वावर आणि सामाजिक जीवनावर जो परिणाम झाला तो निकोप असण्याऐवजी विपरीतच ठरला.

८) वर्णभेद आणि जातिभेद हे भारतीय व्यक्तिमत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण. त्याचा भारतीय समाजजीवनावर काय परिणाम झाला आहे याचा शोध घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. कारण जातिभेदाच्या कल्पनेचा प्रत्येक भारतीयावर विलक्षण पगडा आहे. प्रथम वर्णभेद होते. त्यातून जातिभेद निर्माण झाले. वर्णभेद आणि जातिभेद यांच्या उगमाबद्दल मतभेद आहेत. त्यासंबंधी चर्चा करण्याचे कारण नाही. जातिभेदाच्या समाजजीवनावर झालेल्या परिणामाचे मूल्यमापनच केवळ या ठिकाणी प्रस्तुत आहे.

वर्णभेद आणि जातिभेद यांमुळे समाजाचे विभाजन निरनिराळ्या जातींमध्ये होऊन समाजाची एकसंधता नष्ट झाली. हिंदुधर्माच्या व्यापक चौकटीमध्ये प्रत्येक जातीमध्ये तिचे स्वतंत्र आचार, रूढी, नियम, संस्कार इत्यादी उत्क्रांत झाले. साहजिकच निरनिराळ्या जातींमध्ये भेदाची दरी निर्माण होऊन त्यांच्यातील दळणवळण यथाकाल संपुष्टात आले. प्रत्येक जातीचा पेशाही निश्चित झाला. याचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे जातीचे संकुचित जग हेच प्रत्येकाचे सर्वस्व झाले आणि सर्व निष्ठा जातीपुरत्याच मर्यादित राहिल्या. जातीपलीकडे अधिकाधिक विस्तारित जग आहे, त्याचे आणि आपले काही हितसंबंध तरी समान आहेत, त्यासंबंधी आपली काही कर्तव्ये आहेत, ही भावना हळूहळू लुप्त झाली. पेशा हेच उदरनिर्वाहाचेही साधन झाले. त्यामुळे निष्ठाही पेशाशीच निगडित राहिल्या.

याचा परिणाम एकंदर भारताच्या इतिहासावर कसा झाला हे एका जातीच्या - लढाऊ जातीच्या - संदर्भात तपासून पाहण्यासारखे आहे, देशाचे रक्षण हे नेहमीच लढाऊ दलावर अवलंबून असते. लढणे हा पेशा झाल्यामुळे ते उदरनिर्वाहाचेही साधन झाले आणि आपण कोणासाठी लढतो हा प्रश्न अत्यंत दुय्यम झाला. युरोपात भाडोत्री सैनिकांची पद्धत होती. त्याच्याशी याची तुलना होऊ शकत नाही. कारण युरोपमध्ये भाडोत्री पेशा स्वीकारावयाचा हा प्रत्येक सैनिकाचा व्यक्तिगत निर्णय असे. तो त्याच्या जातीचा धर्म नव्हता. जातिनिहाय पेशाची निश्चिती झाल्याकारणाने दुसरा पेशा पत्करून उदरनिर्वाह करणे हे निषिद्ध समजले जाऊ लागले. 'स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:' या गीतेतील श्लोकात या वृत्तीचे प्रतिबिंब पडले आहे. साहजिकच लढण्याची नोकरी जेथे मिळेल तेथे करणे आणि ज्याची नोकरी धरली त्याच्याशी, मग तो स्वकीय असो अथवा परकीय, निष्ठा बाळगणे हे क्रमप्राप्त झाले. या वृत्तीचा सर्वात जुना ऐतिहासिक संदर्भ हीरोडोटसने लिहिलेल्या ग्रीसच्या इतिहासात मिळतो. पर्शियन सम्राट झर्क्सिस याच्या पदरी भारतीय सैन्याची एक तुकडी होती आणि तिने ग्रीसबरोबरच्या युद्धात भाग घेतला होता. कोठे भारत आणि कोठे ग्रीस. पण लढणे हे उदरनिर्वाहाचे साधन झाल्यावर जेथे मिळेल तेथे लढण्याची चाकरी केलीच पाहिजे. जात आणि पेशा यांची सांगड समाजात बसल्यानंतर प्रथम परजातीचा आणि नंतर परधर्मीय एवढेच भेद हिंदू समाज ओळखू लागला. स्वकीय आणि परकीय हा फरक आपणास कधीच जाणवला नाही. असा फरक आपण प्रथम करावयास लागलो तो इंग्रजी राजवटीत, पाश्चात्य शिक्षण घेण्यास सुरुवात केल्यानंतर. इराणी, दुराणी, तुर्की, पठाण, फिरंगी, हे सर्व परधर्मीय होते. परकीय नव्हते. यवन, कुशाण, हूण हे युद्धनेते (वॉर लॉर्डस्) होते. परकीय नव्हते. उलट कित्येक स्वकीयही परकीय समजले जात. भारताच्या इतिहासात याची असंख्य उदाहरणे आहेत. अलेक्झांडरने भारतावर आक्रमण केल्यानंतर पोरसशी शत्रुत्व असल्यामुळे, अंभीने अलेक्झांडरचे स्वागत केले. त्याबद्दल, आजच्या संकल्पनांचा आरोप त्या काळावर करून, त्याला देशद्रोही मानण्यात येते. अंभी हा राजा होता, राज्य करणे हा त्याचा पेशा होता. त्या पेशाला अनुसरून राज्यविस्तार करणे हा त्याचा धर्म होता. त्याच्या दृष्टीने पोरस हा त्याचा शत्रू होता आणि त्याचे निर्दालन करण्यासाठी त्याने त्रयस्थाची मदत घेतली. त्यावेळच्या राजनीतीला अनुसरूनच हे सर्व होते. पोरसने पुढे तेच केले. पोरसचा पराभव झाल्यानंतर त्याने अलेक्झांडरला 'मला राजासारखे वागव' असे बाणेदार उत्तर दिले, हा भाग सर्वांनाच माहीत आहे व त्यामुळे पोरसला आपण

राष्ट्रीय 'हीरो' बनवले. पुढचा इतिहास जास्त महत्त्वाचा आहे. पोरसने अलेक्झांडरचे मांडलिकत्व स्वीकारले आणि चिनाबपासून बिआसपर्यंतचा जो प्रदेश आहे त्यातील सर्व लहान लहान प्रजासत्ताके नष्ट करण्यास अलेक्झांडरला मदत करून त्याचे साम्राज्य बिआस नदीपर्यंत वाढविण्यास साहाय्य केले. याचे पारितोषिक म्हणून भारत सोडताना अलेक्झांडरने सिंधूपासून बिआस नदीपर्यंतच्या भूभागाचा गव्हर्नर म्हणून पोरसची नेमणूक केली. अलेक्झांडर भारतात असताना चंद्रगुप्त मौर्य त्याला भेटला होता आणि मगध साम्राज्यावर त्याने आक्रमण करावे म्हणून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत होता, असे ग्रीक इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे.

मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर हीच परंपरा पुढे सुरू राहिली. बाल्खमधील यवनांनी भारतावर आक्रमण केले. यवन राजा मिनँडर याने बौद्धधर्म स्वीकारल्याने बौद्धधर्मीयांचा तर त्याला पाठिंबा होताच; पण इतरांचाही असावा असे दिसते. कारण त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पार्थिव अवशेषांची राख त्याच्या राज्यातील सर्व नगरांनी आपापसात वाटून घेतली होती. त्यानंतर शक, कुशाण, हूण यांची आक्रमणे झाली. पण आपण त्यांची इमानेइतबारे नोकरी केली. कुशाणांचा बौद्धधर्मीय राजा कनिष्क याच्या दरबारी, चरकसंहितेचा कर्ता चरक, प्रसिद्ध बौद्धभिक्षु अश्वघोष हे होते. बौद्धभिक्षु नागार्जुन आणि वसुमित्र हेही कनिष्काशी संबंधित होते. शकक्षत्रप नहपान आणि त्याचा जावई ऋषभदत्त, तसेच एतद्देशीय सातवाहन राजे, या दोघांकडूनही बौद्धधर्मीय दानपत्रे घेत असत. हूणांचीदेखील आपण चाकरी केली. जबलपूरनजीक एरण येथे एक शिलालेख सापडला आहे. त्यात हूण राजा तोरमाण याचा राजाधिराज म्हणून मोठ्या गौरवाने उल्लेख केला आहे. दहाव्या-अकराव्या शतकापासून मुस्लिम आक्रमणे पुन्हा सुरू झाली. अनेक घराणी स्थापन झाली. पण त्यांना फारसा विरोध झाला नाही. सोळाव्या शतकात मुघलांनी आक्रमण केले. बाबरला आमंत्रण देण्यात रजपूत राजा राणा संग याचाही सहभाग होता. मुघलांचे राज्य तीनशे वर्षे टिकले. या प्रदीर्घ कालात हिंदूंनी त्यांच्याशी संपूर्ण सहकार्य केले. अपवाद फक्त राणा प्रतापचा. अकबराच्या कारकीर्दीत तर रजपुतांनी आपल्या मुलीदेखील मुसलमानांना दिल्या. राजा मानसिंग, राजा तोडरमल यांच्यासारखे रजपूत त्याच्या साम्राज्याचे आधारस्तंभ होते. औरंगजेबाचे धोरण धार्मिक छळणुकीचे होते. तरीही त्याला हिंदूंचे साहाय्य होतेच. शिवाजीचा बीमोड करण्यासाठी पाठविलेल्या सेनेचे आधिपत्य औरंगजेबाने रजपूत सेनापती राजा जयसिंह याच्याकडेच सोपविले होते. दक्षिणेतील मुसलमानी राज्यात तीच परिस्थिती होती. विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर येथील मुस्लिम राजांना हिंदू सरदारांची वाण

पडली नाही. शहाजीने लहान मुलाला निजामशाहीच्या गादीवर बसवून त्या राज्याचे संरक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. निजामशाहीच्या पाडावानंतर त्याने आदिलशाहाकडे नोकरी धरली. विजापूरकरांकडे अनेक मराठे सरदार होते. त्या सर्वांची बादशहाच्या मेहेरबानीसाठी स्पर्धा चालू असे. या सर्वांनीच शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेला विरोध केला होता. पेशाशी एकनिष्ठ असल्यामुळे पर्शिअन सम्राटांच्या आक्रमणापासून म्हणजे इ. स. पूर्व सहाव्या शतकापासून ते इंग्रजी राजवटीत राष्ट्रवादाचा उदय होईपर्यंतच्या दीर्घ कालात प्रादेशिक राष्ट्रवाद (रिजनल पेट्रिऑटिझम) देखील अस्तित्वात आला नाही. अपवाद फक्त शिवाजीच्या महाराष्ट्रधर्माचा. त्याच्यापासून स्फूर्ती घेतलेल्या राजा छत्रसाल याचा आणि काही प्रमाणात सुरजमल जाटचा. इंग्रज आल्यानंतरही लढण्याच्या बाबतीत पेशाशी एकनिष्ठ राहण्याची परंपरा पुढे चालू राहिली. इंग्रज, फ्रेंच यांच्या पदरी अनेक एतद्देशीय सैनिक होते. त्यांना कवायती शिक्षण देऊन प्रथम फ्रेंच आणि नंतर इंग्रज यांनी भारतात बस्तान बसवले. प्लासीच्या लढाईने इंग्रजी सत्तेचा पाया घातला. त्या लढाईत १००० युरोपियन सैन्य आणि २००० भारतीय शिपाई होते. बक्सारच्या लढाईत इंग्रजी सैन्याने मुघल बादशहा, बंगालचा नवाब आणि अयोध्येचा नवाब यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला. त्या लढाईत इंग्रजांचे सैन्य ७००० होते. त्यापैकी फक्त ८५७ युरोपियन सैनिक होते. बाकी सर्व भारतीय शिपाई होते. नंतर मराठ्यांबरोबर झालेल्या लढायांतही, महिदपूरच्या लढाईचा अपवाद वगळता, इतर लढायांत इंग्रज सैन्याचे प्रमाण अल्प होते. इंग्रजांनी भारत जिंकला म्हणण्यापेक्षा भारतीयांनीच इंग्रजांना भारत जिंकून दिला, हे वास्तव आहे. इंग्रजी सत्ता दृढमूल झाल्यानंतरही नोकरी करणे चालूच राहिले. अट फक्त एक होती. जातिधर्माचे पालन करता आले पाहिजे. त्यात इंग्रज ढवळाढवळ करीत आहेत ही आशंका १८५७ च्या बंडाचे एक प्रमुख कारण होते. तरीदेखील मद्रास, आणि मुंबई येथील भारतीय शिपाई इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले. भाड्याने जाण्याची ही प्रवृत्ती आजपर्यंत टिकून आहे.

लढाऊ जातीबद्दल जे म्हटले तेच इतर जातीबद्दलही खरे आहे. व्यापाऱ्यांना व्यापार करता आला म्हणजे राज्य कोणाचे हा प्रश्न व्यापाऱ्यांना पडला नाही. त्याला धक्का पोहोचला म्हणजे त्यांच्या निष्ठा बदलत असत. बंगालमध्ये सिराज उद्दौलाच्या कारकीर्दीत व्यापाऱ्यांना अपमानास्पद वागणूक मिळाल्यानंतर त्यांनी इंग्रजांशी संधान बांधले. इंग्रजांनी सिराज़ उद्दौलाला पदच्युत करण्यासाठी जी कटकारस्थाने केली त्यात जगत शेठ, उमीचंद या व्यापाऱ्यांचा सहभाग होता.

या ठिकाणी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. भारताप्रमाणेच इतर देशांवरही आक्रमणे झाली नाहीत किंवा तेथील लोकांनी नाइलाजापोटी आक्रमकांशी जमवून घेतले नाही असे नाही. परंतु आक्रमकांविरुद्ध असंतोष मात्र सतत राहिला. याउलट, जातिधर्म आणि कुलाचार पाळावयास मिळाला म्हणजे भारतीयांची आक्रमकांविरुद्ध कोणतीच तक्रार नव्हती. या संदर्भात अफगाणिस्तानचे उदाहरण देता येईल. इंग्रजांनी त्या देशावर आक्रमण केले; पण त्या देशावर अंमल बसवणे मात्र त्यांना शक्य झाले नाही. कारण तेथे राज्य करणे म्हणजे तो देश लष्करीदृष्ट्या व्यापणे असाच होता. पण इंग्रजांना विरोध एवढा झाला, की त्या देशावर सैनिकी ताबा ठेवण्याचा खर्च त्यांना परवडणारा नव्हता. त्यामुळे तेथून माघार घेणे त्यांना भाग पडले. याउलट, भारतात सर्वांनी सहकार्य केल्यामुळे इंग्रजांना येथे दीडशे वर्षे राज्य करणे शक्य झाले.

अशा तऱ्हेने जात आणि पेशा यांचा भारतीय व्यक्तिमत्त्वावरील परिणाम हजारो वर्षांइतका जुना आहे. राष्ट्रवादाचा उदय झाल्यानंतर इंग्रजी राजवटीत तो काही काल दबल्यासारखा झाला होता. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तो चौखूर उधळला आहे. इतका की मंत्रिमंडळ घोषित झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना, कोणत्या जातीला किती प्रतिनिधित्व दिले आहे, याचा खुलासा करणे लज्जास्पद न वाटता अभिमानास्पद वाटते.

९) न्यूनगंड हा भारतीय व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक विशेष. अनेक आक्रमणे सोसल्यानंतर असा गंड निर्माण झाला नसता तरच नवल ! पण इंग्रजी राजवटीतील काही काळाचा अपवाद वगळता आपण त्यातून बाहेर पडण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. त्यामुळे या गंडाचे परिणाम अनेक क्षेत्रांत जाणवतात. नवोपक्रमशीलतेचा अभाव आणि अनुकरण या दोहोंबद्दल वर विवेचन केलेच आहे. इतर दोषांमध्ये जबरदस्तापुढे शरणागती आणि दुर्बलांसमोर मुजोरी यांचा अंतर्भाव होतो. मुसलमानांचा अनुनय आणि तथाकथित हिंदुत्ववाद्यांविरुद्ध गर्जना हा केवळ राजकारण्यांचाच नव्हे, तर पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या विचारवंतांचाही छंद आहे. न्यूनगंडाचा सर्जनशीलतेवरही परिणाम होतो. कलावंत जर मुक्त नसेल तर त्याचा परिणाम त्याच्या निर्मितीवर होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे सर्जनशील कलावंत कमी, समीक्षक जास्त, विनोदकार विरळा, उपहासगर्भ लेखन करणारे अधिक असे दृश्य आढळते. परिणामी समाजात एकंदर वातावरण टिंगलटवाळीचे. असेच वातावरण साडेतीनशे वर्षांपूर्वीही महाराष्ट्रात असावे. त्याला उद्देशून रामदासांनी 'टवाळा आवडे विनोद' असे भाष्य केले असावे

असे दिसते. कोणत्याही गोष्टीतील चांगल्या भागाकडे दुर्लक्ष करून त्यात ज्या उणीवा असतील त्यावरच लक्ष केंद्रित करणे हा आपला एक विरंगुळा होऊन राहिला आहे. वस्तुत: सुधारणा होण्याच्या दृष्टीने अशा दोषदिग्दर्शनाची आवश्यकता असते. पण आपण उणीवा शोधतो त्या फक्त त्यांचा विपर्यास करून स्वत:चे मनोरंजन करण्यापुरत्याच. कोणत्याही वक्त्याच्या व्याख्यानातील टिंगलीचाच भाग फक्त आपल्या लक्षात राहतो, पण त्यातील तार्किक भाग मात्र आपल्याला कंटाळवतो.

१०) 'आत्मानं सततं रक्षेत' ही वृत्ती आणि अंगी बाणलेला न्यूनगंड यामुळे वैयक्तिक हितसंबंध आणि पूर्वग्रह बाजूला ठेवून कोणत्याही गोष्टीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची आपल्याला सवय नाही. न्यूनगंड असलेला समाज वास्तवाचे भान ठेवीत नाही. कारण वास्तवाचे आव्हान स्वीकारण्यासाठी ज्या आत्मविश्वासाची गरज असते तो त्या समाजाने केव्हाच गमावलेला असतो. राजकारणात तर याची अनेक उदाहरणे मिळतात. मुस्लिम जातीयवाद, शीख जातीयवाद, दहशतवाद यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्याचे आपण नेहमीच टाळले आहे. असा विचार ज्यांनी करावयाचा ते न्यूनगंडाने ग्रस्त असतात किंवा त्यांचे हितसंबंध तरी त्यांना करू देत नाहीत.

११) आध्यात्मिक गुरू तसेच गोसावी, बैरागी, मांत्रिक इत्यादींचा भारतीय व्यक्तिमत्त्वावर विशेष प्रभाव आहे. परमेश्वरी अवताराची कल्पना आणि भक्तिमार्ग या दोहोंचा मिलाफ होऊन आध्यात्मिक गुरूची संस्था अस्तित्वात आली. गुरू हा परमेश्वरी अवतार असून त्याची भक्ती केली असता त्याच्या कृपाप्रसादाने भवसागर तरून जाता येईल असा विश्वास भाविकांत असतो. भवसागर तरून जाणे म्हणजे गुरूचा कृपाप्रसाद मिळाल्यानंतर आयुष्यभर पापे करण्यास मोकळीक, असाच वास्तवात त्याचा अर्थ झाला आहे. आत्मपीडनाचे महत्त्व हिंदू संस्कृतीत फार मोठे आहे. पुराणांनी उपासतापास, व्रतवैकल्ये, आत्मपीडनाचे इतर प्रकार यांना उदंड लोकप्रियता मिळवून दिली. त्यातून गोसावी, बैरागी यांचे प्रस्थ वाढले. गांधीजींनी हिंदूंच्या या प्रवृत्तीचा राजकारणात फार कौशल्याने उपयोग करून घेतला. ज्या वेळी न्याय्य पद्धतीने एखादी महत्त्वाकांक्षा पुरी करता येण्यासारखी नसते किंवा तेवढा आत्मविश्वास नसतो त्यावेळी समाजात तांत्रिक-मांत्रिकांचे प्राबल्य माजते. अनेक भारतीय राजकारणी तंत्रमंत्राच्या मागे असतात त्याचे कारण हेच.

१२) मध्ययुगीन समाजाचे एक वैशिष्ट्य म्हणजे एकत्र कुटुंबपद्धती. त्याचे काही दुष्परिणाम आजही हिंदू व्यक्तिमत्त्वात आढळून येतात. आधुनिक भारताच्या इतिहासाची त्याच्या संदर्भातच अधिक चांगली उमज पडते. कर्त्याच्या छायेखाली

राहण्याच्या सवयीमुळे वैयक्तिक पुढाकार घेण्याच्या वृत्तीवर अनिष्ट मर्यादा पडल्या. साहजिकच हिंदू व्यक्तिमत्व हे सतत कर्त्याच्या आश्रयाखाली दबलेले आणि त्यामुळे खुरटलेले राहिले. घर सोडून नवीन साहसे अंगीकारण्याची वृत्ती आपण सोडल्याला हजार एक वर्षे तरी झाली. कोणत्याही बाबतीत निर्णय घेऊन त्याप्रमाणे कृती करण्याच्या बाबतीतील अक्षमता हा त्यातून उद्‌भवलेला एक दोष. साहजिकच कोणत्याही क्षेत्रात बंडखोरीचे प्रमाण अपवादात्मक आणि अत्यल्प आढळते. त्यामुळे एकंदर समाजाला स्थितिशीलता आली. वैचारिक क्षेत्रात जी काय थोडीफार बंडखोरी आढळते ती इंग्रजी राजवटीशी संपर्क आल्यानंतरच्या काळात. तथापि एकत्र कुटुंबपद्धतीचे परिणाम पुसून टाकण्याची क्षमता त्या बंडखोरीत नव्हती. न्या. रानडे यांचे उदाहरण या संदर्भात देण्यासारखे आहे. त्यांनी वैचारिक बंडखोरी केली, पण अखेर वडीलधाऱ्यांच्या समाधानासाठी त्यांना दुसरा विवाह एका बालकुमारिकेशी स्वत:च्या मताविरुद्ध करावा लागला. ज्या वेळी युरोपमधील तरुण नवीन नवीन क्षेत्रे धुंडाळत होते, नवीन साहसांना सामोरे जात होते त्या वेळी, माझे एक वयस्क नातेवाईक वर्णन करीत असत त्याप्रमाणे, कर्त्याचे धाकटे भाऊ सासुरवाशिणीला माहेरी पोहोचवायचे आणि पहिलटकरणीला बाळंतपणासाठी माहेरी आणावयाचे अशाच कार्यात गुंतलेले असत. भारतात औद्योगीकरण सुरू झाल्यानंतर एकत्र कुटुंबपद्धती मोडकळीस येऊ लागली. तरीदेखील तिचे परिणाम आजही जाणवतात. वैयक्तिक पुढाकाराचा, साहस अंगीकारण्याच्या प्रवृत्तीचा आणि निर्णय घेऊन त्याप्रमाणे कृती करण्याच्या क्षमतेचा अभाव हीच वैशिष्ट्ये विभक्त कुटुंबपद्धती आल्यानंतरही हिंदू व्यक्तिमत्त्वात आढळतात. राजकारण, समाजकारण, सेवाक्षेत्र अशा सर्वच ठिकाणी त्यांचे प्रदर्शन आढळून येते.

१३) संघटनेचा अभाव आणि त्याचा हिंदू व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम यांचाही शोध घेणे आवश्यक आहे. तसे पाहिले तर निसर्गत: मनुष्य दुबळा आहे. तो हरणासारखा चपळ नाही. वाघासारखी त्याला नखे किंवा दात नाहीत. शिंगे नाहीत. त्याला रंग बदलता येत नाही. त्यामुळे संरक्षणासाठी त्याला संघटना आणि बुद्धी यांवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे आदिम अवस्थेत मनुष्य टोळ्या करून राहू लागला. पुढे भारतात शांतता, स्थैर्य व सुबत्ता लाभल्यानंतर टोळीवादाची गरज संपली आणि धर्माचे स्वरूप आवश्यकत: व्यक्तिवादी झाले. याउलट, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांची प्रेरणा मूलत: टोळीवादी आहे. त्यामुळे त्यांचे स्वरूप सामूहिक (कॉंग्रिगेशनल) राहिले. मूळच्या टोळीवादी यहुदी धर्माला मानवतावादी स्वरूप देण्याच्या येशू ख्रिस्ताच्या प्रयत्नातून ख्रिश्चन धर्म हा नवीनच पंथ उदयास आला. पण पुढे

रानटी टोळ्यांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यानंतर ख्रिश्चन धर्माने पुन्हा टोळीवादाची वैशिष्टचे जागवली. ही प्रक्रिया जलद करण्यात शार्लमेनचा फार मोठा वाटा होता. तलवारीच्या जोरावर त्याने अनेक रानटी टोळ्यांचे धर्मांतर घडवून आणले. त्यावर बर्नार्ड शॉ यांनी अतिशय मार्मिक भाष्य केले आहे. "Conversion of every savage to christianity was conversion of christianity to savagery." प्रत्येक रानटी माणसाला ख्रिश्चन धर्माची दीक्षा देणे म्हणजे ख्रिश्चन धर्मालाच रानटीपणाची दीक्षा देणे होते. पुढे युरोपमध्ये जो धार्मिक संघर्ष झाला त्याचे मूळ टोळीवादी प्रवृत्तीतच शोधावे लागते. तथापि नंतर युरोपमध्ये रेनासान्स, रेफर्मेशन आणि नवीन जगाचा शोध यामुळे ख्रिश्चन लोक पुन्हा व्यक्तिवादाकडे वळण्यास सुरुवात झाली. त्याच्याच बरोबरीने टोळीवादाने राष्ट्रवादाचे अधिक प्रगत स्वरूप धारण केले. याच्या उलट, इस्लाममध्ये रेनासान्स, रेफर्मेशन या चळवळी न झाल्यामुळे त्याचे स्वरूप आजही टोळीवादी आहे. भारतात हिंदुधर्माचे स्वरूप व्यक्तिगत राहिल्यामुळे धर्माच्या व्यापक पायावर समाज केव्हाच संघटित झाला नाही. साहजिकच सामाजिक संघटन फक्त खेड्यापुरते मर्यादित राहिले. त्यामुळे मध्य आशियातून आलेल्या रानटी टोळ्या आणि इस्लामी आक्रमण यांना भारत कधीच तोंड देऊ शकला नाही. आजही भारतात टोळीवादी प्रेरणा असलेला इस्लाम आणि व्यक्तिवादी हिंदुधर्म यांची सांगड पडली आहे. त्यामुळे अल्पसंख्य असूनही मुसलमान येथे दिमाखाने, वेळप्रसंगी मग्रूरीने राहात आहेत. तर बहुसंख्याकांचे प्रतिनिधित्व करीत असूनही हिंदू राज्यकर्ते टोळीवादी प्रवृत्तीपुढे दबून राज्य करीत आहेत. त्यातच आजच्या जातीयवादाच्या समस्येचे मूळ आहे. इस्लामी टोळीवादाला लगाम घालून त्याचे रूपांतर प्रगत राष्ट्रवादात घडवून आणण्यास प्रयत्नशील झाल्याखेरीज येथील जातीय समस्या सुटणार नाही. पण त्यासाठी हिंदू व्यक्तिमत्वाच्या प्रेरणेतून निर्माण होणारी सामाजिक बेपर्वाई काबूत ठेवून हिंदूंचे संघटन करून त्याकरवी मुस्लिम टोळीवादाचे रूपांतर राष्ट्रवादात करणे आवश्यक आहे. तथापि निवडणुकीतील यश हा वैयक्तिक उत्कर्षाचा सोपान झाल्याकारणाने मुस्लिम टोळीवादी प्रेरणांना अधिकाधिक खतपाणी मिळत आहे आणि येथील जातीय समस्या अधिकच तीव्र होत आहे. यावर भारताची समस्या आर्थिक आहे आणि त्यावर आर्थिक उपाययोजना हेच उत्तर आहे, असा दावा केला जातो. पण साम्यवादाच्या प्रेषिताच्याच मते धर्म ही अफूची गोळी आहे. आणि हे व्यसन सोडण्यास मुसलमान तयार होत नाहीत तोपर्यंत आर्थिक प्रगतीचा उतारा त्यावर कसा काय लागू पडणार ? संघटित समाजच टोळीवाद काबूत आणू शकतो. पण अशा संघटनेच्या अभावी

परतंत्र भारतातील हिंदूप्रमाणेच स्वतंत्र भारतातील हिंदूही मुस्लिम टोळीवादापुढे भयग्रस्तच असतो. निधर्मीवादाची झूल पांघरणाऱ्या हिंदू विचारवंतांची भूमिका वस्तुनिष्ठपणे तपासली तर त्याच्यामागे ही भयग्रस्तताच आढळेल. राम, कृष्ण यांच्या नालस्तीने त्यांना भरते येते. पण इस्लामचे वस्तुनिष्ठ विश्लेषण त्यांच्या मानसिक ताकदीबाहेरचे असते. तसेच हिंदू जातीयवादाविरुद्ध गर्जना करणारे राज्यकर्ते मुस्लिम जातीयवादाचा अनुनय करतानाच आढळतात. संघटनेच्या अभावी हिंदू व्यक्तिमत्त्व पोचट आणि भेकड झाले असल्याचीच उदाहरणे भारताच्या आधुनिक इतिहासात वारंवार मिळतात. त्यातूनच दुसऱ्याच्या आश्रयाने राहण्याची सवय आणि त्यातून परिणत होणारी लांगूलचालनाची वृत्ती ही हिंदू व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये निर्माण झाली आहेत. राजकारणात नेहरूंपासून राजीव गांधींच्या काळात त्यांचेच दर्शन घडले. संघटनेच्या अभावाचा आणखी एक परिणाम म्हणजे परिस्थितीला तोंड देण्याऐवजी हिंदू तिच्याशी जमवून घेण्यातच धन्यता मानतो. व्यक्तीला परिस्थितीशी नेहमीच जमवून घ्यावे लागते, तर संघटना त्या परिस्थितीवर मात करण्याची निदान मनीषा तरी बाळगू शकते. संघटना हे सहकाराचेच स्वरूप आहे आणि सहकाराशिवाय उद्धार नाही, हा मानवी अस्तित्वाचाच मूलाधार आहे. पण हे हिंदू व्यक्तिमत्त्वाला कधी उमगलेच नाही आणि आजही त्याची ते समजून घेण्याची तयारी नाही.

भारतीय व्यक्तिमत्त्वाची जी वैशिष्टये वर विशद केली आहेत त्यांपैकी बरीचशी मनुष्य-स्वभावाचीच लक्षणे असून ती यच्चयावत मानवजातीला लागू आहेत, असा आक्षेप त्यासंबंधात घेतला जाण्याची शक्यता आहे. तथापि असा आक्षेप केवळ वरकरणीच योग्य वाटू शकेल. उपजत सहजप्रेरणा, आनुवंशिकता आणि पर्यावरण यांतून व्यक्तिमत्त्व साकार होत असते. समाजाचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात पर्यावरणाचा महत्त्वाचा भाग असतो. त्याचप्रमाणे आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक संस्था आणि संस्कार यांचेही योगदान असते. त्यामुळे एखादा समाज विजिगीषु असतो. एखादा समाज आक्रमक असतो, एखादा साहसखोर असतो, तर एखादा समाज नुसता अस्तित्वासाठी धडपडत असतो. गेली हजारएक वर्षे तरी भारत हा निव्वळ अस्तित्वासाठी धडपड करीत राहिला आहे. ही धडपड आणि मानवी स्वभावाची लक्षणे यांच्या संयोगातून भारतीय व्यक्तिमत्त्व साकार झाले आहे. याच पद्धतीने ज्यू व्यक्तिमत्त्व, मुस्लिम व्यक्तिमत्त्व, अमेरिकन व्यक्तिमत्त्व यांचाही वेध घेता येईल.

प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने महत्त्वाची वाटली तेवढीच भारतीय व्यक्तिमत्त्वाची लक्षणे वर उल्लेखिली आहेत. त्याशिवाय न्या. रानडे यांच्या लेखांतील अवतरणे

वर दिली आहेत त्यात काही वैगुण्यांचा उल्लेख आहे. त्यामुळे या लेखात नमूद केलेल्या वैशिष्ट्यांची यादी सर्वसमावेशक (एक्झॉस्टिव्ह) नाही याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

भारतीय व्यक्तिमत्त्व हे हिंदू संस्कृतीचे एक अभिन्न अंग आहे. एवंगुण विशिष्ट संस्कृतीचा संपर्क इंग्रजी राजवटीत एकदम वेगळ्या संस्कृतीशी आला. त्याचे परिणाम काय झाले याचा शोध घेण्यासाठी त्या राजवटीचे स्वरूप जाणून घेणे अगत्याचे आहे.

जो देश परतंत्र नसतो तेथील राज्यकर्ते आणि लोक यांची संस्कृती एकच असते. परंतु भारतात इंग्रजी राजवट स्थापन झाल्यानंतर राज्यकर्ते एका संस्कृतीचे, तर जनता वेगळ्या संस्कृतीची अशी परिस्थिती निर्माण झाली. दुसरे म्हणजे इंग्रजांचे शासन आधुनिक होते, तर समाज सरंजामी होता. म्हणजे सरंजामी समाज आणि आधुनिक शासन यांची विचित्र सांगड भारतात पडली होती. या विसंवादातून सुसंवाद कसा निर्माण करायचा हे भारतीय जनतेचा नवीन राज्यपद्धतीला कसा प्रतिसाद मिळतो यावर अवलंबून होते. या प्रतिसादाचे स्वरूप भारतीय व्यक्तिमत्त्व निश्चित करणार होते. तथापि, तो जाणून घेण्यापूर्वी इंग्रजी राजवटीची वैशिष्ट्ये समजावून घेतली पाहिजेत.

# ३

# भारताचे आधुनिकीकरण

इंग्रजांनी भारतात आधुनिक राज्यपद्धती आणली. ही पद्धती भारतीयांना परिचित असलेल्या राज्यपद्धतीपेक्षा अनेक अंगांनी अगदी वेगळी होती.

१) इंग्रजी राजवटीचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शांतता आणि सुव्यवस्था. उत्तरपेशवाईमध्ये ठग, पेंढारी, बाजारबुणगे यांनी जो धुमाकूळ घातला होता त्याच्या, तसेच ज्या अंतर्गत लढाया चालू होत्या त्याच्या पार्श्वभूमीवर इंग्रजांनी प्रस्थापित केलेली शांतता आणि सुव्यवस्था ही सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अत्यंत अनुकूल व स्वागतार्ह घटना होती. इंग्रजी राज्यात काठीस सोने बांधून कोठेही जावे असा जो वाक्प्रचार रूढ झाला होता, त्यावरून इंग्रजी राजवटीतील शांतता आणि सुव्यवस्था यांनी सर्वसामान्य माणूस किती भारावून गेला होता याचे दर्शन घडते. इंग्रजी राजवटीपूर्वी शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी प्रामुख्याने जमीनदारांकडे होती, पण ही सरंजामी पद्धत असल्यामुळे त्यात एकसूत्रता नव्हती. इंग्रजांनी शासनाचा अंगभूत भाग असलेली अत्यंत कार्यक्षम अशी पोलिसयंत्रणा उभारून तिच्याकडे गुन्ह्यांचा शोध, गुन्हेगारांविरुद्ध खटले दाखल करणे नि गुन्ह्यांना अटकाव करणे, तसेच सर्वसाधारण शांतता व सुव्यवस्था राखणे अशी कामे सोपविली. ही सर्व कामे पोलिसयंत्रणेने अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडली. त्यामुळे जीवित नि मालमत्ता यांचे रक्षण करण्याच्या त्या यंत्रणेच्या क्षमतेबद्दल जनतेत विश्वास निर्माण झाला. वर उल्लेख केल्याप्रमाणे जातिधर्म व धर्माचरण यासंबंधात मोकळीक मिळाली म्हणजे आपली कशाबद्दलच तक्रार नसे.

हेस्टिंग्जवर महाभियोग चालू असता भारतीयांच्यातर्फे हेस्टिंग्जच्या वतीने काही निवेदने देण्यात आली होती. त्यात बनारसच्या नागरिकांचे एक निवेदन होते. त्यात म्हटले होते की, 'ते आमच्या संप्रदायाचे पावित्र्य अबाधित राहावे याबाबत अतिशय आग्रही होते.' बनारसचे पंडित आणि ब्रह्मवृंद यांनी हेस्टिंग्जला दिलेले आणखी एक प्रशस्तिपत्र.

"जेव्हा जेव्हा गव्हर्नर जनरल हेंस्टिंग्ज येथे येत असत आणि लोक जमत असत तेव्हा आपल्या वागणुकीने ते प्रत्येकाचे हृदय प्रमोदित करत असत... सर्व तीर्थक्षेत्रात विश्वेश्वराच्या मंदिराचे स्थान आद्य आहे. आम्हा पामरांना संतोष व्हावा म्हणून त्यांनी देवळाच्या प्रवेशद्वारावर स्वत:च्या खर्चाने एक भव्य नगारखाना बांधवून घेतला." शांतता आणि सुव्यवस्था स्थापन झाल्यानंतर 'उदंड जाहले पाणी, स्नानसंध्या कराया' अशीच अवस्था झाली. साहजिकच इंग्रजी राजवटीने अनेकांचा दुवा मिळवला. ती राजवट स्थिर होण्याच्या दृष्टीने शांतता आणि सुव्यवस्था यांचे फार मोठे योगदान होते.

२) इंग्रज येण्यापूर्वी भारतातील राज्यपद्धती सरंजामशहांवर अवलंबून असल्यामुळे अत्यंत ढिली होती. त्याऐवजी इंग्रजांनी अत्यंत कार्यक्षम शासकीय पद्धती अंमलात आणली. सबंध भारतभर त्यात सुसूत्रता होती. निर्णय घेणे, त्यांची अंमलबजावणी करणे, दैनंदिन कारभार पाहणे यासाठी गव्हर्नर जनरलपासून ते थेट तलाठ्यापर्यंत कामाची वाटणी करून प्रत्येकाचे अधिकारक्षेत्र निश्चित करण्यात आले. त्यामुळे सबंध राज्यकारभारात सुसूत्रता आली. त्याचबरोबर शासकीय कर्मचाऱ्यांनी जनतेची पिळवणूक करू नये म्हणून भ्रष्टाचाराविरुद्ध कायदाही करण्यात आला. सरंजामशाहीच्या विरोधात नोकरशाही (सिव्हिल सर्व्हिसेस) हे आधुनिक राज्यपद्धतीचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे.

३) आधुनिक राज्यपद्धतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वित्तव्यवस्था (फायनान्शिअल ॲडमिनिस्ट्रेशन). त्यापूर्वीच्या भारतीय राजवटीत राजाचे उत्पन्न आणि राज्याचे उत्पन्न यात फरक केला जात नसे. जे पारंपरिक कर होते ते राजाला मिळत असत आणि त्यातून त्याने राज्यकारभाराचा खर्च भागवावा अशी अपेक्षा असे. पैसा कमी पडला तर सत्ताधाऱ्यांनी वैयक्तिक कर्ज काढावे अथवा दुसऱ्या राजाकडून खंडणी वसूल करावी अशी पद्धत होती. त्यामुळे पुष्कळ वेळा सत्ताधारी वैयक्तिकरीत्या कर्जबाजारी होत असत. पेशवे तर कर्जात आकंठ बुडालेले असत. युद्धासाठी किंवा राज्यकारभारासाठी होणाऱ्या खर्चाचा वाटा रयतेने उचलला पाहिजे ही संकल्पनाच अस्तित्वात नव्हती. इंग्लंडमध्येही सुरुवातीला हीच पद्धत होती, परंतु

राजाच्या खिदमतीत जी खाती होती ती हळूहळू सार्वजनिक क्षेत्रात आली (दे मूव्हड आऊट ऑफ रॉयल हाऊसहोल्ड) आणि राज्याचा खर्च नि राजाचा खर्च यात फरक करण्यात येऊ लागला. भारतात ही प्रक्रिया केव्हाच सुरू झाली नाही. इंग्रजांनी त्यांच्या देशातील वित्तव्यवस्था भारतात आणली. त्याची प्रमुख सूत्रे दोन : (१) आय आणि व्यय किंवा राज्याचे उत्पन्न नि त्याचा खर्च यांची तोडमिळवणी झाली पाहिजे, आणि खर्च जास्त असेल तर रयतेवर कर लादून उत्पन्न वाढविले पाहिजे. (२) जी अनुदाने मंजूर झाली असतील त्यांच्या मर्यादितच खर्च झाला पाहिजे. या सूत्रांच्या अनुरोधाने राज्यकारभार सुरू झाल्यानंतर साहजिकच रयतेवरील कराचा बोजा वाढला. इंग्रज सरकारची उत्पन्नाची तीन प्रमुख साधने होती. शेतसारा, अबकारी कर आणि स्टॅंप ड्युटी. भारतात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने कराचा सर्वात जास्त बोजा शेतकऱ्यांवरच पडला आणि शेतकऱ्यांची परिस्थिती नेहमीच दयनीय राहिली.

४) खडे सैन्य हे आधुनिक राज्यपद्धतीचे आणखी एक प्रमुख अंग. सरंजामशाहीत प्रत्येक सरदाराने स्वत:चे सैन्य बाळगण्याची पद्धत होती. पेशव्यांबरोबरच शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरकर भोसले यांची स्वत:ची सैन्ये होती. आणि लढाईमध्ये ते आपापली सैन्ये घेऊन उतरत असत. त्यामुळे राज्यप्रमुखांचे कोणतेही नियंत्रण या सैन्यावर नसे. इंग्रजांनी ही पद्धत बंद करून शांततारक्षणासाठी आणि भारतीय वसाहतीच्या रक्षणासाठी खडे सैन्य ठेवण्याची प्रथा सुरू केली. त्यामुळे सैन्य मध्यवर्ती सरकारच्या संपूर्ण हुकूमतीखाली आले. त्याचा उपयोग अत्यंत कार्यक्षमतेने होऊ लागला. सैन्याच्या हालचालीत सुसूत्रता आली. देशाच्या ज्या भागात गरज असेल तेथे सैन्य पाठवणे शक्य झाले. खडया सैन्याच्या पद्धतीमुळे कमी सैन्यात देशाच्या लष्करी गरजा भागू लागल्या. साहजिकच एतद्देशीय सत्ताधाऱ्यांकडील अनेक सैनिक बेकार झाले आणि त्यांच्यात असंतोष निर्माण झाला.

५) इंग्रजांनी भारतात कायद्याचे राज्य स्थापन केले. कायद्याचे राज्य म्हणजे कायदा सर्वश्रेष्ठ असून तो सत्ताधारी आणि रयत या दोघांवरही बंधनकारक असून त्याचे उल्लंघन कोणासही करता येत नाही. कायदा म्हणजे सार्वभौम सत्तेने केलेले नियम. आणि सार्वभौम सत्तेने ते केलेले असतात म्हणूनच ते सरकारी अधिकारी आणि रयत यांवर बंधनकारक असतात. वास्तविक भारतात ही संकल्पना नवीन नाही. कौटिल्याने अर्थशास्त्रात आणि नारदस्मृतीनेही हा विचार मांडला होता. राजाने केलेल्या कायद्याला स्वत:ची अशी स्वतंत्र बंधनकारकता असते आणि तो शास्त्रसंमत

असण्याची गरज नाही. तसेच तो पवित्र शास्त्राहूनही अधिक बलवत्तर असतो, असा दावा अर्थशास्त्रात केला आहे. तथापि प्रत्यक्षात मात्र ही भूमिका मान्य करण्यात आली नव्हती. कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेत प्रत्येकाला कायद्याची माहिती असण्याची गरज असते. त्यानुसार इंग्रजांनी अनेक कायदे केले. भारतीय दंडसंहिता, कराराचा कायदा, मालमत्ता हस्तांतरण कायदा इत्यादी. हे सर्व कायदे इंग्रजी कायद्यांवर आधारलेले होते. त्यांत भारतीय परिस्थितीला अनुरूप असे काही बदल करण्यात आले, पण ते अत्यंत जुजबी होते, त्यामुळे कायद्याच्या राज्यामुळे रयतेवर अन्यायच जास्त झाला. नव्या कायद्यातील दोन तरतुदींनी तर दूरगामी परिणाम घडवून आणले. त्याआधी दामदुपटीचा नियम प्रचलित होता. त्या नियमानुसार मुद्दल आणि व्याज मिळून दामदुपटीपेक्षा जास्त रकमेवर धनकोला अधिकार सांगता येत नसे. नव्या कायद्यात या प्रथेला स्थान मिळाले नाही. गहाणाची जी पद्धत अस्तित्वात होती त्यानुसार गहाण ठेवलेल्या वस्तूवर धनकोला मालकी हक्क मिळत नसे. मालमत्ता हस्तांतरण कायद्याने इंग्रजी प्रथेप्रमाणे हा अधिकार धनकोला दिला गेला. या तरतुदींचा विशेषत: शेतकऱ्यांवर अत्यंत विपरीत परिणाम झाला. नवीन कायद्यांच्या बरोबरीनेच नवीन न्यायदान पद्धतीही अमलात आणली. मुन्सफाच्या कोर्टापासून ते प्रीव्ही कौन्सिलपर्यंत न्यायालयांची एक उतरंड तयार केली आणि तेथील कामकाजासाठी सिव्हिल प्रोसिजर कोड आणि क्रिमिनल प्रोसिजर कोड तयार केले. न्यायालयीन काम नि:पक्षपातीपणाने चालावे म्हणून बऱ्याच प्रमाणात शासन आणि न्यायव्यवस्था यांची फारकत केली. न्याय सुलभतेने मिळावा म्हणून इंग्रजांनी कायद्याच्या राज्याची स्थापना केली. पण न्यायदानपद्धतीत अंतर्भूत असलेल्या दीर्घसूत्रीपणाचा पुरेपूर फायदा उठवून आपण कायद्याच्या राज्याचे रूपांतर कायदेबाजीच्या राज्यात केले. आणि त्यामुळे न्यायापेक्षा अन्यायच जास्त होऊ लागला.

६) इंग्रजांनी न्यायाची नवीन संकल्पना भारतात आणली. त्यापूर्वी भारतात परमेश्वरी न्याय, दैवी न्याय यापलीकडे न्यायाच्या संकल्पनेला स्थान नव्हते. 'नवऱ्याने मारले आणि पावसाने झोडले तर फिर्याद कोणाकडे करायची ?'' या वाक्प्रचारात सत्ता असलेल्याने केलेल्या अन्यायाला दैवी अन्यायाच्या पातळीवर बसविले आहे. साहजिक मानवी अन्यायदेखील दैवी न्यायच दूर करू शकेल अशी हताशपणाची भावना सर्वदूर होती. इंग्रजांनी मानवी अन्याय दूर करून घेण्यासाठी न्यायालयांची स्थापना केली. तसेच, समाजाने मान्य केलेल्या अन्यायांना प्रतिबंध केला. सतीची चाल बंद करणे, विधवा-विवाह कायदेशीर ठरविणे, नरमेधबंदी, इत्यादी या दिशेने

केलेले काही उपाय. याच्या पुढचे पाऊल म्हणजे १८३३ च्या चार्टर कायद्याने धर्म, वंश, जात, पंथ यांवर आधारित भेदभावाला शासकीय नोकरीत प्रतिबंध करून सामाजिक न्यायाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले.

लॉक आणि रूसो या तत्त्वज्ञांनी युरोपमध्ये न्यायाची नवीन संकल्पना मांडली. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीला मूलभूत अधिकार असून ते त्याच्यापासून हिरावून घेणे म्हणजे अन्याय करणे होय. साहजिकच असे अधिकार व्यक्तीला मिळवून देणे म्हणजेच न्याय करणे होय. इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाल्यानंतर सुशिक्षित भारतीयही न्यायाच्या नव्या संकल्पनेच्या प्रभावाखाली आले आणि त्यांनी भारतीयांना अधिकार मिळावे म्हणून अर्ज-विनंत्या करण्यास सुरुवात केली. त्यातून पुढे राजकीय चळवळ उभी राहिली.

७) इंग्रजांनी भारताचे आर्थिक शोषण केले ही गोष्ट जितकी खरी, तितकीच राज्य अखेर जनतेच्या कल्याणासाठी असल्यामुळे शासनाची तत्संबंधी काही कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असतात, ही कल्पना त्यांनी प्रथमच भारतात आणली हेही तितकेच खरे. तत्पूर्वी एतद्देशीय राजवटीत लोककल्याणासाठी करण्यात आलेला खर्च धर्मादायापोटी असे. राज्यकर्त्यांची ती जबाबदारी नव्हती. त्यामुळे जनतेला त्यासंबंधी कोणताही अधिकार नसे. भारतास नेहमीच जाचक ठरलेली समस्या म्हणजे दुष्काळ. भारतात अनेक दुष्काळ पडले, परंतु दुष्काळात जनतेला मदत करण्याची कायदेशीर जबाबदारी कोणीही राज्यकर्त्यांनी आपल्यावर घेतली नाही. जे काय केले जात असे ते भूतदयेच्या भूमिकेतून, कायद्याच्या नव्हे. अशी भूतदया मंगळवेढ्याच्या दामाजीपंतांनी सरकारी धान्याचे कोठार लुटू देऊन दाखविली, पण ती त्यांच्या अंगलट आली. तेव्हा साक्षात पंढरीनाथाला महाराचे रूप घेऊन त्यांच्या साहाय्यार्थ धावावे लागले. आज असा दामाजीपंत निघाला तर त्याच्या साहाय्याला पंढरीनाथ येणार नाहीच, पण दामाजीपंतांना हातकड्या मात्र बसतील. इंग्रजांनी 'फेमिन कोड' तयार करून दुष्काळ ही भूतदयेची बाब नसून दुष्काळनिवारण ही शासनाची जबाबदारी आहे हे मान्य केले. कोडातील तरतुदी काय होत्या, त्यांची अंमलबजावणी कशा तऱ्हेने होत होती, इत्यादी प्रश्न या ठिकाणी गैरलागू आहेत. अंमलबजावणीपेक्षा शासनाने जे तत्त्व स्वीकारले त्याचे महत्त्व मोठे होते. कारण त्या तत्त्वाच्या आधारानेच शासन आणि रयत यांचे संबंध निश्चित होणार होते. तसे पाहिले तर लोकोपयोगी कामे अगदी चंद्रगुप्त मौर्याच्या काळापासून भारतात होत असत असा ऐतिहासिक पुरावा आहे. सरदार रास्ते यांनी कर्नाटक लुटला आणि घाट बांधले व ब्राह्मणांना घरे दान

दिली. पण ती त्यांची कायदेशीर जबाबदारी नव्हती. कायदेशीर जबाबदारी म्हटली म्हणजे शासनास जाब विचारण्याचा अधिकार रयतेला मिळतो.

८) इंग्रजांनी त्यांच्या व्यापारासाठी आणि राज्यकारभाराच्या सोयीसाठी अनेक भौतिक सुधारणाही केल्या. अर्थात त्यांचा उपयोग भारताच्या निरनिराळ्या भागात राहणाऱ्या लोकांमधील दळवळण वाढण्यासाठीही झाला. पोस्ट, रेल्वे व टेलीग्राफ या त्यापैकी महत्त्वाच्या सुधारणा. इंग्रजांनी अशा सुधारणा करताना किती दूरवर विचार केला होता याचे दर्शन डलहौसीने आपल्या कारभाराचा विस्तृत आढावा घेतला होता त्यात घडते. रेल्वे, टेलीग्राफ आणि पोस्ट यांसारख्या महत्त्वाच्या सुधारणांबरोबरच स्त्री-शिक्षण, नरमेधबंदी, तुरुंग सुधारणा, इंजिनिअरिंग कॉलेज आणि क्लासेस, चहा आणि रेशीम यांचे उत्पादन, कोळसा आणि लोखंडाच्या खाणींचा शोध, घोडयांची पैदास, तसेच ऑस्ट्रेलियातून मरिनो एडक्यांची आयात करून चांगल्या जातीच्या मेंढयांची पैदास, वनीकरण अशा बाबींकडेही लक्ष पुरविले होते.

९) या सर्व सुधारणांच्या मागे सुराज्य स्थापणे एवढाच हेतू नव्हता, तर त्याच्याच बरोबरीने एतद्देशियांची उन्नती व्हावी, हेही उद्दिष्ट इंग्रजी राजवटीने आपल्यासमोर ठेवले होते. एल्फिन्स्टन, मन्रो, मेटकाफ, माल्कम, मेकॉले या सर्वांनीच हा आशावाद व्यक्त केला होता. मन्रो त्याच्या टिपणात म्हणतो, 'एतद्देशियांची मानसिक उन्नती करणे हे निस्संशयपणे आपले उद्दिष्ट असावयास पाहिजे. जेव्हा आपला भारताबरोबरचा संबंध संपुष्टात येईल त्यावेळी, आपण भारतात आलो त्या वेळेपेक्षा लोकांना अधिक क्षुद्र आणि राज्य करण्यास अधिक नालायक करून सोडले, असे आढळून येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे... आपण भारताकडे एक हंगामी वसाहत म्हणून पाहता कामा नये, तर भावी कालात जेव्हा भारतीय आपल्या अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह सोडून, स्वत:चे शासन स्थापण्यास, चालविण्यास आणि राखण्यास प्रबुद्ध होतील, तोपर्यंत टिकवून धरण्याचे राज्य म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. जेव्हा अशी वेळ येईल त्यावेळी इंग्रजांनी भारतावरील आपला ताबा हळूहळू सोडणे हे दोन्ही देशांच्या दृष्टीने उत्कृष्ट होईल.' याचा अर्थ भारत हा भौतिक आणि वैचारिक अशा दोन्ही दृष्टींनी आधुनिक व्हावा अशी इंग्रजांची मनीषा होती. तसेच, इंग्रजी राजवटीची खूण ज्यांनी बरोबर ओळखली होती अशा सर्व भारतीयांची म्हणजे बंगालमध्ये राजा राममोहन रॉय, पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, देवेन्द्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन, इत्यादी तर महाराष्ट्रात लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, न्या. रानडे, गोखले, आगरकर, जोतीबा फुले, टिळक, या सर्वांनाच भारत आधुनिक व्हावा अशी ओढ होती. या

यादीतील टिळकांचे नाव काहीजणांना खटकण्याचा संभव आहे. पण उत्तरायुष्यात टिळकांचा दृष्टिकोन खूपच उदार झाला होता. त्यांनी आपल्या मुलींची लग्ने त्या कालाच्या मानाने बऱ्याच उशिरा केली होती. अस्पृश्यतेला त्यांचा विरोध होता वगैरे गोष्टी विचारात घेतल्या, तर त्यांचे नाव खटकण्याचे कारण नाही. आजही 'एकविसाव्या शतकाकडे वाटचाल' ही भाषा सर्वत्र ऐकू येते. म्हणजे जवळजवळ दीडशे वर्षांहून अधिक कालपर्यंत भारताला आधुनिक बनविण्याचा प्रयत्न किंवा तशी भाषा चालू आहे. मग भारत खरोखरीच आधुनिक झाला का ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याकरिता आधुनिक आणि आधुनिकता यांचा अर्थ समजावून घेतला पाहिजे आणि इंग्रजांनी त्यासाठी कोणता मार्ग अनुसरला व आपला त्यास काय प्रतिसाद होता हे पाहिले पाहिजे.

## आधुनिक आणि आधुनिकता

हे दोन्ही शब्द आपण अतिशय वेगळ्या अर्थाने वापरतो. आधुनिक म्हणजे अगदी अलीकडील किंवा सांप्रतचा काल, आणि आधुनिकता म्हणजे आधुनिक सुखसोयींनी युक्त अशी राहणी, अशी काहीतरी संदिग्ध कल्पना आपल्या मनात असते. पण या दोन्ही शब्दांना इतिहासात निश्चित अर्थ आहे आणि तो समजावून घेतला म्हणजे भारताची प्रगती होत आहे की परागती, याचा शोध घेता येईल.

आधुनिक भारत ही संकल्पना आपण युरोपच्या इतिहासातून उसनवार घेतलेली आहे. युरोपच्या इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक (मॉडर्न) असे तीन भाग कल्पिलेले आहेत. कला, साहित्य, विज्ञान यांतील सर्जनशीलता हे प्राचीन कालाचे वैशिष्ट्य होते. साधारण पाचव्या शतकापासून म्हणजे पश्चिमेतील रोमन साम्राज्याच्या पतनापासून ते १५ व्या शतकापर्यंत म्हणजे पूर्वेतील अथवा कॉन्स्टँटिनोपलच्या रोमन साम्राज्याच्या अंतापर्यंतच्या कालाला मध्ययुग समजतात. अंधश्रद्धा, चर्चचे मानवी जीवनावरील, तसेच साहित्य व कला यांवरील सर्वंकष नियंत्रण आणि त्यामुळे सर्व क्षेत्रातील सर्जनशीलतेचा ऱ्हास, सरंजामशाही ही मध्ययुगाची वैशिष्टचे होत. विद्यांचे पुनरुज्जीवन (रेनासान्स), धर्म-सुधारणा (रेफर्मेशन) आणि नवीन जगाचा शोध या तीन घटनांनी मध्ययुगातून आधुनिक काळातील संक्रमण साजरे झाले. प्राचीन विद्यांच्या पुनरुज्जीवनाने कला आणि साहित्य यांतील सर्जनशीलता, मानवतावाद, बुद्धिवाद, नवीन शोध यांना चालना मिळाली. रेनासान्सनंतरचा टप्पा म्हणजे प्रबोधनकाल (एज ऑफ रीझन). पूर्वग्रह, धर्म, श्रद्धा, इत्यादी विवेकाच्या निकषावर घासूनच स्वीकारली पाहिजेत ही त्यामागची कल्पना. तथापि विवेक (रीझन) सामान्य माणसाला दुष्प्राप्य

निबंध ३५६० वा. क्र. २७०८९ ८।६।९३



असल्यामुळे ती गरज त्यांच्यासाठी राजाने भागविली पाहिजे, हा विचार त्यातून पुढे आला. त्यातून प्रवुद्ध हुकूमशहांचे युग (अेज ऑफ एनलायटन्ड डेस्पॉटस) सुरू झाले. राजाचे, राजाने, लोकांसाठी चालविलेले राज्य, असे साधारणपणे त्याचे वर्णन करता येईल. ते संपुष्टात आणले फ्रेंच राज्यक्रांतीने. राष्ट्रवाद, लोकशाही, उदारमतवाद, समाजवाद इ. कल्पना त्या क्रांतीने प्रसारात आणल्या. अशा तऱ्हेने १९ व्या शतकात युरोप एका वैचारिक वावटळीतून जात होता. त्याच काळात इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन केली. साहजिकच इंग्रज राज्यकर्त्यांच्या धोरणात नव्या विचारांचे प्रतिबिंब पडलेले आढळते. बेंटिंकच्या सुधारणा हा त्याचाच परिणाम होता. तसेच भारताला आधुनिक बनविण्याच्या प्रक्रियेला त्यापासूनच चालना मिळाली. भारतातील आधुनिक युगाला सुरुवात झाली ती राजा राममोहन रॉय यांच्यापासून. कारण त्यांनी बुद्धिवादाचा पुरस्कार केला. तथापि भारत आधुनिक बनणार होता, तो मानवतावाद, बुद्धिवाद, सरंजामशाहीचा अंत - मानसिक आणि संस्थात्मक - कला, साहित्य, आणि विज्ञान यांतील सर्जनशीलता, अंधश्रद्धेचे निर्मूलन इत्यादी गोष्टी आत्मसात केल्यानंतरच. भारताच्या भौतिक आधुनिकीकरणाला इंग्रजांनी सुरुवात केलीच होती. भारताचे वैचारिक आधुनिकीकरण, आपण नवीन विचाराला कसा प्रतिसाद देतो यावर अवलंबून होते.

आधुनिकता ही मनाची अवस्था आहे. आधुनिक युगाची जी लक्षणे वर सांगितली आहेत. ती आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनवणे म्हणजे आधुनिकता, असे समीकरण मांडता येईल. आधुनिकता आणि आधुनिक सुखसोयींचा काहीही संबंध नाही. तसा असेल तर तेलाच्या पैशाने अत्यंत समृद्धीचे जीवन जगणाऱ्या अरबांना अत्याधुनिक म्हणावे लागेल. वस्तुत: आधुनिकतेला कालाचे बंधन नाही. ती कालातीत आहे. सॉक्रेटिस, बुद्ध, अशोक, राजा राममोहन रॉय, देवावर विश्वास ठेवणारे न्या. रानडे, आणि देवाचे अस्तित्व नाकारणारे आगरकर, जोतिबा फुले, संन्यास स्वीकारलेले विवेकानंद इत्यादी, हे चिरंतन कालपर्यंतचे आधुनिक होत. या सर्वांनीच आधुनिकता अंगी बाणवली होती. तथापि भारत मात्र आधुनिक बनू शकला नाही. आणि स्वातंत्र्यानंतर तर भारतात आधुनिकता उरली आहे ती फक्त पाश्चात्यांची मर्कटचेष्टिते करण्यापुरतीच. पाश्चात्य पेहेराव, बर्थ डे केक, फ्रीज, टी.व्ही., मोटार, कॉन्व्हेन्टमधील शिक्षण, एकोणचाळीसचा अर्थ थर्टीनाईन म्हणून मुलाला समजावून सांगताना अंगावर उठणारे रोमांच, बॉय फ्रेंड, गर्ल फ्रेंड यांचा सुळसुळाट, ड्रिंक्स, नाईट पायजमा आणि गाऊन, घरातील अत्याधुनिक फर्निचर, गिझर, इत्यादींपुरतीच आपली आधुनिकता मर्यादित आहे.

भारताला वैचारिकदृष्ट्या आधुनिक बनविण्यासाठी इंग्रजांनी मार्ग चोखाळला होता तो शिक्षणाचा. एल्फिन्स्टनने आपल्या टिपणात म्हटले आहे, की भारतातील सर्व अनिष्ट प्रवृत्तींवर एकच उतारा आहे तो म्हणजे शिक्षणाचा. मेकॉलेने तोच विचार उचलून धरला. आणि आपले शिक्षणविषयक टिपण तयार केले. या टिपणात काही अज्ञानजन्य विधाने आहेत. कोठे साम्राज्यवादी अहंता आहे. आणि त्यांनाच धरून टिपणाचा धिक्कार करणे हा अनेकांचा फुरसतीचा खेळ झाला आहे. सबंध टिपणावर चर्चा या ठिकाणी अप्रस्तुत आहे. फक्त भारताच्या आधुनिकीकरणाबाबत त्याने काय आशावाद बाळगला होता, तेवढ्यापुरतेच हे विवेचन मर्यादित ठेवणार आहे. शिक्षणाच्या बाबतीत त्याने 'पाझर' सिद्धांत (फिल्ट्रेशन थिअरी) मांडला.

सर्व जनतेला शिक्षण देणे इंग्रज सरकारच्या आवाक्याबाहेरचे असल्यामुळे लहानशा वर्गाला शिक्षण दिले म्हणजे त्या वर्गामार्फत इतर स्तरापर्यंत ते पाझरत जाईल ही त्याच्यामागची संकल्पना. या वर्गाचे वर्णन मेकॉलेने 'हाडामांसाने आणि वर्णाने भारतीय, पण आवडीनिवडी, मते, नीतिमत्ता आणि बुद्धीने इंग्रज' असे केले आहे. त्याचा विपर्यास करून मेकॉलेवर नेहमीच कडक टीका केली जाते. आणि त्याला भारतीयांना गावठी साहेब बनवायचे होते असा आरोप केला जातो. वस्तुत: गावठी साहेब बनण्याची भारतीयांचीच महत्त्वाकांक्षा होती आणि आजही आहे आणि त्याबद्दल मेकॉलेला जबाबदार धरणे हे भारतीय संस्कृतीला अनुसरूनच आहे. खरी गोष्ट अशी आहे, की त्या काळातील इंग्रजांची भारतीयांकडे पाहण्याची जी दृष्टी होती तिला अनुसरून भारतीयांचे प्रबोधन व्हावे यासाठी तो उत्सुक होता. आणि त्यासाठी भारतीयांनी इंग्रजी नीतिमूल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, अशी त्याची खात्री होती आणि ते खरेही होते. कारण पाश्चात्य लोकशाही संस्था यशस्वीपणाने राबवायच्या असतील तर त्याला अनुरूप असेच व्यक्तिमत्त्व भारतीयांनी विकसित करण्याची नितांत आवश्यकता होती. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे, की लोकहितवादी गोपाळराव देशमुखांपासून ते चिंतामणराव देशमुखांपर्यंत सर्व भारतीय बुद्धिमंत १०० टक्के इंग्रजच होते. आवडीनिवडी, मते, नीतिमत्ता आणि बुद्धीने ते इंग्रज होते. त्यामुळेच भारतीय संस्कृतीत जे स्पृहणीय आहे त्याचा व इंग्रजी संस्कृतीत जे चांगले आहे त्याचा मिलाफ त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात घडवून आणला नि आपापल्या कालावर ते ठसा उमटवून गेले. साधारण १९२० पर्यंत इंग्रजी पद्धतीने आपण आपली राजकीय चळवळ, तसेच सामाजिक सुधारणा चालविल्या. पण त्यानंतर अस्सल भारतीयत्वाचे पुनरुत्थान घडवून आणले आणि स्वातंत्र्यानंतर तर आपण

१०० टक्के भारतीय झालो आहोत. भारतीयत्वाची जी वैगुण्ये वर दिली आहेत ती सर्व आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात दृग्गोचर होऊ लागली आहेत आणि एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करण्याऐवजी आपण पुन्हा तमोयुगाकडे जाऊ लागलो आहोत.

आपण जर भारतीयत्वाचे पुनरुज्जीवन केले नसते नि आपण आवडीनिवडी, मते, नीतिमत्ता आणि बुद्धीने इंग्रज झालो असतो, तर स्वतंत्र भारतात कसे चित्र दिसले असते याची कल्पना करणे मोठे प्रत्ययकारी ठरेल. स्वातंत्र्यानंतर काही काल रेशनिंग चालू होते. त्यावेळी रेशनच्या दुकानासमोरील रांगेत मंत्र्याची बायको किंवा मुले दिसली असती. आणि आठवड्याचे जे वाटप मिळत असे त्याच्या मर्यादितच त्यांनी कौटुंबिक गरजा भागवल्या असत्या. कार्यालयातील कर्मचाऱ्यांत कामासंबंधी आस्था, कार्यक्षमता, तत्परता आणि रुची आढळली असती. कर्मचारी कामावर वेळेवर आले असते आणि कार्यालयीन वेळेत त्यांनी फक्त कामच केले असते. नवीन वेतनश्रेणी आणि महागाईभत्याचा पुढील हप्ता एवढ्यापुरतेच त्यांचे स्वारस्य मर्यादित राहिले नसते. आपल्याकडे येणाऱ्या व्यक्तीला त्याच्या कामासंबंधात मदत केली असती. मागण्या मान्य होत नाहीत म्हणून कार्यालयाच्या वेळात भजने म्हटली नसती किंवा महापालिकेभोवती कचरा व मेलेली जनावरे पेरली नसती. महाविद्यालये गुंडांचे आणि विद्यापीठे राजकारण्यांचे अड्डे बनले नसते. सर्व प्राध्यापक आणि शिक्षक यांनी प्रामाणिकपणे शिकवले असते आणि विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन केले असते. सरकारी वाहने कुटुंबियांच्या मौजमजेसाठी वापरली गेली नसती. दप्तरखान्यातील (आर्काइव्ज) कागदपत्रांना बुरशी आली नसती. ग्रंथालयांची काळजी घेतली गेली असती. ग्रंथपालांना पुस्तकांबद्दल ममत्व वाटले असते. आपल्यास कोणीतरी वाचक भेटेल याची पुस्तकांना वाट पाहावी लागली नसती. विद्वत्तेचा आपण मान ठेवला असता. निवडणुकीत अपप्रकार झाले नसते. मतदानकेंद्रे काबीज करण्यात आली नसती. आमदार, खासदार म्हणून गुन्हेगार निवडून आले नसते. आमदार-खासदारांनी कायदेमंडळात अभ्यासपूर्ण भाषणे केली असती. आयाराम-गयाराम यांची लागण झाली नसती. मंत्र्यांनी आपल्या खात्यासंबंधी पूर्ण माहिती करून घेतली असती नि सचिव शिरजोर झाले नसते. सभापती सर्वार्थाने तटस्थ राहिले असते. निवडणुका जिंकण्यासाठी सर्वधर्मसमभाववाल्यांनी शाही इमाम बुखारी यांचा आशीर्वाद घेतला नसता. रस्ते स्वच्छ राहिले असते. गटारे तुंबली नसती. नगरपालिकांनी आरोग्याकडे लक्ष पुरवले असते. पोलिस जनतेचे मित्र आणि संरक्षक बनले असते. पोलिस उपनिरीक्षक म्हणून

निवड होताना लाखभर रुपये द्यावे लागले नसते. राजकारणी, गुंड, तस्कर आणि पोलिस यांची युती झाली नसती. भ्रष्टाचार कह्यात राहिला असता.

एक भारतीय नि एक इंग्रज यांची तुलना करून सदर विवेचन संपवितो. पं. नेहरू हे आदर्श भारतीय म्हणून मानले जातात. त्यांची नि ज्याने आदर्शत्वाचा कधीच दावा केला नाही नि व्यवहारी राजकारणाचीच सतत कास धरली अशा एका इंग्रजाची तुलना केली म्हणजे भारतीय व्यक्तिमत्त्व आणि इंग्रजी व्यक्तिमत्त्व यातील फरक प्रकर्षाने लक्षात येईल. ॲटलींनी पंतप्रधानपदावर असताना ब्रिटिश साम्राज्य मोडीत काढले. साम्राज्य स्थापन करणे आणि टिकवणे यापेक्षा त्याचे विसर्जन करणे नि तेही मोठ्या रुबाबात याला जास्त हिंमत, व आपण प्रतिपादन करीत असलेल्या तत्त्वावरचा ठाम विश्वास, यांची गरज असते. ती ॲटलींनी दाखविली. दोनतीनशे वर्षे अनेक झगडे, लढाया, महायुद्धे करून इंग्रजांनी मिळवले ते सर्व ॲटलींच्या नेतृत्वाखाली त्यांनी गमावले. याउलट, काँग्रेसच्या साम्राज्याचे केरळमध्ये विसर्जन झाल्यानंतर लोकशाहीचा सतत जप करणाऱ्या नेहरूंनी तेथील जातीयवादी शक्तींना हाताशी धरून विरोधकांचे सरकार बरखास्त केले. तसेच राजाजींनी म्हटल्याप्रमाणे ज्यांच्यावर चॅप्टर केस भरता येईल अशी माणसे नेहरूंनी ती निव्वळ निवडणुका जिंकण्यास मदत करतात एवढ्यासाठीच जवळ केली. आपण मेकॉलेच्या अपेक्षेप्रमाणे इंग्रजी नीतिमत्ता अंगी बाणवली असती तर काय झाले असते त्याचे विवेचन येथवर केले.

मेकॉलेने दुसरा आशावाद व्यक्त केला होता तो माध्यमांसंबंधी. इंग्रजी माध्यम तात्पुरते आहे याची त्याला जाणीव होती. त्यामुळे कालांतराने देशी भाषा समृद्ध होऊन त्या ज्ञानप्रसाराची साधने बनतील अशी अपेक्षा त्याने धरली होती. मेकॉलेचे दोन्ही आशावाद आपण धुळीला मिळविले. परिणामी आपण सार्वजनिक जीवनात इंग्रज बनलो नाही, पण पाश्चात्य संस्कृतीच्या बाह्याविष्काराचे आकर्षण मात्र आपल्याला आजपर्यंत वाटत राहिले आहे. त्यामुळे आवडीनिवडी, मते, नीतिमत्ता आणि बुद्धीने भारतीय, पण मानसिकदृष्ट्या पाश्चात्यांचे गुलाम अशी आपण आपली अवस्था करून घेतली आहे. आणि त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रात जाणवतो आहे. तथापि त्याचे खापर मात्र आपण मेकॉलेवर फोडतो.

# ४

# भारतीय प्रतिसाद

●

इंग्रजी राजवटीने भारताच्या आधुनिकीकरणास सुरुवात केली. तसेच वैचारिक आधुनिकतेसाठी पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात करून दिली. या आधुनिकीकरणास भारताचा काय प्रतिसाद राहील व कशा तऱ्हेने राहील यावर भारताच्या इतिहासाचा भावी ओघ अवलंबून होता. त्यामुळे त्याचा विचार येथे प्रस्तुत आहे.

एकोणिसाव्या शतकापासून स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या कालाचा इतिहास लिहिताना सर्वसाधारपणे इंग्रजी राजवटीस भारतीय बुद्धिवंतांचा काय प्रतिसाद होता, तेवढाच लक्षात घेऊन विवेचन केले जाते, त्यामुळे ते नेहमीच अपुरे असते. आणि आजच्या समस्यांचे मूळ नीटपणे लक्षात येत नाही.

इंग्रजी राजवटीला मिळालेला प्रतिसाद घटकनिहाय वेगवेगळा होता आणि त्याचे स्वरूप त्या घटकांच्या हितसंबंधांनी निश्चित केले होते. सरंजामशहा, विचारवंत, मध्यमवर्गीय, मुसलमान, शीख, लष्करातील शिपाई या प्रत्येक घटकाचा प्रतिसाद वेगवेगळा होता. आदिवासी, तळागाळाचे लोक, शेतकरी यांचा कोणताच प्रतिसाद नव्हता, असे म्हणणे योग्य ठरेल. इंग्रजी राजवटीचे स्वरूप त्यांच्या आकलनाबाहेरचे होते आणि ती नवी राजवट नेहमीच्या दैववादी वृत्तीने त्यांनी स्वीकारली होती.

सरंजामशहांचा प्रतिसाद साधारणपणे विरोधाचा होता. तथापि ज्यांची संस्थाने किंवा वतने खालसा झाली नव्हती त्यांनी इंग्रजांशी

सहकार्य केले. पुढे काही कारणाने लष्करातील शिपाई इंग्रजविरोधी झाले तेव्हा त्यांच्या, आणि ज्या सरंजामशहांची वतने खालसा झाली होती त्यांच्या सहयोगातूनच १८५७ चे बंड उभे राहिले. सैनिकांचा विरोध दोन प्रमुख कारणांनी होता. हुकूम दिला जाईल त्या भागात लष्कराला कूच करावे लागेल, असा आदेश काढण्यात आला होता. समुद्र पार करणारी व्यक्ती जातिबाह्य होते, अशी त्याकाळी समजूत होती. नवीन आदेशाप्रमाणे समुद्र पार करावा लागल्यास आपण बहिष्कृत होऊ, अशी शिपायांना भीती वाटू लागली. दुसरे कारण भारतीय व्यक्तिमत्त्वावर चांगला प्रकाश पाडते. ज्या सैन्याने बंडाचा उठाव केला त्या बंगाल आर्मीमध्ये जास्तीत जास्त भरणा अयोध्येच्या संस्थानातील शिपायांचा होता. त्या वेळच्या नियमाप्रमाणे देशी संस्थानांतून भरती झालेल्या शिपायांना खास भत्ता दिला जात असे. अयोध्येचे संस्थान खालसा झाल्यानंतर तो भाग इंग्रजी राज्याचा हिस्सा झाला. त्यामुळे साहजिकच भत्ता बंद झाला. शिपायांतील असंतोषाचे हेही कारण होते. आजही भत्त्याकरिता आपण किती घाबरे होतो याचा अनुभव प्रत्येकाला आहेच. काडतुसाचे प्रकरण हे बंडाचे तात्कालिक कारण होते. त्याचाही संबंध जात किंवा धर्म गमावण्याशीच होता. सरंजामशहा होते त्यांच्या असंतोषाचे मूळ, संस्थान खालसा होणे अथवा खास सवलती काढून घेतल्या जाणे, याच्याशी होता. झाशीच्या राणीची 'मेरी झांसी नही दूँगी' अशी गर्जना होती, 'मेरा भारत' अशी नव्हती. नानासाहेबांना पेन्शन हवे होते. मुघल बादशहाला तर मारूनमुटकून नेता बनवण्यात आले होते. अशा प्रकारे ज्यांनी काही हक्क आणि सवलती गमावल्या होत्या किंवा ज्यांना धर्म बुडण्याची भीती होती ते बंडात सामील झाले होते.

भारतातच नव्हे, तर इंग्लंड आणि फ्रान्समध्येदेखील मध्ययुगातून आधुनिक कालात संक्रमण होताना अशीच बंडे झाली होती. आणि सरंजामशहांचा बीमोड करूनच तेथे आधुनिक शासन स्थापन करण्यात आले होते. गुलाबांच्या युद्धात इंग्लंडमधील अनेक सरंजामशहा मारले गेले होते. उरलेल्यांची विल्हेवाट सातव्या हेन्रीने लावली आणि इंग्लंडने आधुनिक युगात प्रवेश केला. फ्रान्समध्येही सरंजामशहांचा पाडाव करूनच १४ व्या लुईने आपली निरंकुश सत्ता स्थापन केली. भारतात इंग्रजांनी बलवान अशी केंद्रसत्ता स्थापन केली. त्याला सरंजामशहांचा विरोध होणे अटळ होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे आधुनिक शासन आणि सरंजामी समाज अशी सांगड भारतात पडली होती. त्याची अपरिहार्य परिणती १८५७ च्या बंडामध्ये झाली. सरंजामी शक्तींची ही अखेरची धडपड होती. १८५७ ला त्यामुळे भारताच्या मध्ययुगीन

इतिहासाचा शेवटचा अध्याय म्हणणेच योग्य ठरेल. १८५७ हे बंड की स्वातंत्र्ययुद्ध, हा वाद अनेक वर्षे खेळला गेला आहे आणि आणखी अनेक वर्षे तो चालेल. या संदर्भात एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे, ती म्हणजे स्वातंत्र्ययुद्ध एकदा सुरू झाले म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ती होईपर्यंत ते थांबत नाही. काही वेळा ते भूमिगत होते, पण नष्ट होत नाही. १८५७ बद्दल तसे म्हणता येणार नाही. बंडखोरांचा बीमोड झाल्यानंतर बंडाचा पूर्णविराम झाला. इंग्रजांनी बंड मोडताना केलेल्या अमानुष क्रौर्याची दहशत भारतीय मनावर बराच काल राहिली, एवढाच त्याचा तादृश परिणाम. सावरकरांनी '१८५७' लिहिल्यानंतर १८५७ चे बंड इंग्रजांविरुद्ध होते याच एका कारणामुळे त्याचे उदात्तीकरण होऊन त्याला स्वातंत्र्ययुद्ध समजण्यात येऊ लागले. अशा तऱ्हेने सरंजामशहांचा विरोधी प्रतिसाद संपुष्टात आला. यानंतर भारताचे भवितव्य इतर घटकांचा जो प्रतिसाद असेल त्यावरच अवलंबून होते.

मुसलमानांची इंग्रजी राजवटीबाबत सुरुवातीला विरोधाचीच भावना होती. वहाबींचे बंड हे त्याचे एक उदाहरण. मुसलमानांनी शिखांवर कित्येक शतके अत्याचार केले होते, त्याचा उपयोग करून घेऊन इंग्रजांनी शिखांना आपल्यास अनुकूल करून घेतले. आणि १८५७ मध्ये शीख सैन्य इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले. पारशी आणि ख्रिश्चन यांनी इंग्रजी राज्याचे सर्वसाधारणपणे स्वागत केले. ख्रिश्चनांनी समान धर्माच्या कारणाने, तर भारतात आल्यापासून राज्यकर्त्यावर्गाशी जमवून घेणे भाग पडले गेले होते, त्याला अनुसरून पारशी समाजाने. व्यापारीवर्ग सिराज उद्दौलाच्या कालापासूनच इंग्रजांचा पक्षपाती होता. शांतता आणि सुव्यवस्था ही त्याची सर्वप्रथम गरज. ती इंग्रजांनी सर्वार्थाने पुरविली. त्याशिवाय, नवीन इंग्रजी कायद्यांमुळे कोणत्याही तऱ्हेच्या सामाजिक बंधनापासून मुक्त होऊन त्याला पिळवणूक करण्याची सुसंधी प्राप्त झाली. उद्योजकवर्ग सुरुवातीला इंग्रजांशी एकनिष्ठच होता. पुढे स्वातंत्र्ययुद्धात या वर्गाने राष्ट्रीय चळवळीलाही पाठिंबा दिला तो स्वदेशीच्या चळवळीमुळे या वर्गाचा सर्वाधिक फायदा होणार होता म्हणून. व्यापारी आणि उद्योजक वर्गाची नफा ही खरी निष्ठा. जमीनदारवर्गही इंग्रजांचाच पाठिराखा होता. बंगालमधील जमीनदारवग मूलत: सारावसुली करणारा वंशपरंपरा नोकरदार वर्ग होता. कायमधारा पद्धत अंमलात आणून कॉर्नवॉलीसने या वर्गाला जमिनीचे मालक म्हणून मान्यता दिली. त्यामुळे हा वर्ग इंग्रजी सत्तेचा आधारस्तंभ बनला. राष्ट्रीय वृत्तीचे एक जमीनदार रमेशचंद्र दत्त यांची प्रतिक्रिया या संबंधात अतिशय बोलकी आहे. इंग्रजी धोरणावर सर्वसाधारणपणे टीका करणाऱ्या या अर्थशास्त्रज्ञाने जमीनदारी पद्धतीचे, इंग्रजांनी भारतात केलेली एकमेव चांगली गोष्ट,

म्हणून वर्णन केले आहे. 'भारताचा आर्थिक इतिहास' या आपल्या ग्रंथात त्यांनी कायमधारा पद्धतीची, धाकट्या पिटने इंग्लंडमध्ये कृषिविषयक काही निर्णय घेतले होते त्याच्याशी तुलना करून कॉर्नवॉलिसची पिटपेक्षा दूरदृष्टीचा मुत्सद्दी म्हणून भलावण केली आहे. खरे तर कायमधारा पद्धतीने कुळांचे सर्व हक्क हिरावून घेण्यात आले होते. पण त्या पद्धतीचे मूल्यमापन जमीनदारांच्या हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून करण्यात आले. बंगालमधील जमीनदारांप्रमाणेच इतर भागातील खोत, मालगुजार, तालुकदार इत्यादींचा पाठिंबा इंग्रज राजवटीला होता. या संदर्भात एक घटना लक्षणीय वाटते. १८५७ च्या बंडात ग. ज. लॉर्ड कॅनिंग याच्या एका आदेशाप्रमाणे अयोध्येमधील तालुकदारांच्या जमिनी जप्त केल्या जाणार होत्या. तालुकदार तात्काळ बंडात सामील झाले आणि अयोध्येमधील बंड लांबले.

सरंजामशाहीत मध्यमवर्ग अतिशय लहान असतो. कारण शासकीय सेवाक्षेत्राच्या गरजा सरंजामशाहीत अत्यंत मर्यादित असतात. जमाबंदी, कारकुनी अशा तऱ्हेची कामे मध्यमवर्ग करीत असे. ब्राह्मण, सारस्वत, कायस्थ, पाठारे प्रभू आणि तत्सम जातींनी अशा तऱ्हेच्या कामात आपली मक्तेदारी निर्माण केली होती. इंग्रजी राजवटीतही या वर्गाने आपले हे वैशिष्ट्य कायम राखले. इंग्रजी शिक्षण ही इंग्रजी राजवटीत सरकारी नोकरीची गुरुकिल्ली झाली होती. मुघलांच्या कारकीर्दीत पर्शिअनवर प्रभुत्व मिळवून या वर्गाने आपल्यासाठी शासकीय सेवेत खास स्थान मिळविले होते. त्या परंपरेला अनुसरून इंग्रजी शिक्षण घेऊन शासकीय नोकरीत शिरकाव करून घेणे एवढीच महत्त्वाकांक्षा या वर्गाची होती. स्नानसंध्या, धर्माचरण करावयास मिळाले म्हणजे पारतंत्र्य वगैरे गोष्टींशी या वर्गाचा संबंध नव्हता. अगदी १९४२ च्या चळवळीतही यांच्यापैकी अनेक जणांना दुसरे महायुद्ध ही नोकरीची पर्वणीच लाभली होती. परिस्थित्यनुरूप बदलणे, आपले जास्तीत जास्त हित साधणे, धन्याशी एकनिष्ठ राहणे, ही या वर्गाची वैशिष्ट्ये. दादोजी कोंडदेव हा या वर्गातील आदर्श पुरुष, तर गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास' नाटकातील जिवाजीपंत कलमदाने हे या वर्गाचे अत्यंत भ्रष्टरूप. इंग्रजी राजवटीत सेवाक्षेत्र अधिकाधिक विस्तारत जाणार हे ओळखून या वर्गाने आपले जास्तीत जास्त हित साधून घेतले. इंग्रजी राजवटीत मध्यम वर्गात आणखी एका वर्गाचा समावेश झाला तो म्हणजे वकील वर्ग. ब्राह्मण आणि तत्सम जातीतूनच वकीलवर्गाची भरती झाली. संस्कृतच्या व्यासंगामुळे श्लेष काढणे, वादविवाद करणे, वगैरेशी हा वर्ग परिचित होता. त्यामुळे न्यायदानाच्या आधुनिक पद्धतीशी या वर्गाचे जातक चांगले जुळले. इंग्रजांनी अनेक नवीन कायदे केले होते. साहजिकच वकिलीच्या

व्यवसायाला चांगलीच बरकत आली. कायद्याच्या ज्ञानामुळे या वर्गाला इंग्रजी राजवटीची खूण नेमकेपणाने ओळखता आली. त्यामुळे आधुनिक भारतातील अनेक विचारवंत याच वर्गातून आले.

शेतकरी, कारागीर, दलित आणि आदिवासी हे उरलेले महत्त्वाचे वर्ग. यांपैकी आदिवासी वर्ग अत्यंत हलाखीचे जीवन जगत होता. इंग्रजी राजवटीमुळे या वर्गाच्या जीवनात फक्त एकच बदल घडून आला, तो म्हणजे व्यापारी आणि जमीनदार वर्गाने आदिवासींची अधिकाधिक पिळवणूक करण्यास सुरुवात केली. स्वातंत्र्यानंतरही तोच प्रकार चालू राहिला. आणि त्यातूनच आदिवासींची आंदोलने उभी राहिली. आणि आता त्याने दहशतवादी रूप धारण केले आहे.

दलित वर्गाचीही तीच परिस्थिती होती. पण त्याखेरीज या वर्गाला सामाजिक हीनतेची मिती लाभल्यामुळे, केवळ लाचारीचे जिणे त्याच्या नशिबी आले. साहजिकच आत्मविश्वासाचा अभाव आणि कोणाच्या तरी आसऱ्याने राहणे ही या वर्गाची प्रमुख वैशिष्टये बनली. आंबेडकरांच्या निधनानंतर ही लक्षणे या वर्गाने पुन्हा एकदा प्रकर्षाने जागविली.

शेतकरी आणि कारागीर हा वर्ग भारतात बहुसंख्येने होता. लोकशाही प्रक्रियेत संख्येला महत्त्व असल्यामुळे हाच वर्ग अखेर सत्ताधारी होणार होता आणि त्याच्याच हाती भारताचे भवितव्य राहणार होते. तो कोणती मूल्ये उत्क्रांत करतो यावरच भारताचे भलेबुरे अवलंबून होते. इंग्रजांनी आधुनिकीकरणाची जी प्रक्रिया भारतात सुरू केली होती तिला या वर्गाचा प्रतिसाद काय राहणार होता ? तो आपले वैचारिक प्रबोधन करून घेणार होता का ? भारतीय व्यक्तिमत्त्वाची जी वैगुण्ये वर वर्णन केली आहेत त्यापासून मुक्तता करून घेणार होता का ? या प्रश्नांच्या उत्तरावर स्वतंत्र भारताचे चित्र अवलंबून होते.

शेतकरी आणि कारागीर या वर्गाची इंग्रजी राजवटीत बरीच परवड झाली. इंग्रजी व्यापाराच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागल्याने पारंपरिक उद्योगधंदे बुडाले आणि कारागीरांना आपला व्यवसाय सोडून शेतीवर अधिकाधिक अवलंबून राहावे लागले किंवा भूमिहीन मजूर म्हणून काम करावे लागले. त्यामुळे शेतीवरील दडपण वाढले, शासकीय उत्पन्नाचे शेतसारा हेच प्रमुख साधन असल्यामुळे शासकीय खर्चाचा, शांतता - सुव्यवस्थेच्या खर्चाचा तसेच साम्राज्याच्या संरक्षणाच्या खर्चाचा बोजा प्रामुख्याने याच वर्गावर पडला. महसूल वसुलीच्या कडक नियमामुळे सारा भरण्यासाठी त्याला सावकाराकडून सतत उसनवारी करावी लागे. गहाणासंबंधीच्या नव्या कायद्यामुळे

सावकारांना गहाण पडलेल्या जमिनींची मालकी मिळविणे सोपे झाले आणि सावकारवजा जमीनदारांचा एक नवा वर्ग उदयास आला. अशा परिस्थितीत शेतकरी वर्ग सतत उदरनिर्वाहाच्या किंवा त्याखालच्या पातळीवरच (सब्सिस्टन्स लेव्हल) राहिला. साहजिकच तो कोणतीही सामाजिक मूल्ये उत्क्रांत करू शकला नाही किंवा शिक्षणाअभावी त्याचे प्रबोधनही होऊ शकले नाही. भारतीय व्यक्तिमत्त्वाची सर्व वैगुण्ये त्याने टिकवून धरली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच वर्गाच्या हाती सत्ता आली. तेव्हा त्याच्या पुढाऱ्यांनी ती वैगुण्ये हीच आपल्या राज्यकारभाराची पद्धत बनविली.

मध्यमवर्ग वगळता इतर सर्व 'आहे रे' वर्गाची वृत्ती कारागीर, शेतकऱ्यांसारखीच होती. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर फारसा परिणाम झाला नव्हता. आपण केव्हा तरी स्वतंत्र होणार आहोत, लोकशाही राबविणार आहोत, त्यासाठी लोकशाहीला अनुरूप अशी सामाजिक मूल्ये स्वीकारली पाहिजेत याची जाणीव त्यांना केव्हाच झाली नाही. उलट, इंग्रजांनी प्रस्थापित केलेली शांतता आणि सुव्यवस्था, तसेच वैयक्तिक हितसंबंधांकडे जास्तीत जास्त लक्ष देणारी राज्यपद्धती, यांचा पुरेपूर फायदा उठवून कोणत्याही सामाजिक दडपणाच्या अभावी हा वर्ग अधिकाधिक निर्घृण (रूथलेस) होत गेला; कोणत्याही तऱ्हेने प्रबोधन न झाल्यामुळे केवळ वैयक्तिक स्वार्थाने प्रेरित झालेले बहुसंख्य समाजाचे पुढारी आणि कोणताही विधिनिषेध न बाळगणारा 'आहे रे' वर्ग यांच्या हाती स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या सर्व नाड्या आल्या व त्यांनी मूल्यविहीन राजकारणास सुरुवात केली. त्यांच्या सहकार्यातून पाशवी शक्ती (मसल पॉवर) आणि द्रव्यशक्ती यांचे प्राबल्य सार्वजनिक जीवनात हळूहळू वाढत गेले आणि आता तर या दोन शक्तीच सार्वजनिक जीवनाचे नियमन करीत आहेत. भारतीय विचारवंतांनी पुरस्कार केलेली सामाजिक मूल्ये त्यात होरपळून गेली. परिस्थितीनुरूप बदलणाऱ्या मध्यमवर्गाने नव्या मूल्यविहीन सार्वजनिक जीवनाशी झटदिशी जुळवून घेतले आणि आपल्या अधोगतीचे तत्त्वज्ञान आणि पद्धत बनविली. भारतीय व्यक्तिमत्त्वाची वैगुण्ये अबाधित ठेवणारा आणि त्यामुळे केवळ वैयक्तिक स्वार्थाच्या मागे असलेला बहुसंख्य समाज, कोणताही विधिनिषेध न बाळगणारा 'आहे रे' वर्ग आणि मूल्ये हरविलेला मध्यमवर्ग या परिस्थितीतच भारताच्या आजच्या समस्यांचे मूळ आहे. त्यातून मुक्तता करून घ्यावयाची असेल तर आज जो सत्ताधारी वर्ग आहे त्याचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. त्याने मूल्याधिष्ठित राजकारणास सुरुवात केली तरच ग्रामपंचायतीपासून ते राष्ट्रीय प्रशासनापर्यंतचा कारभार सुधारेल आणि देश प्रगतिपथावर जाईल. अन्यथा अधोगती अटळ आहे.

सरंजामशहा आणि इतर वर्गाचा इंग्रजी राजवटीला जो प्रतिसाद होता त्याचे विवेचन वर केले आहे. एक मध्यमवर्ग वगळता इंग्रजी राजवटीचे यथोचित मूल्यांकन कोणत्याही वर्गाला करता आले नव्हते. तथापि या वर्गाचा प्रतिसाद आपल्या हिताचा विचार करण्यापुरताच मर्यादित होता.

तथापि भारतीय विचारवंतांचा इंग्रजी राजवटीस असलेला प्रतिसाद मात्र परिपूर्ण होता. परिपूर्ण म्हणजे सर्वसमावेशक या अर्थाने. इंग्रजी राजवटीचे, आधुनिकीकरणाचे आणि त्यात अनुस्यूत असलेल्या भारताच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय समस्यांचे संपूर्ण आकलन त्यांना झाले होते. अर्थात त्यांच्या प्रतिसादाचे स्वरूप मात्र वेगवेगळे होते. काहींनी सामाजिक आणि धार्मिक सुधारणांवर भर दिला, काहींनी आर्थिक दुरवस्थेकडे अधिक लक्ष पुरविले, तर राजकीय सुधारणा हे काहीजणांनी आपले लक्ष्य बनविले. या सर्वांचा महत्तम साधारण विभाजक म्हणजे भारताचे आधुनिकीकरण घडवून आणणे (आधुनिक याचा अर्थ वर दिला आहे त्या अर्थाने आधुनिकीकरण). या प्रक्रियेची सुरुवात राजा राममोहन रॉय यांच्या कार्यापासून झाली. धार्मिक आणि सामाजिक सुधारणांवर त्यांचा भर होता. त्याला अनुसरून त्यांनी ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. त्यांच्यानंतर स्वामी दयानंद यांनी आर्यसमाजाची, आत्माराम पांडुरंग यांनी प्रार्थनासमाजाची आणि स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. हिंदू प्रथा, परंपरा, चालीरीती, रूढी यांत जे अनिष्ट आहे ते नष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तथापि या सर्व चळवळी उच्चवर्णीयांपुरत्याच मर्यादित राहिल्या. दुसरे म्हणजे हिंदू जातिव्यवस्था एवढी चिवट आहे, की ब्राह्मोसमाज आणि आर्यसमाज याही चळवळ न बनता जाती बनल्या.

दादाभाई नौरोजी आदि अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक शोषणावर भर दिला व भारताची आर्थिक प्रगती कशी साधता येईल यासंबंधी विवेचन केले. धरणे की रेल्वे असे वाद या काळात खेळले गेले. राजकीय हक्कासाठीही हळूहळू चळवळी सुरू होऊ लागल्या. सुरेंद्रनाथ बॅनर्जी प्रभृतींचा त्यात विशेष सहभाग होता. अशा तऱ्हेने धार्मिक, सामाजिक, आर्थिक नि राजकीय चळवळी वेगवेगळ्या प्रकारे चालू होत्या. त्यांचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न न्या. रानडे यांनी केला. तथापि १९ व्या शतकाच्या अखेरीपासून राजकीय चळवळीने अधिक जोर धरला आणि त्या प्रमाणात सामाजिक व धार्मिक सुधारणा मागे पडल्या. भारतात आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा दोष म्हणजे बहुसंख्य समाज त्यापासून अलिप्त राहिला. मुसलमान समाजही त्यात सहभागी झाला नव्हता. या दोन वर्गांचे, तसेच दलित नि स्त्रिया यांचे प्रबोधन

झाल्याखेरीज आधुनिक भारताची निर्मिती अशक्य होती. त्या दृष्टीने जोतिबा फुले यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे होते. स्त्रिया व दलित यांच्या उद्धाराशिवाय भारतात नवयुग अवतरणार नाही असा त्यांचा सार्थ विश्वास होता. त्यांचे कार्य विधायक आणि विध्वंसक असे दोन्ही प्रकारचे होते. त्यापैकी विधायक कार्याला भारतीय व्यक्तिमत्त्व अनुकूल नव्हते. त्यांचे विध्वंसक कार्यही विधायकच होते. समाजातील अनिष्ट प्रवृत्तींचा विध्वंस हे त्याचे उद्दिष्ट होते. पण त्याच्यामागे व्यक्तिद्वेष अथवा जातिद्वेष नव्हता. त्यांना भावले त्या तऱ्हेचे प्रबोधन ही त्याच्यामागची प्रेरणा होती. त्यांचे नाव सांगणाऱ्यांनी त्यांचा विधायक कार्यभाग उचलला नाहीच नि विध्वंसक कार्यास भ्रष्ट रूप देऊन कित्येक पिढ्या नुसता जातिद्वेषच पोसला. त्यामुळेच 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ फसली. जोतिबांच्यानंतर नामदार गोखले यांनी राजकारणाच्या अध्यात्मीकरणाची हाक दिली. जोतिबांचे कार्य सामाजिक उन्नयनाचे होते, तर गोखल्यांचे उद्दिष्ट राजकीय उन्नयन हे होते. दरम्यान टिळकांनी सर्वसामान्य माणसाच्या हक्कांचा पाठपुरावा करून 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' म्हणून मान्यता मिळविली होती. दुष्काळ पडल्यानंतर साराबंदीची चळवळ सुरू करून शेतकऱ्यांचे हितसंबंध राखणे हेही राजकीय चळवळीचे एक प्रमुख उद्दिष्ट असल्याचे दर्शवून दिले. अशा तऱ्हेने धार्मिक, सामाजिक आणि राजकीय सुधारणा, दलितोद्धार व स्त्री-शिक्षण, राजकारणाचे अध्यात्मीकरण, शेतकऱ्यांचे हितरक्षण हे भारताच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील निरनिराळे धागे एकवटून एका सर्वसमावेशक कार्यक्रमाद्वारे भारताला आधुनिक युगात प्रविष्ट करणे हा त्यानंतरचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता.

ही ऐतिहासिक जबाबदारी गांधींच्या अंगावर पडणार होती आणि त्या दिशेने त्यांनी पहिले पाऊलही उचलले, ते म्हणजे चंपारण्य लढ्याचे. चंपारण्य लढा हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक अभूतपूर्व लढा होता व त्या लढ्यात अनुस्यूत असलेली तत्त्वे निव्वळ इंग्रजांच्याच नव्हे, तर एतद्देशीय हितसंबंधांच्या विरुद्धच्या लढ्यातही वापरली गेली असती तर टॉयन्बी यांना अभिप्रेत असलेला आणि गौतम बुद्धापासून ते विवेकानंदांपर्यंतच्या द्रष्ट्यांनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले, तो भारत सत्यात अवतीर्ण झाला असता.

चंपारण्याचा लढा हा भारताच्या पुनरुत्थानातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. एका दृष्टीने राजा राममोहन रॉय यांनी जे कार्य सुरू केले त्याचा 'चंपारण्य' हा कळसाध्याय होता असे म्हणता येईल. वर पाहिलेच, की इंग्रजी राजवटीला भारतीय विचारवंतांचा असलेला प्रतिसाद हा परिपूर्ण होता. तथापि सुरुवातीला तो बराचसा

वैचारिक पातळीवरच होता. त्याला परिपूर्ण असे कृतिशील रूप दिले चंपारण्यलढ्याने. रॉय यांनी मानवतावाद, बुद्धिवाद, पीडितांची शोषणमुक्ती इत्यादी तत्त्वांचा पुरस्कार केला. चंपारण्यलढ्यात याच तत्त्वांचा आविष्कार आढळतो. चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा अविश्रांतपणे नि अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास करण्यात येऊन ती काटेकोर आणि यथायोग्य पद्धतीने मांडण्यात आली होती. म्हणजे शेतकऱ्यांची बाजू मांडताना भावनिक आवाहन न करता बुद्धिवादाचा आश्रय घेण्यात आला होता. या लढ्यासंबंधी लिहिताना गांधी म्हणतात,

'मी या माझ्या कार्यास प्रारंभ केला आहे तो अशा आशेने, की संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य व मुक्तता उपभोगण्यासाठी जन्माला आलेले इंग्रज लोक आपल्या प्रतिष्ठेस जागण्यास कुरकुरणार नाहीत. आणि तीच स्वतंत्रता आणि मुक्तता शेतकऱ्यांना देण्यास तक्रार करणार नाहीत. सर्व मानवजातीला जी स्वतंत्रता व प्रतिष्ठा मिळावयास हवी ती येथील शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी मळेवाले व शेतकरी यांच्यामध्ये शांतता नांदावी याशिवाय दुसरी कोणतीही इच्छा माझ्या मनात नाही.' यावरून हे स्पष्ट होईल, की मानवतावाद, स्वतंत्रता, न्यायाची आधुनिक संकल्पना या सर्व गोष्टी चंपारण्य-लढ्याच्या मुळाशी होत्या. त्याशिवाय अहिंसा हा जो भारताचा वारसा समजला जातो त्याचेही या लढ्यात काटेकोरपणे पालन करण्यात आले होते. गांधींनी कार्यकर्त्यांना ज्या सूचना दिल्या होत्या त्यात म्हटले होते, 'स्वत:च्या गाऱ्हाण्यासाठी किंवा आपल्या मदतीस आलेल्या कार्यकर्त्यांच्या तुरुंगवासाविरुद्ध रयतेने अत्याचार करू नयेत, अशी स्पष्ट सूचना तिला देण्यात यावी. पण त्यांना असे सांगता येईल की, जेव्हा तुम्हाला अन्यायाने वागवले जाईल तेव्हा कोर्टात न जाता नीळ लावण्याचे फक्त तुम्ही नाकारावे आणि तसे केल्याबद्दल सरकारने तुरुंगात टाकल्यास तुम्ही तुरुंगवास सोसावा. या शांततामय प्रतिकाराची प्रक्रिया ज्या कार्यकर्त्यास कळत नसेल किंवा त्याच्या शक्तीचे ज्यांना आकलन होत नसेल, त्यांनी कार्यक्रमातील हा भाग गाळावा.'

सूचनांतील हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. पहिले म्हणजे ज्यांचे हितसंबंध डावलले गेले होते त्यांनाच सत्याग्रहाचे आवाहन करण्यात आले होते. भारतीय व्यक्तिमत्त्वाला अनोख्या असलेल्या स्वावलंबनावर (सेल्फ-हेल्प) त्यात न्याय मिळविण्यासाठी भर देण्यात आला आहे. दैवी न्यायावरच अथवा कोणाच्या कृपाप्रसादावरच अवलंबून राहण्याची आपली सवय आहे ती या लढ्यात अव्हेरली गेली होती. दुसरे म्हणजे प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे, झेपेल त्या प्रमाणात सत्याग्रहात भाग घ्यावयाचा होता. अशा प्रकारे सत्याग्रहाची प्रक्रिया ज्यांना समजत नाही त्यांना

त्यात भाग न घेण्याचे आवाहन करून 'भाऊ-गर्दी' टाळण्यात आली होती. तिसरे म्हणजे या लढ्यात प्रत्येक कार्यकर्त्याला निश्चित अशा सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे हौसे, नवसे आणि गवसे यांना त्यात भाग घेण्यास अवसर नव्हता. शेवटचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'नेमकी गाऱ्हाणी आणि नेमके उपाय' हा जो इंग्रजी लोकशाहीच्या विकासाचा मूलाधार त्याचा या लढ्यात अवलंब करण्यात आला होता.

रॉय यांचे कार्य गांधींनी कसे पूर्णत्वास नेले याचे आणखी एक उदाहरण देता येईल. रॉय यांना इंग्रजी राजवटीच्या भारताच्या दृष्टीने हितकारक अशा पैलूंची जाणीव होती. गांधींनीही १९२० च्या सुरुवातीपर्यंत तीच भावना बाळगली होती. आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर गांधींनी सत्याग्रहाच्या प्रभावाचे सामान्य माणसात त्याबद्दल भाविकता निर्माण होईल अशातऱ्हेने विवरण केले. त्यात वारंवार हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद यांचे उदाहरण, नरसिंहाचा उल्लेख न करता, येते. या विवरणाने अनेक गांधीवादी आचार्य इतके भारावून गेले की त्यांनीही सत्याग्रहाचे तसेच गूढरम्य विवेचन करण्यास सुरुवात केली. या संदर्भात आचार्य जावडेकर यांनी 'आधुनिक भारत' मध्ये सत्याग्रहाचे माहात्म्य वर्णन केले आहे ते वाचनीय. पण या सर्व आचार्यांचा भावी भाबडेपणा खुद्द गांधींनीच अजाणता आगाऊच उघडा पाडला आणि रॉय यांच्या कालापासून ज्या तऱ्हेने कार्यास सुरुवात झाली होती तोच मार्ग आपण चोखाळत आहोत याची जाहीर वाच्यता केली. २४ एप्रिल १९१५ रोजी मद्रास येथे भाषण करताना ते म्हणाले, 'या ब्रिटिश साम्राज्यावरील माझी निष्ठा आज संध्याकाळी या महान व महत्त्वपूर्ण मेळाव्यामध्ये पुन्हा एकदा घोषित करण्यास मला अत्यंत आनंद वाटत आहे. माझी साम्राज्यनिष्ठा माझ्या स्वार्थावर आधारित आहे. एक सविनय प्रतिकारक म्हणून मला असे आढळून आले आहे, की ब्रिटिश साम्राज्यामध्ये मला जे स्वातंत्र्य मिळाले आहे ते अन्यत्र मिळाले नसते. सविनय प्रतिकार करण्याचा आपला हक्क सविनय प्रतिकार करणाऱ्याला स्थापित करावा लागतो. मग तो कोणत्याही परिस्थितीत असो. तसे करताना मला असे आढळून आले आहे, की ब्रिटिश साम्राज्यामध्ये काही ध्येये आहेत आणि त्यांच्याविषयी मला प्रेम वाटते. त्यापैकी एक ध्येय असे, की ब्रिटिश साम्राज्यातील प्रत्येक प्रजाजनाला आपल्या विवेकास पटणारे कोणतेही कार्य करण्यास व आपली शक्ती वापरण्यास आणि प्रयत्न करण्यास पूर्ण मोकळीक आहे. हे ब्रिटिश साम्राज्यास जेवढे लागू आहे तितके आपण पाहात असलेल्या दुसऱ्या कोणत्याही सरकारला लागू नाही... ... मला असे आढळून आले आहे, की ब्रिटिश

साम्राज्यात माझ्यावर कमीत कमी शासन राहील. मी हे भाषण संपवून... खाली बसण्यापूर्वी... एका विशेष प्रसंगाचे स्मरण करून देतो. ब्रिटिश साम्राज्याच्या सैन्यातील एक विश्वासू सेनापती जनरल बेयर्स यांनी त्या साम्राज्याविरुद्ध उघड बंड उभारले. तसे करणे आणि त्यानंतर त्यांस जागच्या जागी ठार न करण्यात येणे या गोष्टी केवळ ब्रिटिश साम्राज्यातच शक्य आहेत. जनरल स्मटस् यांनी त्या वेळी त्यांना एक संस्मरणीय पत्र पाठविले आणि लिहिले, 'मीही एका काळी बंडखोर होतो. आपले प्राण वाचविणे तुम्हाला केवळ ब्रिटिश साम्राज्यामध्येच शक्य आहे.' म्हणून माझी ब्रिटिश साम्राज्यावर निष्ठा आहे.'

म्हणजेच गांधींच्या स्वत:च्या मताप्रमाणे सुसंस्कृत इंग्रजी राजवट आणि 'आपले प्राण वाचविणे तुम्हाला केवळ ब्रिटिश साम्राज्यातच शक्य आहे' हा दृढ विश्वास, या त्यांच्या सत्याग्रहाच्या संकल्पनेमागच्या प्रेरणा होत. ही त्यांची भूमिका १९२० च्या सुरुवातीपर्यंत टिकली. कारण १९१९ च्या सुधारणा कायद्याने इंग्रजांनी आश्वासनपूर्ती केली आहे असे १९१९-२० च्या काँग्रेसच्या अमृतसर अधिवेशनामध्ये त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. जालियनवाला हत्याकांड त्यापूर्वीच होऊन गेले होते, ही गोष्ट येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

अशा तऱ्हेने चंपारण्य-लढ्यात भारतातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील अनेक धागे गुंफले गेले होते. त्यांचाच उपयोग करून भारतात जी मध्ययुगीन जळमटे इंग्रजांनी स्वत:च्या हितासाठी टिकवून धरली होती ती झटकून टाकणे ही त्यानंतरची तर्कशुद्ध पायरी होती. इंग्रज मळेवाले करीत होते त्यापेक्षाही अधिक शोषण आणि अत्याचार, जमीनदार, सावकार, मालगुजार, खोत, कारखानदार, सवर्ण, इत्यादी करीत होते. त्यांच्या पकडीतून वेठबिगारी, कुळे, मजूर, अस्पृश्य यांना मुक्त करणे आवश्यक होते. आणि त्याला अग्रक्रम देणे ही भारतात नव-युग आणण्याची पूर्व-अट होती. वेळप्रसंगी निकड भासल्यास त्यासाठी इंग्रजांशी सहकार्य करण्याचीही तयारी ठेवावयास हवी होती. मळेवाले इंग्रज होते. तरीही गांधींच्या कार्याने प्रभावित झालेल्या इंग्रज सरकारने मळेवाल्यांना तडजोड करण्यास भाग पाडले. साहजिकच भारतीय जमीनदार, सावकार इत्यादींचा पाठपुरावा करण्याचे इंग्रजांना कोणतेही सबळ कारण नव्हते. फक्त आपल्या चळवळीचा मोहरा आपण कोठे वळवणार यावर भारत आधुनिक बनणार की दुसरे काही, हे अवलंबून होते.

चंपारण्य-लढ्यापूर्वी दोन वर्षे भारतातील भावी घटनाक्रमांच्या दृष्टीने तितकीशी हितकारक न ठरलेली अशी एक घटना घडली होती. ती म्हणजे अहमदाबादच्या

परिसरात कोचरब येथे गांधीजींनी केलेली आश्रमाची स्थापना. या आश्रमासाठी जे नियम करण्यात आले होते त्यात इंद्रियदमनावर भर देण्यात आला होता. त्यात इतर काही चांगल्या गोष्टी होत्या. पण भारतीय मनावर असलेल्या इंद्रियदमनाच्या मोहिनीमुळे इतर गोष्टींना महत्त्व मिळणे अशक्य होते. वानगीदाखल एक नियम देतो. ' दूध, तूप आणि इतर दुग्धजन्य पदार्थ ब्रह्मचर्याला बाधक आहेत. दूध हे मांसाइतकेच उत्तेजक आहे, म्हणून त्याचा उपयोग केला तर अत्यंत जपून केला जाईल.' सर्वसाधारण व्यक्तीच्या बाबातीत इंद्रियदमनाची परिणती नेहमीच विकृतीत होते. म्हणजे आश्रम हा अंतेवासीयांवर नैतिक अत्याचार करण्याचाच एक कारखाना होता असे म्हणणे अवाजवी ठरणार नाही. दुसरे म्हणजे इंद्रियदमन करणे ज्यांना जमते त्यांना नीतिगंड होतो. दुर्गा भागवतांनी शंकरराव देवांवर एक लेख लिहिला आहे. त्यावरून देवांना प्रत्येक कुमारिकेच्या चारित्र्यासंबंधी शंका घेण्याचा छंद असावा अशी शंका येते. शिवाय अशा व्यक्तीचे सर्व लक्ष इंद्रियदमनावर एकवटल्यामुळे त्या आत्मलक्ष्यी होतात. त्यांचे सामाजिक अवधान सुटते व त्या नैतिक शक्ती म्हणून सार्वजनिक जीवनात स्वत:साठी स्थान निर्माण करू शकत नाहीत. विनोबा भाव्यांपासून सर्व गांधीवादी कार्यकर्त्यांची हीच शोकांतिका झाली. आणीबाणीचे वर्णन विनोबांनी ' अनुशासनपर्व ' म्हणून केले हे सर्वश्रुतच आहे. वास्तविक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अशा व्यक्तींनी सत्तास्थानापासून दूर न राहता सत्तेत सहभागी होऊन सामान्य माणसांसाठी सत्ता कशा तऱ्हेने राबवता येते, याचा आदर्श घालून द्यावयास हवा होता. पण सत्ता भ्रष्ट करते या सुभाषितावर विसंबून वैयक्तिक नीतिमत्ता शाबूत ठेवण्यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केले. सार्वजनिक जीवनापासून दूर राहून चारित्र्य शुद्ध ठेवणे सोपे असते. खरा कस लागतो तो सार्वजनिक जीवनात सहभागी झाल्यानंतरच. पण इंद्रियदमनावर भर दिल्यानंतर हा विवेक राहात नाही. जयप्रकाश नारायण आणि अच्युत पटवर्धन ही या प्रवृत्तीची दोन उदाहरणे. राजकारणसंन्यास घेऊन त्यांनी देशाचे काय भले साधले हे त्यांचे त्यांनाच माहीत. जयप्रकाश नारायण यांना आपली चूक पुढे उमगली आणि त्यांनी पुन्हा राजकारणात प्रवेश केला. पण तोपर्यंत परिस्थिती किती बिघडली होती याचे दर्शन चंद्रशेखरसारख्या कावेबाज माणसाव्यतिरिक्त अन्य व्यक्ती जनतापक्षाच्या अध्यक्षपदासाठी त्यांना सापडू नये, या घटनेने होते.

कोचरब येथे आश्रम स्थापन करून गांधींनी सार्वजनिक जीवनात आश्रमसंस्कृती आणण्याचा मनोदय सूचित केला. भारतीय व्यक्तिमत्त्वाचे एक अत्यंत जीवघेणे वैगुण्य म्हणजे वैयक्तिक उद्धाराच्या संकल्पनेतून निर्माण होणारी आत्मकेंद्रितता आणि

सामाजिक उदासीनता. आश्रम संस्कृतीचेही तेच व्यवच्छेदक लक्षण आहे. कारण-वशात या संस्कृतीचा संपर्क सार्वजनिक जीवनाशी आलाच तर या संस्कृतीचे प्रतिनिधी, आपल्याला इंद्रियदमनाचे जाहीर प्रदर्शन करावयास मिळाले, यावरच बेहद्द खूष असतात. त्यातून काय साध्य झाले याबाबतीत ते निर्विकार असतात. एका उदाहरणावरून हे स्पष्ट होईल. आश्रमवासीय किंवा त्या संस्कृतीने भारली गेलेली व्यक्ती जेव्हा सत्याग्रह करते, तेव्हा आपण लाठ्या खाल्ल्या, आपणास पीडा झाली, आपण ते सर्व सहन केले, यावरच मनसोक्त संतुष्ट असते. त्यातून साध्य काय झाले याची त्याला फिकीर नसते. आणि यदाकदाचित असा प्रश्न पडलाच तर गीतेने तो आधीच सोडवून ठेवला आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन.' त्यामुळे एक सत्याग्रह संपल्यानंतर, पुन्हा केव्हा सत्याग्रह होतो आणि आपण आपले इंद्रियदमनाचे सामर्थ्य कधी दाखवितो याची वाट पाहणे एवढेच त्याचे जीवितकार्य होते. त्यामुळे समाजाच्या उद्धारासाठी आवश्यक असलेल्या विधायक कार्याबद्दल त्यास यत्किंचितही रुची राहात नाही.

चंपारण्य-लढ्यानंतर गांधीजींपुढे दोन मार्ग होते. एक म्हणजे चंपारण्य-लढ्याचा आणि दुसरा म्हणजे आश्रमसंस्कृतीचा अथवा आत्मपीडनाचा. पहिल्या मार्गामुळे सामान्य माणसाच्या समस्या सोडविण्याचा एक उपाय आपल्याला सापडला होता. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेशी आणि न्यायाच्या आधुनिक संकल्पनेशी तो सुसंगत होता. आपले प्रश्न आपल्या प्रयत्नाने, कार्यकर्त्यांच्या मदतीने आणि समाजाच्या सहानुभूतीने सोडवू शकू असा आत्मविश्वास त्या उपायाने सामान्य माणसात निर्माण करता येण्यासारखा होता. याच मार्गाने प्रगती करून भारताला जे नवयुग निर्माण करावयाचे होते त्याच्याशी सुसंवादी असे, भारतीय व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे कार्य सफल होऊ शकले असते. आश्रममार्गातील धोके उघड होते. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेशी तो सर्वस्वी विसंगत होता. कारण आत्मकेंद्रितता आणि मानवतावाद यात कोणताही संवाद नसतो. साहजिकच आश्रममार्ग अवनत भारतीय व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत होता. या व्यक्तिमत्त्वाला भावणारी आणखी एक संकल्पना म्हणजे रामराज्य ! रामराज्य म्हणजे दैवी अथवा ईश्वरी न्यायाने फलद्रूप होणारा आदर्श समाज ! राम हा दैवी अवतार समजला जातो आणि तो अशा राज्याचा कारक असतो. त्यामुळे सामान्य माणसाचा जाणीवपूर्वक सहभाग अशा समाजाचा आदर्श नसतो. आश्रमसंस्कृती आणि रामराज्य या दोन कालविसंगत गोष्टी गांधींनी प्रचारात आणल्या. त्याचबरोबर आश्रमसंस्कृतीचा हिस्सा असलेल्या वैराग्याचाही ते पुरस्कार करू लागले. या सर्वांचेच

आकर्षण भारतीय व्यक्तिमत्त्वाला होते. इंग्रजी राजवटीच्या स्थापनेनंतर जी आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली होती त्यात भारतीय व्यक्तिमत्त्वातील काही वैगुण्ये दबल्यासारखी झाली होती. त्यांना आश्रमसंस्कृतीने पुन्हा उजाळा मिळणार होता, सामान्य माणसाचे आश्रम हे आकर्षण ठरणार होते. पण त्याचा स्वत:चा उद्धार मात्र त्यामुळे होणार नव्हता. कारण आश्रमसंस्कृती अंगीकारलेल्यांच्या आत्मपीडनाचा तो केवळ एक प्रेक्षक बनणार होता. आत्मपीडनाचा खेळ पाहून तो टाळ्या वाजवणार होता. कोणाचा तरी जयजयकार करणार होता. आणि त्यानंतर सामाजिक बेफिकिरीचा जो नित्यक्रम आहे त्यात गुंतून जाणार होता. दुसरे म्हणजे आश्रमसंस्कृतीत वैयक्तिक स्तरावर षड्‌रिपूंचे दमन अभिप्रेत असते. त्यांचे सामाजिकीकरण करून त्यांना विधायक वळण देणे त्यात अनुस्यूत नसते. साहजिकच समाजात, निव्वळ राजकारणात नव्हे, जे अनिष्ट आहे त्याचा मुकाबला करणारे व्यक्तिमत्त्व निर्माण करण्यात आश्रमसंस्कृती यशस्वी ठरणार नव्हती. थोडक्यात, आश्रमसंस्कृतीच्या प्रादुर्भावामुळे आपण पुन्हा अवनत भारतीयत्वाच्या कोशात शिरणार होतो. कारण आपली वैगुण्ये केवळ दबल्यासारखी झाली होती. नष्ट झाली नव्हती.

१९१८ साली गांधी कोणता मार्ग स्वीकारणार हा भारताच्या दृष्टीने लाख मोलाचा प्रश्न होता. गोखले, फिरोजशहा मेथा यांचे निधन झाले होते. टिळक प्राकृतिक अस्वास्थ्याने पीडित होते. त्यामुळे गांधींकडे नेतृत्व येण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. चंपारण्य मार्गाने आधुनिक भारत निर्माण होणार, की आश्रमसंस्कृतीच्या मार्गाने पुन्हा एकदा अवनत भारतीयत्वाचे पुनरुत्थान होणार, हा प्रश्न होता. त्याचा निर्णय लागला तो रौलट कायद्यांविरुद्ध गांधींनी सुरू केलेल्या आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला त्याने. रौलट कायदे ही इंग्रज साम्राज्यशहांची बचावात्मक धडपड होती. खुद्द इंग्रजी राजनीतीशी ते विसंगत होते, हे १९१७ च्या मॉटेग्यूच्या घोषणेने आगाऊच जाहीर केले होते. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत जबाबदार राज्यपद्धती हे भारतातील घटनात्मक प्रगतीचे उद्दिष्ट त्या घोषणेने निश्चित केले होते. अशा परिस्थितीत चंपारण्य मार्गाने रौलट कायद्यांविरुद्ध आंदोलन करणे शक्य होते. या कायद्याने ज्यांचे अधिकार प्रत्यक्षात हिरावून घेतले जाणार होते, त्यांनी समाजाच्या सहानुभूतीवर विसंबून कायदे भंग करणे हे उचित ठरले असते. पण गांधींनी आश्रमसंस्कृतीला अनुसरून त्याला आत्मपीडनाचे स्वरूप दिले. तसेच मुळात राजकीय असलेला लढा धार्मिक म्हणून घोषित केला. ते म्हणतात : 'सत्याग्रह ही आवश्यकत: धार्मिक चळवळ आहे. ती आत्मशुद्धीची आणि तपाची प्रक्रिया आहे. आत्मपीडनाने सुधारणा मिळविण्याचा

किंवा गाऱ्हाणी दूर करून घेण्याचा तो मार्ग आहे.' आत्मपीडन हा यापुढील राजकीय चळवळींचा मूलाधार ठरणार होता. साहजिकच उद्दिष्टापेक्षा आत्मपीडनाला जास्त महत्त्व येणार होते. त्याच्याच बरोबरीने ज्यांचा केल्या गेलेल्या अन्यायाशी प्रत्यक्षात संबंध येत नाही त्यांनी चळवळीत भाग घेतला तर काय होते, हेही या आंदोलनाने दाखवून दिले. आश्रमसंस्कृतीवाले आत्मपीडनाचा, तर इतर उत्साही, हिंसक प्रकारांचा अवलंब करणार, हे निश्चित झाले. आत्मपीडन करावयास मिळाले म्हणून आश्रमसंप्रदायी खूष, तर हिंसा करावयास मिळाली, मोर्चा काढण्यास किंवा ओरडण्यास मिळाले म्हणून इतर खूष. नाहीतरी आरत्या म्हणण्याखेरीज एरवी आपल्याला ओरडण्याची संधीच नसते. अशा तऱ्हेने सर्वच खूष. नाहीतरी 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' हे भारतीय संस्कृतीचे ब्रीदच आहे. एवढे झाले म्हणजे उद्दिष्टांची 'ऐशी तैशी.'

गांधींना स्वतःला आंदोलनाच्या यशाबद्दल प्रथम शंका होती; पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाल्यामुळे ते इतके भारावून गेले, की प्रत्यक्षात त्यांनी लेखनाद्वारे आणि तोंडाने हिंसक प्रकारांचा निषेध केला असला तरी हंटर कमिशनपुढे दिलेल्या साक्षीत आडपडद्याने त्यांनी हिंसाचाराचे समर्थनच केले. या यशामुळे 'चंपारण्य' मार्ग सोडून त्यांनी आत्मपीडनाचा मार्ग निश्चित केला. आश्रम-संप्रदायाने चंपारण्य मार्गावर निर्णायक विजय मिळविला होता आणि भारत पुन्हा अवनत भारतीयत्वाच्या कोशात शिरणार होता. संप्रदाय म्हटला म्हणजे महंत आलाच. ते स्थान गांधी भूषविणार होते. महंताला स्पर्धा चालत नाही. विरोधकांना आपले अनुयायी बनविणे किंवा त्यांना नेस्तनाबूत करणे एवढा एकच मार्ग त्याच्यापुढे असतो. महंमद पैगंबरांचांही तोच मार्ग होता. त्यांच्या चारित्र्याची मोहिनी गांधींवरही होती. त्यानुसार लजपतराय, चित्तरंजनदास, मोतीलाल नेहरू इत्यादींनी त्यांचा संप्रदाय स्वीकारला. राहता राहिले जीना. तेव्हा ज्यांच्या राजकीय स्पर्धेची भीती नव्हती अशा जातीयवादी महंमद अली आणि शौकत अली यांचे सहकार्य मिळवून कॉंग्रेसच्या नागपूर अधिवेशनात गांधींनी जीनांचा निकाल लावला. सप्रू, जयकर, शास्त्री, यांसारखी नेमस्त पण कर्तबगार माणसे राजकारणाच्या रिंगणाभोवती काही काळ घुटमळून नंतर निष्प्रभ झाली. साहजिकच आश्रम सांप्रदायिक, आणि संख्या हेच ज्यांचे बल होते, तसेच आधुनिकता ही संकल्पनाही ज्यांना अनोखी होती, अशा हौसे, नवसे आणि गवसे यांच्या हाती भारतीय राजकारणाची सूत्रे आली. हौसे, नवसे आणि गवसे व्यावहारिक राजकारणात सांपद्रायिकांपेक्षा नेहमीच अधिक धूर्त असतात. साहजिकच सार्वजनिक जीवनावर त्यांचीच छाप यापुढे राहणार हे निश्चित होते. त्यांच्या हाती जेव्हा सत्ता येईल

त्या वेळी तिचा उपयोग, त्यांची मूल्यविहीनता लक्षात घेता, ते स्वत:च्या स्वार्थासाठीच करणार हेही उघड होते, आणि आजतागायत तेच चालू आहे. अशा तऱ्हेने राजा राममोहन रॉय यांच्यापासून भारताला आधुनिक बनविण्याची सुरू झालेली प्रक्रिया १९२० साली खंडित झाली आणि भारताचे भवितव्य ज्यांचा आधुनिकतेशी कोणत्याही तऱ्हेने संपर्क आलेला नव्हता अशांच्या हाती कालांतराने सुपूर्त होण्याचा मार्ग मोकळा झाला. १९२० च्या चळवळीने अशा तऱ्हेने राष्ट्रीय आंदोलन आडमार्गाला तर नेलेच; पण त्याच्याच बरोबरीने मुस्लिम जातीयवादी शक्तींना खतपाणी घालून भारताच्या फाळणीचा पायाही घातला. परागती हे राष्ट्रीय जीवनाचे सूत्र बनले, आणि एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना प्रत्यक्षात मात्र आपण मागे मागे जात आहोत. आजच्या समस्यांच्या अनुषंगाने त्याचाच शोध घ्यावयाचा आहे.

# ५

# आधुनिक भारताच्या समस्या

१८५३ च्या चार्टर कायद्याने शासनाच्या आधुनिकीकरणाची जी प्रक्रिया सुरू झाली होती, आणि राष्ट्रीय आंदोलनाच्या नेत्यांनी वारंवार ज्या राजकीय सुधारणा मागितल्या होत्या, त्यावरून भारताची घटनात्मक वाटचाल इंग्रजी धर्तीच्या संसदीय पद्धतीतच होणार हे निश्चित होते. संसदीय पद्धतीसाठी तिला अनुरूप अशा व्यक्तिमत्त्वाची गरज असते. एरवी आधुनिक पद्धती आणि सरंजामी व्यक्तिमत्त्व यांची विचित्र सांगड पडून त्यातून अरिष्टाचीच निर्मिती होते. १९२० पर्यंत पाश्चात्य पद्धतीच्या संस्थांशी विसंगत अशी भारतीय व्यक्तिमत्त्वातील वैगुण्ये दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात होते. पण १९२० च्या असहकाराच्या चळवळीमागे जे तत्त्वज्ञान होते ते संसदीय पद्धतीसाठी जो लढा होता त्याच्याशी विसंगत पण भारतीय व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत होते. १९२० नंतरच्या राष्ट्रीय आंदोलनात हा जो अंतर्गत विरोध होता त्याचे दुष्परिणाम स्वातंत्र्याच्या ऊर्मीमुळे १९४७ पर्यंत काही प्रमाणात सुप्त होते. परंतु १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते उफाळून आले आणि सार्वजनिक जीवनातील प्रत्येक क्षेत्रात आणि वैयक्तिक जीवनातही भारतीय व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव प्रकर्षाने जाणवू लागला. ग्रामपंचायतीपासून ते संसदेपर्यंत, ग्रामसेवकापासून ते पंतप्रधानापर्यंत आणि हुंडाबळीपासून ते भ्रष्टाचारापर्यंत आपल्याला काय आढळत असेल तर भारतीय व्यक्तिमत्त्वाचा मुक्त संचार. आजची ही भयावह परिस्थिती आणि भारतीय व्यक्तिमत्त्व यांच्यातील अन्योन्य-संबंधांचा वेध घेऊनच

आजच्या परिस्थितीचे नेमके निदान होऊ शकेल. त्याची सुरुवात लोकशाहीपासूनच करू.

**लोकशाही**

आधुनिक राज्यपद्धतीत व्यक्तीचा शासनाशी संबंध अनेक अंगांनी व प्रत्यही येत असतो. अगदी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे नियमन शासनप्रणीत कायद्याने केलेले असते. घटनेने मूलभूत अधिकार दिलेले आहेत. त्यावर देखील वाजवी निर्बंध घालण्याचे अधिकार शासनाला आहेत. मध्ययुगीन राज्यपद्धतीत व्यक्ती आणि शासन यांतील संबंध इतके सर्वंकष नव्हते. राजधानीत कोणतीही उलथापालथ झाली, एक शास्ता जाऊन दुसरा आला, एका राजवटीच्या जागी दुसरी राजवट आली, तरी त्या घटनेने सर्वसाधारण व्यक्तीचे जीवन कोणत्याही तऱ्हेने त्रस्त होत नव्हते. अधिकारपदस्थांनाच फक्त त्याची झळ पोहोचत असे. परंतु आधुनिक राज्यपद्धतीत व्यक्ती आणि शासन यांचे संबंध अत्यंत निकटचे झाल्यामुळे साहजिकच प्रत्येक व्यक्तीने शासनपद्धतीत जास्तीत जास्त रस घेणे ही आधुनिक राज्यपद्धतीची एक प्राथमिक गरज असते. असा रस घेण्याची एक संधी लोकशाहीमध्ये निवडणुकांच्या वेळी प्रत्येक मतदाराला मिळते.

आपण लोकशाही स्वीकारली असल्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्वही अंमलात आणले आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत लोकनियुक्त संस्थाही स्थापन केल्या आहेत. अशा पद्धतीत निवडणुका ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. लोकशाही संस्था कोण राबवणार याचा निर्णय निवडणुकांद्वारे होत असतो. मतदार जर जागरूक असतील तर लायक व्यक्तींना लोकनियुक्त संस्थेत स्थान मिळते. मतदार जर जागरूक नसतील अथवा त्यांना स्वत:ची विवेकबुद्धी नसेल तर त्यांना भुलविणे सोपे असते. आणि या मार्गाचा अवलंब करून अनेक अपात्र व्यक्ती लोकनियुक्त संस्थांमध्ये निवडून येऊ शकतात. म्हणजे जागरूक मतदार आणि लायक लोकनियुक्त प्रतिनिधी या लोकशाही यशस्वी रीतीने राबविण्याच्या दोन पूर्व-अटी आहेत.

निवडणूक प्रक्रिया आणि लोकशाही या भारतीय संस्कृतीला संपूर्णपणे अनोख्या संकल्पना आहेत. बौद्धसंघातील काही प्रथांचा दाखला देऊन काही देशाभिमानी मंडळी, लोकशाही आम्हाला नवीन नाही, असा पुकारा करतात. पण वास्तवात लोकशाही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नाही याचा प्रतिवाद करणे अशक्य आहे. आणीबाणी आपल्याला फारशी जाचक वाटली नाही. आरडाओरडा करता येत नव्हता याचेच फक्त दु:ख होते. आणीबाणी संपल्यानंतर तो करायला मिळू लागला आणि लोकशाहीतले

आपले स्वारस्य संपले. निवडणुकांइतकीच प्रतिनिधित्वाची पद्धतही आपल्याला अपरिचित आहे. १८९२ च्या कायद्याने भारतात प्रथमच प्रतिनिधित्वाचे तत्त्व अंमलात आले. मध्यवर्ती कायदेमंडळात काही हितसंबंधांना प्रतिनिधित्व देऊन प्रतिनिधित्त्वाचे तत्त्व प्रथमच भारतात इंग्रजांनी कार्यवाहीत आणले. या कायद्याने सरकारी धोरणावर टीका करण्याचे मर्यादित अधिकार प्रतिनिधींना मिळाले. म्हणजे एका परकीय राजवटीने, शासकीय धोरण टीकेपासून मुक्त नाही आणि तो अधिकार भारतीयांना आहे, ही दोन तत्त्वे या कायद्यान्वये मान्य केली. स्वतंत्र भारतात अनेकदा विरोधकांना देशद्रोही म्हटले जाते ही वस्तुस्थिती या संदर्भात लक्षात ठेवण्याजोगी आहे. हा फरक पडण्याचे कारण म्हणजे लोकशाही हा इंग्रजी व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे, तसा तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा नाही. त्यानंतर १९०९ च्या सुधारणा कायद्याने निवडणुकांचे तत्त्व अमलात आणले. अशा तऱ्हेने प्रतिनिधित्व आणि निवडणुका या दोन संकल्पना भारताला प्रथमच अनुभवण्यास मिळाल्या. १९१९ आणि १९३५ च्या कायद्यांनी या दोन संकल्पना अधिक विस्तारित केल्या आणि त्याचबरोबर लोकप्रतिनिधींना शासकीय अधिकारही दिले. थोडक्यात, निवडणुका, प्रतिनिधित्व आणि शासकीय अधिकार या तिघांची सांगड भारतात पडली आणि पाश्चात्य धर्तीच्या लोकशाहीची प्रक्रिया भारतात सुरू झाली. स्थानिक स्वराज्य संस्था हा लोकशाहीचा मूलाधार. रिपनच्या १८८३ च्या सरकारी निर्णयाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निर्मितीस सुरुवात झाली. अशा तऱ्हेने स्थानिक स्वराज्य संस्था, मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदामंडळे व प्रांतिक स्वायत्तता एवढी प्रगती १९३५ पर्यंत भारताने केली होती. या संस्थांचे भवितव्य, आपण त्या कशा तऱ्हेने राबवितो, यावर अवलंबून होते. या दिशेने सुरुवात तर चांगली झाली होती. ना. गोखले, सप्रू, जयकर, श्रीनिवास शास्त्री, जीना, चित्तरंजनदास, मोतीलाल नेहरू इ., जगातील कोणत्याही विधिमंडळाचे भूषण ठरावेत असे संसदपटू या काळात उदयास आले. आणि त्यांनी आपली छाप विधिमंडळातील कामकाजावर पाडली. ना. गोखले यांनी नगरपालिकेच्या कार्यातही रस घेतला आणि काही काळ ते पुणे नगरपालिकेचे अध्यक्षही होते. मतदानाचा अधिकार मर्यादित असल्याने मतदार सर्वसाधारणपणे मताचे महत्त्व समजणारा होता आणि त्यामुळे योग्य व्यक्तींनाच तो सहसा निवडून देत असे.

१९३५ पर्यंतचा काल हा संसदपटुत्वाचा सुवर्णकाल मानता येईल; पण त्यात एक न्यून होते. १९२० पूर्वी सर्वच पक्ष निवडणुकांना आणि त्यात यशस्वी झाल्यानंतर मिळणाऱ्या अधिकारांना महत्त्व देत असत. लोकनियुक्त संस्था आपल्या सार्वजनिक

जीवनाचा भाग बनल्या होत्या आणि हळूहळू त्या आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनवण्याचीही प्रक्रिया सुरू झाली होती. नगरपालिकादेखील योग्य तऱ्हेने चालविण्यास आपण शिकत होतो. मुंबई महानगरपालिकेत फिरोझशहा मेथा यांनी केलेले कार्य त्या दृष्टीने अत्यंत संस्मरणीय आहे. तथापि १९२० साली असहकाराची चळवळ सुरू झाल्यानंतर लोकनियुक्त संस्थांमधील सर्वसामान्य माणसाचा रस कमी होऊ लागला. खरे तर पाश्चात्य धर्तीची लोकशाही भारत स्वीकारणार हे निश्चित झाल्यानंतर अशा तऱ्हेची उदासीनता लोकनियुक्त संस्थांच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत हानीकारक होती. असहकाराचे वातावरण १९४७ पर्यंत टिकले. म्हणजे पंचवीस वर्षांहून अधिक काळ आपण अशा संस्थांना आपल्या विचारधारेतून जवळ जवळ बहिष्कृत केले होते. काही वेळेला मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांचा उपयोग करून घेण्यात आला होता; पण तो निव्वळ अडवणुकीच्या धोरणातून त्यांचे कामकाज बंद पाडण्याच्या दृष्टीने. लोकनियुक्त संस्थांच्या मार्फत सर्वसामान्य माणसाच्या हिताचे रक्षण करता येते असा विश्वास निर्माण करणे त्या संस्थांच्या यशस्वितेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. पण असहकाराच्या धोरणामुळे असा विश्वास दृढमूल न होता उलट त्या संस्थांचा उपयोग असलाच तर नकारात्मक असतो, अशा तऱ्हेची भावना निर्माण होण्याचा धोका मात्र उत्पन्न झाला. १९१९ च्या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचे खाते लोकनियुक्त मंत्र्याकडे सोपविण्यात आले होते. त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांचे त्यांच्या कारभारात ढवळाढवळ करण्याचे अधिकार सीमित झाले होते. तेव्हा नगरपालिकांचा कारभार कार्यक्षमतेने करण्यास तशी अडचण नव्हती. आणि नगरसेवकांनी आपल्या कामात हयगय केली असती तर वरून शासकीय दडपण आणि खालून सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक यांचा सत्याग्रह अशा कैचीत त्यांना पकडून नगरपालिकांचा कारभार सुधारता आला असता. रस्ते स्वच्छ नाहीत, गटारे तुंबलेली आहेत, जकातीत भ्रष्टाचार चालू आहे, आरोग्याकडे नगरपालिकेचे लक्ष नाही, अशा गोष्टींविरुद्ध सत्याग्रह करणे हे इंग्रजांविरुद्ध सत्याग्रह करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे होते. नागरिक जर स्वच्छता राखण्यात मदत करत नसतील तर त्यांच्या विरुद्धही कृती करणे आवश्यक होते. पण यावर काँग्रेसी उपाय म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्ते साफ करणे. आत्मपीडनाच्या शास्त्रातलाच तो एक मार्ग. मागे मला वाचलेले आठवते की, ऋषितुल्य सेनापती बापट रस्ते झाडत असत आणि बायका ते येण्याच्या वेळेस रस्त्यावर कचरा टाकत असत. या आख्यायिकेत सेनापती बापटांचा मोठेपणा, कचरा टाकणाऱ्यांचा करंटेपणा, की आख्यायिका शांतपणे लिहिणाऱ्यांचा आणि

वाचणाऱ्यांचा मुर्दाडपणा ध्वनित होतो याचा निर्णय मला अजून करता आलेला नाही. एवढे मात्र खरे की, आमच्या भारतीय व्यक्तिमत्त्वाचा हा एक आविष्कार होता आणि तो आश्रमसंस्कृतीला अनुसरूनच होता. वर उल्लेखिलेल्या मार्गाने, नगरपालिकांवरीलच नव्हे, तर लोकनियुक्त संस्थांवरील लोकांचा विश्वास वाढला असता. पण बहिष्काराच्या धोरणामुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या उदासीनतेने लोकशाहीचा मूलाधार असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचा विचका झाला आणि लोकशाहीच्या प्राथमिक शिक्षणापासून सामान्य माणूस वंचित झाला. आपले प्रश्न आपण सोडवू शकू, हा विश्वासच त्यांच्यात निर्माण होऊ शकला नाही. मुळात सामाजिक बेफिकिरी हा आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग. तेव्हा नगरसेवकांना आपली कर्तव्ये योग्य तऱ्हेने करण्यास भाग पाडून, तसेच नागरिकांना शिस्त लावून त्यांच्यात सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करता आली असती तर, आपल्या व्यक्तिमत्त्वातील एका दोषाला थोडी तरी मुरड घालता आली असती. पण १९२० नंतर आपण आध्यात्मिक धुंदीत होतो. त्यामुळे मर्त्य लोकांचे दैनंदिन हित आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वैगुण्ये या सर्वांचाच विसर पडला. आपण जी आध्यात्मिक उंची गाठू पाहात होतो त्याच्या तुलनेत हा सर्वच भाग अत्यंत उपेक्षणीय नव्हता का !

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. पण त्यापूर्वीची सत्तावीस वर्षे लोकशाहीची पाटी कोरीच राहिली होती. त्यामुळे लोकशाहीचा ओनामा नव्याने करण्याची पाळी आली. लोकशाहीत लोकप्रतिनिधींच्या हाती सत्ता येत असल्यामुळे लोकनियुक्त संस्थांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. लायक लोकप्रतिनिधी आणि जागरूक मतदार या अशा संस्थांच्या यशस्वितेच्या दोन पूर्व-अटी. त्याशिवाय, अशा संस्था राबविण्याचा अनुभव ही आणखी एक गोष्ट. भारतीय घटनेने सार्वत्रिक प्रौढ मतदानाची पद्धत अस्तित्वात आणली. नवीन मतदारांपैकी बहुसंख्य निरक्षर होते. लोकशाही प्रक्रियेबद्दल ते विलक्षण अज्ञानी होते. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी जे व्यक्तिमत्त्व अभिप्रेत आहे त्याचा त्यांच्या ठिकाणी अभाव होता. त्यामुळे मतदान स्वतःच्या विवेकबुद्धीने न करता कोणाच्या तरी दडपणाखाली किंवा कोणते तरी आमिष दाखविले गेल्यामुळे ते करणार, हे निश्चित होते. त्या दृष्टीने मतदानाचे महत्त्व त्यांच्या हिशोबी वेगळेच होते. गांधींनी एका ठिकाणी म्हटले आहे की, सद्यःस्थितीत परमेश्वराने भारतात अवतार घेतला तर त्याला भाकरीच्या स्वरूपातच अवतरावे लागेल. अशिक्षित मतदारांच्या दृष्टीने असा अवतार मतदानाच्या दिवशी होतो. त्याच्या एक दिवसाच्या भाकरीचा

प्रश्न तरी त्यामुळे सुटतो. या मतदाराच्या सुज्ञतेबद्दल अनेकांनी अनेक वेळा गहिवरून लिहिले आहे. १९८९ च्या निवडणुकांनंतर तर अशा लिखाणाला बहर आला होता. पण १९५२ पासूनच्या निवडणुकांचे जर विश्लेषण केले तर मतदानाचा आकृतिबंध तोच असल्याचे आढळून येते. कॉंग्रेस विरोधकांनी एकजूट केली आणि त्याच्या जोडीला एखादा भावनिक प्रश्न असला तर कॉंग्रेसचा पराभव निश्चित असतो. वस्तुत: सार्वत्रिक प्रौढ मतदान जारी करून लोकशाहीने स्वत:चेच थडगे खणले होते. निदान साक्षरता ही जरी अट ठेवली असती, तरी मतदानासाठी पात्र होण्याकरता प्रयत्न करावे लागतात, ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली असती आणि त्यातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास सुरू झाला असता. इतकेच नव्हे, तर मतदार मिळविण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी साक्षरता मोहीम सुरू केली असती आणि निरक्षरतेची समस्या एव्हाना सुटली असती.

बहुसंख्य मतदार असे असल्यानंतर निवडून येणाऱ्यांबद्दल काय लिहावे ? अशा निवडणुकांत सप्रू, जयकर, श्रीनिवास शास्त्री, चिंतामणराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ अशांना स्वसामर्थ्याधिष्ठित स्थान मिळणे अशक्य होते. आंबेडकरांना स्थान राहणार नव्हते, पण नारायणराव काजरोळकरांना मात्र राहणार होते. घटनेने लोकनियुक्त सभासदांसाठी वयापलीकडे कोणतीही पात्रता ठेवली नव्हती. साधी कारकुनी करायची म्हटले तरी एस. एस. सी. पास व्हावे लागते. पण संबंध राष्ट्राचे भवितव्य ज्यांच्या हाती त्यांना मात्र कोणतीही पात्रता संपादन करावी लागत नसे. फक्त विशिष्ट जातीचा किंवा ठराविक विभागात वजन असणारा असला म्हणजे झाले. त्यामुळे लोकनियुक्त सभासदांपैकी बहुसंख्यांना प्रबोधनाची कसलीही बाधा झालेली नसते. भारतीय व्यक्तिमत्त्वातील जी वैगुण्ये वर विशद केलेली आहेत त्यांपैकी बहुसंख्य त्यांच्या ठिकाणी एकवटलेली असतातच. श्रमसंस्कृतीपासून ते अलिप्त असतात, त्यामुळे आपल्या वैधानिक कामात त्यांना कोणतीही रुची असत नाही. लोकनियुक्त संस्थांच्या सभांना नियमित हजर राहणे, त्यात सहभागी होणे, निरनिराळ्या समस्यांचा अभ्यास करून त्यासंबंधी तोडगे सुचविणे, इत्यादी बाबींसंबंधात ते उदासीन असतात. स्थानपरत्वे मिळणारे अधिकार व सवलती आणि त्यातून साधला जाणारा वैयक्तिक उत्कर्ष एवढीच त्यांची महत्त्वाकांक्षा असते. सामाजिक सद्भाव त्यांच्या ठिकाणी अभावानेच तळपतो. राष्ट्रहितापेक्षा भाचे-पुतण्यांचे हितच त्यांच्या हिशेबी अधिक महत्त्वाचे असते. अशा तऱ्हेने निवडून येणे हा वैयक्तिक उत्कर्षाचा सोपान झाला म्हणजे कोणत्याही नीतिमत्तेचा प्रश्न फालतू ठरतो. त्यातूनच निवडणुकांतील आणि निवडून

आल्यानंतरच्या अपप्रकारांची निपज होते.

निवडणुकीचा संबंध वैयक्तिक उत्कर्षाशी जोडला गेल्याकारणाने निवडून येणे हेच साध्य बनले आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी हा जनतेचा सेवक असतो या कल्पनेची त्यात वाताहत झाली. या परिस्थितीची जबाबदारी भारताचे शिल्पकार नेहरू यांची. निवडणुकीच्या ज्वराने त्यांना एवढे ग्रासले होते की भारताच्या भवितव्याचा सारासार विचार त्यात पार वाहून गेला होता. उदाहरणार्थ, संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी पं. नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना कोणता प्रश्न विचारला असेल तर तो हा की, त्याचा परिणाम पुढील निवडणुकीवर काँग्रेसला अनुकूल अशा तऱ्हेने होईल की नाही. यशवंतरावांनी होकारार्थी उत्तर दिल्यानंतर नेहरू समाधान पावले आणि संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मार्गी लागला. संयुक्त महाराष्ट्र झाल्यामुळे राज्यकारभारात सुधारणा होईल का, लोकांच्या गाऱ्हाण्यांची तड लागणे सुलभ होईल का, किंवा महाराष्ट्राच्या उत्कर्षासाठी कोणत्या योजना आहेत, याची चौकशी करण्याची त्यांना गरज वाटली नाही. काँग्रेस निवडून आली म्हणजे त्यांना सर्व भरून पावले. नियोजनाचा अपवाद वगळता काँग्रेसला निवडून आणणे एवढेच त्यांचे अंतर्गत बाबतीत धोरण होते. त्यासाठी त्यांनी 'निवडणुकीच्या जादूगारांना' जवळ केले होते. केरळमध्ये काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर तेथील जातीयवाद्यांना उत्तेजन देऊन लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारविरुद्ध आंदोलन करण्यास प्रवृत्त केले. आणि त्याचा फायदा घेऊन तेथील विरोधी पक्षांचे सरकार बरखास्त केले. नेहरू असे का वागले ? त्याचे साधे उत्तर असे आहे, की ते भारतीय होते म्हणून लोकशाही हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नव्हता. त्यांची खरी भूमिका होती ती हिंदू कुटुंबातील कर्त्या पुरुषाची. आणि त्या नात्यानेच ते आपला अधिकार गाजवत असत. सर्व निर्णय त्यांचे असत. खानदानी सौजन्याचा भाग म्हणून इतरांचा फक्त सल्ला विचारत असत. हीच त्यांची लोकशाही होती. भारतीय ब्रँड लोकशाही.

निवडणुकीलाच सर्वस्व समजण्याचा नेहरूंनी जो पायंडा पाडला त्याचे रूपांतर आता विषवल्लीत झाले असून तिचे जहर सबंध राजकीय जीवनात भिनले आहे. भारतीय व्यक्तिमत्त्वही या प्रक्रियेला संपूर्णपणे अनुकूल आहे. वैयक्तिक उत्कर्ष हेच आपले खरे उद्दिष्ट असते. त्यामुळे ग्रामपंचायतीपासून ते संसदेपर्यंत येनकेनप्रकारे निवडून येणे एवढेच ध्येय आता प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याने आणि पक्षाने आपल्यासमोर ठेवले आहे. त्यामुळे आता निवडणुकांत कोणत्याही तडजोडी होतात. तस्कर आणि गुंड यांचे साहाय्य घेतले जाते, मतदानकेंद्रे ताब्यात घेतली जातात, गुन्हेगारांनाही

राजकीय पक्ष तिकिटे देतात. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नैतिक मूल्यांचा गजर करणाऱ्या जनता दलाने शाही इमाम बुखारी यांचा आशीर्वाद पैदा करून त्याचे राजकीय निर्णय म्हणून समर्थनही केले. एवंच लोकशाही यशस्वी रीतीने राबविण्यासाठी भारतीय व्यक्तिमत्त्वात योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील होण्याऐवजी भारतीय व्यक्तिमत्त्वाला सोयीस्कर अशा तऱ्हेने लोकशाही संस्थाच राबविल्या जात आहेत. परिणामी लोकशाहीची फक्त बाह्यलक्षणेच आता शाबूत राहिली आहेत. तिचा आत्मा मात्र नष्ट झाला आहे. खेदाची गोष्ट म्हणजे नैतिक मूल्ये मानणाऱ्या काही व्यक्ती वगळता त्याची कोणालाच खंत नाही. हे असेच चालायचे, असे म्हणून आपण त्या बाबतीत निर्धास्त आहोत. लोकशाही हा आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होऊ न शकल्याकारणाने आपणास त्यामुळे अस्वास्थ्यही जाणवत नाही.

अलीकडे या विषयावर जे लेखन होते त्यात नेहरू फार चांगले होते हो, ते लोकशाहीवादी होते. पण इंदिरा गांधींनी लोकशाहीचे वाटोळे केले, असा गळा काढला जातो. या युक्तिवादाच्या समर्थनार्थ पार्लमेंटला नेहरू किती मानत असत, त्याच्या अधिवेशनाला काटेकोरपणे हजर राहात असत, चर्चेत सहभागी होत असत, वगैरे गोष्टींचा न चुकता उल्लेख केला जातो. वास्तविक पार्लमेंट हे नेहरूंच्या ऐश्वर्याचे प्रतीक होते, लोकशाहीचे साधन नव्हते. ऐश्वर्याच्या प्रतीकाची नेहमीच अतीव काळजी घेतली जाते. ते घासूनपुसून नेहमी स्वच्छ ठेवले जाते, त्याबद्दल आपण सतत बोलत असतो. आपणास त्याविषयी विलक्षण रुची असते. येणाऱ्या-जाणाऱ्यांपुढे आपण त्याचे सतत अभिमानाने प्रदर्शन करीत असतो. नेहरूंची पार्लमेंटकडे पाहण्याची दृष्टी यापेक्षा वेगळी नव्हती. पार्लमेंटला जर ते लोकशाहीचे साधन समजले असते तर त्यांचे धोरण अगदीच वेगळे दिसले असते. संसदीय पद्धतीचा खरा आत्मा म्हणजे बलशाली विरोधी पक्ष आणि त्याला मिळणारी प्रतिष्ठा. नेहरूंना ज्या वेळी सुचविण्यात आले, की विरोधी पक्ष बलशाही व्हावा म्हणून त्यांनी सहयोग द्यावा, त्या वेळी ती सूचना त्यांनी हास्यास्पद ठरविली. इंदिरा गांधींनी संजय गांधींना घटनाबाह्य अधिकारकेंद्र बनविले होते, असा आरोप केला जातो. मग नेहरू राजवटीत कृष्ण मेनन यांचे काय स्थान होते ? इंदिरा गांधी म्हणजे नेहरूंची अधिक बिघडलेली आवृत्ती एवढाच दोघांत फरक होता.

### जातीयवाद

जातीयवाद हा शब्द उच्चारल्याबरोबर फंडामेंटलिझम, रिव्हायवॅलिझम, कम्युनॅलिझम इत्यादी शब्दांची तात्काळ बरसात होते, त्यांचा अर्थ न समजता.

जानव्याची ब्रह्मगाठ पाहिली म्हणजे भूत हताश होते असे म्हणतात, त्याप्रमाणे जातीयवाद हा शब्द कानी पडताच पुरोगामी म्हणवून घेणारे विचारवंत हवालदिल होतात, इतके हवालदिल की जातीयवाद नेमका कोठे आहे याचाही त्यांना सारासार विचार राहात नाही आणि एखाद्या पवनचक्कीलाच जातीयवाद समजून तिच्याशी लढण्यासाठी सर्व बळ एकवटण्याचा प्रयत्न करतात. तथापि स्वत:चे बळ त्यांनी जोखलेले असल्यामुळे काल्पनिक जातीयवादाशी लढण्यासाठी ते खऱ्याखुऱ्या जातीयवाद्यांचेच सहकार्य घेत असतात. उदा., तथाकथित हिंदू जातीयवाद्यांविरुद्ध ते शाही इमाम बुखारी यांची मदत घेतात. या पुरोगामी विचारवंतांची वक्तव्ये ऐकली की, लहानपणी आम्हाला मराठीच्या पुस्तकात भित्र्या सशाची गोष्ट होती, त्याची आठवण होते. तो ससा पान पडला की दचके, कोणाची पावले वाजली कीं दचके, कुठे खुट्ट झाले की दचके. एक दिवस त्याच्या पाठीवर झाडाचे मोठे पान पडले. तशी आभाळ कोसळले म्हणून तो धावत सुटला. त्या सशासारखीच पुरोगामी विचावंतांची अवस्था आहे. काहीही खुट्ट झाले की जातीयवाद म्हणून ते हंबरडा फोडू लागतात. त्यांची विवेकशक्ती नष्ट होते आणि आपल्या बिळात बसून जातीयवादाच्या नावाने बोटे मोडू लागतात. जातीयवाद प्रत्यक्षात जेथे मोकाट सुटला आहे तेथे जाऊन त्याच्याशी मुकाबला करण्याचे मात्र त्यांना धाडस नसते. मग ते लेख लिहितात, परिसंवादात भाग घेतात, चर्चासत्रे घडवून आणतात आणि जातीयवादी नसलेल्या पण जातीयवादाचे स्वरूप नेमकेपणाने माहीत असलेल्यांनाच जातीयवादी म्हणून झोडपत असतात. सर्वात मौजेची गोष्ट म्हणजे ज्यांनी निदान चार पिढ्या तरी जातिद्वेष पोसला, जातीयवाद्यांचा पाठिंबा घेऊन सत्तास्थाने काबीज केली, जातीयवाद्यांना सत्तेत सहभागी करून घेतले, इतकेच नव्हे, तर निरनिराळ्या जातींना आपण कशा तऱ्हेने अधिकारपदाचे वाटप केले हे आत्मगौरवाने सांगतात, तेही अशा विचारवंतांबरोबर त्यांचे वैचारिक प्रवासी म्हणून अशा सभास्थानी मिरवत असतात किंवा त्यांना आशीर्वाद देत असतात आणि विचारवंत त्याबद्दल कृतज्ञ असतात. अर्थात हे सर्व भारतीय व्यक्तिमत्त्वाशी सुसंगतच आहे. सत्ताधाऱ्यांना विद्वान भाड्याने हवे असतात आणि विद्वानांना तो गौरवच वाटतो. या संदर्भात कोणत्याही टिप्पणीशिवाय महाराष्ट्र टाईम्समधील वृत्तांत उद्धृत करतो. "कार्ला येथे शरद पवार अध्यक्ष असलेल्या 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'ने एक शिबिर भरवले होते. त्याला ना. ग. गोरे, यशवंतराव मोहिते, प्रा. राम जोशी वगैरे विचारवंत हजर होते. शरद पवार यांच्या अल्पमतातील सरकारला जनमानसातील पाठिंब्याची निकड हे काही वेळा चर्चेचे अधिष्ठान होई. त्यामुळे धारियांना दोन

वेळा तरी सांगावे लागले, की हे कॉंग्रेसचे शिबिर नव्हे. (म. टा. १७-४-९०)"

वस्तुनिष्ठ विश्लेषणाचा अभाव हेही आपले एक वैशिष्ट्य आहे. त्याला अनुसरून जातीयवादाचा उगम, त्याचे स्वरूप, त्याच्या वाढीची कारणे, याबद्दल आपणास कुतूहल नसते. या सर्वांचा शोध घेऊन त्यांच्याशी मुकाबला करण्यातही आपणास स्वारस्य नसते. जातीयवाद म्हणून कोणत्याही दोरीला झोडपले म्हणजे आपले पितर स्वर्गात गेल्याचा आपणास आनंद होतो. आणि असे केले म्हणजे खऱ्याखुऱ्या जातीयवाद्यांची मते आपल्याला निश्चित मिळतील हे मनोमन ओळखून आपण अधिकच प्रमुदित होतो. शिवाय त्यांच्याशी सख्यत्व साधल्यामुळे त्यांच्या दहशतवादापासून आपल्याला अभय असल्याची निश्चिती हा वर बोनस. इतके फायदे वस्तुनिष्ठ विश्लेषणापायी गमावणे हे भारतीयत्वात बसत नाही.

## जातीयवाद : उगम आणि वाढ

भारतात दोन प्रकारचा जातीयवाद आढळतो. धार्मिक जातीयवाद आणि हिंदू समाजांतर्गत जातीयवाद, यांपैकी धार्मिक जातीयवादाचा प्रथम विचार करू. भारतात हिंदू आणि इस्लाम हे प्रमुख धर्म. ख्रिश्चन, पारशी, ज्यू, इत्यादी संख्येने इतके लहान आहेत की त्यांच्यातील जातीयवादाची झळ सबंध देशाला पोहोचण्याची शक्यता कमी. त्याशिवाय त्यांच्या बाबतीत परकीय देशांशी निष्ठा असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. शीख जातीयवादाचे स्वरूप भिन्न असल्यामुळे त्याचा विचार पुढे करू. त्यामुळे हिंदू आणि मुस्लिम जातीयवादाचाच शोध घेण्याचा येथे प्रयत्न करणार आहे.

मुस्लिम जातीयवादाचा उगम नेहमी इंग्रजांच्या कूटनीतीत शोधला जातो. इंग्रज येण्यापूर्वी या दोन्ही जमाती गुण्यागोविंदाने नांदत होत्या. परंतु इंग्रजांनी बिब्बा घातला, असे एक गृहीतक अनेक विचारवंतांनी आपल्या हृदयसंपुटात मोठ्या काळजीने जतन करून ठेवले आहे. १८५७ च्या बंडात हिंदू आणि मुसलमान खांद्याला खांदा लावून इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढले असाही त्यांचा शोध आहे. १८५७ मध्ये कोण कशासाठी लढले याचा विचार मागे केलाच आहे. पैकी राहिले गुण्यागोविंदाने राहणे. त्याची कारणे अगदी वेगळी आहेत. दोन्ही जमातीतील भ्रातृभाव हे निश्चित नव्हे. मुसलमान हे दीर्घकाळपर्यंत भारतात राज्यकर्ते होते. त्यांना राज्यकारभारासाठी हिंदूंची मदत हवी असे. हिंदूंचा दृष्टिकोन नेहमीच व्यवसायाभिमुख असल्यामुळे जो कोणी राज्यकर्ता असेल त्याची चाकरी करण्यास ते नेहमीच तयार असतात. त्याप्रमाणे त्यांनी मुसलमानांच्या पदरी राहण्याचे पत्करले. सर्वसामान्य हिंदूही मुस्लिम धर्मीयांकडे

राज्यकर्ती जमात म्हणूनच पाहात असे - ज्याप्रमाणे इंग्रजी राजवटीत ख्रिश्चनांकडे पाहात असे. अशा तऱ्हेने हिंदूंनी आपणहून आणि आपखुषीने मुस्लिमांच्या संदर्भात दुय्यम स्थान स्वीकारलेले असल्यामुळे तंटाबखेड्याचा प्रश्नच उद्भवत नसे, मुसलमानांचा जुलूम ते प्रतिकाराशिवाय सहन करीत असत. याउलट, हिंदू राज्यात मुसलमानांना त्रास होण्याचा संबंधच नव्हता. कारण हिंदुधर्म मुळातच सहिष्णू आहे. अशा तऱ्हेने या दोन्ही जमाती इंग्रजी राजवटीपूर्वी एक तऱ्हेच्या अस्वस्थ शांततेने नांदत होत्या. दोन्ही जमातींचे सार्वजनिक जीवनही पृथक् असल्यामुळे त्यातही संघर्षाचा संबंध येत नसे. संघर्षाच्या सर्वसाधारण अभावाला गुण्यागोविंदाने राहणे असे म्हणणे सर्वस्वी निराधार आहे. तसेच संघर्ष आला तर मुसलमान नेहमी आक्रमक भूमिका घेत. १८५७ च्या बंडात त्यांनी हिंदू देवाल्यांवर हिरवे झेंडे लावण्याचा प्रयत्न केला होताच.

तर अशा तऱ्हेने एका अस्वस्थ शांततेने या दोन्ही जमाती राहात होत्या; इंग्रजी राजवट स्थापन झाल्यानंतर या दोन्ही जमातीतील जुने संबंध संपले. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमाती इंग्रजांच्या आधिपत्याखाली आल्या आणि त्यांचे इंग्रजांशी संबंध, तसेच परस्परसंबंध नव्याने निश्चित होणे ही एक नवी गरज निर्माण झाली. एवढ्यानेच संपले नव्हते. इंग्रजी राजवट निव्वळ नवीन राजवट नव्हती हे या संदर्भात लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे होते. आधीच्या इतर राजवटींप्रमाणेच ती जर एक नवी सरंजामी राजवट असती तर दोन्ही जमातींना आपापसातील तसेच नव्या राजवटीशी, संबंध जुळवून घेणे सोपे झाले असते. कारण सरंजामी राजवटीला दोन्हीही जमाती सरावलेल्या होत्या. सरंजामी राजवटीत बहुतेक संबंध वरपासून खालपर्यंत (व्हर्टिकली) एका उतरंडीने निश्चित केलेले असतात. त्यामुळे दोन्ही जमातींतील संघर्षाचे क्षेत्र साहजिकच अत्यंत संकुचित असते. आधुनिक राज्यपद्धतीत असे संबंध वरपासून खालपर्यंत आणि समाजाच्या सर्वच घटकांना भेदून जाणारे (व्हर्टिकली आणि हॉरिझांटली) असतात. त्यामुळे संघर्षाचे किंवा स्पर्धेचे क्षेत्र विस्तारित होत जाते. सरंजामी राजवटीत राज्यकर्त्यांपासून सामान्य माणसापर्यंतचे संबंध परंपरेने निश्चित केलेले असतात आणि एका सरंजामी उतरंडीतून ते खालपर्यंत येतात. आधुनिक राज्यपद्धतीत असे संबंध कायद्याने निश्चित केलेले असतात. त्यामुळे त्यांचा प्रभाव राज्यकर्त्यांसकट सबंध समाजावर असतो. या कायद्यांना ज्या घटकांचा जसा प्रतिसाद असेल त्याप्रमाणे तो घटक आपल्या हितसंबंधाचे संवर्धन करतो आणि या प्रक्रियेत आपले इतर घटकांबरोबरचे संबंधही निश्चित करतो. उदाहरणार्थ, १८३३

च्या चार्टर कायद्याने कंपनी सरकारच्या नोकऱ्यांच्या संदर्भात जात, पंथ, धर्म यांवर आधारित कोणताही भेदभाव केला जाणार नाही असे घोषित केले. या तरतुदीचा फायदा घेणे हे प्रत्येक घटकाची प्रतिसाद देण्याची जी क्षमता होती तिच्यावर अवलंबून होते. ज्यांना असा फायदा घेता येणार नाही ते त्यापासून वंचित होणार हे निश्चित होते. अशा परिस्थितीतच संघर्षाची बीजे असतात आणि त्यांचे क्षेत्र सतत विस्तारत असते. साहजिकच इंग्रजांनी जेव्हा भारतामध्ये आधुनिक राज्यपद्धती अमलात आणली आणि भारताच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ केला तेव्हा या नव्या प्रवाहाशी दोन्ही जमाती कशा तऱ्हेने जुळवून घेणार, आधुनिकतेला त्यांचा कसा प्रतिसाद असणार यांवर त्यांचे परस्परसंबंध अवलंबून होते.

इंग्रजी राजवटीबाबत मुसलमानांची पहिली प्रतिक्रिया विरोधाचीच होती. वहाबींचे बंड हे त्याचे दृश्य स्वरूप. १८५७ चे बंड हेही मुसलमानांच्या दृष्टीने मुघल साम्राज्याच्या स्थापनेकरताच होते. हा विरोध सातत्याने राहिला असता तर त्यातून मुसलमानांचे नुकसानच झाले असते. हा धोका ओळखला तो सर सयद अहमद यांनी. मुसलमानांनी इंग्रजी शिक्षण घेऊन इंग्रजी राजवटीत आपले योग्य ते स्थान प्राप्त करून घेतले पाहिजे हे त्यांनी बरोबर हेरले. आणि मुसलमानांमध्ये शिक्षणप्रसार सुरू व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. त्यात त्यांना मुल्ला आणि मौलवी यांच्या जबरदस्त विरोधाला तोंड द्यावे लागले. पण त्याला न जुमानता त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले आणि त्याचे दृश्य फळ म्हणजे १८७७ साली त्यांनी अलिगढ येथे स्थापन केलेले मुहम्मदन अँग्लो ओरिएंटल कॉलेज. सय्यद अहमद यांचे धोरण द्विसूत्री होते. शिक्षणप्रसार आणि इंग्रजांशी सहकार्य. इंग्रजांशी सहकार्य करून मुसलमानांनी जेवढा लाभ पदरात पाडून घेता येईल तेवढा घ्यावा ही त्यामागची विचारधारा होती. हिंदूबरोबरच्या स्पर्धेत आपण टिकू शकणार नाही ही भावना त्याच्या मुळाशी होती. मुस्लिम अल्पसंख्य आहेत आणि लोकशाही संस्थांमध्ये बहुसंख्येलाच महत्त्व असणार हीही जाणीव त्यांना होती.

इंग्रजी राजवटीला असलेला हिंदूंचा प्रतिसाद आणि मुसलमानांचा प्रतिसाद यांतील फरक मुस्लिम जातीयवादाचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने मूलगामी आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे हिंदू विचारवंतांचा प्रतिसाद परिपूर्ण होता. इंग्रजी शिक्षण घेऊन नोकऱ्या मिळविण्यापुरताच तो मर्यादित नव्हता, तर १) सामाजिक आणि धार्मिक संस्थांची पुनर्मांडणी करणे २) शिक्षणप्रसार ३) आर्थिक प्रगती आणि ४) इंग्रज राज्यकर्ते आणि भारतीय जनता यांच्यातील संबंध पुनःपुन्हा नव्याने निश्चित

करणे, अशा तऱ्हेने तो सर्वसमावेशक होता. याउलट, मुसलमानांचा प्रतिसाद केवळ आंशिक होता. आणि इंग्रजांशी सहकार्य हा त्याचा मूलाधार होता. सामाजिक आणि धार्मिक संस्थांची पुनर्मांडणी हा प्रकार इस्लामी संस्कृतीत बसत नाही. एक ईश्वर, एक प्रेषित आणि एक धर्मग्रंथ मानणारा समाज त्या संबंधात नेहमीच कडवा असतो. तथापि या सर्व गोष्टी ख्रिश्चन धर्मात असूनही प्रबोधनामुळे ख्रिश्चन समाजात आधुनिकतेशी सुसंगत असे स्थित्यंतर घडून आले. त्याचप्रमाणे मुसलमानांतही आर्थिक परिस्थितीच्या दबावाखाली आणि शिक्षणप्रसारातून प्रबोधनाची चळवळ हळूहळू मूळ धरू शकली असती. अर्थात ही प्रक्रिया अत्यंत संथ राहणार हे निश्चित होते. तथापि त्याशिवाय फारसे अडणार होते असाही प्रकार नव्हता. कारण आधुनिक राज्यपद्धतीत एखाद्या व्यक्तीचा विशिष्ट धर्मीय म्हणून समाजात येणारा संबंध अत्यल्प असतो. सरकारी नोकर, गिऱ्हाईक, विक्रेता, कर भरणारा नागरिक, पादचारी, मजूर, मालक, इत्यादी अशा अनेक नात्यांनी समाजात वावरत असताना धर्माचा संबंध येत नाही. त्यामुळे प्रबोधनाची प्रक्रिया संथ राहिली असती तरी चालले असते. त्यासाठी आवश्यक अशा शिक्षणप्रसाराला मुसलमान समाजात सुरुवात झालीच होती.

तथापि आधुनिक राज्यद्धतीत एक राजकीय घटक या नात्याने व्यक्तीला सर्वात महत्त्वाचे स्थान असते. आणि राजकीय घटक म्हणून मुसलमानांचा प्रतिसाद काय राहणार हा यक्षप्रश्न होता. १९ व्या शतकात मुसलमानांत दोन पंथ होते. पहिला म्हणजे सयद अहमद यांचा. दुसऱ्याचे प्रतिनिधित्व बद्रुद्दिन तयबजी आदि सुशिक्षित मुसलमान करीत होते. यापैकी कोणता मार्ग मुसलमान स्वीकारणार यावर हिंदू-मुसलमानांचे भविष्यातील संबंध अवलंबून होते. पहिल्या मार्गाला इंग्रजांचा सक्रिय पाठिंबा होता. आणि त्यानुसार अलिगढ कॉलेजचे इंग्रज प्रिन्सिपाल यांच्या प्रेरणेने, आणि गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांच्या आशीर्वादाने आगाखान यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने गव्हर्नर जनरलची भेट घेऊन मुसलमानांसाठी लोकनियुक्त संस्थांमध्ये स्वतंत्र प्रतिनिधित्वाची मागणी केली. त्या वेळी जीना आगाखान यांचे कट्टे विरोधक होते. पुढे १९१३ साली त्यांनी मुस्लिम लीगचे सदस्यत्व स्वीकारले. लगेचच्या भविष्यकाळातील त्यांचे धोरण पाहता काही विशिष्ट हेतूने त्यांनी लीगमध्ये प्रवेश केला असावा असे वाटते. 'मुस्लिम गोखले' होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. म्हणजे केवळ एक मुस्लिम संसदपटू होण्याची त्यांची मनीषा नव्हती, तर मुस्लिम समाजाला त्याचे संबंध भारतीय म्हणून इंग्रज राजवटीशी नव्याने निश्चित करावयास लावणे, हा त्यांचा हेतू असावा असे दिसते. म्हणजे सय्यद अहमद यांच्या नेतृत्वाखाली

मुस्लिम समाजाने आधुनिक राज्यपद्धतीला केवळ आंशिक प्रतिसाद दिला होता, तो अधिक परिपूर्ण करण्याचा जीनांचा प्रयत्न होता. लीगच्या बाहेर राहून हे साध्य होण्यासारखे नव्हते. दुसरे म्हणजे काँग्रेसमधील काही हिंदू पुढारी काँग्रेसबरोबरच हिंदुमहासभेचेही सदस्य असत. म्हणजे जीनांनी मुस्लिम लीगचे सदस्यत्व पत्करून जातीयवाद अंगीकारला असे म्हणता येणार नाही. प्रख्यात राष्ट्रवादी न्या. छगला हेही काही काळ लीगमध्ये होते. साहजिकच लीगमध्ये प्रवेश करून लीगला राष्ट्रीय आंदोलनाच्या प्रवाहात आणणे हे त्यांनी उद्दिष्ट ठरविले असावे असे दिसते. भारतीय राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास असलेल्या टिळकांनाही त्याची जाणीव असावी, म्हणून १९१६ साली जीना यांच्या बरोबरीने लखनौ करार घडवून आणण्यात पुढाकार घेतला व त्यावर काँग्रेसने शिक्कामोर्तब केले. या कराराने मुसलमानांसाठी वेगळे मतदारसंघ ठेवण्यास राष्ट्रसभेने मंजुरी दिली. काँग्रेसने केलेल्या या तडजोडीचे दृश्यफळ ताबडतोब दिसून आले. जीना व मुस्लिम लीग यांनी होमरूलच्या चळवळीत सक्रिय भाग घेतला व लीग प्रथमच इंग्रजांविरुद्धच्या आंदोलनात सहभागी झाली. एवंच राजकीय बाबतीत हिंदू व मुसलमान यांचा प्रतिसाद अभिन्न झाला. इंग्रजी राजवटीच्या संदर्भात भारतीयांचे कायदेमंडळात आणि कार्यकारी कौन्सिलात स्थान काय असावे हे नव्याने निश्चित करण्याची मागणी दोन्हीही जमाती करीत होत्या. लीग राष्ट्रीय आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात प्रथमच सामील झाली होती. त्यावर कळस चढणार होता तो या जमातींनी कायदेमंडळाच्या कामकाजातील परस्पर सहकार्याने इंग्रजांविरुद्धचा लढा अधिक तीव्र करण्याने. यामुळे अनेक उद्देश सफल झाले असते. पहिला म्हणजे सांसदीय कामकाजाबाबत सामान्य माणसाचे स्वारस्य वाढले असते. त्या कामकाजात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांची सांसदीय पद्धतीची जाण अधिक परिपूर्ण झाली असती. कायदेमंडळात इंग्रजांशी लढा द्यावयाचा असल्यामुळे नुसते हात वर करणाऱ्यांची नव्हे, तर अभ्यासू व्यक्तींची निवड प्रत्येक पक्षाने केली असती. १९१९ च्या कायद्याने लोकनियुक्त सभासदांना काही खात्यांच्या बाबतीत शासकीय अधिकार दिले होते ते लोकहितासाठी कशा तऱ्हेने राबवावेत याचे शिक्षण भारतीयांना मिळाले असते. कायदेमंडळातील कामकाजात धार्मिक प्रश्नांना अत्यंत गौण स्थान असल्यामुळे लोकांचे सर्व लक्ष राजकीय आणि आर्थिक बाबींवरच केंद्रित झाले असते. आणि त्या प्रमाणात जातीय तणाव निर्माण करणाऱ्या प्रश्नातील लोकांचे स्वारस्य कमी झाले असते. उदाहरणार्थ, खिलाफतीबाबत मुसलमानांच्या भावना महंमद अली आणि शौकत अली यांनी प्रमाणाबाहेर चेतविल्या होत्या. 'खिलाफतीबाबत इंग्रज सरकारने जी आश्वासने

दिली आहेत ती पूर्ण करावीत' अशा आशयाचा ठराव मध्यवर्ती कायदेमंडळापुढे मांडून, त्यांचे शमन करता आले असते. तथापि कायदेमंडळातील कामकाजाला अशा तऱ्हेने महत्त्व दिले गेले असते, तर त्यामुळे संसदपटू प्रखर प्रकाशात आले असते. गांधींना नेमके तेच भावणारे नव्हते. कायदेमंडळावरील बहिष्काराने त्यांचे महत्त्व आपोआपच कमी झाले असते, हे गांधींनी बरोबर हेरले होते. याच सुमारास झालेल्या रौलट कायद्यांविरुद्धच्या आंदोलनाला मिळालेल्या यशाने गांधींची आत्मपीडनाच्या मार्गावरील श्रद्धा अधिकच बलवत्तर झाली होती. आत्मपीडनाच्या शास्त्रातील ते तज्ज्ञच होते. आणि त्या भूमिकेतून असहकाराची चळवळ सुरू झाली तर काँग्रेसमधील त्यांचे स्थान एकमेवाद्वितीय होणार होते. पण त्यात एक न्यून होते, गांधींना नुसते काँग्रेसचे नव्हे तर देशाचे एकमेवाद्वितीय पुढारी व्हावयाचे होते आणि मुसलमान त्यांचे नेतृत्व मान्य करतील का हा जरा शंकास्पद भाग होता. खिलाफत चळवळीत आपण पुढाकार घेतला तर मुसलमानही आपले नेतृत्व मान्य करतील, असा अंदाज त्यांनी बांधला आणि १९१९ च्या अमृतसर अधिवेशनात नवीन सुधारणा स्वीकाराव्या, असा आग्रह धरणाऱ्या गांधींनी एकदम घुमजाव केले व असहकाराच्या चळवळीचा संकल्प सोडला.

१९२० ची चळवळ ही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अत्यंत दुर्दैवी घटना होती. त्यामुळे लोकांचे सांसदीय पद्धतीतील स्वारस्य अजिबात नष्ट झाले. राष्ट्रीय आंदोलन, खिलाफतीच्या चळवळीला बांधले गेले. पण भावी इतिहासाच्या दृष्टीने त्याचा अत्यंत भयावह परिणाम म्हणजे १९१६ पासून मुसलमानांना राष्ट्रीय आंदोलनाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे जे यशस्वी प्रयत्न झाले होते त्यांना अकस्मात धक्का पोहोचला आणि मुसलमानांचे लक्ष राष्ट्रीय प्रश्नांवरून विचलित होऊन ते पॅन इस्लामिझमच्या कोशात गुरफटले गेले. भारतीय मुसलमानांचे खरेखुरे हितसंबंध भारतातील राजकीय प्रगतीत गुंतलेले नसून ते इस्लामी राष्ट्रातील घडामोडींशी अधिक निगडित आहेत, अशी त्यांची खात्री करून देण्यात आली. आधुनिक राज्यपद्धतीला १९१६ सालापासून त्यांचा अधिक परिपूर्ण प्रतिसाद मिळविण्यात आला होता, त्याचे रूपांतर खिलाफत चळवळीनंतर पुन्हा आंशिक प्रतिसादात झाले आणि मुसलमानांना पुन्हा सय्यद अहमद यांच्या काळात मागे ढकलण्यात आले. यानंतरचे मुस्लिम राजकारण इंग्रजांशी सहकार्य आणि अलगता जोपासणे या सय्यद अहमद यांच्या द्विसूत्राच्या अनुरोधानेच चालविण्यात आले. जीनांचा असहकाराच्या धोरणास विरोध होता. त्यामुळे ते राष्ट्रीय राजकारणातून बाहेर फेकले गेले आणि मुसलमानांचे नेतृत्व पुन्हा कट्टर

जातीयवाद्यांच्या हातात गेले. १९२० च्या चळवळीने अनर्थच होईल असे भाकित जीनांनी केले होते. त्याचा प्रत्यय ताबडतोब आला. त्याप्रमाणे तात्कालिक अनर्थ म्हणजे मलबारमध्ये मोपल्यांनी हिंदूंची केलेली कत्तल आणि अंतिम अनर्थ म्हणजे भारताची रक्तरंजित फाळणी. त्याचे नेतृत्व स्वत: जीना यांनीच केले. राष्ट्रवादी जीनांचे रूपांतर जातीयवादी जीनात होण्याची प्रक्रिया १९२० च्या चळवळीनेच सुरू केली होती.

१९२० पासून १९४७ पर्यंतच्या काळात मुसलमानांचा आधुनिक राज्यपद्धतीस अधिक परिपूर्ण प्रतिसाद मिळविण्याच्या तीन संधी आल्या होत्या. पहिली म्हणजे 'दिल्ली मुस्लिम प्रपोजल्स'. यात मुस्लिम लीगने काही अटींवर संयुक्त मतदार संघास मान्यता दिली होती, पण ती दवडण्यात आली. दुसरी म्हणजे सर्वपक्षीय परिषद. यात मुसलमानांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्व मागण्यात आले होते. परंतु ती मागणी फेटाळण्यात आली. मात्र एका गोष्टीचा या संबंधात उलगडा होत नाही. कोणी केल्यास मी त्याचा ऋणी होईन. मुसलमानांना प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधित्व दिल्यास त्याचा कायदेमंडळाच्या कामकाजावर कोणता विपरीत परिणाम होणार होता ? त्यांनी जास्तीत जास्त काय मागितले असते ? मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात त्यांच्या संमतीशिवाय कोणताही बदल करू नये. मशिदीवरून वाद्ये वाजवीत नेऊ नये आणि मुसलमानांना नोकऱ्या. स्वतंत्र भारतातही मुसलमान त्याच मागण्या करीत आहेत. मग फाळणी कशासाठी ? उरलेले सर्वच प्रश्न राजकीय आणि आर्थिक स्वरूपाचे होते. त्या बाबतीत मुसलमानांची मुसलमान म्हणून कोणती वेगळी भूमिका राहिली असती ? त्यानंतरची संधी आली होती. ती १९३५ च्या कायद्याखाली निवडणुका घेण्यात आल्या त्या वेळी विभक्त मतदारसंघाचा उल्लेख वगळता, कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांचे निवडणूक जाहीरनामे जवळजवळ सारखेच होते. निवडणूक झाल्यानंतर कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांचे संयुक्त मंत्रिमंडळ उत्तर प्रदेशात अधिकारावर यावे, अशी मुस्लिम लीगची इच्छा होती. पण नेहरूंनी त्याला विरोध केला. मुसलमानांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची ती शेवटची संधी होती. ती हुकल्यानंतर मुस्लिम लीगच्या राजकारणाची घोडदौड फाळणीच्या दिशेने सुरू झाली आणि त्यात मुस्लिम जातीयवादाचा आगडोंब उफाळला. स्वातंत्र्यपूर्व काळातील मुस्लिम जातीयवादाचा इतिहास हा असा आहे. त्यात कोणाची किती जबाबदारी याचा निर्णय वाचकांनीच करावा.

मुसलमानांचा आधुनिक राज्यपद्धतीस आंशिक प्रतिसाद हे मुस्लिम

जातीयवादाचे एकमेव कारण आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय म्हणून - मुसलमान म्हणून नव्हे - राजकीय प्रक्रियेत त्यांना सहभागी होण्यास भाग पाडणे हा जातीयवादावरील एकमेव उपाय होता. फाळणीनंतर भारतात राहिलेले मुसलमान थोडेसे दबल्यासारखे झाले होते. त्यामुळे हे काम सोपे होते. तथापि पहिली घोडचूक घटनेने केली. मुसलमानांनी धार्मिक अल्पसंख्य म्हणून फाळणीपूर्व भारतात अलगता जोपासली होती. फाळणीसारखी घटना होऊनही आपण त्यापासून धडा घेतला नाही. आणि धार्मिक अल्पसंख्याकांना घटनेत खास स्थान दिले. खरे तर 'सर्व भारतीयांना समान हक्क राहतील' एवढीच घटनात्मक तरतूद पुरेशी होती. मुसलमानांना आणि सर्वच धर्मीयांना जे काय अधिकार राहतील ते भारतीय म्हणून. अल्पसंख्याक म्हणून नव्हे. हे मुसलमानांसकट सर्व धर्मीयांना स्पष्ट शब्दांत आणि प्रत्यक्ष कृतीने समजावून देण्याची नितांत गरज होती. पण त्याऐवजी अलगतावाद जोपासण्यासाठी अनुकूल अशी तरतूद घटनेतच केली त्याचा उल्लेख वर केला आहेच. तथापि घटनात्मक तरतुदीपेक्षाही जातीयवादास अधिक पोषक काही ठरले असेल तर ते नेहरूंचे निवडणूकविषयक धोरण. भारताच्या हितापेक्षा निवडणुकीतील हिताचाच त्यांनी जास्त विचार केला आणि मुसलमानांना मतपेढी समजून त्यांच्या बाबतीत अनुनयाचे धोरण स्वीकारले. समान नागरी कायद्याला विरोध, राष्ट्रवादी मुसलमानांपेक्षा जातीयवादी मुसलमानांशी साथसंगत, ही त्याची काही उदाहरणे. साहजिकच पूर्वाश्रमीचे अनेक कट्टर लीगवादी, फेज कॅप टाकून, गांधी टोपी चढवून काँग्रेसमध्ये डेरेदाखल झाले. हेच धोरण पुढे चालू राहिले. मुस्लिम महिला विधेयक याच धोरणाचा परिपाक. विरोधी पक्षांनीही हेच काँग्रेसचे धोरण अनुसरले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत जनता दल पक्षाने शाही इमाम बुखारी यांचा आशीर्वाद मिळवून 'हम भी कुछ कम नहीं' हे दर्शवून दिले. तसेच विरोधी पक्ष केरळमध्ये सत्तेवर असताना मुस्लिम बहुसंख्य असलेल्या भागाचा एक नवीन जिल्हा बनवला होता.

अशा परिस्थितीत मुस्लिम जातीयवाद फोफावला तर त्यात आश्चर्य नाही. आणि केवळ वैयक्तिक उत्कर्ष हेच ध्येय मानणाऱ्या हिंदू राजकारण्यांना त्याचे सोयरसुतकही नाही. त्यांची तक्रार एवढीच आहे की, मुसलमानांचा जातीयवाद, हिंदुत्ववादी समजले जाणारे काही पक्ष, उघडा पाडतात आणि सर्वसामान्य हिंदू जनतेला ते उमजू लागले आहे. त्यामुळे भाड्याने जाऊ इच्छिणाऱ्या हिंदू विचारवंतांना हाताशी धरून हिंदू जातीयवादाच्या विरुद्ध त्यांच्या गर्जना सुरू होतात. आधुनिक राज्यपद्धतीस मुसलमानांचा परिपूर्ण प्रतिसाद मिळाल्याखेरीज मुस्लिम जातीयवाद नष्ट होणार नाही, हे वास्तव स्वीकारण्यास त्यांची तयारी नसते. कारण मुस्लिम मतासाठी राजकारणी

नेमकी त्याच्या उलट दिशेनेच पावले टाकत आहेत.

मुस्लिम जातीयवादानंतर हिंदू धार्मिक जातीयवादाचा विचार करणे इष्ट होईल. या संदर्भात काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. १९ व्या शतकातील हिंदू विचारवंतांचा आधुनिक राज्यपद्धतीस मिळालेला प्रतिसाद परिपूर्ण होता. त्यामुळे राजकीय प्रक्रियेकडे ते भारतीय म्हणून पाहात असत. हिंदू म्हणून नव्हे. हिंदू हा हिंदूधर्मांतर्गत जातिभेदाच्या बाबतीत कडवा आहे, पण धार्मिक बाबतीत सहिष्णू आहे. हिंदूंनी धार्मिक अत्याचार केल्याची उदाहरणे इतिहासात नाहीत. त्यामुळे हिंदू धार्मिक जातीयवाद हा मुळातच वदतोव्याघात आहे. साहजिकच मुस्लिम लीगला जे स्थान मुसलमानात मिळाले ते हिंदूमहासभेला हिंदू जनमानसात मिळाले नाही. मग आज जो हिंदुधर्माभिमान आढळतो, त्याचा अन्वयार्थ काय ? ती एक निव्वळ प्रतिक्रिया आहे. कॉंग्रेस आणि पुरोगामी विरोधी पक्षीयांनी स्वीकारलेल्या मुस्लिम अनुनयाच्या धोरणाची. सर्वसामान्य हिंदूंना अनेक गोष्टी खटकत असतात. पुण्याच्या गणपती चौकातील गणपतीचे देऊळ वाहतुकीला अडथळा होतो म्हणून रातोरात हलविले जाते, पण त्याच कारणासाठी एकाही मशिदीला हात लावला जात नाही. मुसलमानांच्या धमकावणीमुळे शिवप्रतिमेची मिरवणूक काढण्यास वर्षानुवर्षे बंदी घातली जाऊ शकते, शिवप्रतिमेची मिरवणूक निघाल्यास रक्ताचे पाट वाहतील, अशी धमकी मुसलमान नेता देतो आणि शासन व पुरोगामी विरोधक त्यापुढे हतबल होतात. शंकराचार्यांना अटक होते, पण फौजदारी गुन्हा ठरतील अशी वक्तव्ये करूनही शाही इमाम बुखारी यांच्याविरुद्ध कृती करण्याच्या बाबतीत शासन हवालदिल असते. हिंदू कोड बिल मंजूर होते, पण समान नागरी कायदा केला जात नाही. राम, कृष्ण आदि हिंदू देवतांवर टीका केली तर ते लेखनस्वातंत्र्य ठरते, पण इस्लाम आणि महंमद यांच्याविरुद्ध तसेच लेखन केले तर तो जातीजातीत वैमनस्य निर्माण करण्याचा गुन्हा होतो. मुस्लिम मतांसाठी उर्दूला राज्यभाषेचा दर्जा दिला जातो. क्रिकेटमधील पाकिस्तानच्या विजयाबद्दल नि भारताच्या पराजयाबद्दल मुस्लिम वस्तीत आनंदोत्सव साजरा केला जातो. बोहरा धर्मगुरू सय्येदना आपल्याच धर्मातील सुधारणावाद्यांना नृशंस वागणूक देतात, पण शासन त्याबाबतीत हताश असते. मुस्लिम सत्यशोधक समाजाला सापत्न वागणूक मिळते, तर जातीयवादी मुसलमानांचे कोडकौतुक केले जाते. या सर्व घटनांची हिंदू मन नोंद घेत होते, पण वैयक्तिकरीत्या अस्वस्थ होण्यापलीकडे त्याची मजल गेली नाही. कारण धार्मिक बाबतीत हिंदू नेहमीच उदासीन असतो, पण हळूहळू तो अनुनयाच्या धोरणाचा विरोधक मात्र निश्चितपणे होऊ लागला होता. तथापि

त्याला जे जाणवत होते ते नेमकेपणाने मांडणारा पक्ष मात्र अस्तित्वात नव्हता. भारतीय जनता पक्ष गांधीवादी समाजवादाच्या नादी लागला होता, तर शिवसेनेचे राजकारण मराठी भाषकांपुरतेच मर्यादित होते. या दोन्ही पक्षांनी हिंदुत्वाच्या बाबतीत आणि त्याहीपेक्षा मुस्लिम जातीयवादाच्या संदर्भात निश्चित भूमिका घेतल्यानंतर आपल्याला डाचणाऱ्या गोष्टी उघडपणे आणि स्पष्टपणे बोलल्या जात आहेत, याचे हिंदू मनाला समाधान मिळाले. त्याच वेळी हिंदू मनाला वाटणारा ताण मोडण्याच्या मर्यादेपर्यंत वाढवणारी घटना घडली, ती म्हणजे मुस्लिम महिला विधेयक. निवडणुका जिंकण्यासाठी सतारूढ पक्ष किती हीन भूमिका घेऊ शकतो याचे हे विधेयक म्हणजे एक तळपते उदाहरण. या विधेयकाचे कोणत्या तत्त्वाच्या आधारे समर्थन करता येण्यासारखे होते ? राजकीय वेश्याभाव हेच त्याचे निखळ स्वरूप. हिंदूंच्या बाबतीत हे विधेयक म्हणजे उंटाच्या पाठीवरील शेवटची काडी ठरली. आधीच अस्वस्थ असलेल्या हिंदू मनाला या विधेयकाने हतबुद्ध केले. राजकारणाचा केवळ वरवर विचार करणाऱ्या हिंदूंच्या हिशेबी समान नागरी कायदा किंवा मुस्लिम महिला विधेयक यांचे काय स्थान आहे हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राप्रमाणेच तो एक भावनिक प्रश्न झाला आहे. त्यातून काय निष्पन्न होणार याची त्याला क्षिती नाही, पण ते व्हायला पाहिजे याबाबतीत तो आग्रही होऊ लागला आहे. वास्तविक, समान नागरी कायद्याने हिंदूंचे खरोखर काय हित साधले जाणार आहे. मुसलमानांनी आपल्या स्त्रियांना वाईट वागवले, जबानी तलाक दिला, पोटगी दिली नाही, चार चार बायका केल्या, त्यांना छळले तर हिंदूंना त्याचे काहीच सोयरसुतक असण्याचे कारण नाही. कारण हिंदू समाजातही अशा तऱ्हेचे प्रकार चालू आहेत. तथापि अशा घटना त्याला अस्वस्थ करीत नाहीत आणि त्याविरुद्ध तो ओरडही करत नाही. एखादा फारच अस्वस्थ झाला तर एक पत्र वर्तमानपत्रात लिहितो आणि महान सामाजिक कार्य केल्याचे त्याला समाधान मिळते. इतरांना 'पर्याय' मधील बंडाचे कर्तुक पाहून किंवा ऐकून आनंद होतो आणि तेवढ्यावरच सर्व संपते. अशा परिस्थितीत नागरी कायदा वगैरेबाबत त्याला एवढे स्वारस्य का ? तर मुसलमानांच्या बाबतीत शासन दौर्बल्याचे धोरण स्वीकारीत आहे, अशी जी त्याची खात्री पटली आहे तिचे निराकरण नागरी कायदा मंजूर झाल्याने अथवा मुस्लिम महिला विधेयक रद्दबातल केल्याने होणार आहे. आणि तेवढेच त्याला हवे आहे. सत्ताधारी पौरुष दाखवू शकतात, मुसलमानांना ते त्यांची जागा दाखवू शकतात, याचे त्याला समाधान हवे आहे. पण ते त्याला मिळू शकले नाही. मुस्लिम महिला विधेयकाला तत्त्वत: विरोध करणारे

किंवा नागरी कायद्याचा पुरस्कार करणारे पुरोगामी विरोधकही प्रत्यक्षात त्या बाबतीत हतबल ठरतात हे पाहणे त्याला क्लेशदायक होऊ लागले आहे. स्पष्टच बोलायचे तर मुसलमानांच्या बाबतीत वागताना दाखविण्यात येणाऱ्या राजकीय षंढपणाचा त्याला उबग आला आहे. साहजिकच निदान वाचिक पौरुष तरी दाखविणाऱ्या पक्षांकडे तो वळला. अडवाणींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने गांधीवादी समाजवादाच्या धेडगुजरी धोरणाला तिलांजली दिली आणि शिवसेनेने हिंदुत्वाची भूमिका घेतली या गोष्टी त्याला आकर्षित करणाऱ्या ठरल्या. त्यात भर पडली बाबरी मशीद-राममंदिर प्रकरणाची. मी अनेकांशी या बाबतीत बोललो. त्यांपैकी कोणालाही या प्रकरणाची फारशी माहिती नव्हती. पण राममंदिर झाले पाहिजे याबद्दल मात्र ते आग्रही होते. कारण तेच. हिंदू राजकारण्यांनी एकदा तरी पौरुष दाखवावे ही त्यामागची अपेक्षा. खरे तर हिंदूंना कोणत्याच मंदिराबद्दल तसे फारसे प्रेम नाही. अनेक मंदिरे भग्नावस्थेत आहेत. अशा परिस्थितीत राममंदिराबद्दल हिंदूंना एकाएकी उमाळा का यावा ? राममंदिराच्या शिलान्यास समारंभाला अनेक लोक ठिकठिकाणी लोटावे, याचा शोध पुरोगामी विचारवंतांना घ्यावासा वाटला नाही. कारण ते पुरोगामी आहेत आणि 'जातीयवादी' ही शिवी हासडली की त्यांचे पुरोगामित्व सिद्ध होते. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्यामागे लोक का गेले त्याची ही कारणमीमांसा आहे. त्यांच्या प्रचारामुळे हिंदू जातीयवादी झाले नाहीत. असा प्रचार पन्नासाहून अधिक वर्षे चालू आहे. तर हिंदूंना जे जाणवत होते आणि भावत होते त्याचे प्रतिबिंब या पक्षांच्या प्रचारात त्यांना आता आढळू लागले. फ्रेंच तत्त्वज्ञ वोल्तेर आणि रूसो यांच्या लोकप्रियतेचे विश्लेषण करताना इंग्रज इतिहासकाराने म्हटले आहे की लोकांना जे जाणवत व भावत होते ते त्यांनी लिहिले आणि त्यामुळे त्यांचा फ्रेंच राज्यक्रांतीवर फार मोठा प्रभाव होता. (वोल्तेर रोट व्हॉट पीपल थॉट ॲंड रूसो रोट व्हॉट पीपल फेल्ट). लोकांचे या पक्षांबद्दल आकर्षण कमी करायचे असेल तर कॉंग्रेस आणि पुरोगामी पक्षांनी राजकीय पौरुष दाखविणे एवढा एकच उपाय आहे. मुसलमानांना भारतीय म्हणून परखडपणे त्यांची जागा दाखवून देणे हा तो मार्ग आहे. शिबिरे भरवणे, अथवा जातीयवादी म्हणून बोटे कडाकडा मोडणे हा तो उपाय नव्हे. त्याबरोबरच या पक्षांच्या कार्यक्रमात नेमके जातीयवादी काय आहे याचेही विश्लेषण पुरोगामी विचारवंतांनी करावयास हवे. या दोन्ही पक्षांत मुसलमान आहेत. त्या पक्षातर्फे त्यांनी निवडणुका लढवल्या. मुसलमान या देशात राहू नयेत, अशी त्यांची भूमिका नाही. त्यांनी या देशात मुसलमान म्हणून नव्हे, तर भारतीय म्हणून राहावे हा त्यांचा

आग्रह. मुसलमानांनी धर्म पाळण्यास त्यांचा विरोध नाही. फक्त तो घरापुरता राहावा ही त्यांची अपेक्षा. या भूमिकेत जातीयवादी काय आहे ? उलट मुसलमानांनी हिंदूंना सहभागी करून घेता येईल अशी एकही संघटना बांधली नाही. मुसलमान म्हणूनच आपली अलगता जोपासली. मुसलमान म्हणूनच ते सवलतींची मागणी करतात. तेव्हा आघाडी उघडावयाची असेल तर मुस्लिम लीग आणि इतर मुस्लिम जातीय संघटनांविरुद्ध उघडावयास पाहिजे. पण मग मुस्लिम मते जातील. ती मिळविण्यासाठी मुसलमानांना चुचकारणे आणि भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांना जातीयवादी म्हणणे आलेच. 'गर्व से कहो हम हिंदू है' ही घोषणा त्या दृष्टीने त्यांना आयतीच गवसली. पण एक राष्ट्रनिष्ठ मुसलमान, माजी राष्ट्रपती, झाकीर हुसेन यांनी दूरदर्शनवरील माहितीपटात काढलेले 'आय ॲम एव्हरी इंच अ मुस्लिम' हे उद्‌गार ते सोयीस्करपणे विसरतात आणि हेच हिंदूंना खटकते.

शेवटी फंडामेन्टॅलिझम आणि रिव्हायवॅलिझमबद्दल. हे शब्द सर्रास वापरले जातात, पण हिंदू व मुसलमान या दोघांनाही पुनरुज्जीवनवादाचे खरेच आकर्षण आहे का ? हिंदूंच्या बाबतीत तर पुनरुज्जीवनवाद म्हणजे नेमके काय हेच सांगणे कठीण आहे. अनेक देव, अनेक धर्मग्रंथ, अशा धर्मात पुनरुज्जीवन करायचे म्हणजे कशाचे करायचे ? वैदिक धर्माचे, पौराणिक धर्माचे की आणखी कशाचे ? त्यामुळे पुनरुज्जीवनवाद हा शब्द हिंदूधर्माच्या बाबतीत अर्थहीन आहे. ज्याला पुनरुज्जीवनवाद म्हणून पुरोगामी विचारवंत मानतात ती वर उल्लेखिल्याप्रमाणे मुस्लिम अनुनयाच्या धोरणाची प्रतिक्रिया आहे. पण पुनरुज्जीवनवाद म्हणून लेबल चिकटवले की युक्तिवादाची गरज नसते हा विचारवंतांच्या दृष्टीने त्यातला सोयीस्कर भाग. पूर्वी कम्युनिस्ट ज्याप्रमाणे 'बूर्झ्वा' म्हणून विरोधकांची हेटाळणी करीत त्याप्रमाणे आता पुनरुज्जीवनवाद या शब्दाचा उपयोग करण्यात येऊ लागला आहे. मुसलमानांनाही 'पुनरुज्जीवन' हवे आहे असे दिसत नाही. कारण तसे असते तर कुराणाचा कायदा मुसलमानांना लागू करावा, अशी त्यांनी मागणी केली असती. मुसलमानांसाठी कुराणात सांगितलेल्या शिक्षा, त्यांच्यापुरती दारूबंदी, व्याज घेण्यावर बंदी वगैरे मागण्या त्यांनी केल्या असत्या. परंतु त्या बाबतीत ते अवाक्षरही काढत नाहीत. याचा सरळ अर्थ असा आहे की, भारतीय मुसलमानांनाही पुनरुज्जीवनवाद नको आहे. इस्लामच्या नावावर मुसलमानांना एकत्र आणणे, धार्मिक अल्पसंख्य म्हणून सवलती मागणे आणि काही जणांच्या बाबतीत पाकिस्तानबद्दल निष्ठा बाळगून भारतात दहशतवादी कृत्ये करणे एवढाच मुस्लिम पुनरुज्जीवनवादाचा अर्थ आहे.

## हिंदुधर्मांतर्गत जातीयवाद

आधुनिक राज्यपद्धतीस आंशिक प्रतिसाद हे मुस्लिम जातीयवादाचे एकमेव कारण आहे. हिंदू समाजातील जातीयवादाचे कारण तसेच आहे. निरनिराळ्या जातींचा आधुनिक राज्यपद्धतीस वेगवेगळा प्रतिसाद हे हिंदू समाजातील जातीयवादाचे कारण आहे. कोणत्याही घटनेला जातिनिहाय प्रतिसाद देणे हे भारतीय व्यक्तिमत्त्वाचे एक वैशिष्ट्य आहे. साहजिकच अशा प्रतिसादाच्या स्वरूपाप्रमाणे निरनिराळ्या जातींनी आपापल्या हितसंबंधांचे संवर्धन केले किंवा त्यात त्यांना अपयश आले. अस्पृश्य नि आदिवासी यांचा प्रतिसाद शून्य असल्यामुळे त्यांची परिस्थिती अधिकच दयनीय झाली. तथापि त्यांच्यातही आता जागृती होत असून त्यामुळे परिस्थितीत थोडीशी सुधारणा आढळून येत आहे. भारतातील प्रत्येक विभागातील जातीयवादाचे स्वरूप वेगवेगळे आहे. त्या सर्वांचा शोध घेणे अवघड आहे. म्हणून फक्त महाराष्ट्रातील जातीयवादाचेच विश्लेषण करणार आहे. तीच पद्धती इतर राज्यातील जातीयवादाचे स्वरूप समजण्यास उपयुक्त ठरेल.

महाराष्ट्रात तीन प्रमुख जातिविभाग आहेत - १) ब्राह्मण आणि तत्सम वर्ग, २) मराठा आणि इतर स्पृश्य जाती, ३) दलित. यापैकी नवीन राज्यपद्धतीस ब्राह्मण आणि तत्सम जातींचा प्रतिसाद परिपूर्ण होता. त्यामुळे सामाजिक सुधारणा, राजकारणातील सहभाग, शिक्षण, सरकारी नोकऱ्या, डॉक्टर, वकील, इंजिनिअर आदि व्यवसाय अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी इतरांनी हेवा करावा असे स्थान मिळविले. मराठा आदी जातींचा दुसरा जो बहुसंख्य वर्ग होता त्याचा प्रतिसाद अत्यल्प होता. वास्तविक जोतिबा फुले यांनी नव्या राज्यपद्धतीशी सुसंगत असा सामाजिक उद्धाराचा युगप्रवर्तक मार्ग घालून दिला होता. स्त्रीशिक्षण, दलितोद्धार, प्रबोधन हे जोतिबांच्या चळवळीचे मूलाधार होते. त्या मार्गाने सबंध समाजाला नेणे ही या बहुसंख्य वर्गाची जबाबदारी होती. पण त्यास नवीन राज्यपद्धतीचे स्वरूपच समजले नाही त्यामुळे सरंजामी वृत्तीतून हा वर्ग बाहेरच पडला नाही. साहजिकच जोतिबांच्या मार्गाने न जाता या समाजाने आपल्याला आपल्याच कोशात गुरफटून घेतले. परिणामी ब्राह्मण आदि वर्गाच्या तुलनेत हा वर्ग सर्वच क्षेत्रात मागे राहिला. त्यामुळे मुस्लिम समाजाची हिंदू समाजाच्या संदर्भात जशी न्यूनगंडाची भावना होती तशाच तऱ्हेची न्यूनगंडाची भावना ब्राह्मण आदि वर्गाच्या संबंधात बहुसंख्य समाजाने बाळगली. इंग्रजांनी याचा अचूक फायदा उठवला. त्यांनी ज्याप्रमाणे मुस्लिम जातीयवादाला उत्तेजन दिले, त्याप्रमाणेच ब्राह्मणेतर वर्गालाही अलगता जोपासण्यास प्रोत्साहन दिले. हेतू हा की,

राष्ट्रीय आंदोलनात ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशी फूट पडावी. अलगता जोपासल्यामुळे ब्राह्मणेतर वर्गाची न्यूनगंडाची भावना अधिकच तीव्र झाली आणि आत्मोद्धाराचा बिकट मार्ग सोडून बहुसंख्य समाजाने आपल्यावर अन्याय झाला आहे, अशी समजूत करून घेण्याचा सोपा मार्ग चोखाळला. वस्तुत: शतकानुशतके अन्याय झाला होता तो दलितांवर, आणि त्यांच्या उद्धारासाठी सबंध समाजाने ठोस अशी पावले उचलण्याची नितांत गरज होती. त्या संबंधात सर्वात मोठी जबाबदारी साहजिकच बहुसंख्य वर्गाची होती. पण महर्षी शिंदे यांच्या व्यतिरिक्त हे कार्य कोणालाच करावेसे वाटले नाही. उलट, दलितांना हीन लेखण्याचीच परंपरा या वर्गाने पुढे चालविली. त्यामुळे दलितांची नव्या युगास अनुरूप अशी उन्नती होऊ शकली नाही. इतकेच नव्हे, तर आजतागायत त्यांच्यापैकी बहुसंख्य दीनवाणे जीवन जगत आहेत. अशा तऱ्हेने एका बाजूला दलितांचा तिरस्कार आणि दुसऱ्या बाजूला दुखावलेपणाची भावना या चौकटीत या समाजाने स्वत:ला बंदिस्त करून घेतले. दुखावलेपणाची भावना आणि त्यावर मात करण्यासाठी लागणाऱ्या आत्मविश्वासाचा अभाव, यांच्या साहचर्यातून निर्माण होते ती प्रथम मत्सराची आणि नंतर द्वेषाची भावना. ती या समाजाने आपल्या अंगी बाणवली. आधुनिक समाजाला आवश्यकता असते ती निकोप स्पर्धेची आणि मानवतावादाची. राज्यव्यवस्थेसाठी मूलभूत असलेली आधुनिकता या वर्गाच्या आवाक्याबाहेरच राहिली. महाराष्ट्रातील जातीयवादाचा उगम बहुसंख्य समाजाने आधुनिकतेचा सतत अव्हेर केला या वस्तुस्थितीतच सापडतो.

१९२० साली गांधींनी असहकाराच्या चळवळीला सुरुवात केली. त्यानंतर ब्राह्मणेतर वर्ग स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाला. या घटनेचे नेहमीच कौतुक केले जाते आणि ब्राह्मणेतर चळवळीला राष्ट्रीय लढ्याच्या मुख्य प्रवाहात आणले असे त्याचे वर्णन करण्यात येते. वस्तुस्थिती अशी होती, की ब्राह्मणेतर चळवळ आपल्या जातीयवादासह काँग्रेसमध्ये सामील झाली आणि काँग्रेसचेच रूपांतर जातीयवादी पक्षात झाले. हा जातीयवाद स्वातंत्र्यापर्यंत तर टिकलाच, पण आजही त्याचा जोर कमी झालेला नाही. या जातीयवादाचे एक ज्वलंत उदाहरण म्हणजे गांधीवधोत्तर झालेली जाळपोळ आणि त्यात झालेला नरमेध. या घटनेचे विश्लेषण करताना ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'एका निर्वासिताची कहाणी' या स्वानुभवावर आधारित पुस्तकात म्हटले आहे की, महाराष्ट्रात ब्राह्मण राज्यकर्ते होते या वस्तुस्थितीत ब्राह्मणद्वेषाचे मूळ शोधावे लागेल. माडखोलकरांचे मत सयुक्तिक वाटत नाही. कारण पेशवाई ऐन भरात असताना ब्राह्मणेतर सरदार पेशव्यांशी निष्ठा बाळगून होते. तेव्हा

नवीन राजवटीशी जुळवून घेण्यात ब्राह्मणेतर वर्गाला आलेले अपयश आणि त्यातून निर्माण होणाऱ्या मत्सरातच या द्वेषाची उत्पत्ती लागते. असा मत्सर निर्माण होणे मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. पण त्याची परिणती निकोप स्पर्धेत न होता द्वेषात आणि त्यातून क्रोधात झाली. त्याला विधायक वळण लागले असते तर बहुसंख्य समाजात अन्यायाविरुद्ध प्रचंड चीड निर्माण होऊन समानतेवर आधारित समाजाकडे (इगॅलिटेरिअन सोसायटी) आपली वाटचाल सुरू झाली असती. पण विधायक वळण न लाभल्यामुळे क्रोधाचे रूपांतर अनुकूल संधी मिळताच हिंसाचारात झाले. गांधीवधोत्तर जाळपोळ हे त्याचेच दृश्य फळ.

महाराष्ट्रात आजही जातीयवाद कसा बलवत्तर आहे हे विधानसभेतील जातिनिहाय सभासदसंख्या पाहिली तर कळून येईल. लोकनियुक्त सभासदत्व अशा तऱ्हेने विशिष्ट जातींचा विशेषाधिकार असावे हे सरंजामशाहीचे लक्षण आहे. जास्तीत जास्त कार्यक्षम आणि प्रबुद्ध व्यक्तींकडून राबविली जाण्यातच आधुनिक राज्यपद्धतीचे यश अवलंबून आहे. जातीयवादामुळे त्यावर अनिष्ट अशा मर्यादा पडतात. त्यामुळे पद्धती आधुनिक आणि ती राबविणारे, तसेच समाजही, सरंजामी वृत्तीचा अशी सांगड केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात पडली आहे. त्यातच भारताच्या परागतीचे मूळ आहे. त्यातून बाहेर पडावयाचे असेल तर मानवतावादावर आधारित आधुनिकतेचा अवलंब करण्याखेरीज अन्य पर्याय नाही.

तिसरा जातिविभाग म्हणजे दलित. या वर्गाला आधुनिक बनविण्याचा प्रयत्न आंबेडकरांनी केला. पण या समाजाने केव्हाच उभारी धरली नाही. त्यामुळे आंबेडकरांचे कार्य चळवळ न होता, लोकोत्तर झाले. आणि त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळण्यातच हा वर्ग रममाण झाला. स्वातंत्र्यानंतर या वर्गाकडे सत्ताधारी पक्षाने मतपेढी म्हणूनच पाहिले आणि ते स्थान बहुसंख्य दलितांनी मनोभावे स्वीकारले. त्याच्या बदल्यात आपल्याला सत्तास्थाने मिळाली एवढ्यावरच त्यांचे नेते खूष आहेत. आता दलितांना सवलती मिळू लागल्या आहेत. पण त्यांचा ते विशेषाधिकार म्हणूनच उपयोग करीत आहेत. त्यामुळे त्या प्रमाणात निकोप स्पर्धेचे तत्त्व मागे पडत आहे. विशेषाधिकार हे सरंजामी तत्त्व आहे. त्यामुळे हाही समाज सरंजामी मूल्यांचाच अंगीकार करून राहिला आहे.

अशा तऱ्हेने हिंदुधर्मातर्गत जातीयवाद हे सरंजामी वृत्तीचे आणि आधुनिकतेचा अव्हेर करण्याचे फळ आहे. पण त्यातून सुटका कोणालाच नको आहे. 'जो आला तो रमला' अशी या जातीयवादी चौकटीची अवस्था आहे.

## नोकरशाही

लोकनियुक्त संस्थांनंतर आधुनिक राज्यपद्धतीतील महत्त्वाचा घटक म्हणजे नोकरशाही. आजच्या नोकरशाहीचे स्वरूप नीट समजावून घेण्यासाठी तिचा थोडासा इतिहास तपासणे आवश्यक आहे. आधुनिक नोकरशाहीची सुरुवात इंग्रजी राजवटीत झाली. बंगालमध्ये ईस्ट इंडिया कंपनीने आपले राजकीय वर्चस्व स्थापन केल्यानंतर कंपनीच्या नोकरांनी भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करून अमाप संपत्ती कमावली. त्याविरुद्ध उपाययोजना म्हणून १७६५ साली कंपनी सरकारने क्लाईव्हला असा आदेश दिला, की त्याने कंपनीच्या भारतातील प्रत्येक नोकराकडून एक करारनामा (कव्हेनंट) करून घ्यावा.

त्यान्वये प्रत्येक नोकराला आपण कोणाकडूनही नजराणे घेणार नाही अशी एक अट मान्य करावी लागे. तथापि क्लाईव्ह आणि हेस्टिंग्ज या दोघांच्याही कारकीर्दीत भ्रष्टाचाराला आळा बसू शकला नाही. हेस्टिंग्जनंतर गव्हर्नर जनरल झालेल्या कॉर्नवॉलीसने लंडनहून येतानाच भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्याचा निर्धार केला होता. आपल्या निर्धारित कार्याचे कॉर्नवॉलीसने मोठे रोचक वर्णन केले आहे. ग्रीक पौराणिक कथेत हर्क्युलसने बारा अचाट कृत्ये केली होती. ऑजिअन नावाच्या राजाने त्याला दुर्गंधीयुक्त गोठे साफ करावयास सांगितले होते, हे त्यापैकी एक. त्याच्या संदर्भात भारतात ऑजिअन गोठे साफ करणे असे आपल्या कार्याचे तो वर्णन करतो. मथितार्थ असा की, भारतातील कंपनी सरकारच्या कारभारातील भ्रष्टाचाराचे गोठे साफ करणे त्याच्यावर सोपविण्यात आले होते आणि हर्क्युलसच्या वीरकृत्याप्रमाणेच त्याचे कामही अचाट होते, इतका कंपनीचा कारभार भ्रष्टाचाराने बरबटलेला होता. कॉर्नवॉलीसपूर्वी कंपनी सरकारच्या कारभारात भारतीय आणि इंग्रज या दोघांचाही बरोबरीने सहभाग असे. दोघेही भ्रष्टाचारात आकंठ बुडलेले असत. सोळा-सतरा वर्षांची इंग्रज मुले कंपनी सरकारच्या नोकरीत भारतामध्ये नशीब काढण्यासाठी येत असत. आल्यानंतर येथील एकंदर सामाजिक वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होत असे. हे वातावरण कसे असे याचा एका उल्लेखावरून उलगडा होईल. बंगालची दिवाणी कंपनी सरकारला मिळाल्यानंतर झालेल्या कराराप्रमाणे बंगालच्या नबाबाला सालीना ५२ लाख रुपये देण्याचे ठरले होते. त्या वेळी बंगालचा नबाब एक अठरा वर्षांचा मुलगा होता. एवढे पैसे मिळणार हे ऐकल्यानंतर 'आता मला हव्या तेवढ्या नाचणारणी ठेवता येतील' असे त्याने उद्गार काढले. साहजिकच इंग्रज पोरे येथे आल्यानतंर अत्यंत भ्रष्टाचारी आणि बदफैली जीवन जगत असत. येथील रहाटीप्रमाणे इतक्या लहान वयातही बाया ठेवणे वगैरे नाद त्यांना

लागत असत. ही जीवनशैली बघून इंग्लंडमधून थेट आलेल्या गव्हर्नर जनरल्सना धक्का बसत असे आणि साहजिकच साम्राज्य वाचवायचे असेल तर इंग्लंडमधून प्रशिक्षित आणि प्रामाणिक अधिकारी आणणे एवढा एकच उपाय आहे, असे त्यांना जाणवत असे. या प्रक्रियेची सुरुवात कॉर्नवॉलीसने केली. त्याने सर्व उच्च पदांचे युरोपियीकरण करण्याचा निर्णय घेतला. भारतीय नोकर आणि युरोपियन अधिकारी यांमध्ये संपूर्ण दुरावा निर्माण करणे हा त्यामागील मुख्य हेतू होता. तसे केले नाही आणि दोन्ही यंत्रणांची सरमिसळ झाली तर भारतीय कर्मचारी हे इंग्रज अधिकाऱ्यांच्या हातात रयतेच्या पिळवणुकीचे आयते साधन बनतील अशी त्याला साधार भीती होती. कॉर्नवॉलीसच्या धोरणात इंग्रजी राजवटीची दोन सूत्रे प्रतीत होतात - पहिले म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांना रयतेची पिळवणूक वर्ज्य होती. दुसरे म्हणजे सरकार पिळवणुकीसाठी नसून राज्यकारभारासाठी आहे. याचेच उपप्रमेय म्हणजे सरकार वैध शोषणाला बंदी घालणार नाही. पण बेकायदा पिळवणुकीला मान्यता देणार नाही. या दोन सूत्रांतून लोकसेवक (पब्लिक सर्व्हंट) ही संकल्पना भारतात प्रथमच आणली गेली. त्यापूर्वी राजसेवक ही संकल्पना होती. भारतीय परंपरेला अनुसरून असे स्थान हे वैयक्तिक उत्कर्षाचेच साधन होते. लोकसेवेचे नसे. त्यामुळे त्या स्थानाचा उपयोग व्यक्तिगत हितसंबंधांचे संवर्धन करण्यासाठी होत असे. साहजिकच नजराणे वगैरे घेण्यावर कोणतीही बंदी नव्हती. नवीन पद्धतीबरोबर आणखी एक संकल्पना अस्तित्वात आली, ती म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांचा हक्क फक्त वैध उत्पन्नावरच असेल. इतर कोणत्याही तऱ्हेने त्याला सरकारी स्थानाचा उपयोग करून उत्पन्न मिळविण्याचा अधिकार नाही. लोकसेवा आणि वैध उत्पन्न या दोन संकल्पना अशा तऱ्हेने आधुनिक भारतीय नोकरशाहीच्या मूलाधार ठरल्या. कार्यक्षमता हे तिचे तिसरे वैशिष्ट्य. ती साध्य करण्यासाठी सरकारी नोकरांच्या निवडीसाठी इंग्लंडमध्ये हेलीबरी येथे प्रशिक्षण संस्था काढण्यात आली. हेलीबरी येथील संस्थेत चार सत्रे व्यतीत केली असतील त्यांचीच कंपनी सरकारच्या नोकरीत भरती केली जाईल, अशी तरतूद १८३३ च्या चार्टर कायद्याने केली. साहजिकच सर्व वरिष्ठ पदे इंग्रजांचीच मक्तेदारी बनली. तथापि त्याच कायद्याने धर्म, पंथ, वर्ण इत्यादी कारणांवरून कोणालाही कंपनी सरकारच्या नोकरीत अपात्र समजले जाणार नाही, अशीही तरतूद केली होती. यानंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १८६१ चा इंडियन सिव्हिल सर्विसेस ॲक्ट. या कायद्यान्वये सर्व वरिष्ठ मुलकी पदे फक्त सदर परीक्षा पास होणाऱ्यांसाठीच राखून ठेवण्यात आली. अशा तऱ्हेने नोकरशाहीची पोलादी चौकट अस्तित्वात आली. या नोकरशाहीचे आणखी

एक वैशिष्ट्य म्हणजे 'लालफीत'. सर्व तऱ्हेच्या औपचारिकता पूर्ण झाल्याखेरीज कोणतेही कागदपत्र पुढील कारवाईसाठी जागेवरून हलणार नाहीत हा त्याचा मथितार्थ. त्यातून कारभाराची दीर्घसूत्री पद्धत अंमलात आली. लालफितीचा जाच कमी व्हावा म्हणून लॉर्ड कर्झनने कसोशीने प्रयत्न केले, पण पद्धत एवढी चिवट, की त्याच्यासारख्या असामान्य कर्तबगारीच्या गव्हर्नर जनरललादेखील हात टेकावे लागले. लोकसेवा, वैध उत्पन्न, कार्यक्षमता आणि लाल फीत या चार वैशिष्टचांनी संपन्न अशी नोकरशाही इंग्रज राजवटीची प्रमुख आधारस्तंभ होती. प्रत्यक्ष सत्ता नोकरशाहीच राबवत असल्यामुळे तिला भ्रष्टाचाराची लागण होऊ नये म्हणून अवैध लाभ मिळविणे हा भारतीय दंडसंहितेने गुन्हा ठरविला गेला.

आय. सी. एस. परीक्षा प्रथम इंग्लंडमध्ये होत असल्याकारणाने नोकरशाहीतील बहुसंख्य वरिष्ठ पदावर इंग्रजांचीच नियुक्ती होत असे. जरी ही परीक्षा सर्व ब्रिटिश प्रजाजनांना खुली असली तरी फारच थोडचा भारतीयांना इंग्लंडला जाऊन ही परीक्षा उत्तीर्ण होणे शक्य होत असे. साहजिकच वरिष्ठ श्रेणीमध्ये भारतीयांचे प्रमाण फारच कमी असे. तथापि जे निवडले जात असत त्यांची बुद्धिमत्ता आणि कार्यक्षमता अत्यंत उच्च दर्जाची असे. नोकरशाहीतील निम्न श्रेणीतील सर्वच पदांवर भारतीयांची नेमणूक करण्याशिवाय अन्य पर्याय इंग्रजी राजवटीसमोर नव्हता. नोकरशाहीतील या घटकाचाच सर्वसामान्य माणसाशी प्रत्यक्ष संबंध येत असे. निम्नश्रेणीतील पदे ही ब्राह्मण नि तशाच वर्गांचीच जवळजवळ मक्तेदारी बनली होती. या जमातींचा इंग्रजी राज्यपद्धतीस असलेला प्रतिसाद परिपूर्ण असल्यामुळे त्यांनी भराभर इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरुवात करून कंपनी सरकारच्या नोकरीत प्रवेश मिळविला. तथापि नोकरी हे त्यांच्या लेखी वैयक्तिक उत्कर्षाचेच साधन होते, लोकसेवेचे नव्हे. कारण लोकसेवा ही संकल्पना भारतीय व्यक्तिमत्त्वास अनोखी आहे. या संदर्भात प्रा. वि. मा. दि. पटवर्धन यांनी पंजाबचे माजी राज्यपाल दादो चिंताप्पा पावटे यांची एक आख्यायिका सांगितली, ती भारतीय आणि इंग्रज व्यक्तिमत्त्वावर नेमका प्रकाश टाकते. पावटे एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते त्यावेळची ही घटना आहे. नक्की लक्षात नाही, पण बहुधा कॅमेरॉन त्यावेळी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन (शिक्षणसंचालक) असावेत. वित्तीय तरतूद लक्षात न घेता आणि संचालकांच्या संमतीशिवाय पावटे यांनी खात्यास बऱ्याच खर्चात टाकणारी योजना जाहीर केली. संचालकांच्या नजरेस ही गोष्ट येताच त्यांनी पावटेंच्याकडे नाराजी व्यक्त केली. अगदी क्षुल्लक घटना घडली आहे, अशा निश्चिंतपणे पावटे म्हणाले, की असे असेल तर आपण योजना रद्द करून टाकू.

त्यावर संचालकांनी जी प्रतिक्रिया व्यक्त केली ती विलक्षण बोलकी आहे. ते उद्‌गारले, 'बट, इट इज अ कमिटमेंट टु पब्लिक.'

पावट्यांना योजना जाहीर करणे काय व रद्द करणे काय, दोन्ही गोष्टी सारख्याच. पण इंग्रज अधिकारी त्याच्याकडे 'कमिटमेंट' म्हणून पाहात होता. तीही जनतेशी कमिटमेंट. कमिटमेंटशी बांधिलकी न मानणे त्याला नामुष्कीचे वाटत होते. मग ती गोष्ट त्याच्या संमतीशिवाय का झाली असेना. पण पावट्यांना त्याचे काहीच सोयरसुतक नव्हते. लोकसेवा ही संकल्पनाच मुळात आपल्याला परकी. धन्याची चाकरी हे आपले व्रत. त्यामुळे आपली कमिटमेंट असते ती धन्याशी. लोकांशी नव्हे. त्यामुळे ज्या व्यक्तीवर आधुनिकतेचे संस्कार नाहीत तो प्रत्येकजण पावटे यांच्यासारखाच वागणार. आजही प्रत्येक नोकरदार त्याच वृत्तीने वागत आहे. तथापि कोणत्याही नव्या परिस्थितीशी झटदिशी जुळवून घेण्याची ब्राह्मण आदि वर्गाची परंपरा आहे त्याला अनुसरून इंग्रजी नोकरशाहीची जी लोकसेवेखेरीज इतर वैशिष्ट्ये आहेत ती इंग्रजी राजवटीत या वर्गाने आत्मसात केली. यांपैकी 'लाल फिती'चे वैशिष्ट्य तर भारतीय व्यक्तिमत्त्वाशी सुसंगतच होते. जपजाप्य, स्नान, संध्या, व्रतवैकल्य, यज्ञयाग इत्यादींसंबंधात ज्या कठोर औपचारिकता पूर्ण कराव्या लागत त्यांचा आणि लाल फितीचा सांधा बेमालूम जुळण्यासारखा होता. दुसरे म्हणजे न्यूनगंड हे हिंदू व्यक्तिमत्वाचे एक वैशिष्ट्य आहे. अशा व्यक्तीला झटदिशी निर्णय घेता येत नाही. अशा व्यक्तीस निर्णय सावकाशीने करण्यास लाल फीत नेहमीच उपयोगी पडते. ज्यांचा हिंदू आणि मुसलमान नोकरांशी संबंध आला असेल त्यांस दोघांच्या लाल फितीसंबंधीच्या दृष्टिकोनातील फरक चटदिशी जाणवतो. लाल फितीबरोबरच कार्यक्षमता, तत्परता या बाबतीतही हिंदू नोकरदारांनी इंग्रज धन्यांचे अनुकरण केले. अशा तऱ्हेने नोकरशाहीची सबंध राज्यकारभारावर एक जबरदस्त पकड तयार झाली. ही स्थिती स्वातंत्र्य मिळेपर्यंत टिकली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जोपर्यंत जुने सनदी नोकर आणि जुन्या परंपरेत वाढलेली इतर नोकरदार मंडळी होती तोपर्यंत नोकरशाहीने आपली कार्यक्षमता बऱ्याच प्रमाणात टिकवून धरली. तथापि १९७० च्या आसपास यापैकी बरीच मंडळी निवृत्त झाली आणि त्यांची जागा स्वातंत्र्योत्तर कालात जन्मलेल्या पिढीने घेण्यास सुरुवात केली. संस्कारक्षम वयात मूल्यविहीन राजकारणाचा आणि समाजकारणाचा या पिढीने अनुभव घेतला होता. साहजिकच इंग्रजी राजवटीत दबल्या गेलेल्या भारतीय व्यक्तिमत्त्वाने शासकीय कारभारात अक्षरशः धुमाकूळ मांडला.

स्वातंत्र्यानंतर अनेक कल्याणकारी योजना हाती घेण्यात आल्या. आर्थिक

निबंध ३५६० २८००९ ८८४९३



नियोजनाची सांगड खासगी उद्योगक्षेत्राशी घालण्याच्या गरजेमुळे शासनाला राष्ट्राच्या आर्थिक जीवनाचे नियमन अधिक कसोशीने करण्याची निकड निर्माण झाली. त्यातून परवाने, नियंत्रणे यांचा सुळसुळाट झाला. अनेक कामगार कायदे करण्यात आले. औद्योगिक प्रगती मोठ्या प्रमाणावर झाली. सहकार चळवळ फोफावली. बँकांचा व्याप वाढला. शिक्षणक्षेत्राचा विस्तार झाला. या सर्व विकासामुळे सार्वजनिक सेवाक्षेत्र सतत विस्तारत जात आहे. साहजिकच नोकरशाहीच्या हाती अमाप सत्ता एकवटली. कारण विधिमंडळाने कायदे केले तरी त्याची अंमलबजावणी नोकरशहांच्याच हाती असते. या नोकरशाहीचे पोत कसे होते ? सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे सनदी नोकरांची गरज मोठ्या प्रमाणावर भासू लागली. परंतु विशेष बुद्धिमान लोक खासगी क्षेत्रांकडे वळले. त्यामुळे पुरवठा कमी झाला. मागणी वाढली आणि पुरवठा कमी झाला म्हणजे सुमार दर्जाचा मालही चांगल्या भावाने विकला जातो. या नियमानुसार सुमार दर्जाचे उमेदवारही सनदी सेवेत भरती होऊ लागले. इंग्रजी राजवटीत इंग्रज उमेदवारांबरोबर स्पर्धा करून सनदी सेवेत प्रवेश मिळवावा लागे. आता फक्त भारतीय उमेदवारच असल्यामुळे स्पर्धेचा कस एकदम कमी झाला. त्यात राखीव जागांचे खूळ सुरू झाले. त्यामुळे सनदी सेवेचा दर्जा पार घसरला. निम्नश्रेणीत जे नोकरदार होते त्यांच्यावर या ढासळत्या दर्जाचा परिणाम होणे अपरिहार्य होते. त्यात भर घालणारे आणखी काही घटक होते. १) नोकरांच्या संघटना बांधल्या गेल्या. संघटना नसली की लाचार आणि संघटना असली की मुजोर हे आपले ब्रीदच आहे. २) लोकसेवा ही संकल्पना आपणास परकी असल्यामुळे बेफिकिरी वाढली. ३) महिला मोठ्या संख्येने शासकीय सेवेत रुजू होऊ लागल्या. त्यांच्या अस्तित्वामुळे कार्यालयीन वातावरण अधिक रंगतदार होऊ लागले असले, तरी अधिकाऱ्यांचा वचक कमी होऊ लागला. कार्यालयीन कामासंबंधी स्त्री-कर्मचाऱ्यांना समज दिली असता त्यांच्यापैकी काहीजणी तरी रडू लागतात, त्यामुळे अधिकारीच ओशाळा होतो आणि त्याच्या कार्यपद्धतीवर प्रतिकूल परिणाम होतो. ४) सेवाज्येष्ठतेने बढती मिळत असल्याने त्याचा कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होतो. ५) राखीव जागांच्या धोरणामुळे कार्यक्षम नोकरांच्या बढतीच्या संधीवर अनिष्ट मर्यादा पडू लागल्या आहेत. त्यामुळे असे कार्यक्षम नोकर वीस वर्षांची नोकरी झाली, की स्वेच्छा निवृत्ती पत्करून खाजगी क्षेत्रात जाऊ लागले. (६) १९७० नंतर स्वातंत्र्योत्तर कालात जन्मास आलेली पिढी हळूहळू शासकीय सेवेत सामावली जाऊ लागली. तत्परता, निरलसता, कार्यक्षमता, सचोटी, इत्यादी गोष्टी ते ज्या समाजात वाढले त्या समाजात अभावानेच तळपत होत्या. साहजिकच या

गुणांची बाधा नवीन पिढीस होण्याची शक्यताच नव्हती. या सर्व कारणांनी शासकीय सेवा वरपासून खालपर्यंत सडल्यासारखी झाली. आपल्या स्थानाकडे फक्त उदरनिर्वाहाचे वा वैयक्तिक उत्कर्षाचेच साधन म्हणून बहुसंख्य नोकरदार पाहू लागले. भ्रष्टाचाराची मोठ्या प्रमाणावर लागण होण्यास ही प्रवृत्ती एक प्रधान कारण होते. इंग्रजी राजवटीतील लाल फीत हे भ्रष्टाचारास साहाय्यभूत ठरणारे एकच वैशिष्ट्य स्वातंत्र्यानंतर टिकवून धरले गेले. लोकसेवा, कार्यक्षमता आणि वैध उत्पन्न ही वैशिष्ट्ये हळूहळू नष्ट झाली आणि सेवाक्षेत्राचे संपूर्ण भारतीयीकरण झाले. श्रमसंस्कृती, नवोपक्रमशीलता नि न्याय या संकल्पनांचा अभाव, बेफिकिरी, दुसऱ्याच्या असहाय्यतेचा फायदा घेण्याची निर्घृण वृत्ती, इत्यादी वैगुण्यांनी संपन्न झालेली नोकरशाही आता विलक्षण संवेदनशून्य झाली आहे आणि अनेकदा तर तिचे वर्तन क्रौर्याच्या सीमेवर रेंगाळत असते.

**काळा पैसा आणि भ्रष्टाचार :**

काळ्या पैशावर अनेक तज्ज्ञांनी लिहिले आहे. काळा पैसा निर्माण कसा होतो, त्यातून समांतर अर्थव्यवस्था कशी उदयास येते, एकंदर किती काळा पैसा असावा, समांतर अर्थव्यवस्थेचे आपल्या जीवनावर काय परिणाम होतात, त्याचे निराकरण कशा पद्धतीने करता येईल, इतर राष्ट्रांनी ही समस्या कशा प्रकारे हाताळली यांवर विपुल लेखन झाले आहे. त्यात मला कोणतीही भर घालता येण्यासारखी नाही. भारतीय व्यक्तिमत्त्वाशी त्याचा सांधा कसा जुळतो एवढ्यापुरतेच माझे विवेचन मर्यादित ठेवणार आहे.

काळा पैसा ही दुसऱ्या महायुद्धाची भारताला देणगी. युद्धामुळे अनेक गोष्टींची चणचण निर्माण झाली. भाव वाढू लागले, त्यामुळे इंग्रज सरकारने किमतीवर नियंत्रण बसवले. लगेच बाजारातून अनेक वस्तू गडप झाल्या आणि त्यांना काळ्या बाजारात वाट फुटली. दुसऱ्याच्या असहाय्यतेचा वैयक्तिक लाभासाठी फायदा उठवणे हा आपला धर्मच आहे. खरे म्हणजे राम, कृष्ण, बुद्ध, महावीर यांच्या शिकवणुकीचे आपण वारसदार. तेव्हा काळ्या बाजाराला भारतात तरी स्थान मिळावयास नको होते, पण या विभूतींचे नामस्मरण केल्यानंतर कोणतीही कृत्ये करण्यास आपल्याला मोकळीक असते अशी आपली धारणा. त्यानुसार काळाबाजार आपणास वर्ज्य असण्याचे कारण नव्हते. आणि आपण त्यात पटाईत झालो. वास्तविक किमतीवरील नियंत्रण सामान्य माणसाच्या हितासाठीच होते, पण त्यामुळे काळा बाजार वाढतो हे पाहिल्यानंतर इंग्रज सरकारने शिधावाटपाची पद्धत सुरू केली. किमतीवरील नियंत्रण आणि शिधापद्धती या दोन्हीही उपाययोजना भारतीयांच्या हितासाठीच होत्या. वाजवी किमतीत जीवनावश्यक

वस्तू सामान्य माणसास मिळाव्या हा त्यामागचा हेतू. सरकार जर त्या बाबतीत बेफिकीर असते तर युद्धप्रयत्नासाठी लागणाऱ्या वस्तू थेट उत्पादकांकडूनच घेऊन जे उरेल त्यावर भारतीयांनी गुजराण करावी असा दृष्टिकोन त्याने बाळगला असता आणि मग बंगालमध्ये जसा दुष्काळ पडला तसा सबंध भारतात पडला असता आणि भारतीय व्यापाऱ्यांनी त्याचा पुरेपूर फायदा उठवला असता. पण चणचणीच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याची जबाबदारी शासनाची आहे ही भूमिका शासनाने - परकीय असूनही - घेतली, तर व्यापाऱ्यांनी, ते भारतीय असूनही, चणचणीचा काळ ही गिऱ्हाइकांची लूटमार करण्याची संधी आहे, असे मानले. नव्यानेच एखादी पद्धती सुरू करावयाची म्हणजे त्यात नाना अडचणी येतात. त्याप्रमाणे वाटपपद्धतीत अनेक त्रुटी होत्या हे निस्संशय ! पण मुख्य अडचणी या होत्या, की जनतेने ती पद्धत मोठ्या अनिच्छेने स्वीकारली आणि व्यापाऱ्यांनी तिच्याकडे अवैध मार्गाने पैसा मिळविण्याची सुवर्णसंधी म्हणून पाहिले. अवैध उत्पन्न म्हटले, की त्यात सरकारी नोकरांचे सहकार्य आणि हिस्सा आलाच. सरकारी नोकरही भारतीयच होते. तेव्हा जनतेच्या हितासाठी जी पद्धत सुरू करण्यात आली होती तिची कठोरपणे अंमलबजावणी करण्याऐवजी त्यांनीही आपले हात ओले करून घेण्याचे व्रत आरंभले. काळ्या बाजारात वाट फुटणाऱ्या वस्तूंना गिऱ्हाइकांची वाण पडली नाही. कारण सुखवस्तू भारतीय त्यांचे उदार आश्रयदाते होते.

अशा तऱ्हेने नवीन शिधावाटपपद्धतीला आपण संपूर्णपणे भारतीय प्रतिसाद दिला. आता यात गोरगरिबांची दैना होत होती हे खरे; पण ते त्यांच्या गतजन्मीच्या पापाचे फळ होते. त्याला व्यापारी, सरकारी नोकर आणि सुखवस्तू भारतीय काय करणार ! म्हणजे ज्या वेळी इंग्लंडमधील उमरावदेखील ठिगळाच्या विजारी वापरत होते आणि आठवड्याचा जो शिध्याचा वाटा मिळत असे त्यावरच मंत्र्याचे देखील कुटुंब गुजराण करीत असे, त्याच वेळी काळा बाजार आपण आपल्या झटदिशी अंगवळणी पाडून घेतला. खरोखर ब्रिटन ज्याप्रमाणे आपल्या अस्तित्वासाठी लढत होते त्याप्रमाणे आपण आपला स्वातंत्र्यलढा पुकारला होता. मग इंग्रजांनी त्यांच्या जीवनमरणाच्या लढ्यात जी नीतिमत्ता जागवली ती आपण का पाळू शकलो नाही ! कारण अगदी उघड आहे. अधिक पैसा मिळवणे एवढाच आपला जीवन-मरणाचा लढा असतो. त्याच्यापुढे सर्व नीतिमूल्ये नतमस्तक असतात. अनेक काँग्रेसवाल्यांची दुकाने होती. तेही त्या दिवसात काळाबाजार करीत असल्याचा बोभाटा होता. त्या वेळी अनेक राष्ट्रवादी भूमिगत होऊन इंग्रजांशी लपंडाव खेळत होते. माझ्या मनात

पुष्कळ वेळा येते, की त्यांच्यापैकी जे भूमीवर होते त्यांनी, सरकारी नियमाप्रमाणे गोरगरिबांना धान्य मिळावे, यासाठी प्रयत्न केले असते तर जनतेचे हित अधिक प्रमाणात साधू शकले नसते का ? पण मग 'हेमू कलाणी झिंदाबाद, धन्य हुतात्मा शूर' ही गाणी कोणी म्हटली असती ! ते असो. काळ्या बाजाराशी 'आध्यात्मिक' भारताचे जातक अगदी विनासायास जुळले ही गोष्ट खरी.

पंडित नेहरू तुरुंगातून सुटल्यानंतर काळा बाजारवाल्यांचे घृणास्पद वर्तन त्यांच्या कानी गेले. ते अत्यंत संतप्त झाले आणि अशांना जवळच्या झाडावर टांगून फाशी दिले पाहिजे अशी जळजळीत प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. पुढे भारत स्वतंत्र झाला. पण झाड, फास आणि काळाबाजारवाले यांची सांगड कधीच पडली नाही. कारण स्वतंत्र भारतात त्यांचीच गरज काँग्रेसला भासणार होती. आध्यात्मिक भारत 'पैशाला विटाळ नाही' हे मूल्य सतत पाळत आला आहे. त्यामुळे काळाबाजारवाल्यांनी काँग्रेसला देणगी दिली, की तेही पावन झाले आणि त्यांचा पैसाही पावन झाला. गांधीजी नसत का अंबालाल साराभाईंकडून आश्रमाला मदत घेत ! सांगण्याचा मतलब हा, की दुसऱ्या महायुद्धात सुरू झालेला काळाबाजार, त्यातून निर्माण होणारा काळा पैसा आणि भ्रष्टाचार यांना स्वतंत्र भारततही प्रतिष्ठा लाभली. आणि त्यांनी भारताची साथसंगत आजवर सोडलेली नाही आणि पुढेही ती सुटेल असे वाटत नाही. आता आपल्याला त्याची इतकी सवय झाली, की काळा पैसा किंवा नंबर दोनचा पैसा हा आपल्या दैनंदिन शब्दसंपदेचा एक आवश्यक भाग झाला आहे आणि शाळकरी मुलेही त्याचा सहजपणे उपयोग करीत असतात.

काळा पैसा आणि भ्रष्टाचार परस्परपूरक आहेत. काळ्या पैशामुळे भ्रष्टाचार होतो आणि भ्रष्टाचारातून काळा पैसा निर्माण होतो. तथापि त्यांचे स्वरूप थोडेसे भिन्न आहे. एका उदाहरणावरून हे स्पष्ट होईल. न्या. छगला यांनी आपल्या आत्मचरित्रपर पुस्तकात लिहिले आहे की, त्यांचे उत्पन्न एका ठराविक पातळीच्या वर गेले, की त्यांना १०० तील ९७ रुपये कर म्हणून भरावे लागत. आणि फक्त तीन रुपये त्यांच्या हाती राहात असत. म्हणून त्यांनी नवीन प्रकरणांचे वकीलपत्र घेण्याचे बंद केले. दुसऱ्या एखाद्या वकिलाने हे शंभर रुपये हिशेबात दाखविले नाहीत तर त्यांचे रूपांतर काळ्या पैशात होते. तसेच एखाद्या न्यायमूर्तीने आपल्यासमोर असलेल्या प्रकरणी पैसे घेऊन विपर्यस्त निकाल दिला तर तो भ्रष्टाचार होतो. पण त्या प्रक्रियेत त्याने घेतलेल्या पैशाचे काळ्या पैशात रूपांतर होते. काळा पैसा म्हणजे बिनहिशेबी पैसा. पैशाचा हिशेब दाखविला असता कर भरावा लागतो. म्हणून ज्या पैशाचा

हिशेब दाखविला जात नाही तो काळा पैसा. म्हणजे काळा पैसा हे करपद्धतीचे अपत्य आहे. भ्रष्टाचार ही संज्ञा आज ज्या अर्थाने वापरली जाते त्याचा उगम संपूर्णपणे परकीय आहे. इंग्रजी राजवटीपूर्वी भ्रष्टाचार हा शब्द धर्मविरुद्ध आचरण एवढ्याच मर्यादित अर्थाने वापरला जात होता. सरकारी नोकरांचा हक्क फक्त वैध उत्पन्नावरच राहील अशी तरतूद करून कॉर्नवॉलीसने भ्रष्टाचाराची आधुनिक संकल्पना भारतात आणली. तत्पूर्वी इंग्रज आणि भारतीय दोघेही मिळून रयतेची लूट करीत असत. सरकारी नोकराने नजराणे घेणे हे भारतीय परंपरेला धरूनच होते. उलट रिक्त हस्ताने कोणाच्या भेटीस जाणे हे गर्ह्य समजले जात असे. इंग्रज नोकरांनीही ही प्रथा चटदिशी आत्मसात केली. साहजिकच वरकमाई हा सरकारी अंमलदाराचा अधिकारच समजला जाऊ लागला. त्यावर उतारा म्हणून कॉर्नवॉलीसने सरकारी नोकरांच्या वरकड उत्पन्नावर प्रतिबंध आणला. त्याचीच तर्कशुद्ध परिणती म्हणजे भारतीय दंडसहितेत सरकारी नोकरांच्या बेकायदा लाभाचे गुन्हा म्हणून वर्गीकरण. म्हणजेच काळा पैसा आणि भ्रष्टाचार या दोन्हीही आधुनिक राज्यपद्धतीने अस्तित्वात आणलेल्या संकल्पना. जनहित ही त्यामागची प्रेरणा. कर वसूल केला जातो तो जनहिताची कामे करण्यासाठी पैशाची गरज भासते म्हणून. तसेच भ्रष्टाचाराचा कायदा केला गेला तोही सरकारी नोकरांनी रयतेची लूट करू नये आणि त्यांच्यावर पैशासाठी अन्याय करू नये म्हणून. इंग्रज सरकार परकीय असल्यामुळे त्यांची अंमलबजावणी कशा रीतीने होत होती हा भाग अलाहिदा. पण जी तत्त्वे त्यांनी पुरस्कारली ती निरपवादपणे जनहितासाठीच होती. ही दोनही तत्त्वे त्या वेळी प्रचलित असलेल्या भारतीय राज्यपद्धतीस संपूर्णपणे अनोळखी होती. कारण समाज सरंजामी होता, तर ही तत्त्वे आधुनिक राज्यपद्धतीचा भाग होता. साहजिकच नवीन संकल्पनांचे यश नवीन राज्यपद्धतीस कसा प्रतिसाद मिळतो, यावर अवलंबून होते, हे आपण वर पाहिलेच आहे. हिंदू विचारवंत आणि लहानसा प्रबुद्ध मध्यमवर्ग यांचाच फक्त नवीन राज्यपद्धतीस परिपूर्ण प्रतिसाद लाभला. त्यामुळे भ्रष्टाचार गर्ह्य आहे ही कल्पना इंग्रजी राजवटीत या वर्गापुरतीच मर्यादित राहिली. इतर वर्ग त्यापासून संपूर्णपणे मुक्त राहिले. कारण त्यांचा प्रतिसाद अत्यल्प होता. आणि त्यामुळे नवीन राज्यपद्धतीचे त्यांस केव्हाच आकलन झाले नाही. साहजिकच त्यांची सरंजामी वृत्ती होती तशीच राहिली. हा वर्ग भ्रष्टाचारी नव्हता, पण आधुनिकता आत्मसात न केल्यामुळे त्याला भ्रष्टाचाराचे वावडेही नव्हते. भ्रष्टाचार हा सामाजिक रोग आहे, ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली नव्हती. बहुसंख्य असल्यामुळे स्वातंत्र्यानंतर याच वर्गाच्या हाती सत्ता येणार

होती. लोकशाही व आधुनिक राज्यपद्धती हाच वर्ग राबवणार होता. साहजिकच स्वातंत्र्योत्तर काळात प्रशासन स्वच्छ असणार की भ्रष्टाचारी हे, या वर्गाचा आधुनिक राज्यपद्धती आणि लोकशाही यांना कोणता प्रतिसाद असेल, यावर अवलंबून होते. पर्यायाने आधुनिकतेशी विसंगत असणारी भारतीय व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये दूर करून त्यास अनुरूप असणारे व्यक्तिमत्त्व हा वर्ग विकसित करणार का, हा लाखमोलाचा प्रश्न होता. नेहरूंचे नेतृत्व या वर्गाने निरपवादपणे मान्य केलेले असल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात नेहरू कोणती मूल्ये राजकारणात विकसित करणार यावर या वर्गाचा कल अवलंबून राहणार होता.

स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आला. नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले. लोकशाही म्हटले, की निवडणुका आल्याच. या निवडणुका, जनहिताची कामे करून जिंकायच्या की पैसे खर्च करून जिंकायच्या हा निर्णय सर्वस्वी नेहरूंचा होता. तथापि पैशाचा वापर करून निवडणुका जिंकायच्या हा मार्ग नेहरूंनी पसंत केला. निवडणुका आणि काळा पैसा यांतील संबंध अनेक लेखकांनी उघड करून दाखविला आहे. त्याची सुरुवात नेहरूंच्या कारकीर्दीत झाली. निवडणुकीसाठी जमा केलेला पैसा कशा तऱ्हेने वापरला जातो (१) प्रचार आणि प्रचारसाहित्य (२) पक्षाचे अनेक पूर्णवेळ कार्यकर्ते असतात; निवडणुकीसाठी जमा केलेल्या पैशातून त्यांची सोय करता येते. (३) मतदारांना आर्थिक आमिष दाखविण्यासाठी. अशा तऱ्हेने पैसा खर्च करण्याची खरेच गरज होती का ? कॉंग्रेस पक्षाने जनहिताची कामे करून तोच पक्ष सामान्य माणसाच्या हितसंबंधांचे रक्षण करू शकेल अशी मतदारांची खात्री पटवून दिली असती, तर निव्वळ कृतज्ञतेपोटी त्यांनी कॉंग्रेसला निवडून दिले असते. पण तो मार्ग नेहरूंना मान्य नसावा असे दिसते. स्थानिक पुढाऱ्यांना त्यांनी या बाबतीत मोकळे रान सोडले. हे पुढारी बहुजनसमाजातले होते. त्यांना भ्रष्टाचाराचे वावडे नव्हते. त्यांच्यापैकी अनेकांचे प्रबोधन झालेले नसल्यामुळे भारतीय व्यक्तिमत्त्वाची बहुतेक वैगुण्ये त्यांनी शाबूत ठेवली होती. त्यामुळे मतदारांना आकृष्ट करण्याचा आर्थिक आमिष हा सोपा मार्ग त्यांनी निवडला. त्याला नेहरूंचा विरोध असण्याचे कारण नव्हते. कारण कोणत्याही मार्गाने कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आला पाहिजे याबाबतीत ते आग्रही होते. या प्रक्रियेत भ्रष्टाचाराचे बीज रुजले. येथील भूमीही त्याला अनुकूल होती. भ्रष्टाचारास तात्त्विक विरोध असणारांची संख्याही अत्यंत सूक्ष्म होती. अशा परिस्थितीत भ्रष्टाचाराचा वेल फोफावण्यास वेळ लागला नाही.

नेहरूंनी निवडणुका आणि पैसा यांची का सांगड घातली असावी याचा

शोध घेणे आवश्यक आहे. नेहरू आणि जनता यांचे संबंध अतूट होते. नेहरूंना पाहून जनतेला भरते येत असे नि अथांग जनसमुदाय पाहून नेहरूंना भरते येत असे. लाखालाखांच्या सभा ही नेहरूंची भावनिक गरज होती. त्याशिवाय राहणे त्यांना अशक्य होते. अशा परिस्थितीत इंग्लंडमध्ये होतात तशा लहान लहान सभा (कॉर्नर मीटिंग्ज) घेऊन कमी खर्चात काँग्रेसला निवडून आणणे ही नेहरूंच्या कल्पनेबाहेरची संभाव्यता होती. हजारो निष्ठावंत कार्यकर्ते निरपेक्षपणे खेडेगावातून प्रचार करीत आहेत, शहराच्या कोपऱ्याकोपऱ्यात सभा घेऊन काँग्रेसचा कार्यक्रम लोकांना पटवून देत आहेत, हे दृश्य नेहरूंना मानवण्यासारखे नव्हते. काँग्रेसची प्रचंड प्रचारयंत्रणा, निवडणूक घोषणांनी भरलेल्या भिंती, ठिकठिकाणी लावलेली पोस्टर्स, जागोजागी फिरणाऱ्या जीप्स, मिरवणुका, घोषणांचा गदारोळ, लाखालाखांच्या सभा, नेहरूंचे भाषण समजले नाही तरी त्यांचा आवाज भक्तिभावाने कानात साठवणारा श्रोतृसमुदाय, इतर राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तशाच सभा याशिवाय नेहरू निवडणुकांची कल्पनाच करू शकत नव्हते. असे उत्सवी वातावरण हे उत्सवप्रिय भारतीयांनाही भावणारे होते. अशा सभांना जमणारा समुदाय आणि कुंभमेळ्याला जाणारे यात्रिक यांच्यात काहीच फरक नव्हता. भाविकताच दोहोंच्याही मुळाशी असे. तसेच काँग्रेसची ती परंपराही होती. दरवर्षी काँग्रेसचा उरूस भरत असे त्यालाही अशीच भाविकांची गर्दी उसळत असे. अशी गर्दी हेच काँग्रेसचे ऐश्वर्य आणि वैभव होते. साहजिकच स्वातंत्र्यानंतर निवडणुकांसंबंधात तीच सवय कायम राहणे अटळ होते. निवडणुकांकडे जनतेच्या शिक्षणाची संधी म्हणून पाहण्याची आपल्यास दृष्टीच नव्हती. गर्दी जमवणे आणि लोकांच्या भावनांना आवाहन करणे म्हणजेच निवडणूक-प्रचार असे समीकरण त्यामुळे सहजच तयार झाले. नेहरूंचा पिंडही त्याला अनुरूप होता. नव्हे त्यांचे ते ऐश्वर्य आणि वैभव होते.

अशा थाटात निवडणुका लढवावयाच्या म्हणजे प्रचंड निधीची गरज भासणारच. असा निधी भांडवलदारांकडूनच मिळण्यासारखा होता. त्याच्या बदल्यात त्यांना हव्या असलेल्या सवलती देणे हे पाठोपाठ आलेच. निवडणुकीसाठी उमेदवार स्वत:चाही पैसा खर्च करीत असत. लोकसेवेची संकल्पना आपल्याला परकी असल्यामुळे निवडून आल्यानंतर खर्च केलेला पैसा वसूल करणे एवढेच नव्हे, तर पुढच्या काही पिढ्यांची सोय करणे हेही त्यांचे प्रथम कर्तव्य असे. असा पैसा भ्रष्टाचारानेच मिळविता येतो. त्या प्रक्रियेत काळा पैसाही तयार होतो. अशा तऱ्हेने भारतात नव्यानेच जी लोकशाही प्रक्रिया सुरू झाली होती तिच्यावर बाल्यावस्थेतच भ्रष्टाचाराचेच संस्कार झाले आणि

लोकसेवा हे जे तिचे ईप्सित, त्याची भ्रूणहत्या झाली.

निवडणुका आणि पैसा यांचे अशा तऱ्हेने जातक जुळल्यानंतर पैसा मिळविण्याचे नवीन नवीन मार्ग शोधण्यात येऊ लागले. या तंत्रात परिपूर्णता आणली गेली ती इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या कारकीर्दीत. भांडवलदारांखेरीज तस्कर आणि बिल्डर यांनाही या प्रक्रियेत सामील करून घेण्यात आले. 'अधिकस्य अधिकं फलं' या न्यायाने गुंडांचेही साहाय्य मिळविण्यात आले. तथापि अशा तऱ्हेने पैसा मिळविण्यावर उघड मर्यादा होत्या. म्हणून सोन्याची अंडी घालणाऱ्या हंसीचा शोध सुरू झाला. तिचा शोध लागला तो जागतिक स्वरूपाची कंत्राटे देण्याच्या व्यवहारात. या देशाकडून अब्जावधी रुपयांच्या मालाची खरेदी करताना त्यातून मिळणारी दलाली तशीच प्रचंड असणार हे काही चतुर राजकारण्यांनी जाणले आणि त्यातून बोफोर्स, पाणबुड्या, विमानखरेदी अशी भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे निघाली. अशा तऱ्हेने आज जो भ्रष्टाचाराचा आणि काळ्या पैशाचा महापूर लोटला आहे त्याचे मूळ भारतीय व्यक्तिमत्त्वातच शोधावे लागते- सत्ताधारी नि सत्ताकांक्षी लोकांत लोकसेवेच्या संकल्पनेचा असलेला संपूर्ण अभाव आणि सत्तास्थानाकडे केवळ वैयक्तिक उत्कर्षाचे साधन म्हणून पाहण्याची त्यांची वृत्ती.

लोकशाहीचे राखणदार अशा तऱ्हेने लोकशाहीला 'भारतीय' स्वरूप देण्यात दंग असताना वर पाहिल्याप्रमाणे नोकरशाहीचेही भारतीयीकरण सुरू झाले होते. वस्तुत: नोकरशाहीवर लोकनियुक्त सभासदांचा वचक असणे हे लोकशाहीच्या कार्यपद्धतीचे प्रमुख अंग. पण लोकनियुक्त सभासदच वैयक्तिक उत्कर्षाच्या मागे लागलेले. त्यामुळे त्यांना ज्या प्रकरणात रस असेल तेवढी प्रकरणे निस्तारली म्हणजे इतर बाबतीत नोकरशहा सर्वेसर्वा झाला. इंग्रजी राजवटीतही कोणताही धोका न पत्करता जेवढी वरकमाई करता येईल तेवढी तो करतच होता. लोकप्रतिनिधींचा वचक नाही म्हटल्यावर त्याला अधिकच फावले.

त्यात परवाने, नियंत्रणे, अनुदाने, कल्याणकारी योजना, अनेक नवे कर, इत्यादींमुळे त्यांच्यासमोर भ्रष्टाचाराची अलीबाबाची गुहाच खोलली गेली. भ्रष्टाचारी लोकनियुक्त सभासद आणि नोकरशहा, तसेच त्यांच्या कारभारामुळे आणि निवडणुकीतील अपप्रकाराने भ्रष्टाचाराला सरावलेली जनता, या सर्वांच्या कारणे समाजात सार्वत्रिक भ्रष्टाचाराचे वातावरण निर्माण झाले. प्रत्यक्ष भ्रष्टाचारापेक्षाही असे वातावरण अधिक घातक असते. कारण त्याचे स्वरूप रोगाच्या साथीप्रमाणे असते. रोगाच्या साथीत रोगाची केव्हा आणि कोणाला लागण होईल हे सांगता येत नाही. त्याप्रमाणे

भ्रष्टाचाराच्या वातावरणात भ्रष्टाचार केव्हा कोणाचा बळी घेईल हे सांगता येत नाही. एक उदाहरण देता येण्यासारखे आहे. १९४२ च्या चळवळीत कोणतीही अपेक्षा न धरता सर्व तऱ्हेचा त्याग अनेकांनी केला. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांच्यापैकी कित्येकजण भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले आहेत. त्यातही एक फरक लक्षात घेण्यासारखा आहे. इंग्रजी राजवटीत ज्यांचा प्रतिसाद परिपूर्ण होता त्या जातीतील नेत्यांचा भ्रष्टाचारात सहभाग नाही. पण ज्यांचा प्रतिसाद अत्यल्प होतो त्यांचीच भ्रष्टाचार ही मक्तेदारी आहे. भ्रष्टाचाराच्या ऑक्टोपसने आता एकही क्षेत्र मुक्त ठेवले नाही. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही, विना अनुदान संस्था काढून, सार्वजनिक कार्यकर्त्यांनी शासकीय सहकार्याने, गरजू विद्यार्थ्यांची आर्थिक लूट करून जो हाहाकार माजवला तो पाहिला म्हणजे लोकशाहीचे 'भारतीय' स्वरूप पाहून हतबुद्ध व्हायला होते. राजकीय भ्रष्टाचार अशा तऱ्हेने जोरात फुलत असताना शासकीय भ्रष्टाचारानेही बाळसे धरले. आयकर, विक्रीकर, अबकारीकर, रोजगार हमी योजना, बँकांच्या कर्जयोजना, परवाने, नियंत्रणे, जी काय व्यवस्था असेल तिच्याकडे फक्त भ्रष्टाचाराचे साधन म्हणूनच कर्मचारी पाहू लागले. नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती यांनाही या रोगाने ग्रासले. आणि या प्रक्रियेत काळ्या पैशाचीही प्रचंड वाढ झाली. त्याची चर्चा अनेक अर्थतज्ज्ञांनी केली आहे.

भ्रष्टाचाराचा ओघ वरून खाली येतो असा अनेक विचारवंतांचा एक आवडता सिद्धांत आहे. सत्ताधारी भ्रष्ट असतात म्हणून खालचेही लोक भ्रष्ट होतात असा त्याचा रोख. मला स्वतःला तरी त्याचा अर्थ कळत नाही. एक उदाहरण देतो. महापालिकेच्या आयुक्तांनी एखादी निविदा किंवा कामाचे बिल मंजूर करताना लाच घेतली, आणि नाक्यावर जकात वसूल करणारा पैसे खातो, या दोन घटनांत भ्रष्टाचाराचा ओघ कुठून कुठे वाहतो ? किंवा शिक्षणमंत्र्यांनी विना अनुदान शैक्षणिक संस्थांच्या भ्रष्टाचारास संमती देऊन त्यात हिस्सा घेतला म्हणून परीक्षकाने पैसे घेऊन विद्यार्थ्याला उत्तीर्ण करावे यात अर्थाअर्थी काही संबंध आहे का ? शासकीय अधिकारी, नाकेकारकून, मंत्री आणि परीक्षक हे सर्वच भ्रष्टाचारी आहेत एवढाच त्याचा अर्थ. भ्रष्टाचाराचा ओघ वरून खाली आला म्हणूनच बाकीचे भ्रष्टाचारी नाहीत; तर स्वतंत्रपणे आणि आपल्या अधिकारात प्रत्येकजण भ्रष्टाचारी असतो. नगरपालिकेत इमारतींचे नकाशे मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यावर त्याने पैसे खाल्लेच पाहिजेत आणि त्यांचा हिस्सा पोचता केला पाहिजे अशी सक्ती आयुक्त करीत नसतात. भ्रष्टाचाराच्या ओघाचा सिद्धांत साधारणपणे बांधकाम खात्यापुरता मर्यादित आहे. अगदी इंग्रजी राजवटीपासून

दर महिन्याच्या महिन्याला प्रत्येक कर्मचाऱ्याचा वरकड कमाईतील हिस्सा त्याच्या टेबलावर पोचता केला जातो. अगदी दोन महिन्यांकरता अकाउंट्स खात्याने एखाद्या कर्मचाऱ्याला प्रतिनियुक्तीवर पाठवले असेल तर त्याचाही हिस्सा त्याला दिला जातो. इतक्या 'प्रामाणिकपणे' भ्रष्टाचाराची पद्धत त्या खात्यात राबवली जाते. पण इतरत्र भ्रष्टाचाराच्या ओघाचा सिद्धांत लागू पडत नाही. वस्तुस्थिती अशी आहे, की माझ्या भ्रष्टाचाराचे समर्थन 'वरपासूनच हे चालू आहे' या शब्दात मी करतो. विचारवंत नेहमीच सिद्धांताच्या शोधात असतात. माझ्या समर्थनात त्यांना तो सापडतो. आणि भ्रष्टाचाराचा ओघ वरून खाली वाहतो असा सिद्धांत ते मांडतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात मूल्याधिष्ठित राजकारण होते आणि स्वातंत्र्यानंतर मूल्यविहीन राजकारणाला सुरुवात झाली असे एक अतिसुलभ विश्लेषण अनेकदा केले जाते. वस्तुस्थिती अशी आहे, की समाजाचा पिंड भ्रष्टाचाराला अनुरूप असेल तर संधी मिळताच त्या समाजात भ्रष्टाचाराचे भूत थैमान घालते. संधीच्या अभावी भ्रष्टाचार सुप्त असतो. भारतातील परिस्थिती साधारणपणे अशीच आहे असे म्हणता येईल. या संदर्भात कोणतीही टिपणी न करता एका घटनेसंबंधात गांधीजींनी केलेले भाष्य उद्धृत करतो. त्यांनी 'टिळक स्वराज्य फंड' नावाचा एक कोटी रुपयांचा निधी उभारला. त्यात अफरातफर झाली असा काहींनी आरोप केला. त्याला उद्देशून गांधींनी निवेदन केले. त्यात ते म्हणतात, 'काही प्रकरणात ज्यांच्याकडे निधी सोपविला होता ते ट्रस्टशी प्रामाणिक राहिले नाहीत हे नि:संशय ! पण त्याचा अर्थ एवढाच, की कॉंग्रेस इतर सर्व संस्थांप्रमाणेच अपरिपूर्ण आहे आणि सर्व तऱ्हेची माणसे तिच्यात मौजूद आहेत. जिच्यामध्ये अप्रामाणिक माणसे नाहीत अशी जगातील एकही संस्था मला माहीत नाही आणि कॉंग्रेस त्याला अपवाद नाही.' भारतातील प्रत्येक भ्रष्टाचारी माणसाचे गांधींच्या शब्दात समर्थन करता येणार नाही का ?

बेकायदेशीर भ्रष्टाचाराबद्दल येथवर विवेचन केले, पण नैतिक भ्रष्टाचाराबद्दल मात्र कोणी लिहीत नाही. आपला जो न्याय्य वाटा आहे त्यापेक्षा अधिक मागणे हा नैतिक भ्रष्टाचार, तर वैध वाट्यापेक्षा जास्त घेणे हा बेकायदेशीर भ्रष्टाचार. पुष्कळ वेळा वैध वाटा न्याय्य वाट्यापेक्षा अधिक असतो. उदा., संघटित कामगार आपल्या संघटनेच्या शक्तीचे प्रदर्शन करून राष्ट्रीय उत्पन्नात आपला जो न्याय्य वाटा असेल त्यापेक्षा कितीतरी अधिक पदरात पाडून घेतात. या नैतिक भ्रष्टाचाराबद्दल कोणीही काहीच बोलावयास तयार नसतो. कारण तसे करणे म्हणजे कामगारविरोधी आणि म्हणून प्रतिगामी भूमिका घेणे असे मानले जाते.

**गरिबी हटाव**

दारिद्र्य ही आजची आणखी एक समस्या. किती लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, कितीजण निरनिराळ्या योजनांमुळे दारिद्र्यरेषेच्या वर आले, किती कॅलरीज परवडणाऱ्याला दारिद्र्यरेषेवर असलेला समजावे, अशा अनेक गोष्टीबद्दल आकडेशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ज्ञ चर्चा करीत असतात. पण एका मूलभूत प्रश्नाबद्दल मात्र सर्वच जण मौन धरून असतात, तो म्हणजे दारिद्र्य नष्ट व्हावे याबद्दल खरोखरीच कोणाला आस्था आहे का ? राजकारण्यांना तसे वाटते का ? सुखवस्तु लोकांना आपलाही त्यात सहभाग असावा असे कधी जाणवते का ? या सर्व प्रश्नांची नकारार्थीच उत्तरे द्यावी लागतील. आपल्यामध्ये सामाजिक सद्भावाची कोणतीही जाणीव नाही. दारिद्र्य आणि दैन्य पाहण्यास आपण सरावलो आहोत, दुसऱ्याच्या भल्याबद्दलची बेफिकिरी आपल्या अंगात मुरली आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्य निवारणाबद्दल उदासीनता नसली तरच नवल ! शिवाय दारिद्र्याचे समर्थन फार पूर्वीच भारतीय संस्कृतीने करून ठेवले आहे. मागील जन्मी केलेल्या पापाची फळे या जन्मात प्रत्येकजण भोगत असतो. आपण सुखवस्तू असल्यामुळे आपण गेल्या जन्मी पुण्य केले होते हे निश्चित ! मग ज्यांनी पाप केले असेल त्यांच्याबद्दल कळवळा कशाकरिता ? अशा तऱ्हेने ' गरिबी हटाव 'बद्दल कोणालाच स्वारस्य नसले तरी राजकारण्यांना गरिबांमध्ये मात्र स्वारस्य असते. कारण गरिबांनाही मताधिकार असतोच.

म्हणून अधूनमधून दारिद्र्याबद्दल लिहिले जाते, त्याच्या निवारणासाठी योजना आखल्या जातात, घोषणा केल्या जातात. तथापि घुशीला मारले असता ती अधिकच फुगते असे म्हणतात. त्याप्रमाणे दारिद्र्य अधिकाधिक फुलतच चाललेले दिसते.

दारिद्र्य म्हणजे नेमके काय ? तर ज्या व्यक्तीला एक ठराविक कॅलरीज अन्न परवडत नाही तो दरिद्री. इंग्रजी राजवटीपूर्वी दारिद्र्य होते काय ? उत्तर देणे कठीण आहे. कारण त्या वेळी कोणाला किती कॅलरीज परवडत होत्या याची नोंद नाही. तथापि दारिद्र्य असावे हे निश्चित ! कारण दुष्काळ पडून माणसे मेल्याचे, वाचण्यास मिळते., म्हणजे दुष्काळात मेलेल्यांना आवश्यक कॅलरीज मिळत नव्हत्या हे निश्चित ! पण त्यापलीकडे दारिद्र्याचे नेमके स्वरूप काय होते हे सांगणे कठीण. इंग्रजी राजवटीत दारिद्र्य वाढले हे निश्चित. कारण १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात बंगालमध्ये दुष्काळ पडला तेव्हा असंख्य लोक मेले, आणि त्याची नोंद ब्रिटिश सरकारलाही घ्यावीशी वाटली होती. इंग्रजी राजवट दृढमूल झाल्यानंतरच भारतातील दारिद्र्याचा शोध सुरू झाला. इंग्रजी राजवटीपूर्वी दारिद्र्य होते, पण त्याचा शोध

घेतला गेला नाही. भूकबळी पडले होते पण त्यांची जबाबदारी कोणावरही नव्हती. भारतातील दारिद्र्याचा शोध सुरू झाल्यानंतर असे आढळून आले, की भारतातील इंग्रजी राज्याची स्थापना आणि इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती या दोन्हीही घटना एकाच सुमारास घडल्या. कच्च्या मालाचा पुरवठा करणारा देश आणि हक्काची बाजारपेठ या दृष्टीने भारताकडे इंग्रज पाहू लागले. इंग्लंडमध्ये यंत्राच्या साहाय्याने उत्पादन केला जात असलेला पक्का माल भारतात येऊ लागल्यावर त्याच्याशी स्पर्धा करणे एतद्देशीय उद्योगधंद्यांना शक्य झाले नाही. शिवाय इंग्रज सरकारचे वित्तीय धोरणही इंग्रजी मालाच्या आयातीस उत्तेजन देण्याचे असल्यामुळे येथील उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर बुडाले, कारागीर बेकार झाले, आणि त्यांच्या पोषणाचा भार शेतीवरच पडला. त्याशिवाय आधुनिक राज्यपद्धतीच्या आणि अनेक लढाया लढल्या गेल्या त्यांच्या खर्चाचा भार प्रामुख्याने शेतकऱ्यांवरच पडला. त्यामुळे शेतकरी अधिकाधिक गरीब होऊ लागला. भारतातील दारिद्र्याचे विश्लेषण करताना दादाभाई नौरोजी यांनी 'संपत्तीच्या ओघाचा' सिद्धांत (ड्रेन थिअरी) मांडला. त्यांनी असे प्रतिपादन केले की संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वाहात असल्यामुळे भारत दरिद्री झाला आहे. तथापि भारतातील दारिद्र्याची अत्यंत यथार्थ मीमांसा न्या. रानडे यांनी केली आणि त्याचा संबंध भारतीय व्यक्तिमत्त्वाशी जोडला. ते म्हणतात, 'परकीय चढाओढ ही नुसती परकीय आहे म्हणून घातक नव्हे. ती मनुष्यशक्ती विरुद्ध निसर्गशक्ती, अज्ञान व आळस यांविरुद्ध विज्ञानशक्ती आणि संघटनकौशल्य, यांच्यातील विषम अशी चढाओढ आहे. तीमुळे केवळ संपत्तीच आपल्याकडून दुसऱ्याकडे जात आहे असे नव्हे, तर त्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे बुद्धी, निपुणता आणि कार्यकर्तृत्वही आपणास सोडून दुसरीकडे जात आहेत.' तथापि ही दुरवस्था निव्वळ खाजगी प्रयत्नाने दूर होऊ शकणार नाही याची त्यांस जाणीव होती. म्हणून त्यांनी शासकीय साहाय्याची आवश्यकता प्रतिपादन केली. 'ही (शासकीय) मदत अनेक प्रकारे होऊ शकेल. परस्पर सहकार्याने चालविलेल्या पेढ्यांची स्थापना करणे, त्यांनी दिलेल्या कर्जाची फेड करवून घेण्यास मदत करणे, हमी किंवा द्रव्य-साहाय्य देऊन नव्या धंद्यांना उत्तेजन देणे, परदेशात व स्वदेशाच्या निरनिराळ्या भागात वसाहती करण्यास सवलती देणे, यांत्रिक धंद्यांच्या शाळा काढणे, आपणास लागणारा माल अधिकाधिक स्वदेशीच घेणे आणि अनेक बाबतीत तो आपणच तयार करणे, इत्यादी मार्गांनी ही मदत होऊ शकेल.' औद्योगिक प्रगतीची आवश्यकता व्यक्त करताना ते म्हणतात, 'देशाचे शाश्वत हित, भारतीय कारखाने व व्यापार यांच्या वृद्धीवर अवलंबून आहे यात

शंका नाही. इतर उपायांनी फार तर अडचणींचा तात्पुरता परिहार होऊ शकेल.' याचा अर्थ औद्योगिक उत्पादन वाढविणे, त्यासाठी शासकीय धोरणात योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी शासनावर दडपण आणणे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वात योग्य तो बदल घडवून आणणे हे त्यांच्या विश्लेषणाप्रमाणे राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या चळवळीचे प्रमुख अंग असावयास हवे होते. तथापि त्या दृष्टीने राष्ट्रीय नेत्यांनी जारीने प्रयत्न केलेले दिसत नाहीत. पण १९२० पर्यंत निदान त्यांचा आर्थिक प्रगतीला विरोध तरी नव्हता. भारतीय पुढाऱ्यांनी स्थापन केलेल्या बँका आणि टिळकांच्या आशीर्वादाने तळेगाव येथे सुरू झालेला पैसा फंड काच कारखाना ही त्याची उदाहरणे. परंतु १९२० नंतर दारिद्र्याचे आणि आत्मपीडनाचे राजकारण सुरू झाले आणि त्यात दारिद्र्यनिवारणाची समस्या मागे पडली ती कायमचीच. गांधींनी भारत खेड्यात आहे या प्रश्नाकडे लक्ष वेधले खरे; पण त्यावर उपाय होता तो आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कुटिरोद्योग आणि लहान प्रमाणावरील उद्योगधंदे यांना उत्तेजन देणे. पण त्याऐवजी गांधींनी मार्ग सुचविला सूतकताईच्या जोड-धंद्याचा.

गांधींना खुद्द आपला आश्रम स्वावलंबी करता आला नाही. देणग्यांवर तो कसाबसा गुजराण करत होता आणि सूतकताईच्या मार्गाने भारतातील सर्व खेडी स्वयंपूर्ण करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. साहजिकच १९२० पासून १९४७ पर्यंत औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने राष्ट्रीय चळवळीत सर्व सामसूम होते.

आणखी एका गोष्टीशी दारिद्र्याचा अगदी निकटचा संबंध आहे. तो म्हणजे लोकसंख्येशी. लोकसंख्येला आळा घातला नाही तर उत्पादनवाढ होऊनही दारिद्र्याची समस्या सुटणार नव्हती. या मूलभूत गोष्टीकडे लक्ष वेधण्याचा अत्यंत जोरकसपणे प्रयत्न केला तो महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत र. धों. कर्वे यांनी. पण त्यांची टिंगलटवाळीच झाली. काँग्रेस पक्षालाही या विषयात रस नव्हता. आणि त्याचे क्रियाशील कार्यकर्ते दोन सत्याग्रहांच्या दरम्यान सूतकताई आणि प्रजोत्पादन या जोडधंद्यात स्वतःला गुंतवून ठेवीत होते. अशा तऱ्हेने औद्योगिक प्रगती आणि लोकसंख्येला आळा, या दोन्ही बाबतीत स्वातंत्र्यपूर्व कालात अक्षम्य अशी हेळसांड करण्यात आली.

स्वातंत्र्यानंतर लोकसंख्येच्या बाबतीत तीच उदासीनता दाखविण्यात आली. राजकुमारी अमृतकुंवर या आरोग्यमंत्री होत्या. त्या ख्रिश्चन असल्यामुळे कुटुंबनियोजनाला त्यांचा विरोध होता. त्यांचे पूर्वग्रह जपण्यासाठी लोकसंख्येच्या प्रश्नाकडे सुरुवातीला संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. महायुद्धानंतर लागलेल्या शोधामुळे मृत्यूचेही प्रमाण

कमी झाले आणि लोकसंख्येचा प्रचंड स्फोट झाला. गरिबी हटवण्याच्या मार्गातील तो एक प्रचंड अडथळा आहे.

लोकसंख्येची नसली तरी औद्योगिक प्रगतीच्या आवश्यकतेची मात्र नेहरूंना जाण होती. त्यामुळे त्यांनी आर्थिक नियोजनाला सुरुवात केली. आर्थिक नियोजन आणि त्यातून झालेली औद्योगिक प्रगती ही पं. नेहरूंची भारताला एक शाश्वत देणगी आहे. तथापि नियोजनातील चुकीच्या अग्रक्रमामुळे श्रीमंत नि गरीब यांतील दरी वाढतच गेली. शिवाय लोकसंख्येची वाढ लक्षात घेता विकासाचा वेग आवश्यकतेपेक्षा कमी राहिला. भारताच्या घटनेमध्ये आर्थिक समतेचे उद्दिष्ट नमूद केले आहे. ते अंमलात आणण्यासाठी कठोर उपायांची जरुरी होती. त्याच्याअभावी आश्वासने आणि अंमलबजावणी यात सतत तफावत राहिली. गुन्नार मिर्दाल यांनी म्हटले आहे की, 'बोटचेप्या धोरणामुळे भारत नरम राष्ट्रच राहिले.' (सॉफ्ट ॲप्रोच मेड इंडिया ए सॉफ्ट स्टेट) आणि अशा राष्ट्राला कोणत्याही समस्या सोडविता येत नसतात. गरिबीचे तेच झाले आहे.

समस्या सोडविता आल्या नाहीत तरी आश्वासने देता येतात आणि निवडणुकीत तर त्यांची खैरात असते. दारिद्र्याचे चटके ज्यांना बसत असतात त्यांना आश्वासनामुळे उगाचच आशा वाटू लागते. नि गेली चाळीस वर्षे याच आशेवर गरीब जगत आहेत. इंदिरा गांधींनी 'गरीबी हटाव' ही घोषणा दिली तेव्हापासून तर 'गरिबी' हे निवडणुकीतील चलनी नाणे झाले आहे. प्रत्येक पक्ष आता दारिद्र्यनिर्मूलनाची आश्वासने देत आहे, पण प्रत्यक्षात मात्र काही होत नाही. हे असे का ? याचा शोध घेतला पाहिजे. पण त्याचबरोबर आपली जबाबदारी किती हेही तपासले पाहिजे.

भारताच्या घटनेमध्ये आर्थिक न्यायाच्या उद्दिष्टांचे तत्त्व अंतर्भूत केले आहे. परंतु ती जबाबदारी शासनाची असून आपला त्याच्याशी काहीही संबंध नाही अशी सर्वांची समजूत आहे. एखाद्या उत्तुंग इमारतीचे बांधकाम चालू असता आपण त्याच्याकडे अगदी त्रयस्थपणे अचंब्याने पाहात असतो. त्याचप्रमाणे शासन आर्थिक समता आणण्याचा अद्भुत प्रयोग करीत असून आपण त्याच्याकडे निव्वळ कुतूहल म्हणून पाहात राहावे आणि तो यशस्वी झाला नाही, तर शासनाला हास्यास्पद ठरवावे अशी आपली काहीशी वृत्ती असते. तो प्रयोग फसण्यात आपलाही काही सहभाग असू शकतो याची आपल्याला दखलच नसते. त्यातही खेदाचा भाग हा, की शासनाने जर दारिद्र्यनिवारणासाठी काही योजना आखल्या तर त्याचा लाभ गरिबांपर्यंत पोहोचण्याआधी त्यांची अंमलबजावणी करणारेच त्यातला बराचसा भाग हडप करतात.

रोजगार हमी योजनेत, बँकांच्या कर्जयोजनेत किंवा अशाच इतर योजनांमध्ये अंमलबजावणी अधिकारीच भ्रष्टाचार करीत असतात आणि तो भ्रष्टाचार अरुण भाटियासारख्या अधिकाऱ्याने चव्हाट्यावर आणला तर भ्रष्टाचाराशी संबंधित मंडळी आपले सरकारदरबारी असलेले वजन खर्च करून अशा अधिकाऱ्यांचीच बदली करवून घेतात. म्हणजे भ्रष्टाचारी अधिकारी आणि त्यांना आशीर्वाद देणारे मंत्री हेच दारिद्र्यनिवारणाच्या कार्यातील मोठा अडथळा आहेत. पण माझ्यासारख्यांचाही त्याला हातभार असतोच. फसवेगिरी हा आपला स्थायीभाव झाला आहे. त्यामुळे माझ्यासारखे अनेकजण बनवाबनवी करून अशा योजनांचा लाभ आवश्यकता नसताना उठवतात, तर काहीजण वेगळ्या तऱ्हेने सुपर बनवाबनवी करून आपला हात दाखवतात. ज्या विहिरींसाठी कर्ज मंजूर होते ती विहीरच गायब झाल्याच्या किंवा तीच तीच म्हैस पुन्हा पुन्हा दाखवून कर्ज घेतल्याच्या प्रकरणांबद्दल वृत्तपत्रातून बऱ्याच वेळा वाचावयास मिळते. इतरही बनवाबनवीची अशीच असंख्य प्रकरणे असतात. अशा परिस्थितीत जे खरोखर गरीब आहेत, त्यांच्यापर्यंत निरनिराळ्या योजनांचा लाभ पोहोचणे कठीण आहे. दारिद्र्यनिर्मूलनाच्या मार्गातील आणखी एक धोंड म्हणजे जे गरीब आहेत त्यांना दारिद्र्य जाचत नाही. दैन्याला ते इतके सरावलेले असतात, की आपली आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे याची त्यांना जाणीवच नसते. दैववादी वृत्तीने त्यांना दारिद्र्य न कुरकुरता स्वीकारण्यास शिकविलेले असते.

तथापि दारिद्र्यनिवारणाचा प्रश्न दोन मूलभूत गोष्टींशी निगडित आहे. त्या म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ आणि त्याचे न्याय्य वाटप. उत्पादनवाढ आणि निर्यात या दोन मार्गांनी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊ शकते. राष्ट्रीयीकृत उद्योगात पूर्ण क्षमतेने उत्पादन होत नाही. पण त्याबद्दल तेथे काम करणाऱ्यांसकट सर्वचजण बेफिकीर आहेत. संप, टाळेबंदी यांमुळे कोटचवधी तासांचे उत्पादन बुडते. मालक आणि कामगार या दोघांचाही आडमुठेपणा त्याला कारणीभूत असतो. स्वयंरोजगाराचा एक उपाय उत्पादनवाढ आणि बेकारी-निर्मूलनासाठी सुचविला जातो. पण हजारो उद्योगधंदे आजारी आहेत, त्यांनी उत्पादन केलेला माल कसा खपवावा ही त्यांची समस्या असते. निर्यातीच्या बाबतीत जपान आणि कोरिया यांसारख्या देशांनी जे यश मिळविले आहे त्याच्या तुलनेत भारत कोठल्या कोठे मागे पडला आहे. त्यात उद्योजकांची मालाच्या दर्जाबाबत फसवेगिरी असतेच. उत्पादनवाढीची जी समस्या आहे तिच्या मुळाशी श्रमसंस्कृतीचा आणि नवोपक्रमशीलतेचा अभाव हीच कारणे आहेत. आणि त्यांच्यावर आपल्याकडे उपाय नाही.

उत्पादनवाढीच्या अभावापेक्षाही राष्ट्रीय उत्पन्नाच्या न्याय्य वाटपाचा अभाव, दारिद्र्याला जास्त कारणीभूत आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा जास्तीत जास्त वाटा संघटित कामगारांनी ओरबाडून घेतल्यानंतर जे असंघटित आहेत त्यांच्या वाट्याला दारिद्र्याखेरीज दुसरे काय येणार ? भांडवलदार शोषण करतात म्हणून ओरडा केला जातो. पण भांडवलदार करून करून किती शोषण करतील ! टाटा, बिर्ला, मोदी, अशा मोठमोठ्या भांडवलशहांचे नियंत्रण असलेल्या कंपन्यांच्या भांडवलात किती वृद्धी झाली याचे नेहमी आकडे दिले जातात. पण या आकड्यांची तुलना करताना किमतीची पातळी आणि त्यातील वाढ लक्षात घ्यावयाची असते हे माहिती नसल्यामुळे माझ्यासारखा सामान्य माणूस ते वाचून हबकून जातो. शिवाय या कंपन्यांचे ताळेबंद तपासले तर त्यांच्या नफ्यातील वृद्धी काही कोटींपेक्षा जास्त नसते. पण महागाईभत्त्याचा एक हप्ता केंद्रीय कर्मचाऱ्यांना आणि राज्य कर्मचाऱ्यांना दिला तर शेकडोशे कोटी रुपये त्यात खर्ची पडतात. आणि ही वाढ दर सहा महिन्यांनी दिली जाते. एक जानेवारी १९८६ ला नवीन वेतनश्रेणी आल्यापासून चार वर्षांत महागाईभत्ता म्हणून मूळ वेतनाच्या सत्तर टक्के रक्कम जास्त दिली जात आहे. हा पैसा कोठून येतो ! गरिबांना अधिक दरिद्री करूनच ना ? जास्त पैसा बाजारात आला की किंमतवाढ होते. आणि किंमतवाढ झाली की महागाईभत्त्याचा नवीन हप्ता, हे दुष्टचक्र अधिकाधिक तीव्र होत आहे. पण गरिबांचे उत्पन्न मात्र त्या प्रमाणात वाढत नसल्यामुळे ते अधिकाधिक गरीब होत आहेत. भांडवलशाहीत श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होतात असे म्हटले जाते. पण समाजवादी म्हणवून घेणाऱ्या भारतात संघटित कामगार अधिक श्रीमंत, आणि असंघटित कामगार आणि गरीब अधिक गरीब होत आहेत. आणि त्याला भांडवलशहांपेक्षाही समाजवादी, साम्यवादी व इतर कामगार नेतेच जास्त कारणीभूत आहेत. पण त्यांच्यापैकी एकाही महाभागाला असे म्हणावेसे वाटत नाही, की कामगारांना आता भरपूर मिळत आहे, तेव्हा भांडवलशहांच्या नफ्याप्रमाणेच त्यांच्याही वेतनवाढीवर अंकुश लावला पाहिजे.

निरनिराळ्या कंपन्यांनी कामगारांबरोबर केलेल्या करारपत्राबद्दल वर्तमानपत्रात नेहमीच वाचावयास मिळते. महिना ५००, ७५०, १०२० रु. ची अशा तऱ्हेने कामगारांच्या वेतनात वाढ होत असते. म्हणजे असंघटित मजुराला जे वेतन मिळते त्यापेक्षाही संघटित कामगाराच्या वेतनातील निव्वळ वाढ जास्त असते. म्हणजे एकूण वेतन कितीपटीने जास्त असेल याचा अंदाज येऊ शकतो. एवढा पगार कंपनीला कसा परवडतो तर नफा जास्त होतो म्हणून. नफा जास्त होतो तो उत्पादनमूल्य

आणि विक्रीच्या किमतीतील तफावतीतून. तफावत जेवढी जास्त तेवढा नफा जास्त. याचाच अर्थ उत्पादन केलेल्या वस्तू अतोनात महाग विकून त्यातून जो नफा होतो तो उद्योजक आणि संघटित कामगार दोघे मिळून आपापसात वाटून घेतात. हे निव्वळ शोषण नव्हे, तर गरिबांना लुटण्याचा कट आहे आणि त्यात कामगार नेते, शासन, समाजवादी, साम्यवादी, सर्वचजण सहभागी असतात. १९ व्या शतकात एका अमेरिकन लेखकाने तेथील भांडवलदारांची तुलना मध्ययुगातील ' लुटारू सरदारां 'शी (रॉबर बॅरन) केली होती. भारतातील भांडवलदारांचे आणि संघटित कामगारांचे वर्णन लुटारू सरदार आणि लुटारू सैनिक असे करता येईल. कोट्यवधी भारतीय दारिद्र्यरेषेखाली असताना काहीजणांनी - त्यात मीही आहेच - अशा तऱ्हेने राष्ट्रीय संपत्तीची लूट करावी हे न्यायाच्या कोणत्या संकल्पनेत बसते ? अशा तऱ्हेने जो पैसा मिळतो तो चैनीच्या वस्तू घेण्यात खर्च केला जातो. उरलेल्या पैशाला शेअरबाजारात पाय फुटतात. आजकाल पट्टेवाल्यांकडेदेखील शेअरमध्ये गुंतविण्यासाठी पैसा असतो. हे सर्व शक्य होते ते जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतील वाढ वेतनातील वाढीपेक्षा खूपच कमी आहे यामुळे. १९४८ साली खुल्या बाजारात साखरेची किंमत १ रुपया शेर होती. आज ती फक्त आठपट वाढली आहे. सर्व वस्तूंच्या किमतीतील वाढ अशाच तऱ्हेने दहापटीपेक्षा कमी आहे. अपवाद फक्त गोड्या तेलाचा. पण तेवढ्याच काळात संघटित कर्मचाऱ्यांचे वेतन कमीत कमी दहापटीने वाढले आहे. कित्येकांचे त्याहीपेक्षा अधिक पटीने वाढले आहे. किमतीतील वाढीचा बराच मोठा हिस्सा ठोक आणि किरकोळ व्यापारी आपल्या पदरात पाडून घेतात. म्हणजे प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या हातात पडणारा पैसा फारच कमी असतो. त्यातून त्याला भूमिहीन मजुराला किती वेतन द्यायला परवडेल ? याचाच अर्थ असा, की लहान शेतकरी आणि भूमिहीन मजूर यांची पिळवणूक करूनच संघटित कर्मचाऱ्यांची चैन चालली आहे. याला उपाय म्हणजे आजच्या किमतीच्या पातळीवर भूमिहीन मजुराला निदान चाळीस रुपये तरी मजुरी देण्यास शेतकऱ्याला परवडेल अशा तऱ्हेने शेतीमालाच्या किमतीत वाढ करणे. त्यातही मौजेची गोष्ट अशी, की चैनीच्या वस्तूंच्या किमतीत कितीही वाढ झाली तरी त्या विकत घेतल्या जातात, पण शेतमालाच्या किमतीत वाढ झाली की बोंबाबोंब सुरू. भूमिहीन मजुरांप्रमाणेच बिल्डर, कॉन्ट्रॅक्टर इत्यादींकडे जे मजूर काम करतात त्यांनाही असेच अत्यंत कमी मजुरीत राबविण्यात येते. घरगुती नोकर हा आणखी एक शोषित वर्ग. पाच दिवसांचा आठवडा, हक्काची रजा, नैमित्तिक रजा, आजारपणाची रजा, काही ठिकाणी तर हनीमूनची रजा, बोनस, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युईटी, पेन्शन इत्यादी

फायदे पदरात पाडून घेणाऱ्या संघटित कर्मचाऱ्यांनी तशाच सवलती व फायदे आपल्या घरगुती नोकरांना का देऊ नयेत ? म्हणजे संघटित कर्मचारी घरगुती नोकरांचे शोषण करीत असतातच.

दारिद्र्यामुळे विशेषत: शहरात गुन्ह्यांचे प्रमाण अतिशय वाढले आहे. एवीतेवी उपाशी मरायचे, मग त्यापेक्षा गुन्हे करून का जगू नये, अशी प्रवृत्ती आता नव्या पिढीत आढळून येऊ लागली आहे. अनेक तरुण मुले खिसे कापणे, दागिने हिसकावणे, जुगारी अड्ड्यात काम करणे, नशील्या पदार्थाच्या धंद्यात काम करणे, अशा मार्गांनी उपजीविका करीत आहेत. तेही आता हळूहळू संघटित होऊ लागले असून कोणी प्रतिकार केल्यास वेळप्रसंगी ते खूनही करण्यास मागेपुढे पाहात नाहीत. कर्मचारी संघटित झाल्यानंतर ज्याप्रमाणे जनतेस ओलीस धरून आपल्या मागण्या मान्य करून घेतात, त्याप्रमाणे बेकायदेशीर कृत्यात गुंतलेले, संघटित झाल्यानंतर जनतेला ओलीस धरण्यास मागेपुढे पाहणार नाहीत. त्याची सुरुवात झालेली आहेच. गल्लीतील एखाद्या दादाची दहशत तेथील सर्वांनाच असते. फरक एवढाच की, संघटित कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय उत्पन्नावर घातलेला दरोडा, हा समाजवाद असतो, कामगारांच्या क्रांतिकारी एकजुटीचा विजय असतो, तर एखाद्या व्यक्तीच्या उत्पन्नावर घाला घालणे हा गुन्हा असतो. अर्थात संघटित गुन्हेगारीलाही कोठे कोठे राजमान्यता मिळालेली असल्याचेही आढळून येते. एक सामान्य माणूस म्हणून दारिद्र्यनिर्मूलनासाठी काही उपाय सुचवावेसे वाटतात.

१) निरनिराळ्या कंपन्यांच्या नफ्यातून आणि संघटित कामगारांच्या वेतनातून, तसेच व्यापारी, दुकानदार इत्यादींकडून बेकारी निवारण कर वसूल करून त्यातून बेकारीभत्ता देण्यात यावा.

२) कामाचे तास कमी करून तीनऐवजी चार पाळ्या करण्यात याव्या.

३) पती आणि पत्नी या दोघांनाही पूर्णवेळ काम करण्यास परवानगी नसावी. दोघांच्यापैकी एकाने अर्धवेळ नोकरी करावी. फक्त स्त्रियांनी अर्धवेळ नोकरी करावी असा कायदा केल्यास तो अवैध ठरेल. म्हणून कोणी अर्धवेळ नोकरी करावयाची याचा निर्णय त्यांच्यावर सोपविण्यात यावा.

४) पती आणि पत्नी यांचे उत्पन्न एकत्र करून त्यावर आयकर आकारण्यात यावा.

५) पती आणि पत्नी दोघेही निवृत्तिवेतनधारक असतील अथवा इतर मार्गाने त्यांचे उत्पन्न चरितार्थ चालविण्याइतके मिळत असेल तर एकाच्या मृत्यूनंतर दुसऱ्याला कौटुंबिक निवृत्तिवेतन देण्यात येऊ नये.

६) अधिकतम उत्पन्नावर मर्यादा घालण्यात यावी.
७) सर्व क्षेत्रांतील वेतनात समानता (पॅरिटी) आणण्यात यावी.
८) रेशनचे धान्य कमी उत्पन्न गटातील लोकांनाच देण्यात येऊन ते कमी किमतीत पुरवावे. तसेच स्वस्त धान्याची सुविधा, पती, पत्नी आणि तीन मुले एवढ्यापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावी. त्यामुळे या उत्पन्न गटातील लोकांना कुटुंबनियोजनाची गरज भासू लागेल. मागासवर्गीयांसाठी ठेवलेल्या सवलतीही कुटुंबातील फक्त दोन मुलांनाच देण्यात याव्या. या उपायांमुळे सरकारी तिजोरीवरील भार कमी होईल. अशा तऱ्हेने जी बचत होईल तिचा विनियोग दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी विकास योजना अंमलात आणण्यासाठी करण्यात यावा.

**दहशतवाद आणि हिंसाचार**

कोणतेही ईप्सित साध्य करण्यासाठी हिंसा केली जाते त्याला हिंसाचार म्हटले जाते. ज्या वेळी असे उद्दिष्ट राजकीय असते तेव्हा त्याला दहशतवाद म्हणून संबोधले जाते. ब्रिटिश साम्राज्यात आयर्लंडमध्ये प्रथम राजकीय दहशतवादाचा उपयोग सुरू झाला. आयर्लंडवर ब्रिटिशांनी आपले अधिराज्य प्रस्थापित केले होते. तेथील स्वातंत्र्यवादी चळवळीचा एक भाग म्हणून आयरिश देशभक्तांनी दहशतवादास सुरुवात केली. झारच्या रशियात मतस्वातंत्र्यावर सर्व तऱ्हेची बंधने असल्यामुळे तेथील राजकीय विरोधाने अपरिहार्यपणे दहशतवादाचे स्वरूप धारण केले. भारतातही इंग्रजी राजवटीविरुद्धच्या असंतोषाने काही वेळा दहशतवादाचा आसरा घेतला. अलीकडील काळात दहशतवादाचे शास्त्र बनवले ते ज्यूविरोधी संघर्षात अरबांनी. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे केल्या गेलेल्या अन्यायाशी ज्यांचा संबंध नाही अशा व्यक्तींना ओलीस ठेवून राजकीय प्रश्नांशी संबंधित असलेल्या मागण्या मान्य करून घेण्याचा प्रयत्न करणे. दहशतवादाचे हे अत्यंत अघोरी स्वरूप. पंजाब नि आता काश्मीरमध्ये याच स्वरूपाच्या दहशतवादाचा अवलंब केला जातो.

राजकीय दहशतवादाचे स्वरूप समजून घेताना गोंधळात टाकणारा एक प्रश्न नेहमीच उभा राहतो. दहशतवादी कृत्य हे वीरकृत्य की गुन्हेगारी कृत्य ? मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीचा वध केला. त्या कृत्याबद्दल त्याने जे निवेदन केले होते त्याची चर्चिल यांनीही प्रशंसा केली होती. समर्थक आणि विरोधक दोघेही ज्याला निरपवादपणे राष्ट्रभक्तीप्रेरित दहशतवादी कृत्य म्हणतात त्याचे हे एक उदाहरण. तथापि अशी उदाहरणे थोडी असतात. कान्हेरे यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांची हत्या केली. जॅक्सन हा लोकहितदक्ष अधिकारी नि अतिशय रसिक असा माणूस होता.

त्याची हत्या करून नेमके काय साध्य झाले ? त्याच्याऐवजी भारतीयांवर अत्याचार करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या इंग्रज अधिकाऱ्याची हत्या करून ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्धचा असंतोष अधिक समर्थनीय मार्गाने व्यक्त झाला नसता का ? आणखी एका उदाहरणावरून हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. काश्मीरमध्ये मकबूल बट्ट याने काश्मीरबाबतच्या भारताच्या धोरणाचा निषेध म्हणून एका पोलिस इन्स्पेक्टरची हत्या केली. त्याला न्यायालयात शिक्षा होऊन तो फाशी गेला. आपण त्याला गुन्हेगार समजतो. आझाद काश्मीरवाले त्याला हुतात्मा समजतात. मकबूल बट्ट मग खरा कोण ? याचे उत्तर, आपण जी बाजू घेतो, त्यावर अवलंबून असते. पण त्यापेक्षा भारतीय दहशतवाद्यांचे म. गांधींनी 'वाट चुकलेले देशभक्त' असे वर्णन केले होते ते जास्त सयुक्तिक वाटते. पण केवळ सयुक्तिक, वस्तुनिष्ठ नव्हे. कारण दहशतवादी कृत्यांच्या मागे इतक्या विविध प्रेरणा आणि कारणे असतात, की त्यावर कोणताही ठसा मारणे अशक्य आहे. भारतातील दहशतवादी कृत्यांचा मागोवा घेऊनच त्याचे स्पष्टीकरण करणे इष्ट होईल.

सर्वसाधारण भारतीय शांतताप्रिय, पण भारतीय व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू असे आहेत, की त्यामुळे दहशतवादाला वाव मिळतो. भारतीय व्यक्तिमत्त्वाचे एक वैशिष्ट्य म्हणजे न्यायाच्या संकल्पनेचा अभाव, आणि त्यातून निर्माण होणारी दुसऱ्यांच्या हक्कांबद्दलची आणि हितसंबंधांबाबतची बेफिकिरी. दुसरे म्हणजे केवळ वैयक्तिक स्वार्थातच रममाण होणे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वास्तविक पाहता आदिवासी, वेठबिगार, भटक्या आणि विमुक्त जाती, आणि इतर दुर्लक्षित घटक यांच्यासाठी कल्याणकारी योजना अग्रक्रमाने आखण्याची नितांत आवश्यकता होती. पण ज्यांच्या हाती सत्ता आली त्यांना अशी काही समस्या असेल याची जाणीवच नव्हती. तसेच कालहरणाचे इंग्रजी राजवटीचे तत्त्व त्यांनी चटदिशी आत्मसात केलेले. शांततेने मागणी केली, की तिला पाठिंबा नाही म्हणून ठरवावयाचे आणि हताशपणाच्या भावनेतून काहीजणांनी आततायी कृत्ये केली की, हिंसाचारापुढे आम्ही नमणार नाही म्हणून तंबी द्यायची. या धोरणातून नक्षलवादी, नागालोक, गुरखा, बोडो इत्यादी आंदोलने उभी राहिली. त्यांच्याबद्दल जाणीवपूर्वक उदासीनता दाखविल्यामुळे दहशतवादी कृत्ये संघटित स्वरूपात येऊ लागली. मग धावाधाव सुरू झाली. कोणतीही गोष्ट विकोपाला गेल्याखेरीज त्याची दखलच घ्यायची नाही, अशा तऱ्हेची संवेदनशून्यता भारतीय राज्यकर्त्यांनी आत्मसात केली आहे. वर उल्लेखिलेल्या आंदोलनातील आंदोलक हे सर्वजण भारतीय नागरिक आहेत. त्यांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. त्यांना

माणूस म्हणून जगता आले पाहिजे, या कल्पनेला राज्यकर्त्यांच्या विचारसरणीत स्थानच नव्हते. वैयक्तिक स्वार्थ, पक्षीय हितसंबंध आणि भाचे-पुतणेवाद यांतच सर्वजण मशगुल झालेले. अशा परिस्थितीत या दहशतवादाची जबाबदारी कोणाची ?

केवळ पक्षीय हितसंबंध राखण्याच्या धोरणातून दहशतवाद कसा फोफावतो याचे उदाहरण म्हणजे पंजाब. पंजाबमध्ये काँग्रेसचे साम्राज्य अबाधित राहिले पाहिजे या धोरणात पंजाबमधील दहशतवादाचा उगम आहे. गुरुद्वारावर प्रभुत्व असलेल्या महंतांच्या कारवायांना कंटाळलेल्या अकालींनी इंग्रजी राजवटीत आंदोलन सुरू केले. अखेर इंग्रज सरकारला शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचा कायदा करावा लागला. त्याप्रमाणे गुरुद्वारांचे नियंत्रण स्थानिक समित्यांकडे सोपविण्यात आले. आणि त्यांच्या बचतीच्या दहा टक्के रक्कम शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीला देण्यात यावी अशी तरतूद करण्यात आली. अकालींना त्याचा फायदा मिळू नये म्हणून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसमधील काही शीख नेत्यांचा विरोध असूनही, गुरुद्वारा कायद्यात सुधारणा करण्यात आली. त्याप्रमाणे वित्तीय आणि सर्व नियंत्रणाचे अधिकार गुरुद्वारा प्रबंधक समितीकडे सुपूर्द करण्यात आले. कोणत्याही धार्मिक संघटनेतील सत्तेचे केंद्रीकरण हे अखेर जातीयवादाला आवाहन ठरू शकते आणि त्यातून राजकीय सत्तेला आव्हान मिळण्याची भीती असते, हा इतिहासाचा अनुभव नजरेआड करून काँग्रेसने आपले हितसंबंध जपण्यासाठी हा कायदा केला. कारण त्या वेळी काँग्रेसला आपली सत्ता पंजाबमध्ये टिकविण्यासाठी त्याचा फायदा होणार होता. याच धोरणाचा पुढचा भाग म्हणजे १९५६ साली भाषावार प्रांतरचना झाली तरी पंजाबी भाषिक राज्याची निर्मिती करण्यात आली नाही. साहजिकच आपल्याविरुद्ध भेदभाव केला जात आहे अशी शिखांची समजूत झाली. पुढे उग्र आंदोलन झाल्यानंतर पंजाब आणि हरियाणा अशी दोन राज्ये निर्माण करण्यात आली. १९७७ साली जनता लाटेत पंजाबमध्ये अकालींना बहुमत मिळून त्यांचे सरकार पंजाबमध्ये सत्तारूढ झाले. १९८० साली इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्यानंतर अकालींना शह देण्यासाठी अतिरेकी शिखांना काँग्रेसने उत्तेजन दिले आणि त्यातून भिंद्रनवाले यांचा भस्मासुर उभा राहिला. अशा तऱ्हेने तात्पुरते हित साधण्यासाठी दीर्घकालीन हितसंबंधांचा बळी देण्याच्या वृत्तीतून पंजाबमधील दहशतवाद उभा राहिला. वास्तविक स्वातंत्र्यपूर्वकालापासून राष्ट्रीय आंदोलनात शीख सतत सहभागी झालेले आहेत. तसेच शीख आणि हिंदू यांतील संबंध सौहार्दाचे होते, पण त्यांचा बळी देऊन काँग्रेसची सत्ता टिकविणे अधिक महत्त्वाचे ठरले. दहशतवाद एकदा सुरू झाल्यानंतर मग राजकीय उद्दिष्ट बाजूला

राहून समाजविघातक घटकही त्यात सामील होतात. कारण त्यांची कृत्ये राजकीय दहशतवादाच्या नावाखाली खपविता येतात. तसेच वैयक्तिक सूड उगवण्याचे प्रकारही त्यात घडून येतात. पंजाबमधील दहशतवादात अशा तऱ्हेने नशील्या पदार्थांचा व्यापार करणारे, नुसतीच लूटमार करणारे, इत्यादी सामील झाले आहेत.

काश्मीरमधील दहशतवाद्यांची जात आणखी वेगळी. आझाद काश्मीर आणि भारताचा काश्मीरमधील भाग यांचे मिळून स्वतंत्र काश्मीर स्थापन करण्याची तेथील दहशतवाद्यांची मनीषा आहे. त्यांना पाकिस्तानचे साहाय्य आहे. वास्तविक काश्मीरमधील सर्वसामान्य मुस्लिम शांतताप्रिय आहे. कारण तो सतत उदरनिर्वाहाच्या पातळीखाली राहिलेला आहे. त्यामुळे त्याच्या अंगात फसवेगिरी भरपूर आहे, पण तो दहशतवादी नाही. पाकिस्तानाकडून आर्थिक साहाय्य घेऊन नवीन पिढीतील बेकार असलेल्या तरुणांना आर्थिक आमिष दाखवून दहशतवादी आपल्या पंथात सामील करून घेत आहेत आणि ते सामील होत आहेत; कारण काश्मीरमध्ये बरीच वर्षे शासन ही चीजच अस्तित्वात नाही. आपल्या बेकायदा कृत्याचे परिणाम आपणास भोगावे लागतील याची यत्किंचितही भीती त्यांच्या मनात नाही. काश्मीरमधील परिस्थिती बिघडण्याचे कारण फार जुने आहे. त्याची फळे आता दिसू लागलेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालापासूनच तेथे सरंजामी व्यवस्था आहे. प्रथम संस्थान होते म्हणून संस्थानिकाची, आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही प्रथम शेख अब्दुल्ला, मग बक्षी गुलाम अहमद, पुन्हा काही काळ शेख अब्दुल्ला, त्यांच्या निधनानंतर फारुख अब्दुल्ला, मध्ये काही काळ जी. एम. शहा, यांची सरंजामी राजवट चालू होती. स्वातंत्र्यानंतर तेथील प्रत्येक मुख्य मंत्र्याने काश्मीर ही आपली खाजगी जहागीर असल्याप्रमाणेच तेथे राज्यकारभार केला. पं. नेहरू आणि इंदिरा गांधी यांनीही त्याला आशीर्वाद दिला. कारण त्यांना निरनिराळ्या राज्यात आपले सुभेदार हवे होते. लोकशाही शासन नको होते. इतर राज्यांपेक्षा काश्मीरमधील प्रश्न थोडासा वेगळा आहे. मुसलमान बहुसंख्य आणि पाकिस्तानशी संलग्न सरहद्द यामुळे त्याला धार्मिक स्वरूपही आले आहे. वर पाहिल्याप्रमाणे सुशिक्षित मुसलमानही आधुनिक राज्यपद्धतीशी जुळवून घेऊ शकले नव्हते. त्यात काश्मीरमधील मुसलमान मागासलेले. त्यामुळे काश्मीरचा भारताबरोबर सामीलनामा झाल्यानंतर पहिली गरज होती ती तेथील मुसलमानांना आधुनिक राज्यपद्धतीच्या प्रक्रियेत सामील करून घेण्याची. निव्वळ भारतात सामील करून घेण्याची नव्हे. तथापि नेहरूंच्या काळापासून मुसलमानांच्या बाबतीत काँग्रेसचे एक धोरण राहिले आहे, ते म्हणजे मुसलमानांना मतपेढी समजण्याचे आणि त्यासाठी मुसलमानांना

राजकीय प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचे. काश्मीरबाबतचे धोरण म्हणजे काँग्रेसच्या पसंतीचा जो मुख्य प्रधान असेल त्याची तेथील मुसलमान मतपेढी व्हावे हे. तेथील सर्वच मुख्य प्रधान सरंजामी प्रवृत्तीचे असल्यामुळे भारताने काश्मीरमध्ये जो पैसा ओतला तो सर्व तेथील लोकांनी आपली सरंजामी निष्ठा मुख्यमंत्र्याच्या चरणी वाहावी या दृष्टीनेच. अशा परिस्थितीत सरंजामशहा केंद्रीय सत्तेला नेहमीच डोईजड होतात. त्याप्रमाणे काश्मीरमध्येही झाले. दुसरे म्हणजे जो पैसा काश्मीरमध्ये ओतला त्याचा विनियोग तेथे उद्योगधंदे काढण्यासाठी न झाल्याने त्या भागाचा कोणताही विकास झाला नाही. त्याशिवाय घटनेच्या ३७० व्या कलमाने काश्मीरला स्वतंत्र दर्जा दिल्याकारणाने उर्वरित भारताशी काश्मीरचे कोणतेही दळणवळण राहिले नाही. अशा परिस्थितीत भारत आणि काश्मीर यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असलेले कोणतेही हितसंबंध निर्माण झाले नाहीत. त्याला जोड मिळाली धार्मिक अलगतावादाची. पण धर्म हा दहशतवादाचे मुख्य कारण नव्हे. त्याचा उपयोग करून घेण्यात आला एवढेच म्हणता येईल. मूळ कारण आहे ते म्हणजे सरंजामी राजवट. पाकिस्तानच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होईल. पाकिस्तानात बहुसंख्य मुस्लिम धर्माचे आहेत, तरीदेखील तेथील राजवट सरंजामी असल्यामुळे सिंध, वायव्य सरहद्द प्रांत येथे दहशतवादी सक्रिय आहेतच. विशेषत: सिंधबद्दल तर नेहमीच वाचावयास मिळते. दहशतवादावर एक उपाय आहे. तो म्हणजे लोकशाही प्रक्रियेत भाग घेऊन आपले प्रश्न आपण सोडवू शकू असा विश्वास दहशतग्रस्त भागात निर्माण करणे. तथापि राज्यकर्तेच जेथे सरंजामी वृत्तीचे तेथे जनतेत असा विश्वास कोठून पैदा होणार ? हताशपणातून पैदा झालेल्या दहशतवादाचे किंवा ज्याला जास्त रास्तपणे हिंसाचार म्हणता येईल त्याचे उदाहरण म्हणजे काही वर्षांपूर्वी मध्य प्रदेशात डाकूंनी घातलेला धुमाकूळ. त्याच्या ज्या कथा वाचावयास मिळाल्या त्यावरून जमीनदार आणि सरकारी अधिकारी यांनी मिळून केलेला अन्याय, अत्याचार आणि त्याला पायबंद घालण्यास अयशस्वी ठरलेली न्यायपद्धती, हेच घटक दहशतवादाला कारणीभूत होते.

भारतीय व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अन्यायाचा प्रतिकार करण्याची सवय नाही. उलट आपण अन्याय सहन करतो, त्यामुळे हिंसाचाराला उत्तेजनच मिळते. तसे पाहिले तर कोणत्याही काळी, कोणत्याही देशात शांतताप्रिय नि अन्यायाचा प्रतिकार करू न शकणारी व्यक्ती जबरदस्ताच्या हिंसाचाराला नेहमीच बळी पडत आलेली आहे. तथापि आपले वैशिष्ट्य म्हणजे बहुसंख्य लोकांची ती प्रवृत्ती आहे. कारण कित्येक शतके आपण अन्यायच सहन करीत आलो आहोत

नि आपला आता तो स्वभाव बनला आहे. भारतातील हिंसाचाराला आणखी एक वेगळी छटा आहे. आधुनिक राज्यपद्धतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे शांतता व सुव्यवस्था. एखादी व्यक्ती अन्यायाचा प्रतिकार करू शकत नसली तरी तिच्या पाठीशी सबंध राज्यसंस्था उभी असते नि त्या संरक्षणाखाली ती व्यक्ती शांततेने जीवन जगू शकते. तो तिचा अधिकार असतो. कोणाची मेहेरबानी नसते. याउलट, सरंजामी व्यवस्थेत आत्मरक्षण किंवा सरंजामशहाचे संरक्षण यांच्या आधारेच व्यक्तीला स्वस्थचित्त राहता येत असे. एकाकी व्यक्तीला कोणतेही संरक्षण नसे. इंग्रजी राजवटीत अलीकडील काळात प्रथमच भारतीयांना संपूर्ण देशभर शांतता व सुव्यवस्था अनुभवावयास मिळाली. पोलिसयंत्रणा निर्माण करून इंग्रजांनी गुन्हेगारीस आळा घालण्याचा यशस्वी प्रयत्न केला. प्रत्येक पोलिसाच्या मागे सबंध साम्राज्याची सत्ता उभी आहे, असा दरारा गुन्हेगारांच्या मनात आणि तसाच विश्वास जनतेच्या मनात निर्माण करण्यात त्या राजवटीला यश आले होते. इंग्रजी राजवटीत पोलिस सत्तेचा अतिरेक करीत नसत असे नव्हे, पण पोलिस भारतीय होते आणि भारतीय व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये त्यांनी बऱ्याच प्रमाणात टिकवून धरली होती हे नेहमीच विसरले जाते आणि त्याचा दोष इंग्रजांवर लादला जातो. भारतीय पोलीस लंडनचा 'बॉबी' बनू शकला नाही हा इंग्रजांचा दोष नव्हे. ते असो. कायद्याने वागणाऱ्या प्रजाजनाला सबंध साम्राज्याचे संरक्षण असे आणि गुन्हेगारांविरुद्धही तशीच साम्राज्याची शक्ती होती हे निरपवाद आणि प्रत्येक पोलिसाच्या नसानसातून ही जाणीव प्रतीत होत असे.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि सरंजामी वृत्तीच्या लोकांच्या हाती आधुनिक राज्यपद्धती राबविण्याची कामगिरी आली. त्याचे परिणाम सर्वच क्षेत्रात दिसू लागले. पैकी प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने फक्त शांतता आणि सुव्यवस्थेपुरतीच चर्चा करणार आहे. इंग्रजी राजवटीत पोलिसयंत्रणा ही राज्यपद्धतीचे अविभाज्य अंग होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात पोलिसयंत्रणेला मंत्र्यांच्या दिमतीला असलेल्या खासगी सैन्याची कळा येऊ लागली. एक अनुभव सांगतो. तडीपार केलेला एक गुंड आपल्या बापाच्या घरी आल्याची खबर एका पोलिस अधिकाऱ्यास मिळाली. ताबडतोब त्याला ताब्यात घेण्यासाठी तो तेथे गेला. अधिकारी आलेला पाहताच बापाने अद्वातद्वा बोलून अधिकाऱ्यासच दम देण्यास सुरुवात केली. तेवढ्याते तो बधेना म्हणून मुख्यमंत्री माझ्या ओळखीचे आहेत तेव्हा त्यांच्याकडेच तुमची तक्रार करतो, असे सांगून बापाने फोननंबर फिरवावयास सुरुवात केली, तेव्हा अधिकारी गुंडास मोकळा सोडून

निमूटपणे चौकीवर परतला. इंग्रजी राजवटीत पोलिस अधिकाऱ्याने गुंडाबरोबर त्याच्या बापाचीही गठडी वळली असती. गव्हर्नरशी माझी ओळख आहे, असा दम देण्याची त्या वेळी कोणाला हिंमत झाली नसती. पोलिसखात्याचे नीतिधैर्य किती खच्ची झाले आहे हे दर्शविणारी अशी अनेक उदाहरणे प्रत्यही ऐकण्यास मिळतात.

पोलिसयंत्रणेचे नीतिधैर्य खच्ची होण्याची अनेक कारणे आहेत. त्यांपैकी प्रमुख म्हणजे सत्ताधारी पक्ष पोलिस प्रशासनात करीत असलेली ढवळाढवळ. दुसरे म्हणजे निवडणुका. निवडणुकांत गुंडांचे साहाय्य घेण्याची पद्धत सुरू झाल्याकारणाने त्यांच्या गैरकृत्यांकडे कानाडोळा करणे आले. त्यासाठी पोलिसांवर दडपण येऊ लागले. पुढे तस्कर, जमीनदार, बिल्डर यांच्या साहाय्यामुळे उपकृत झालेला सत्ताधारी पक्ष त्यांच्याही बाबतीत तसेच धोरण अवलंबू लागला. एका बाजूने अशा तऱ्हेने पोलिसांचे नीतिधैर्य खच्ची होत असताना भ्रष्टाचार सार्वत्रिक झाला. नीतिधैर्य खचल्यामुळे कर्तव्याबाबत उदासीन झालेल्या पोलिसांना भ्रष्टाचाराचे वावडे असण्याचे कारण नव्हते. कालांतराने भ्रष्टाचार हेच पोलिस यंत्रणेचे व्यवच्छेदक लक्षण बनले. अशा तऱ्हेने पोलिसयंत्रणा फार पोखरली गेली. त्यातून समाजविघातक घटक, राजकारणी आणि भ्रष्ट पोलिस यांची हातमिळवणी होऊन शांतता आणि सुव्यवस्था यांचा निकाल लागला. त्याला जोड मिळाली ती सार्वत्रिक भ्रष्टाचाराच्या वातावरणात संशयातीत राहू न शकलेल्या न्यायदान पद्धतीची. नुकतेच वाचण्यात आले, की दाखल केलेल्या खटल्यांपैकी एक ते दोन टक्के प्रकरणीच गुन्हेगारांना शिक्षा होते. खटला उभा करण्यात पोलिसांनी केलेली कुचराई, साक्षीदारांना मिळणाऱ्या धमक्या आणि ऱ्हास सुरू झालेली न्यायदान यंत्रणा ही त्याची प्रमुख कारणे. अशा परिस्थितीत हिंसाचार फोफावला नाही तरच नवल ! याचा परिणाम असा झाला, की कायद्यांचे पालन करणाऱ्या नागरिकाला जे संरक्षण असते तेच नष्ट झाले आणि गुंडांच्या दृष्टीने तो निरुपद्रवी असण्यावरच त्याच्या जीविताची शाश्वती अवलंबून राहू लागली.

इतर देशात अशी गुंडगिरी आणि हिंसाचार नसतो असे नाही; पण मुख्य फरक हा आहे, की इतर प्रगत देशात गुंड आणि गुन्हेगार यांना आपण पकडले जाऊ व आपणास शिक्षा होईल अशी धास्ती असते, तर भारतात राजकीय लागेबांधे असलेल्या किंवा संघटितपणे गुन्हेगारी करणाऱ्या, गुंड, तस्कर आणि इतर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना, आपण न्यायालयात निश्चित सुटू अशी खात्री असते. या परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या हिंसाचाराचे अनेक प्रकार आढळतात. बिहारसारख्या प्रदेशात व इतरत्र हरिजनांवर होणारे अत्याचार, सुपारी देऊन प्रतिस्पर्ध्याचा काटा

काढण्याची पद्धत, जातीय दंगली, प्रामाणिक पोलिस अधिकाऱ्याची हत्या, गुन्हेगारी टोळीतील टोळीयुद्ध, राजकीय विरोधकाची हत्या इत्यादी हिंसाचाराबद्दल आपल्याला शिक्षा होऊ शकेल अशी जर तो करणाराची खात्री पटली तर यातील बहुसंख्य प्रकार बंद होतील. कारण हा हिंसाचार करणारे, तोंडाने गीता म्हणत हसतमुखाने फासावर चढणारे क्रांतिकारक नव्हेत. आपण न्यायालयात सुटू शकतो हा विश्वासच त्यांच्या हिंसाचारामागची प्रेरणा असते. हिंसाचाराचा आणखी एक प्रकार गेल्या काही वर्षांत रूढ झाला आहे. तो म्हणजे कामगार जगतातील दहशतवाद. दोन प्रतिस्पर्धी युनिअन्सच्या स्पर्धेतून निर्माण होणारी गुंडगिरी सबंध कामगारक्षेत्राला व्यापून राहिली आहे. त्यात अनेक वेळा निरपराध कामगार आणि अधिकाऱ्यांची हत्या होण्याचे प्रकार घडतात. या दहशतवादाला राजकारण्यांचाही पाठिंबा असतो. वाढत्या हिंसाचारामुळे आणि दहशतवादामुळे एकंदरीत जीवन अत्यंत असुरक्षित आणि बकाल झाले आहे. पण त्याला आळा घालण्यास लागणारी इच्छाशक्ती मात्र राज्यकर्त्यांच्या जवळ मुळीच उरलेली नाही. त्यामुळे सामान्य माणसाला जीव मुठीत धरून राहण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

**समारोप**

आधुनिक राज्यपद्धती आणि सरंजामी वृत्तीचे राज्यकर्ते, लोकशाही आणि भारतीय व्यक्तिमत्त्व, यांच्यातील विसंवादातूनच भारतात आजच्या सर्व समस्या उभ्या राहिल्या आहेत. त्यात सुसंवाद साधल्याखेरीज त्या समस्या सुटणे शक्य नाही. पण त्या दृष्टीने विचारदेखील केला जात नाही. लेखाचा समारोप एका गाजलेल्या हिंदी सिनेमातील तितक्याच विख्यात झालेल्या गाण्याच्या दोन काव्यपंक्तींनी करणार आहे. या कवीचे मला मोठे कौतुक वाटते. ज्या कल्पना विशद करण्यासाठी मला इतकी पाने खर्च करावी लागली, त्या कल्पना त्याने फक्त दोन ओळीतच मांडल्या आहेत.

**मेरा जूता है जापानी,**
**ये पटलून इंग्लिस्तानी ।**
**सरपे लाल टोपी रूसी,**
**फिरभी दिल है हिंदुस्तानी ॥**

आपण इतर संस्कृतीचे कितीही बाह्य अनुकरण केले असले तरी आपले

'दिल' मात्र हिंदुस्थानीच राहिले आहे. हा भावार्थ आणि या 'दिला' च्या 'लीला' किती वर्णन कराव्या. सबंध भारतीय जनतेला या हिंदुस्तानी 'दिला' ने ग्रस्त केले आहे. त्याचे आविष्कार किती तऱ्हेने सापडावे आणि किती तऱ्हेने शोधावे असा प्रश्न पडतो. देशभक्तिपर कवने करणारे कवी, त्यातील संदेश रुपेरी पडद्यावर साकार करणारे कलावंत आणि त्यांनी घेतलेला काळा पैसा, चार्ल्स शोभराज आणि इतर तस्कर यांची तुरुंगात होणारी सरबराई, पोलिसांचे हप्ते आणि इतर भ्रष्टाचार, शासकीय कर्मचाऱ्यांची बेफिकिरी, रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार, जे. जे. हत्याकांड, कोसळणारे पूल आणि इमारती, हुंडाबळीचे प्रकार, तीर्थक्षेत्रात जमणाऱ्या महारोग्यांना भाविकांनी केलेला दानधर्म, फसवेगिरी, हिंसाचार आणि दहशतवाद, राजकारण्यांची स्वार्थप्रेरितता, विद्वान आणि विचारवंतांची लाचारी आणि भाडोत्रीपणा, तुंबलेली गटारे आणि गलिच्छ रस्ते, विना अनुदान संस्थांनी विद्यार्थ्यांची केलेली लूटमार, परीक्षेतील कॉपीचे प्रकार, व्यापाऱ्यांनी धान्यात केलेली भेसळ, विद्यापीठातील राजकारण, शिक्षणाचा खालावत जाणारा दर्जा पण पहिल्या वर्गात पास होण्याचे वाढते प्रमाण, गायब होणाऱ्या विहिरी, हरिजनांवरील अत्याचार, ही यादी जितकी लांबवावी तितकी थोडीच ! पण या सर्वांच्या मागे प्रेरणा आहे ती मात्र हिंदुस्थानी 'दिलाची.' चालणारा दमतो पण वाट संपत नाही असे म्हणतात. त्याप्रमाणे या 'दिलाचे' वर्णन करताना माझी लेखणी शिणली आहे म्हणून एवढेच पुरे !

# ६

# महात्मा गांधी, जीना आणि फाळणी

'भूतकाळच्या उदाहरणांवरून जर काही बोध घ्यावयाचा असेल तर एक गोष्ट स्पष्ट आहे की, हिंदू मुसलमानांचे ऐक्य झाल्यावाचून या प्रचंड देशात कसलीही प्रगती होणार नाही.' (संकीर्ण लेख २२६).

'विशेषत: या बाबतीत मतभेदास जागा नाही. हिंदू व मुसलमान, पारशी व ख्रिश्चन, सरकार व प्रजा, हक्कदार वर्ग व हक्क नसलेला वर्ग एकाच भूमिकेवर आहेत आणि या सभेची जी घटना आहे तीप्रमाणे तरी बरोबरीने कार्य करण्यास ते तयार आहेत. या (औद्योगिक) परिषदेला याप्रमाणे काही विशेष फायदे आहेत. इतर कमी अधिक प्रमाणात जातीय किंवा विशिष्ट पक्षाच्या अशा परिषदांना ते मिळत नाही.' (औद्योगिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून न्या. रानडे.)

हिंदू मुसलमानांची एकी हिंदुस्थानच्या प्रगतीची एक मूलभूत गरज होती याची जाणीव हिंदु विचारवंतांस अव्वल इंग्रजी काळापासूनच होती. ती कशा तऱ्हेने साध्य करता येईल याचे दिग्दर्शनही न्या. रानडे यांनी औद्योगिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात केले होते. इतिहासापासून स्फूर्ती घेऊन जमाती एका व्यासपीठावर येणे अशक्य होते. शिवाय सय्यद अहमद यांच्या शिकवणुकीच्या प्रभावाखाली मुसलमानांची राजकीय दृष्टया वेगळी वाटचाल सुरू झाली होती. राष्ट्रीय चळवळीचा रोखही राजकीय हक्कांकडेच होता. अशा परिस्थितीत आर्थिक प्रगतीच्या पायावरच आधुनिक भारताची उभारणी करता येईल अशी त्यांनी खूणगाठ बांधली होती. राजकीय हक्कांच्या बाबतीत हिंदु-मुसलमान,

अल्पसंख्य-बहुसंख्य असे भेद उद्भवतात. तसेच धार्मिक, सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरेतून दोन्ही समाजातील समानतेपेक्षा फरकच दृष्टीत्पत्तीला येतो. अशा परिस्थितीत रानड्यांच्या योजनेप्रमाणे भारताचा आर्थिक विकास घडून आला असता आणि त्याचे फायदे जर सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांस मिळाले असते तर त्यांच्यामधील मतभेद मर्यादित राहण्याची शक्यता होती.

महात्मा गांधींनाही हिंदु-मुसलमान ऐक्याची अनिवार्यता प्रकर्षाने पटली होती. पण ते साध्य करण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय हितसंबंध, मुस्लिम आंतरराष्ट्रीय हितसंबंधात, बुडवून टाकण्याचे ठरविले. त्याच्या मागची प्रेरणा काय होती याचाही शोध घेणे आवश्यक आहे. वस्तुत: द. आफ्रिकेत सत्याग्रहासंबंधात गांधींना जो अनुभव आला होता त्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण त्यांनी केले असते तर न्या. रानडे आणि इतर भारतीय पुढाऱ्यांप्रमाणेच हिंदु-मुस्लिम ऐक्याची गुरुकिल्ली त्यांना गवसली असती. द. आफ्रिकेत जे भारतीय गेले होते, ते निव्वळ पोटापाण्याच्या सोयीसाठी. याचाच स्पष्ट अर्थ असा की तेथील भारतीयांनी सरकारविरुद्धच्या लढ्यात ऐक्याचे जे दर्शन घडविले त्याच्या मागची प्रेरणा मुलत: आर्थिक होती. या सत्याग्रहाचे गांधींनी कितीही गूढरम्य वर्णन केले असले तरी गांधींचे नेतृत्व तेथील लोकांनी स्वीकारले ते सत्याग्रहाचे माहात्म्य पटल्यामुळे नव्हे तर त्यांची गाऱ्हाणी, जी मुख्यत: आर्थिक होती, त्यांचे निवारण करू पाहणारा नेता गांधींच्या रुपाने त्यांना भेटल्यामुळे. गांधीजींना लढ्याचे नेतृत्व स्वीकारल्याबद्दल गळ घालण्यात व्यापारी वर्गाचाच पुढाकार होता. तेथील भारतीयांच्यात निर्माण झालेल्या ऐक्याबद्दल ते लिहितात, 'येऊन पडलेल्या आपत्तीपुढे उच्च-नीच, लहान-मोठे, शेट-नोकर, हिंदु-मुसलमान, पारशी, इसाई, गुजराथी, मद्रासी, सिंधी वगैरे सर्व भेद विसरून गेले होते. सर्वजण हिंदुस्थानची लेकरे व सेवक होते.' हितसंबंध मूलत: आर्थिक असतात आणि त्याचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या प्रयत्नातच धार्मिक, भाषिक, आणि इतर भेदभाव विसरले जाऊ शकतात, हा द. आफ्रिकेच्या लढ्याने दिलेला अनुभव गांधींनी हेतुपूर्वक नाकारला. जगाला नवा धर्म देणारा प्रेषित होण्याच्या महत्वाकांक्षेपायी त्यांनी सत्याग्रहाच्या मागचे सत्य नजरे आड केले. आर्थिक प्रगतीऐवजी सत्य, सत्याग्रह आणि त्यांच्याशी सांगड घातलेले दैन्य यांनाच त्यांनी राष्ट्रीय चळवळीचे मूलाधार केले. 'हिंद स्वराज' ही त्यांनी लिहिलेली पुस्तिका त्या दृष्टीने वाचनीय आहे. साहजिकच १९२० नंतर औद्योगिक प्रगतीच्या ऐवजी आर्थिक दैन्य हे आपले राष्ट्रीय धोरण ठरले. आणि ज्या प्रश्नावर मतैक्य होण्याची शक्यता जास्त, त्याऐवजी ज्याच्या बाबतीत मतभेद जास्त अशा

धार्मिक प्रश्नावरच भर देण्यात आला. आर्थिक प्रगतीला हिंदु-मुस्लिम ऐक्याचा मूलाधार करण्याऐवजी स्वत:चे निरंकुश नेतृत्व भारतावर लादण्याच्या गांधींच्या हव्यासापायी भारताची फाळणी झाली का याचा शोध येथे प्रस्तुत आहे. तत्पूर्वी भारताच्या इतिहासातील काही गृहीतकांचा पुनर्विचार आवश्यक आहे.

**विभक्त मतदारसंघ आणि फाळणी**

१९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याने मुसलमानांना विभक्त मतदारसंघ दिले आणि भारताच्या फाळणीचा पाया घातला गेला, हे आधुनिक भारताच्या इतिहासातील एक गृहीतक आहे. त्याचप्रमाणे १९१६ साली झालेल्या लखनौ कराराने फाळणीची दिशा निश्चित झाली आणि लो. टिळकांच्या राजकीय आयुष्यातील ती घोडचूक होती, हे आणखी एक गृहीतक. साहजिकच मुसलमानांच्या अलगतावादाचा, विभक्त मतदारसंघाचा आणि फाळणीचा नेमका संबंध काय होता याचे ऐतिहासिक विश्लेषण आवश्यक आहे.

या संदर्भात पहिला प्रश्न असा, की विभक्त मतदारसंघ आणि फाळणी यामध्ये निश्चित स्वरूपाचा असा थेट संबंध असू शकतो काय? किंवा विभक्त मतदारसंघ दिले म्हणजे फाळणी झाली पाहिजे असा काही कार्यकारणभाव आहे का? का फाळणीला काही अन्य कारणे आहेत? या प्रश्नांचा शोध घेताना विभक्त मतदारसंघ दिले तेव्हापासून म्हणजे १९०९ सालापासून १९४७ साली पाकिस्तानची निर्मिती झाली तेथपर्यंतचा इतिहासाचा वस्तुनिष्ठ मागोवा घेतला पाहिजे. पण तत्पूर्वी विभक्त मतदारसंघाविषयी.

विभक्त मतदारसंघाचे जर फाळणीमध्ये अनिवार्यपणे पर्यवसान होत असेल तर प्रत्येक राज्याला वेगळे प्रतिनिधित्व दिले असल्यामुळे त्याच तर्काने राज्येही फुटून निघावयास पाहिजेत. भारतात भाषावार राज्यरचना झालेली असल्यामुळे प्रत्येक भाषेला विभक्त मतदारसंघ दिले आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. धर्माइतकाच भाषेचाही बंध बळकट असतो हे बांगला देशमधील घटनांनी दाखवून दिले आहे. तरीही गेल्या चाळीस वर्षांत एकाही राज्याने आपल्यावर अन्याय होतो यासाठी स्वतंत्र सार्वभौम राज्य म्हणून भारतीय संघराज्यातून फुटून जाण्याची घोषणा केली नाही. याचे कारण म्हणजे संघराज्यातील सर्व राज्यांचे हितसंबंध एकमेकांशी इतके निगडित झाले आहेत की फुटून निघण्यामुळे अशा राज्यांचे फायद्यापेक्षा नुकसानच जास्त होईल. म्हणजेच हितसंबंध आणि ते प्रामुख्याने आर्थिक असतात, समान असले तर अलगतेची भावना निर्माण होत नाही. जेव्हा वेगळे झाल्यामुळेच आपले हितसंबंध

सुरक्षित राहतील अशी भावना निर्माण होते तेव्हाच अलगतेची भावना मूळ धरते. आणि तिचे निराकरण झाले नाही तर अलगतावादाला चालना मिळते. याचाच अर्थ असा की विभक्त मतदारसंघ आणि फाळणी यांचा सावयव संबंध (ऑरॅगनिक रिलेशनशिप) नाही. एकत्र राहिल्यामुळे आपले हितसंबंध सुरक्षित राहणार नाहीत अशी खरी अथवा काल्पनिक समजूत अलगतावादाच्या मागे असते. विभक्त मतदारसंघ आणि फाळणी यांचा अन्योन्यसंबंध काहीही नाही हे आणखी एका उदाहरणावरून सिद्ध होईल. पाकिस्तानमध्ये अल्पसंख्यांकांसाठी विभक्त मतदारसंघ आहेत पण तेथे त्यामुळे अलगतावादाची समस्या निर्माण झाली नाही. याउलट मुसलमानांसाठी सामायिक मतदारसंघ असूनही सिंधी, बलुची, पठाण यांच्यात अलगतावादी भावना आढळते. जीनांना याची कल्पना होतीच. १५ जून १९४८ साली क्वेट्टा म्युनिसिपालिटीपुढे केलेल्या भाषणात ते म्हणाले होते, 'आता आपण सर्व पाकिस्तानी आहोत - बलुची - पठाण, सिंधी, बंगाली किंवा इतर कुणीही नाही.... आपण फक्त पाकिस्तानी आहोत याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे.'

विभक्त मतदारसंघामुळे संबंध देशाची विभागणी निरनिराळ्या धार्मिक अथवा जातीय गटामध्ये होऊन देशाची एकात्मता साध्य करणे कठीण झाले असते असाही एक युक्तिवाद केला जातो. तोही तपासून पाहिला पाहिजे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संयुक्त मतदारसंघ अस्तित्वात आले. तरीही आसामी लोकांनी आपल्या अस्मितेच्या रक्षणासाठी आंदोलन केले होते. तेथेच आज बोडो लोकांची चळवळ चालू आहे. मध्यंतरी गुरखाभूमीसाठी आंदोलन झाले. त्याशिवाय झारखंड आंदोलन, आंध्रपासून बंगालपर्यंत पेटलेले नक्षलवादी आंदोलन, ईशान्य भारतातील निरनिराळ्या जमातींनी आजवर केलेली आंदोलने, ही सर्व कशासाठी? याचा स्वच्छ अर्थ असा आहे की संयुक्त मतदारसंघ अस्तित्वात आले तरी जातीय वैमनस्यावर, भाषिक दुराव्यावर, किंवा अलगतावादी चळवळीवर तोडगा सापडला नाही. म्हणजेच भारतापुढे ज्या समस्या होत्या त्यांच्याशी संयुक्त अथवा विभक्त मतदारसंघाचा काहीही संबंध नव्हता. संयुक्त मतदारसंघाने त्या सुटणार नव्हत्या किंवा विभक्त मतदार संघामुळे त्या अधिक कठीण होणार नव्हत्या. त्या सोडविण्याचा निर्धार आणि इच्छा शक्ती यांची खरी गरज होती. पण त्याची वानवा आजपर्यंत टिकून आहे. आणि त्यामुळेच अनेक आंदोलनांनी भारत आजही अधिकाधिक जर्जर होत आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सर्व घटकांच्या हितसंबंधांचा समन्वय घडवून आणणे हा आपल्या समस्यांवर खरा उपाय आहे याची जाणीवही आता कोठे आढळून येत नाही. सत्ताधारी पक्ष

आणि विरोधक यांच्या सत्ता स्पर्धेमध्ये विधायक कर्तृत्वाचा केव्हाच बळी गेला आहे. समस्यांची उकल नव्हे तर निवडणूका हेच सर्वस्व झाले आहे.

मुस्लिम अलगतावादाचा विचार करताना विभक्त मतदार संघामुळे नेमकी काय परिस्थिती निर्माण झाली होती. हेही लक्षात घेतले पाहिजे. एक उदाहरण घेऊ. एखाद्या गावच्या नगरपालिकेत तीस सभासद आहेत. त्यातील पाच मुस्लिम मतदारसंघातून निवडून आलेले आहेत. मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळाल्यामुळे, गावातील रस्त्याची देखभाल करणे, गटारे स्वच्छ ठेवणे इ. नगरपालिकेची कर्तव्य पार पाडण्यास कोणत्या तऱ्हेचा अडथळा येऊ शकतो याची मला तरी कल्पना करता येत नाही. विभक्त मतदारसंघामुळे जनसामान्यांच्या जीवनात काय फरक पडला ते लक्षात घेतले म्हणजे विभक्त मतदारसंघाविरुद्ध एवढा ओरडा का हे कळेनासे होते. तीन किंवा पाच वर्षांनी घडणाऱ्या निवडणुकीमुळे दैनंदिन जीवनातील संबंधावर यत्किंचितही परिणाम होत नव्हता. मजूर-मालक, व्यापारी-ग्राहक, शिक्षक-विद्यार्थी, अधिकारी-कर्मचारी यांच्या संबंधात कोणताही फरक पडत नव्हता, अगदी १९४० पर्यंत कोकणातील मुसलमान मराठी ही मातृभाषा समजत असत. आणि देशावरील कित्येक मुसलमान दुसरी भाषा म्हणून संस्कृत घेत असत.

विभक्त मतदारसंघ पद्धतीच्या आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या पैलूचा कोणी विचारही केलेला नाही. समजा इंग्रज सरकारने संयुक्त मतदार संघ अस्तित्वात आणले असते तरी मुस्लिम बहुसंख्या असलेल्या भागातून बिगर काँग्रेसी मुसलमानच निवडून आले असते. स्वतंत्र भारतात आजही मलबार भागातून लीगवादी मुसलमानच निवडून येतात. म्हणजे सिंध, पंजाब, बंगाल, वायव्य सरहद्दप्रांत,बलुचिस्तान येथून काँग्रेस विरोधी मुसलमानच निवडून येण्याची शक्यता जास्त. विभक्त मतदारसंघामुळे एवढेच झाले की ज्या प्रांतात मुसलमान विखुरलेले होते त्या प्रांतातही त्यांना प्रतिनिधित्व मिळाले. म्हणजे संयुक्त मतदारसंघ असता तर जेवढे मुसलमान निवडून आले असते त्यांच्यापेक्षा थोडेसे जास्त मुसलमान विभक्त मतदारसंघामुळे मध्यवर्ती मंत्रिमंडळात निवडून येऊ शकत होते. पण यामुळे देशाचे नेमके काय नुकसान झाले असते. नुकसान झालेच असते तर काँग्रेस पक्षाचे झाले असते. कारण त्या पक्षाला काँग्रेसवादी मुसलमान निवडून आणावयाचे होते. व संयुक्त मतदारसंघामुळे काही ठिकाणी ते शक्य झाले असते. तथापि त्याला मुस्लिम व्यक्तिमत्त्वाचा परिचय आहे त्याला माहीत आहेच की काँग्रेसवादी मुसलमान आणि लीगवादी मुसलमान यात कोणताही फरक नसतो. सर्वजण तितकेच जातीयवादी असतात. खरा फरक आहे तो सुधारणावादी

मुसलमान आणि राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी धार्मिक भावनांना आणि जातीयवादाला खतपाणी घालणारे मुसलमान नेते यात. आणि सुधारणावादी मुसलमान काँग्रेस मध्ये होते तसे बाहेरही होते. तथापि सुधारणावादी मुसलमांनाचा वर्ग अतिशय लहान होता व आहे. या वर्गाला काँग्रेसने महत्व देऊन मुसलमानांमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरू होण्यास प्रयत्नशील व्हावयास हवे होते. पण काँग्रेसने जातीयवादी मुसलमानांचाच सतत अनुनय केला व आजही केला जात आहे याचे एक ढळढळीत उदाहरण देण्यासारखे आहे. जीना काँग्रेसमध्ये १९०४ पासून होते. पण गांधीयुगात त्यांना काँग्रेस सोडण्याची पाळी आली. कारण ते निधर्मी होते व खिलाफतवादी नव्हते. याउलट मो. महमदअली १९२० मध्ये काँग्रेसमध्ये आले आणि तीनच वर्षात काकीनाडा अधिवेशनात त्यांना काँग्रेसचे अध्यक्ष निवडण्यात आले. पात्रता-ते जातीयवादी होते. म्हणजे निधर्मी असल्यामुळे एकाला काँग्रेस सोडावी लागते तर दुसऱ्याला जातीयवादामुळे अध्यक्षपदाचे पारितोषिक मिळते. यावरून गांधीवादी काँग्रेसच्या राजकारणाची दिशा स्पष्ट होते.म्हणजे संयुक्त मतदारसंघ अस्तित्वात आले असते तरी जातीयवादी मुसलमानच बहुसंख्येने विधीमंडळात निवडून आले असते. याचाच अर्थ असा की, जातीयवादी मुसलमानांना काँग्रेसचा विरोध नव्हता, उलट पाठिबाच होता. फक्त त्यांनी डोक्यावर गांधी टोपी चढवली म्हणजे झाले. भारताची फाळणी झाली ती जातीयवादी मुसलमानांच्या अनुनयामुळे आणि तरीही आजही तेच धोरण चालू आहे. अरिफखान सारख्यांना काँग्रेस सोडून जाण्याची पाळी आणली जाते . विरोधी पक्षही तेच करतो. अलाहाबादच्या निवडणूकीत अरिफखान यांना प्रचारासाठी बोलविणार नाही असे आश्वासन विश्वनाथ प्रतापसिंग यांनी दिले होते. अशा परिस्थितीत मुस्लिम अलगतावादाशी सामना कोण करणार. जोपर्यंत काँग्रेस आणि विरोधी पक्ष निव्वळ निवडणूकीच्या दृष्टीकोनातूनच प्रत्येक प्रश्नाकडे पाहणार तोपर्यंत मुसलमानांच्याच नव्हे तर इतरांच्याही अलगतावादाला नेहमीच उत्तेजन मिळत राहणार.

### मुस्लिम अलगतावादी चळवळ

विभक्त मतादारसंघ फाळणीला जबाबदार नाहीत हे पाहिल्यानंतर मुस्लिम अलगतावादी चळवळीचा आढावा घेतला म्हणजे फाळणीची नेमके कारणे समजतील. तसेच मुस्लिम अलगतावादी चळवळीला प्रोत्साहन मिळण्यास कोणती धोरणे कारणीभूत झाली याचा शोध घेतला म्हणजे आजही तीच धोरणे चालू आहेत का याचाही उलगडा होईल.

मुस्लिम अलगतावादी चळवळीचे जनक सय्यद अहमद. मुस्लिम समाजाच्या

दोन उणीवा म्हणजे शैक्षणिक मागासलेपणा आणि अल्पसंख्या. लोकशाही प्रक्रियेमध्ये संख्येला महत्त्व असल्यामुळे हिंदूच येथील राज्यकर्ते होतील आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे सर्व जबाबदारीच्या जागा हिंदूंचीच मक्तेदारी बनतील ही धास्ती सय्यद अहमद यांच्या प्रेरणेमुळे निर्माण झालेल्या अलीगढ चळवळीच्या मुळाशी होती. मुसलमानांमध्ये शिक्षणाचा प्रसार आणि इंग्रजांशी राजनिष्ठा ही या चळवळींची दोन सूत्रे होती. त्यामुळेच कॉंग्रेसची स्थापना झाल्यानंतर मुसलमानांनी तिच्याशी संबंध ठेवू नये असा प्रचार सुरू झाला. त्यानंतरचा टप्पा म्हणजे १९०६ साली झालेली मुस्लिम लीगची स्थापना. त्यापूर्वी आगाखान यांच्या नेतृत्वाखाली मुसलमांनाच्या एक शिष्टमंडळाने ग. ज. मिंटो यांची भेट घेऊन मुसलमानांचे 'राष्ट्रीय हितसंबंध' वेगळे असल्याचे एका निवेदनात सूचित केले. हे 'राष्ट्रीय हितसंबंध' कोणते याचाही त्या निवेदनात उल्लेख होता. नोकऱ्यांमध्ये योग्य ते प्रतिनिधित्व आणि लोकनियुक्त संस्थांमध्ये राखीव जागा. नोकऱ्यांना मुसलमानांचे हितसंबंध मानणाऱ्या मुस्लिम पुढाऱ्यांचा बौद्धिक आवाका सहजगत्या समजून येण्यासारखा आहे. आणि अशांना वेगळे मतदार संघ दिले म्हणून कोणती आपत्ती कोसळणार होती. औद्योगिक विकास, शेतकऱ्यांच्या समस्या, आयात-निर्यात धोरण यांसारखे प्रश्न या पुढाऱ्यांच्या गावीही नव्हते. वेगळे प्रतिनिधित्व मिळूनही, राष्ट्रीय हितसंबंधाची यत्किंचितही जाण नसलेल्या या पुढाऱ्यांची स्थिती कॉंग्रेसच्या जगजीवनराम, तपासे, भंडारे, तिरपुडे यांच्यापेक्षा वेगळी राहिली नसती. आणि जे खरोखरी बुद्धिवादी मुसलमान होते ते या पुढाऱ्यांच्या बरोबर नव्हते. आगाखान यांनी म्हटले आहे की, 'जीना हे १९०६ मध्ये आमचे अत्यंत प्रखर विरोधक होते'

जीना हे सुरुवातीला प्रखर राष्ट्रवादी होते. या प्रखर राष्ट्वाद्याचे रूपांतर फाळणीच्या जनकात कसे झाले याचा इतिहास आजच्या परिस्थितीत तर आधिकच उद्‍बोधक आहे. १९०४ च्या कॉंग्रेच्या अधिवेशनात जीना हे प्रथम गोखले यांच्या सान्निध्यात आले आणि गोखले यांच्या व्यक्तिमत्वाने एवढे भारावून गेले की 'मुस्लिम गोखले' होण्याची त्यांनी मनीषा बाळगली. १९०६ च्या कॉंग्रेसचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. वयोमानाने उरक कमी झाल्यामुळे अध्यक्षीय भाषण तयार करण्यास दादाभाईना जीना यांनी मदत केली होती. इंग्लंडमधील लिबरल परंपरेच्या तसेच गोखले, दादाभाई फिरोजशहा मेथा यांच्या प्रभावाखाली जीना यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण चालू होती. त्यामुळे १९१३ पर्यन्त जीना मुस्लिम लीगचे सदस्य झाले नाहीत. तथापि लीगचे सदस्यत्व स्वीकारल्याने मुसलमानांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील

करून घेता येईल या हिशोबाने १९१३ साली त्यांनी लीगचे सदस्यत्व स्वीकारले. हिंदू मुस्लिम समस्या सुटल्याखेरीज घटनातमक प्रगती कठीण आहे अशी त्यांची दृढ खात्री पटली असल्याचे या कालातील त्यांची वक्तव्ये दर्शवतात. एका बाजूने प्रतिगामी मुस्लिमांचा दबाव असल्यामुळे स्वत:ची तत्त्वप्रणाली जीनांनी बाजूला ठेवल्याचे दिसते.. त्यामुळे हिंदूंनी औदार्य दाखवले तर हिंदू-मुस्लिम समस्येची उकल होईल असेही आवाहन यांनी केले. या कालात मुसलमानांच्या हक्काची भाषा ते काढीत नाहीत. १९१६ साली मुंबई प्रांतिक परिषद अहमदाबाद येथे भरली होती. तिच्या अध्यक्षपदावरून बोलताना जीना म्हणाले :

'या दोन मोठ्या जमातीतील सदिच्छा, सहवास, मिलाफ आणि सहकार्य ही खऱ्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे अशी सर्व विचारी लोकांची पुरेपूर खात्री पटली आहे, असा माझा विश्वास आहे. या (जमातींच्या) एकत्रीकरणावर, प्रगतीचा बिंदू केन्द्रित झाला आहे. पण यावर उपाय फारसा अवघड नाही... म्हणून मी माझ्या हिंदू मित्रांना आवाहन करतो की, विभक्त मतदार संघाच्या रूपाने त्यांना स्वार्थत्याग करावा लागत असला तरी मोठ्या मनाने अणि उदार मतवादी दृष्टिकोनातून मुसलमानांच्या इतर कार्याचे स्वागत करून त्यांना प्रोत्साहन द्यावे.'

**मुस्लिम अलगतावादाची पिछेहाट**

हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या भावनेने प्रेरित झालेल्या जीनांनी विभक्त मतदार संघाची एक योजना तयार केली. १९१६ मध्ये मुस्लिम लीग व कॉंग्रेस या दोघांनीही ती स्वीकारली. तिलाच लखनौ करार म्हटले जाते. या योजनेने मुसलमानांना लोकसंख्येपेक्षा आधिक प्रमाणात प्रतिनिधित्व दिले गेले. तसेच कोणत्याही जमातीसंबंधीचा ठराव तिच्या संमतीशिवाय मंजूर केला जाणार नाही या आश्वासनाचीही तरतूद त्यामध्ये होती. या करारासंबंधी बोलताना टिळक म्हणाले की, देशाचे हित साधण्यासाठी कोणत्याही तऱ्हेच्या लोकांबरोबर सहकार्य करण्याची आपली तयारी आहे.

लखनौ करारावर टीका करताना मुसलमानांना विभक्त मतदार संघ देण्यास कॉंग्रेसने मान्यता दिली, एवढ्या एकाच गोष्टीवर भर दिला जातो. या ठरावामुळे मुस्लिम लीग राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील झाली हा भाग विसरला जातो. सर्वात महत्वाचे म्हणजे या कराराने लीगला राजकीय तत्त्वप्रणाली (पोलिटिकल क्रीड) मिळाली. हिंदुस्थानला स्वयंशासन मिळावे म्हणून कॉंग्रेसची जी ध्येय धोरणे होती ती लीगने स्वीकारली होती. इंग्रजांशी राजनिष्ठा दाखवून सवलती मिळवणे या कार्यक्रमापासून फारकत घेऊन इंग्रजांशी स्वयंशासनासाठी मुसलमानांनी संघर्ष

करणे ही केवढी तरी मोठी राजकीय प्रगती होती. इंग्रजांपासून झगडून मिळविलेले राजकीय आधिकार राबविताना ही युती आधिकच बळकट झाली असती. आणि हिंदू आणि मुसलमान या दोघांचेही लोकशाही संस्था कशा चालवाव्या याचे राजकीय शिक्षण सुरू झाले असते. मुसलमानांच्या निधर्मीकरणाचा पाया घालणारा हा करार होता.

लखनौ करार हा हिंदू-मूस्लिम प्रश्नाकडे व्यवहारी दृष्टीने पाहण्याचा पहिला आणि शेवटचा प्रयत्न होता. टिळकांची या बाबतीतील भूमिका अतिशय व्यवहारी होती. हिंदुस्थानात इंग्रज, मुसलमान आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत होती. ती त्यांना दुरंगी करावयाची होती. लखनौ कराराचे परिणाम ताबडतोब दिसून आले. ज्या हिंदू-मूस्लिमफुटीच्या हत्यारावर इंग्रज विसंबून होते ते त्यांच्याकडून हिरावून घेतले गेल्या कारणाने त्यांच्या अनेक वर्षाच्या योजनेवर पाणी पडले होते. मुस्लिम लीगच्या सहकार्याने होमरूल चळवळ आधिकच तीव्र झाली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इस्लामशी जन्माव्यतिरिक्त अन्य कोणताही संबंध नव्हता, अशा राष्ट्रवादी आणि निधर्मी व्यक्तिकडे मुसलमानांचे नेतृत्व गेले.

लखनौ करारानंतर जीनांच्या राष्ट्रवादी कार्याला आधिकच वेग आला. श्रीमती बेझंट यांच्या अटकेनंतर होमरूल लीगच्या मुंबई शाखेची धुरा त्यांनी सांभाळली. भारतीयांची सैन्यात भरती करण्याच्या धोरणावर कडक टीका केली. याचवेळी गांधीजींनी भारतीयांनी सैन्यात भरती व्हावे यासाठी मोहिम काढली होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे टिळक आणि ॲनी बेझंट यांच्या खांद्याला खांदा लावून राष्ट्रीय चळवळीत जीना सहभागी झाले होते. मुंबईचे गव्हर्नर विलिंग्डन यांना मानपत्र देण्याचा समारंभ आयोजित केला गेला. त्याला जीना यांनी विरोध केला. रौलट कायदे जेव्हा मध्यवर्ती कायदे मंडळात चर्चेला आले त्यावेळी जीनांनी त्यांचा कडकडून निषेध केला आणि ते कायदे मंजूर झाल्यानंतर कायदेमंडळाचा राजीनामा निषेधार्थ दिला. राष्ट्रीय चळवळीतील पुढाकार आणि 'हिंदु-मुस्लिम ऐक्याचा राजदूत' म्हणून निभावलेली भूमिका यामुळे टिळक आणि अखिल भारतीय कीर्तीचे इतर पुढारी यांच्या बरोबरीने राष्ट्रीय नेतृत्वाचे स्वप्न जीनासारख्या कर्तबगार मनस्वी महत्वाकांक्षी व्यक्तीने पाहावयास सुरुवात केली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तथापि त्यांच्या या दिवास्वप्नाला एक संत राजकारण्याने जिव्हारी बसणारा धक्का दिला आणि या दोन महामानवांच्या सत्ताझुंजीत अखेर भारताची शकले उडाली. हजारो घरांची राखरांगोळी झाली, माणसे मारली गेली, स्त्रियांची अब्रू लुटली गेली. निसर्गालादेखील करता येणार

नाही एवढा प्रचंड संहार झाला आणि याला कारणीभूत हिंदु मुसलमानातील वैर नव्हे तर निव्वळ सत्तास्पर्धा. कारण जवळ जवळ हजार वर्षे या दोन जमाती अस्वस्थ शांततेने का होईना पण एकत्र नांदत आहेत. या प्रदीर्घ कालावधीत लढाया, तंटेबखेडे कुरबुरी, अत्याचार सर्व काही झाले, पण नरसंहार मात्र झाला नाही. तेव्हा हिंदु-मुसलमानातील वैर हे त्याचे कारण सांगता येणार नाही. ते इतरत्र शोधावे लागेल.

गांधी आणि जीना यांच्या सत्ता-झुंजीतील पहिले पाऊल उचलले ते गांधींनी. १९१८ साली रिक्रूटिंग एजंट म्हणून ज्यांना संबोधले गेले, आणि १९१९ च्या अमृतसर अधिवेशनात मॉटफर्ड सुधारणा काँग्रेसने स्वीकाराव्या म्हणून ज्यांनी यशस्वी प्रयत्न केला, त्या गांधीजींनी केवळ आठ महिन्यांच्या अवधीत असहकाराच्या चळवळीची उलटी चाल का खेळली हा भारताच्या इतिहासातील एक कूट प्रश्न आहे. गांधींच्या संकलित वाङ्मयात याचे विश्वसनीय उत्तर मिळत नाही. अनेकांनी या गूढाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. मुसलमानांचा अनुनय येथपासून ते स्वातंत्र्याच्या निखळ उर्मीपर्यंत निरनिराळी भाष्ये करण्यात आली आहेत. तथापि त्यापैकी कोणतेही भाष्य समाधानकारक वाटत नाही. उदा. मुसलमानांचा अनुनय कशासाठी? अनुनय हे साध्य असू शकत नाही, तर साधन असते. मग गाधींचे साध्य काय होते? याचे उत्तर गांधीजींच्या एकंदर राजकीय जीवनाचे सूत्र लक्षात घेऊनच शोधले पाहिजे. ते सूत्र म्हणजे एकचालकानुवर्तित्व. आफ्रिकेतील लढ्यात सर्व सत्ता त्यांचेच हातात होती आणि त्याच राजकीय पद्धतीची सवय त्यांना लागली होती. चंपारण्य लढ्यातही निरंकुश नेतृत्व त्यांच्याकडेच होते. १९२० पासून १९२२ पर्यंत आणि पुढे १९२८ पासून १९३५ पर्यंत काँग्रेसमध्ये निर्णय घेण्याची सर्व सत्ता त्यांच्याकडेच होती. १९२० च्या कलकत्ता अधिवेशनात मंजूर झालेल्या ठरावांबद्दल बोलताना चित्तरंजनदास म्हणाले होते की, कोणताही युक्तिवाद न होता हे ठराव मंजूर झाले. 'गांधींचे मत असे आहे' एवढाच युक्तिवाद होत असे. गांधींची ही सर्व राजकीय वाटचाल पाहिल्यानंतर १९२० साली काँग्रेस पक्ष अंकित करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा असणार याबाबतीत संदेह राहात नाही. वस्तुत: भारतीयांची गाऱ्हाणी मूलत: आर्थिक आणि अनुषंगाने राजकीय होती. अशा परिस्थितीत आर्थिक विकास हे उद्दिष्ट ठेवून ते साध्य करण्यासाठी इंग्रजांविरुद्धच्या आंदोलनाची आखणी गांधीजींनी, द. आफ्रिकेतल्याप्रमाणे का केली नाही असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. अशा चळवळीच्या प्रक्रियेतच हिंदु-मुस्लिम ऐक्यालाही चालना मिळाली असती. पण गांधीजींनी तो मार्ग न चोखाळता राष्ट्रीय

आंदोलन खिलाफतीच्या दावणीला का बांधले असावे? आधुनिक सुधारणा किंवा आर्थिक प्रगतीचा त्यांनी 'हिंद-स्वराज' मध्ये अधर्म आणि रोग म्हणून धिक्कार केला आहे. अशा परिस्थितीत त्यांनी सदाचार आणि नीती यांच्या संवर्धनासाठीच आपले जीवन व्यतीत करावयास हवे होते. पण त्या ऐवजी खिलाफतीसारख्या संपूर्ण ऐहिक प्रश्नामध्ये त्यांनी स्वत:ला का गुंतवून घेतले? निव्वळ इंग्रजांना घालवणे म्हणजे स्वराज्य नव्हे असे त्यांनी 'हिंद-स्वराज' मध्ये आग्रहाने प्रतिपादन केले आहे. 'हिंद-स्वराज' मधील एकही शब्द बदलण्याची गरज वाटत नाही असे त्यांनी त्यानंतर अनेक वर्षांनी ठामपणाने सांगितले होते. तरीही त्यांनी 'एका वर्षात स्वराज्य' अशी घोषणा करून असहकाराची आणि कायदेभंगाची हाक का दिली? गांधीजींच्या कृतीमध्ये या ज्या विसंगती आढळतात त्यामागे काही सूत्र असले पाहिजे. ते कोणते? भारतीय राजकारणात स्वत:चे एकमेवाद्वितीय स्थान प्रस्थापित करण्याच्या महत्त्वाकांक्षेने ते प्रेरित झाले असावेत आणि त्यासाठी आपल्या तत्वांनाही मुरड घालण्यास त्यांची तयारी असावी. त्याप्रीत्यर्थ त्यांनी भारतीय राजकारणातील दिग्गजांना एका मागून एक कशा तऱ्हेने निष्प्रभ केले त्याचा आढावा रोमहर्षक आणि परिणामांच्या दृष्टीने अतिशय शोचनीय आहे. गांधीजींच्या या प्रयासापोटी भारताच्या आर्थिक समस्या मागे पडल्या. हिंदु-मुस्लिम ऐक्याची इमारत ज्यावर उभी करता आली असती तो पायाच त्यामुळे उद्ध्वस्थ झाला आणि हिंदु-मुसलमानांतील दरी रूंदावली. ग.ज.मिंटोला भेटलेल्या मुस्लीमांच्या शिष्टमंडळाने मुसलमानांच्या आर्थिक गाऱ्हाण्याचीही जिकीर केली होती हे या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे. १९२० नंतर भारतातील राजकारणाचे भारतीय स्वरूप नष्ट झाले. गांधींनी त्याला ते स्वत: आणि त्यांचे विरोधक यांच्यातील डावपेचाचे स्वरूप दिले. सुरुवातीला या संघर्षात त्यांनी मुस्लीम जातीयवाद्यांची कुमक मिळविली, आणि त्यांच्या सहाय्याने आपल्या आधीन न होणाऱ्या राष्ट्रवादी मुसलमानांना आणि इतर राजकीय पुढाऱ्यांना राजकीय अपूर्णांक बनवले. असाच एक अपूर्णांक पुढे भारताच्या फाळणीचा जनक झाला.

एकमेवाद्वितीय पदाच्या मोहात गांधी का पडले होते? इतर कारणांबरोबरच स्वत:वरील आत्यांतिक प्रेम त्याच्या मुळाशी होते. आपण जी तत्वे सांगतो त्यापेक्षा आपल्यावरच लोक आधिक प्रेम करतात अशी त्यांची समजूत होती आणि ही भावना त्यांच्या सर्व कार्यामागची प्रेरक शक्ती होती. आत्मगौरवाची भावना बटबटीत पणे व्यक्त करणारे चार उल्लेख त्यांच्या लेखनात मला आढळले. आणखीही असू शकतील.

१) आफ्रिकेत असताना त्यांच्यावर खुनी हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळी पोलीस सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर आणि त्यांच्या पत्नी यांच्या कौशल्यपूर्ण हाताळणीमुळे गांधीजी त्यातून बचावले. त्याबाबतीत अलेक्झांडर यांना आभारप्रदर्शनाचे पत्र हिंदी समाजातर्फे गांधीनी तयार केले. त्यात ते म्हणतात 'ज्या एका व्यक्तीवर प्रेम करण्यात आम्हाला आनंद वाटतो त्या व्यक्तीचे जीवनरक्षण करण्यास आपण सहाय्यभूत झालात त्याबद्दल कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून आम्ही ही भेट आपणास अर्पण करीत आहोत.' (म. गांधी संकलित वाङ्मय, खंड २ लेख ३०.)

श्रीमती अलेक्झांडर यांनाही अशाच मजकुराचे पत्र धाडण्यात आले :

'आपण स्वत:चा जीव धोक्यात घालून ज्याप्रकारे आम्हापैकी एकाचे - ज्यांच्यावर प्रेम करण्यात आनंद मानतो - रक्षण केले, त्याबद्दल आमच्या कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून ही अल्प भेट पाठवीत आहोत.' (लेख ३१)

दोन्ही पत्रांचा मसुदा गांधीजींनी तयार केला होता. एका अधिकृत संघटनेतर्फे पत्रे पाठविली जात असताना, त्यातील 'लोक आपल्यावर नुसतेच प्रेम करीत नाहीत तर त्यात आनंदही मानतात ' हा त्यातील स्वत:विषयीचा उल्लेख नुसताच अनावश्यक नव्हे, तर औचित्यालाही सोडून आहे. पण गांधीजी स्वत:च्याच प्रेमात पडले होते हेच त्यावरून सिद्ध होते. त्यामुळे अशा तऱ्हेचा उल्लेख त्यांच्या नेणिवेतून आला असावा. आपल्यावरील लोकांच्या प्रेमाचे प्रदर्शन करणे त्यांना आवडत असावे.

३) इस्थर फेअरिगला लिहिलेल्या पत्राचा उल्लेख आधीच्या लेखात आलाच आहे. दंगल गोळीबार होऊन माणसे मारली गेली होती. पण आपणच केवळ शांतता प्रस्थापित करू शकतो या कल्पनेने ते स्वत:चा 'जगातील सर्वात सुखी माणूस 'म्हणून उल्लेख करतात.

४) शेवटचा उल्लेख हंटर कमिशनपुढे दिलेल्या साक्षीत आढळतो. एप्रिल १९१९ मध्ये अहमदाबाद व विरमगाव येथे दंगल झाली. त्याबद्दल स्पष्टीकरण करताना गांधी म्हणाले, "त्या लोकांनी आपला संयम सोडला ही अत्यंत दु:खद गोष्ट होय असे मला वाटले. जमावाच्या त्या कृत्याचे काडीमात्रही समर्थन मी करू इच्छित नाही. पण त्याबरोबरच मला हे सांगावेसे वाटते की, बरोबर वा चूक असो, मी ज्या लोकांमध्ये प्रिय होतो, त्यांच्यावर सरकारने भयंकर ताण पाडला."

अलेक्झांडरना ता. २४ मार्च १८९७ रोजी पत्र लिहिले होते. म्हणजे त्यावेळेपासून जवळजवळ २३ वर्षे गांधीजी आपण लोकांमध्ये प्रिय आहोत याची जाणीव निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने लोकांना करून देत होते. म्हणजे आत्मगौरव हा त्यांचा स्थायीभाव

झाला होता असा निष्कर्ष वावगा ठरणार नाही.

आत्मगौरवाच्या भावनेतून निर्माण झाला तो इतर राजकीय सहकाऱ्यांबद्दलचा आकस. साहजिकच लोकांच्या नजरेत त्यांचे अवमूल्यन करून त्यांना निष्प्रभ करणे हे त्यांचे उद्दिष्ट ठरले असल्यास नवल नाही. राजकीय पुढाऱ्यांबद्दल वाटणारा आकस त्यांनी लो. टिळक आणि पं. मालवीय यांच्या बद्दल जे अनुदार उद्‌गार काढले होते त्यावरून सिद्ध होतो. त्याचा उल्लेख आधीच्या लेखात आला आहेच. तथापि अतिशय धक्कादाय आहे ती ना. गोखले व भारतसेवक समाज यांच्याबद्दल त्यांनी केलेली शेरेबाजी. जाहीर रीत्या गोखले यांच्याबद्दल अत्यंत जिव्हाळा आणि कृतज्ञता यांचे प्रदर्शन ते करीत असत. पण त्यांच्याबद्दल त्यांची खरी भावना काय होती याचे दर्शन एका व्यक्तिगत पत्रात घडते. याला दुटप्पीपणा म्हणता येईल का? २७ जानेवारी १९१० रोजी मगनलाल गांधी यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,

'चि. छगनलाल यांनी सर्वंटस् ऑफ इंडियाबद्दल जे कळवले आहे ते वाचून खेद वाटला. प्रो. गोखले यांच्यासारख्या महान व्यक्तीला त्यात गुरफटावे लागत आहे ही दुःखाची गोष्ट आहे. पण ते प्रामाणिक आहेत, म्हणून ते त्यातून बाहेर पडतील. ते एक पाश्चात्यांचे अनुकरण करणारे आहेत. सेवकांना सेवक असणे बरोबर आहे? आणि सेवक कोण आहेत? त्यांना का ठेवावे लागले? त्यांचा स्वयंपाक इतरांनी का करावा? या सेवकांना धर्माबद्दल काय वाटते? हिंदुस्थानात मोठ्या इमारतींची गरज कशाला? झोपड्या पुरणार नाहीत का? उंदराला मारण्यासाठी डोंगर पोखरण्यासारखे हे आहे. प्रो. गोखले यांनी जी कामगिरी पत्करली आहे ती केव्हा संपणार ? तिला किती पैसे लागतील? एम.ए. किंवा बी.ए झालेल्यांना सेवक होता येईल ही काय वेडगळ समजूत? 'निरस्मपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते' अशासारखे हे आहे. माझ्या समजुती प्रमाणे फिनिक्सचे ध्येय व जीवनाविषयक कल्पना भारत सेवक समाजापेक्षा आधिक श्रेष्ठ आहे.... पुण्यात जे चालले आहे ते खरे खुरे नाही... हेतू चांगला आहे. पण जे केले जात आहे ते वाईट आहे.... फिनिक्स.... पुण्याच्या डामडौलापेक्षा आधिक चांगला आहे....मी 'हिंदस्वराज्य' मध्ये जो मानदंड घालून दिला आहे त्याप्रमाणे ना. गोखले यांच्या सेवकांचे कार्य योग्य आहे असे म्हणता येणार नाही. ते आपल्या गुलामगिरीत भरच टाकील. मी जर पौर्वात्यांना पाश्चिमात्य करण्याचा प्रयत्न केला तर गोखल्यांच्या प्रमाणेच दुःखी होईन...हिंद सेवकांच्या इंग्रजीच्या ज्ञानामुळे ते एक फसवे आवरण उत्पन्न करणारे साधन झाले आहे.' (सं. वा. खंड १०, लेख ६५)

वस्तुत: गोखले आणि त्यांचे कार्य याबद्दल अनुकूल प्रतिकूल मत बनविण्याचा गांधींना पूर्ण आधिकार होता आणि त्याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही. आक्षेपार्ह भाग हा आहे की गांधीजीं सारख्या सत्यवादी व्यक्तीने गोखल्यांकडून सर्व तऱ्हेची मदत घ्यावी, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी आणि त्यांच्याबद्दलचे सत्य मत जाहीरपणे मांडण्यास मात्र कचरावे आणि त्यासाठी खासगी पत्राचा आसरा घ्यावा. गोखले आणि भारतसेवक समाज यांच्याबद्दल गांधींनी व्यक्त केलेली उपरोक्त मते ही आपण आणि आपले कार्य यासंबंधी त्यांची जी गौरवाची भूमिका होती त्यातूनच निपजली होती याबद्दल संदेह राहात नाही. गांधीजी आपल्या अनुयायांकडून संपूर्ण निष्ठेची मागणी करीत असत. ती फलद्रूप झाली नाही तर कोणत्या थराला जाण्याची त्यांची क्षमता होती यांची चुणूक आफ्रिकेतील एका घटनेवरून दिसून येते.

त्यांच्या सत्याग्रह चळवळीतील पहिला सत्याग्रही पंडित रामसुंदर हा होता. त्याला एका महिन्याची साधी कैद झाली तथापि सुटका झाल्यानंतर त्याने चळवळ आणि ट्रान्सवाल या दोघांनाही राम राम ठोकला. गांधीजी या घटनेने किती संतप्त झाले होते याचे दर्शन त्यांनी रामसुंदर बद्दल जी हिंस्र भाषा वापरली त्यावरून घडते. ते लिहितात, (इंडिअन ओपिनिअन -४-१-१९०८)

समाजाच्या दृष्टीने रामसुंदर आजपासून मेला आहे. त्याचे जीवन निरर्थक आहे. त्याने स्वत:च्या हाताने स्वत:ला विष घालून घेतले. अशा सामाजिक मृत्युऐवजी शारीरिक मृत्यु परवडला. ऐन मोक्याच्या वेळी तो गाडीत चढण्यापूर्वी अपघातात मेला असता तर त्याला अमर कीर्ती लाभली असती.... आपण मुलांना 'ते पहा भूत' म्हणून भिववितो. आपण रामसुंदरची आठवण भूत म्हणून ठेवली पाहिजे.' जसजशी गांधीजींना राजकीय परिपक्वता आली तसातसा त्यांनी अतिरेकी भाषेचा उपयोग बंद करुन नम्रतेचा मुखवटा धारण केला. पण त्यांची कृती मात्र तेवढीच हिंस्र असे. सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत त्यांनी आपल्या विरोधकांना जी वागणूक दिली त्यावरून ही वृत्ती स्पष्ट होते.

आत्मगौरव, राजकीय सहकाऱ्यांबद्दलचा आकस आणि श्रद्धावान अनुयायी, यांनी सीमीत केलेला मार्ग एकचालकानुवर्तित्वाकडे आणि प्रेषित पदाकडे अपरिहार्यपणे जातो. गांधीजींनी तीच वाट चोखाळली आणि भारताच्या संदर्भात त्यात आहुती पडली ती सामुदायिक नेतृत्वाची.

**एकमेवाद्वितीय पुढाऱ्याच्या युगाची सुरुवात :**

१९२० सालच्या सुरुवातीस केवळ टिळकांच्याकडूनच गांधींच्या निरपवाद

नेतृत्वाला शह मिळविण्यासारखा होता. पण टिळकांचे वय झाले होते. आणि प्राकृतिक अस्वास्थ्यामुळे त्यांचा राजकरणातील सक्रिय सहभाग फारच कमी झाला होता. राहता राहिले इतर कॉंग्रेस पुढारी बेझंटबाई आणि जीना. या सर्वांना निष्प्रभ करण्याची संधी खिलाफत चळवळीने गांधींना दिली. प्रतिगामी मुसलमानांच्या सहाय्याने या सर्वांची राजकीय शक्ती क्षीण करता येईल, आणि त्याच बरोबर खिलाफत पुढाऱ्यांना गांधीजींच्या राजकीय वर्चस्वाला आव्हान देण्यात स्वारस्य नाही, या अपेक्षेवर ही चाल आधारित होती. १ ऑगस्ट १९२० साली टिळकांचे निधन झाले आणि निर्विरमुर्वीतलम् अशी गांधींची परिस्थिती झाली. त्यानंतर एका महिन्यातच कलकत्ता येथे कॉंग्रेसचे खास अधिवेशन बोलवण्यात आले नि त्यात असहकाराचा प्रस्ताव गांधींनी मांडला. खिलाफत प्रतिनिधी अलीबंधू यांच्या सहाय्याने जीना, चित्तरंजनदास, बिपिनचंद्र पाल, बेझंट यांचा विरोध मोडून काढला. मिया महमद छोटाणी या मुंबईतल्या उद्योजकांने गाड्या भरभरून खिलाफत स्वयंसेवक मुंबईहून पाठवले होते. गांधींच्या विजयात त्यांचा फार मोठा वाटा होता. कलकत्ता अधिवेशनापासून गांधींनी जी जी पावले उचलली, त्यामुळे गांधींचे कॉंग्रेसवरील नियत्रंण आधिकाधिक पक्के झाले.

कलकत्ता कॉंग्रेसमध्ये मिळालेल्या यशानंतर जीना प्रभृतींचा होमरूल लीगवर असलेला प्रभाव नष्ट करून ती संस्था आपल्या ताब्यात आणण्याच्या उद्योगास गांधी लागले. ३ ऑक्टोबर १९२० रोजी मुंबई येथे घाईघाईने होमरूल लीगची सभा बोलवण्यात आली. आणि लीगची घटना बदलण्याचा प्रस्ताव गांधींनी मांडला. 'साम्राज्यांतर्गत स्वयंशासना' ऐवजी 'एका वर्षात संपूर्ण स्वराज्य' हे लीगचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. जीना आणि इतरांनी त्याला विरोध केला, पण प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर ज्यांना हा ठराव मंजूर नाही ते राजीनामा देण्यास स्वतंत्र आहेत, अशी टिप्पणी गांधींनी केली. या टिप्पणीवरून गांधींचा हेतू स्पष्ट होतो. अपेक्षेप्रमाणे जीनांनी राजीनामा दिला. त्यानंतर गांधींनी जीनांना पत्र लिहून नवीन राजकीय कार्यक्रमाला जीनांनी आपल्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ द्यावा असे आवाहन केले. अर्थ स्पष्ट आहे, असे आवाहन लीगच्या सभेतही करता आले असते. पण ते जीनांनी राजीनामा दिल्यानंतर करण्याचा हेतू जीनांना त्यांची जागा दाखवून देण्याचा होता. यापुढे राजकारणात राहावयाचे असेल तर गांधींचा दुय्यम म्हणूनच, स्वयंभू पुढारी म्हणून नव्हे, याचाच हा इषारा होता.

गांधींना उत्तर देताना जीनांनी लिहिले,

'तुमचे मार्ग आणि कार्यक्रम यावर माझा विश्वास नाही, पण माझी पूर्ण

खात्री आहे की त्यातून अनर्थच निष्पन्न होईल' जीना पुढे म्हणतात, 'असा कार्यक्रम एखाद्या व्यक्तीच्या आदेशाने अमलात आणता येणार नाही, तर त्याला सर्व प्रमुख राष्ट्रीय नेत्यांची संमती आणि पाठिंबा असावयास पाहिजे.' तथापि सामुदायिक नेतृत्वाचे युग कलकत्ता अधिवेशनातच संपले होते. जीनांचे उरलेसुरले राजकीय वजन १९२० च्या नागपूर अधिवेशनात संपुष्टात आले. गांधी यांच्या स्वराज्याच्या ठरावाला जीनांनी विषय-नियामक समितीत विरोध केला, तो मोडून काढण्यात आला. आणि खुल्या अधिवेशनात जेव्हा त्या ठरावाला विरोध करणारे भाषण जीनांनी सुरू केले तेव्हा प्रतिनिधींनी 'शेम शेम' चा गलका करून त्यांना बोलणे अशक्य करून सोडले. खिलाफत पुढाऱ्यांनीही जीनांचे अवमूल्यन केले. मौ. शौकत अली तर उघड उघड तिरस्कार करू लागले होते. अखेर मुस्लिम लीगच्या नागपूर अधिवेशनाला हजर राहण्याचेही धाडस त्यांनी केले नाही. जीनांच्या राजकीय नेतृत्वाची अखेर जातीयवाद्यांची मदत घेऊन गांधीजींनी घडवून आणली होती. त्याच जातीयवाद्यांचा आधार घेऊन जीना पुढे, गांधीनी केलेल्या मानखंडनेचा वचपा काढणार होते. प्रथम गांधी नि नंतर नेहरू घराणे यांच्या आश्रयाने राहणे एवढाच मार्ग यापुढे राजकीय पुढाऱ्यांसमोर राहणार होता. त्याला पर्याय म्हणजे राजकीय विजनवास. एकमेवाद्वितीय पुढाऱ्यांचे युग भारतात सुरू झाले. १९२० सालपर्यंत असलेली सामुदायिक नेतृत्वाची परंपरा खंडित झाली. भारताच्या राजकीय शोकांतिकेला येथूनच सुरुवात झाली.

नागपूर येथील पराभवानंतर जीनांनी असहकाराला विरोधी असलेल्या पुढाऱ्यांच्या सहकार्याने नवीन पक्ष स्थापण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना कोणीही साथ दिली नाही. खिलाफतवाद्यांनीही त्यांच्याशी दुरावा धरला होता. अलीबंधू आणि मौलाना आझाद तर त्यांना सरकारचे प्रवक्ते आणि खिलाफतद्रोही समजू लागले होते. तथापि चौरीचौरा घटनेनंतर असहकाराची चळवळ मागे घेण्यात आली आणि कायदेमंडळाचे राजकारण पुन्हा सुरू होईल अशी लक्षणे दिसू लागली व जीनांनी पुन्हा नवी उमेद धरली. १९१९ च्या कायद्याखाली १९२३ मध्ये निवडणुका झाल्या आणि मुंबई मतदार संघातून मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून जीना निवडून आले.विभक्त मतदार संघ नसते तर कदाचित १९२१ सालीच जीनांची राजकीय कारकीर्द संपुष्टात आली असती. साहजिकच विभक्त मतदारसंघाचे महत्व जीनांना अनुभवांनी पटले. १९१६ साली राजकीय तडजोड म्हणून ज्या विभक्त मतदारसंघाची वकिली त्यांनी केली तीच आता गरज बनली. एरवी १९५२ साली आंबेडकर निवडणुकीत पराभूत झाले, तीच अवस्था जीनांचीही झाली असती, गांधींचे अनुयायित्व अथवा जातीयवाद्यांचे

नेतृत्व असा पर्याय त्यांच्या पुढे होता. भारतीय राजकारणातील एक यक्षप्रश्न या घटनेने उभा केला होता. पण त्याची केव्हाच दखल घेतली गेली नाही. प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि राजकीय कर्तबगारी असलेल्या अल्पसंख्यांक पुढाऱ्याला नेता म्हणून बहुसंख्य स्वीकारतील का, हा तो प्रश्न. आणि त्याचे उत्तर 'नाही' असेच आहे. साहजिकच आपल्या मर्यादित विश्वामध्येच राहणे त्यांच्यावर लादले जाते आणि तेथील स्थान टिकविण्यासाठी आपल्या अनुयायातील असंतोष तेवत ठेवणे हे त्यांचे जीवित कार्य बनते. आंबेडकर जगते तर त्यांच्यावर तीच पाळी आली असती. त्यांचा पंतप्रधान म्हणून आपण स्वीकार केला नसता. सुभाष घिशिंग किंवा लाल डेंगा राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकतील असे वातावरण आपण निर्माण करू शकलो नाही. त्यांची दखल घेतली जाते ती केवळ त्यांच्या उपद्रव-मूल्यांमुळे. त्यांच्या विधायक प्रेरणा त्यामुळे दबल्या जातात. अल्पसंख्याकांना सत्तेच्या राजकारणातील केवळ एक प्यादे म्हणून वापरण्याचा डाव आजतागायत खेळला जात आहे.

१९२१ साली गांधींकडून पराभूत होऊनही जीनांनी अलगतावादी राजकारणाला सुरुवात करून, आपले उपद्रवमूल्य वाढविण्याचा प्रयत्न केला नाही. कायदेमंडळात निवडून आल्यानंतर चित्तरंजनदास आणि मोतीलाल नेहरू यांच्या सहकार्याने भारतीय प्रतिनिधींचा एक शक्तिशाली गट बनविण्यात त्यांनी हातभार लावला. तसेच हिंदू-मुस्लिम ऐक्याची कास त्यांनी अजूनही सोडली नव्हती. लाहोर येथे १९२४ साली भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात बोलताना ते म्हणाले 'हिंदु-मुस्लिम ऐक्य आणि स्वराज्य या एकमेकाला पर्यायी संज्ञा आहेत.' यानंतर भराभर घटना घडत राहिल्या. १९२५ साली भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात असहकाराचा ठराव मंजूर झाला आणि केंद्रीय कायदेमंडळात हिंदी प्रतिनिधींच्या गटाचे अस्तित्व संपुष्टात आले. हिंदुस्थानला आधिक आधिकार देण्यासंबंधी शिफारशी करण्यासाठी १९२७ साली सायमन कमिशनची नेमणूक टोरी पक्षाने केली. ताबडतोब राजकीय हालचाली सुरू झाल्या. कमिशनवर एकही हिंदी सभासद नव्हता. इतर सर्व राजकीय पुढाऱ्यांप्रमाणे जीनांनीही त्याचा कडकडून निषेध केला. १९२७ च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात या विषयावर बोलताना जीना उद्गारले, 'बर्कनहेड यांनी निव्वळ गोरे सभासद नेमून स्वयंशासनाला आम्ही अयोग्य आहोत असेच घोषित केले आहे. मी पं. मालवीय यांचे स्वागत करतो. कॉंग्रेसच्या आणि हिंदुमहासभेच्या व्यासपीठांवरून हिंदू पुढाऱ्यांनी मैत्रीचा हात पुढे केला आहे त्याचे स्वागत करतो. माझ्या दृष्टीने इंग्रज सरकार देणाऱ्या

सवलतीपेक्षा हा देकार आधिक मौल्यवान आहे.' लीगच्या अधिवेशनात सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. त्याच वर्षी जीनांनी घटनात्मक सुधारणासंबंधी एक योजना प्रसृत केली. ती मुस्लिम लीगने संमत केली, 'दिल्ली मुस्लिम प्रपोजल्स' म्हणून ती ओळखली जाते. या योजनेने मुस्लिम लीगने प्रथमच संयुक्त मतदारसंघाला संमती दिली. लखनौ कराराचे वेळी टिळक आणि इतरांनी दाखविलेल्या औदर्याचा परिणाम अजून टिकून होता. या संदर्भात एक अट होती. ती म्हणजे सिंध प्रांत मुंब्रईपासून वेगळा करण्याची. तथापी याबाबतीत कॉंग्रेसने मुस्लिम लीगबरोबर करार करण्याचे टाळले आणि ही योजना बारगळली. न्या.छगला यांनी आपल्या आत्मचरित्रात याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. दरम्यान सर्वसंमत अशी घटना तयार करण्याकरता सर्वपक्षीय परिषद १९२८ साली बोलविण्यात आली. या परिषदेने हे काम करण्यासाठी मोतीलाल नेहरू समितीची नेमणूक केली. या समितीने संमत केलेला अहवाल लीगच्या वतीने छगला यांनी स्वीकारला. लीगमध्ये अनेकांना हा अहवाल मान्य होता. १९२८ च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष महमुदाबादचे राजे यांचीही त्याला संमती होती. तथापि जीनांनी त्याला विरोध केला. आणि १९२८ च्या डिसेम्बरमध्ये भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेत जीनांनी १/३ जागांची मागणी केली. पण ती फेटाळली गेली. तेव्हा जीनांनी आपला रस्ता वेगळा आहे या हिशोबाने आगाखान यांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय मुस्लिम परिषदेकडे आपला मोहरा वळवला. प्रश्न असा उपस्थित होतो की १९२७ साली संयुक्त मतदारसंघाची योजना मांडणाऱ्या जीनांनी दोनच वर्षांत तोंड एकदम उलट्या दिशेला का वळवले. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी १९२८ च्या अखेरीची राजकीय परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे. १९२० साली जीनांना नामोहरम करण्यास एक घटक कारणीभूत झाला होता. तो म्हणजे जातीयवादी मुस्लिमांचा गांधींनी केलेला अनुनय. राष्ट्रवादी आणि निधर्मी मुसलमानांना कॉंग्रेसमध्ये किंमत नाही ही तेव्हापासून आजतागायतची परिस्थिती आहे. जीनांनी हे तेव्हाच ओळखले होते. तेव्हा जातीयवादी मुसलमानांचा पाठिंबा गांधींनी मिळवण्याआधीच जीनांनी जातीयवादी पुढाऱ्यांना आपलेसे केले. १९२० च्या चळवळीत मौ. महमद अलींच्या पाठिंब्याने गांधींनी जीनांना पराभूत केले होते. तेव्हा १९३० ची चळवळ सुरू होण्याआधीच जीनांनी मुसलमानांच्या किमान मागण्या म्हणून चौदा मुद्दे प्रसृत केले आणि महमद अलींचा पाठिंबा मिळवला. राष्ट्रवादी मुसलमानांना स्वतंत्र राजकीय स्थान हवे असेल तर त्यांनी जातीयवाद्यांचे नेतृत्व केले पाहिजे हा जो दंडक गांधी युगापासून निर्माण झाला

तो भारतीय राष्ट्रवादाच्या शोकांतिकेचे दर्शन घडवितो. जी गरज जीनांच्यावर लादली गेली होती तिचेच पर्यवसन शेवटी फाळणीत होणार होते.

दरम्यान गोलमेज परिषदेची घोषणा झाली आणि जीना यांनी इंग्लंडला जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. पहिल्या गोलमेजपरिषदेनंतर भारताची घटनात्मक समस्या लवकर सुटण्यासारखी नाही हे दिसून आले. भारतात कायदेभंगाच्या चळवळीने जोर धरला होता. ज्या प्रतिगामी मुसलमानात ते जाऊन बसले होते त्यांच्या साहचर्याचे बौद्धिक आकर्षण जीनांना वाटावे अशी परिस्थिती नव्हती. त्यांना मानवेल असे एकूण वातावरण भारतात नसल्यामुळे इंग्लंडमधेच स्थायिक व्हावे असा विचार ते करू लागले. त्यानुसार कायद्याच्या प्रॅक्टिसला सुरुवात केली. नंतर ब्रिटिश पार्लमेन्टचे सभासदत्व किंवा प्रीव्ही कौन्सिलवर नेमणूक असाही प्रयत्न करण्यात आला, परंतु काहीच जमले नाही. इतकेच नव्हे तर तिसऱ्या गोलमेज परिषदेलाही त्यांना बोलविण्यात आले नव्हते. गुंतून राहण्यासारखे इंग्लंडमध्येही काही नव्हते. परंतु भारतातील परिस्थिती बदलत होती. १९३० च्या चळवळीचा बोजवारा उडालेला होता. साहजिकच कायदेमंडळाला आधिक उठाव मिळणार होता. १९२३ ची परिस्थिती पुन्हा निर्माण झार्ल. होती. अशा परिस्थितीत बेगम लियाकत अली आणि बेगम शहानवाझ यांनी केलेल्या आग्रहाला मान देऊन जीनांनी हिंदुस्थानात येण्याचे ठरविले. जीनांच्या गैरहजेरीत मुस्लिम लीगमध्ये फूट पडली होती. त्यांच्या आगमनाने ती सांधली गेली. दरम्यान ब्रिटिश पार्लमेन्टने नवीन सुधारणा कायद्याबद्दल श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती. त्यातील कित्येक तरतुदी कॉंग्रेसप्रमाणेच जीनांनाही मान्य नव्हत्या, तेव्हा मॅक्डोनाल्डने जो जातीय निवाडा दिला होता, त्याला कॉंग्रेसची संमती मिळवून श्वेतपत्रिकेचा निषेध करण्यासाठी हिंदु-मुसलमानांची युती घडवून आणावी अशी जीनांची खेळी होती. असोशिएटेड प्रेसला दिलेल्या निवेदनात ते म्हणतात, 'हिंदु-मुसलमानांत संपूर्ण सहकार्य आणि मैत्री जुळवून आणण्यात मिळणाऱ्या आनंदाइतका आनंद दुसरी कोणतीही गोष्ट देणार नाही.... तथापि प्रश्न असा आहे की मुसलमानांना ज्या संरक्षणात्मक तरतुदी अत्यंत महत्वाच्या वाटतात त्यांचा समावेश भारताच्या भावी घटनेत होऊ शकेल काय?' १९३१ च्या ऑक्टोबरमध्ये मुंबईचे प्रतिनिधी म्हणून जीनांची मध्यवर्ती कायदेमंडळावर पुन्हा नियुक्ती झाली. पुन्हा एकदा राजेंद्रप्रसाद, मालवीय, यांच्याबरोबर वाटाघाटी करून जातीय निवाड्याला त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्यात यश आले नाही. परिस्थिती अशी होती की जातीय निवाडा पार्लमेन्टच्या कायद्याने लादला जाणारच होता. त्याला संमती देऊन निदान औदार्याचा देखावा

तरी करता आला असता आणि काँग्रेस-लीग सहकार्याचा मार्ग मोकळा झाला असता. पण ते का गेले नाही याचे आश्चर्य वाटते. त्यावेळची खरी राजकीय गरज कोणीच लक्षात घेतली नाही. १९२० पासून जवळ जवळ १५ वर्षे असहकार, कायदेभंग, कायदेमंडळात अडवणुकीचे धोरण, असल्या नकारात्मक आणि निष्फळ कार्यक्रमात राष्ट्राने आपली शक्ती वेचली होती. त्यामुळे हिंदु आणि मुसलमान एकत्रपणे संसदीय पद्धती राबवू शकतील का हा जो त्यापेक्षाही महत्वाचा प्रश्न तो सतत मागे पडत गेला. आगामी कायद्यान्वये प्रांतिक स्वायत्तता मिळणार होती. त्यामुळे हिंदु-मुसलमान सहकार्याचा प्रश्न अत्यंत निकडीचा बनला होता. या दोन जमाती एकत्र येऊन विधायक दृष्टीने राज्यकारभार करू शकतील का या लाखमोलाच्या प्रश्नाला उत्तर मिळणे आवश्यक होते, पण त्याऐवजी तात्त्विक मतभेदातच काँग्रेसचे नेतृत्व गुंतले होते.

'ऑगस्ट १९३५ मध्ये नव्या सुधारणांचा कायदा ब्रिटिश पार्लमेन्टने संमत केला. त्या संबंधात जीनांची प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे: 'आपण सर्वांना माहीत आहे की नवीन घटना आपल्यावर लादण्यात आली आहे... आत्ता सर्व पुढाऱ्यांनी एकत्र येऊन विचारविनिमयाने नव्या घटनेबाबत एक निश्चित आणि सर्वसंमत धोरण आखणे हे त्यांचे कर्तव्य आहे' या दृष्टिकोनाला अनुसरून १९३६ साली भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात सर सयद हसन यांनी अध्यक्षीय भाषणात काँग्रेस आणि लीग यांनी संयुक्तपणे इतर सर्व प्रागतिक राजकीय पक्षांना एका किमान कार्यक्रमावर एकत्र येण्याचे आवाहन करण्याची कल्पना बोलून दाखविली. इतकेच नव्हे तर अशा कार्यक्रमाची रूपरेषा पण सादर केली ती पुढीलप्रमाणे:

१) सध्याच्या पद्धतीऐवजी प्रौढ मतदानावर आधारित लोकशाही जबाबदार शासन

२) सर्व दडपशाहीचे कायदे रद्द करून भाषण, वृत्तपत्र आणि संघटना स्वातंत्र्य देणे.

३) शेतकऱ्यांना ताबडतोबीने आर्थिक मदत, शिक्षित आणि अशिक्षित बेकारांना मदत, कामगारांसाठी आठ तासाचा दिवस आणि किमान वेतन.

४) सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण.

तथापि त्यातून काही निष्पन्न झाले नाही. पुढे १९३७ साली नवीन कायद्यान्वये निवडणुका घेण्यात आल्या. त्यावेळी मुस्लिम लीगने निवडणूक जाहीरनामा तयार केला. विभक्त मतदारसंघाचा अपवाद वगळता इतर बाबतीत तो काँग्रेस जाहीरनाम्याशी मिळता जुळता होता. म्हणजे मुस्लिम लीगचा कार्यक्रम निधर्मी होता. एखाद्या समाजासाठी

संरक्षक तरतुदींची मागणी करणे म्हणजे जातीयवाद नव्हे असेच मत मोतीलाल नेहरू यांचे एक विश्वासू अनुयायी रफी अहमद किडवाई यांचेही असावे.

उत्तर प्रदेशाच्या मुस्लिम लीगच्या पार्लमेन्टरी बोर्डाचे अध्यक्ष खलिकुझ्झमान यांची आणि किडवाई यांची जुनी दोस्ती होती. दोघांची काही बोलणी झाली आणि उत्तर प्रदेशात जर मंत्रिमंडळ बनविण्याची वेळ आली तर मुस्लिम लीगला दोन जागा देण्यात येतील अशा तऱ्हेचे आश्वासन देण्यात आले होते. प्रत्यक्षात निवडणुका झाल्यानंतर जे निकाल आले त्यांनी मुस्लिम लीग व कॉंग्रेस या दोघांचेही दावे खोटे ठरविले. मुसलमान कॉंग्रेसला पाठिंबा देत नाहीत हे तर सिद्ध झालेच, पण ते मुस्लिम लीगच्याही मागे नाहीत हेही दिसून आले. ज्या प्रांतात हिंदू बहुसंख्य होते, तेथेच मुस्लिम लीगला यश मिळाले होते. मुस्लिम बहुसंख्याक प्रांतात लीगचे यश नगण्य होते. कॉंग्रेसने या परिस्थितीचा फायदा उठविण्याचे ठरविले. मुस्लिम लीगला उत्तर प्रदेशात दोन जागा देऊ करण्यात आल्या. पण अशा अटीवर की ज्याचा अर्थ मुस्लिम लीगचे विसर्जन असाच व्हावा. मंत्रिमंडळात सहभागी होणाऱ्या मुसलमानांना मुस्लिम लीगचे सदस्य राहता येणार नाही अशी ती अट होती. अपेक्षेप्रमाणे लीगने हा देकार फेटाळला. त्यानंर जातीयवादी उलेमा पार्टीला मंत्रिपदाची लालूच दाखवून त्यांचा पाठिंबा मिळविण्यात आला. वस्तुत: मुस्लिम लीगला राजकीय कार्यक्रम होता. तेव्हा उत्तर प्रदेशातच नव्हे तर इतरत्रही लीगबरोबर संयुक्त मंत्रिमंडळे बनवून राजकीय कार्यक्रमाच्या आधारावर हिंदू आणि मुसलमान सहकार्य करू शकतात किंवा नाही याचा शोध घेणे अनिवार्य होते. कारण त्यावरच भारतीय लोकशाहीचे भवितव्य अवलंबून होते. धर्माच्या नावावर या दोन जमाती भांडू शकतात हे माहीत होते, पण सर्वांच्या भल्यासाठी त्या एकत्र येऊ शकतात का याचेही उत्तर मिळणं आवश्यक होते. पण गांधी आणि नेहरूंना त्याची गरज वाटत नव्हती. जातीयवादी मुसलमानांना गांधी टोपी चढविणे यातच भारताचा उद्धार आहे, अशी त्यांची प्रामाणिक भावना होती. उत्तर प्रदेशात होऊ घातलेला प्रयोग फसला असता तर कॉंग्रेसनेच लोकसंख्येच्या अदलाबदलीच्या तत्त्वावर फाळणीचा प्रस्ताव देण्यास हरकत नव्हती. मुसलमानांनीच तो नाकारला असता. मलबारमधील मुसलमानाने रावळपिंडीला स्थलांतर करण्यास निश्चितच विरोध दर्शविला असता.

अशी एक आख्यायिका आहे की बाळासाहेब खेरांनी मुस्लिम लीगच्या दोन सदस्यांना मंत्रिमंडळात घेण्याचा विचार केला होता व त्यानुसार दोन नावे सुचविण्यास लीगला सांगितले होते. १९३७ च्या निवडणुकीनंतर गांधींनी व्यक्तिश: लक्ष घालून

हिंदु-मूस्लिम समझोता घडवून आणावा अशी विनंती जीनांनी खेर यांच्यामार्फत केली होती. त्यासंबंधी लिहिताना गांधी म्हणतात, 'मी काही करू शकलो असतो तर फार आनंद झाला असता, पण मी अत्यंत अगतिक आहे. ऐक्यावरील माझी श्रद्धा पूर्वीइतकीच प्रखर आहे. तथापि घन अशा अंध:कारापलीकडे दिवा प्रकाश मात्र दिसत नाही. आणि अशा विपत्तीत मी परमेश्वराकडे प्रकाशासाठी करुणा भाकत आहे. जीनांच्या आवाहनाबाबत गांधींनी दाखविलेली उदासीनता विलक्षण धक्कादायक आहे.

### मुस्लिम अलगतावादाचे पुनरुज्जीवन

१९३७ च्या निवडणुकीतील मुस्लिम लीगच्या अपयशानंतरच्या काँग्रेसच्या धोरणाबद्दल रमेशचंद्र मुजुमदार लिहितात की १९ व्या शतकात काँग्रेसला नगण्य मानण्याची चूक इंग्रजांनी केली होती. तशीच चूक मुस्लिम लीगच्या बाबतीत काँग्रेसने केली आणि त्याचे पर्यवसान फाळणीत झाले. ते आणखी म्हणतात की गांधीशिवाय भारत स्वतंत्र झाला असता पण जींनाशिवाय पाकिस्तान मात्र झाले नसते. साहजिकच जीनांना डावलणे ही अखेरीस राष्ट्रीय अपत्ती ठरली. असे काही होईल याची कल्पना नव्हती असे त्यावेळच्या पुढाऱ्यांना म्हणता येणार नाही. कारण मुस्लिम आक्रमकता, जीनांची कर्तबगारी आणि इंग्रजांचा पाठिंबा या तीन गोष्टी एकत्र आल्या तर उत्पाताखेरीज अन्य काही घडणार नाही ही गोष्ट स्वयंसिद्ध होती. लखनौ कराराला कारणीभूत असणाऱ्यांनी हे ओळखले होते. त्यामुळेच पुढील वीस वर्षे मुस्लिम अलगतवादाला आळा बसला होता. पण १९२० नंतर नैतिक श्रेष्ठतेचा गंड झालेल्या आणि १९३७ सालच्या निवडणुकीत सर्वसाधारण जागांवर भरघोस यश मिळाल्यामुळे स्वत:च्या राजकीय शक्तीविषयी भ्रामक कल्पना करून घेतलेल्या व्यवहारी अपूर्णांकांच्या हाती राजकारण गेले होते. विजयही विनयाने शोभतो याचे भान सविनय कायदेभंग करणाऱ्यांना राहिले नाही. त्यामुळे मुस्लिम लीगच्या निवडणुकीतील अपयशानंतर लीगला खच्ची करण्याचे मनसुबे रचले जाऊ लागले. त्यांची सुरुवात हिंदुमुस्लिम ऐक्याबाबत जीनांनी केलेल्या आवाहनासंबंधात गांधींनी दाखविलेल्या उदासीनतेने झाली. त्यांच्या आशीर्वादाने नेहरूंनी मुस्लिम लीग आणि जीना यांना राजकीय दृष्ट्या संपुष्टात आणण्याची त्रिविध योजना आखली. हिंदुस्थानात काँग्रेस आणि इंग्रज सरकार हे दोनच पक्ष असण्याची नेहरूंची घोषणा हा त्यांचा पहिला भाग. मुस्लिम जनसंपर्क साधून त्यांच्यावरील लीगचा प्रभाव नष्ट करणे हा दुसरा भाग. आणि आझाद इत्यादी खिलाफतवादी मुसलमानांच्या सहाय्याने जातीयवादी मुसलमानांना काँग्रेसमध्ये आणणे हा तिसरा

भाग. १९१६ साली लो. टिळकांनी गृहीत धरलेली तिरंगी लढतीची वस्तुस्थिती आणि नेहरूंचा द्विपक्ष सिद्धांत यांची तुलना केली म्हणजे वीस वर्षात राजकारण किती पोरकट आणि शब्दबंबाळ झाले होते याची कल्पना येते. पोरकट राजनीतीचे पर्यवसान नेहमीच दुर्घटनेत होते, तसे ते हिंदुस्थानातही झाले.

पं. नेहरूंची त्रिविध योजना यशस्वी झाली तर जीनांचा राजकीय अस्त निश्चित होता. जीना एका कोंडीत सापडले होते आणि त्यातून बाहेर पडावयाचे असेल तर १९२० पासून ज्या मार्गाने गांधींनी समाजाला झपाटून टाकले होते त्याची वापर करण्याची गरज आहे हे जीनांनी ओळखले. तो मार्ग म्हणजे जनसंमोहनशास्त्र. मुसलमानांच्या बाबतीत त्याचा वापर फार सोपा आहे. 'इस्लाम खत्रेमे है' म्हणून घोषणा दिली की मुसलमान एकत्र येतात. कोणता धोका आहे याची ते विचारपूसही करत नाहीत. राजकीय अस्तित्वासाठी जीनांनी स्वत:चे अवमूल्यन अत्यंत प्रतिगामी जातीयवाद्यात घडवून आणण्याचे ठरविले. अवमूल्यन ज्यावेळी जाणीवपूर्वक केले जाते त्यावेळी त्याच्या मर्यादाच नष्ट झालेल्या असतात. या न्यायाने जीनांचे रूपांतर अखेर एका रक्तपिपासू राजकारण्यात झाले. १९३७ पासून १९४७ पर्यन्तचे गांधी-नेहरू आणि जीना यांच्यातील संबंध पाहिले तर वैयक्तिक आकसापलिकडे काहीच आढळत नाही. गांधी नेहरूंना धडा शिकवायचा या भावनेने ते पछाडून गेले होते आणि असा धडा शिकवता शिकवता त्यांनी भारताची दोन शकले पाडली.

नेहरूंच्या त्रिविध योजनेला जीनांचे उत्तरही त्रिविध होते. द्विपक्ष सिद्धांताला मुस्लिम लीग हा तिसरा पक्ष भारतात असल्याची घोषणा, हे उत्तर होते. याचेच रूपांतर पुढे जीनांनी मांडलेल्या द्विराष्ट्र सिद्धांतात झाले. 'हिंदू-मुस्लिम ऐक्याचा राजदूत' म्हणून समजल्या गेलेल्या जीनांनी अखेर भारतात हिंदू आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत म्हणून सिद्धांत मांडला. मुस्लिम अलगतावादाचे पुनरुज्जीवन झाले. मुस्लिम जनसंपर्क साधण्याच्या नेहरूंच्या योजनेला उत्तर म्हणून मुल्ला मौलवींच्या मदतीने हिंदूंच्या हातून मुसलमानांचा छळ होत असल्याच्या असत्य प्रचाराची त्यांनी राळ उडवून दिली. मुसलमानांना काँग्रेसमध्ये आकर्षित करण्याच्या धोरणावर उतारा म्हणजे काँग्रेसमधील मुसलमानांना बदनाम करणे. यापुढील इतिहास सर्वांनाच माहीत आहे. त्याची पुनरावृत्ती करण्याचे कारण नाही. दुर्दैवाची गोष्ट एवढीच की नरसंहार आणि मालमत्ता विध्वंस यांच्या रूपाने एवढी किंमत देऊनही आपण त्यापासून काहीच शिकलो नाही. जातीयवादी मुसलमानांचा अनुनय आजही चालू आहे. प्रादेशिक घटकांच्या न्याय्य मागण्याकडे दुर्लक्ष चालूच आहे. अनेक आंदोलने चालू आहेत

त्यात प्राण आणि वित्तहानी होत आहे. आणि त्यांचा लाभ निवडणुकीसाठी कशा रीतीने घेता येईल याविषयी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष व्यग्र आहेत. अलगतावादी आंदोलने ही त्याच्या चिंतेचा विषय नव्हे.

लेखाच्या शेवटी भारतासारख्या बहुधर्मीय, बहुजातीय, बहुभाषिक देशाच्या खऱ्या समस्या कोणत्या हे जीनांच्याच शब्दात देणे उचित ठरेल. फेब्रुवारी १९३५ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळात भाषण करताना जीना म्हणाले होते, 'महाशय, हा प्रश्न अल्पसंख्यांकांचा आहे आणि ती राजकीय समस्या आहे... अल्पसंख्य म्हणजे अनेक गोष्टींचे एकत्रीकरण. एखाद्या अल्पसंख्यांकाचा धर्म देशातील इतर नागरिकांपासून भिन्न असेल. त्याची भाषा वेगळी असेल, त्याचा वंश वेगळा असेल, त्याची संस्कृती, भाषा, वंश, कला, संगीत आणि अशा कित्येक गोष्टी मिळून राज्यामध्ये अल्पसंख्य एक अलग घटक (एन्टीटी) बनतात आणि त्या भिन्न घटकाला एक घटक म्हणून संरक्षक तरतुदी (सेफगार्डस) हव्या असतात, निश्चितच त्या प्रश्नाला आपण एक राजकीय समस्या म्हणून सामोरे गेले पाहिजे. त्याची आपण उकल केली पाहिजे आणि त्याला टाळून चालणार नाही' मला वाटते आदिवासी, बोडो, इतकेच काय पण बेळगाव, कारवार येथील मराठी भाषिक, या सर्वांनाच त्यांच्या भावनेचा प्रतिध्वनी जीनांच्या भाषणात आढळेल.

अल्पसंख्यांकांसाठी जीनांनी संरक्षक तरतूदींची तरफदारी केली. त्या संदर्भात गांधींचे विचार काय होते हे तपासून पहाणे बोधप्रद होईल. १९३९ साली लिहिलेल्या एका लेखात ते म्हणतात, 'हिंदुस्थानात फक्त राजकीय पक्षच असू शकतात. अल्पसंख्य किंवा बहुसंख्य जमाती नव्हे' 'केवळ काँग्रेसलाच समाजातील सर्व लोकांच्या वतीने बोलण्याचा आधिकार आहे असा माझा दावा असल्यामुळे माझ्यावर पुष्कळजण रागावून आहेत हे मला माहित आहे...पण काँग्रेसच सर्व भारतीयांचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे तिला जे विरोध करतात त्यांना मोजले जाऊ नये.' यातून पुढील वस्तुस्थिती निष्पन्न होते. हिंदुस्थानच्या लोकांतर्फे बोलण्याचा आधिकार फक्त काँग्रेसलाच होता आणि काँग्रेसचे प्रतिनिधित्व केवळ गांधीच करीत होते. याचा सरळ अर्थ असा की भारतात जे निरनिराळे घटक होते त्यांचे हितसंबंध संपूर्णपणे काँग्रेसच्या दयाबुद्धीवर आणि गांधींच्या न्यायबुद्धीवर अवलंबून होते. हीच चाल स्वातंत्र्यानंतरही चालू राहिली १९४७ नंतर भारतातील सर्वच समस्यांची उकल नेहरू घराण्याच्या न्यायबुद्धीवर अवलंबून आहे आणि त्यातूनच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत यांची अनेक उदाहरणे सापडतात. भाषावार प्रांत रचनेपासून तो मुस्लिम

महिला विधेयकापर्यंत, कोणतीही घटनात्मक तरतूद नव्हे, तर नेहरू घराण्याची इच्छा ही बलीयसी ठरली आहे. डांग, बस्तर, झारखंड इ. आदिवासी विभागातील लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण कशा तऱ्हेने झाले हे सर्वज्ञात आहे. 'हिंदुस्थानात फक्त राजकीय पक्षच असू शकतात. अल्पसंख्य किंवा बहुसंख्य समाज नव्हे' याचा अर्थ अल्पसंख्यांकांचे हितसंबंध राजकीय पक्षांच्या दावणीला बांधणे एवढाच होता.

गांधी आणि जीना यांच्या भूमिका वर विशद केल्या आहेत. तात्पर्य वाचकांनीच काढावे.

निबंध 3560
वा. क्र. 26009
८५५६३

# ७

# महात्मा गांधी - सत्य आणि सत्याग्रह

सत्याग्रह ही महात्मा गांधींची आधुनिक जगाला अनन्यसाधारण अशी देणगी होय. त्यांनी मांडलेली सत्याग्रहाची तात्त्विक भूमिका आणि त्यांचे आचरण यांचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. गांधीजींनी त्यांची सत्याची कल्पना दोन स्तरांवर मांडली आहे. व्यावहारिक आणि तात्त्विक. 'सत्य सदा बोलावे सांगे गुरू आणि आपुला बाप' किंवा 'सत्यं वद धर्मं चर' या वचनातला जो सत्याचा अर्थ आहे, ते गांधीजींचे व्यावहारिक पातळीवरील सत्य. दुसऱ्या शब्दात सत्य म्हणजे वास्तव किंवा सत्य घटना. उदा. आपला मुलगा हरिलाल यास लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'तुझे मोठे जोराचे म्हणणे आहे, की तू काही ती चोरी केली नाहीस; यावर मी विश्वास ठेवला तरी जग ठेवणार नाही... कोर्टात तुझ्यावर खटला चालला तरी भिऊ नकोस. माझे ऐकायचे असेल तर तू वकील देऊ नकोस. विरुद्ध पक्षाच्या वकिलाजवळ साऱ्या गोष्टीचा खुलासा कर.' तसेच 'सत्यं ब्रूयात, प्रियं ब्रूयात' या सुभाषिताच्या संदर्भात ते लिहितात - 'आपल्या सत्याच्या वापरामुळे ऐकणाराला राग येईल, परंतु त्याची सदसद्विवेकबुद्धी त्याला सांगेल, की आपल्याविषयी बोलण्यात आले ते खरे आहे आणि अत्यंत मोठ्या सद्भावनेनेच ते बोलले गेले.'

तथापि गांधींनी तात्त्विक पातळीवर मांडलेली सत्याची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे आणि त्यांच्या सत्याग्रहाच्या मुळाशी तीच आहे. जैनधर्मातील अनेकान्तवाद अथवा स्याद्वाद हा तिचा आधार

आहे. इंग्लंडहून परत आल्यानंतर जैन पंडित राजचंद्र यांच्या संगतीत ते काही काल होते. त्यांनी जे जैन धर्मतत्त्व विशद केले त्याचा गाढ प्रभाव गांधींच्यावर पडला होता. जैन धर्मतत्त्वाप्रमाणे सत्य हे निरपेक्ष नसून त्याची प्रतीती वेगवेगळ्या तऱ्हेने येऊ शकते. गांधींनी सत्याचे हे तत्त्वज्ञान स्वीकारले होते. त्यामुळे स्वमताबद्दल आग्रही राहूनही दुसऱ्याच्या मताचा आदर करण्याच्या आवश्यकतेचा त्यांनी नेहमीच तात्त्विक पुरस्कार केला. ते म्हणतात, 'अनेकांतवादाचे तत्त्व मला अत्यंत प्रिय आहे... त्यामुळे माझे विरोधक आणि टीकाकार यांच्यावर हेत्वारोप करण्यापासून ते मला नेहमीच वाचवते. आज मी त्यांच्यावर प्रेम करू शकतो कारण दुसरे मला जसे पाहू शकतात त्यानुसार स्वत:ला पाहण्याची दृष्टी मला प्राप्त झाली आहे.' एका दृष्टीने या तत्त्वज्ञानात नवे असे काहीच नाही. सहिष्णुतेचाच त्यात आविष्कार आढळतो. 'माझा तुमच्याशी संपूर्ण मतभेद आहे. पण तुमचा मतभेदाचा हक्क मला पूर्णपणे मान्य आहे.' या वोल्तेरच्या वचनात तीच भावना आढळते. गांधींचे असामान्यत्व निव्वळ विचार मांडण्यात नव्हते. त्यात अनुस्युत असलेली सहिष्णुता आणि परमत आदर यांचा पुरस्कार अनेकांनी फार पूर्वीपासून केलेला आहे. तथापि गांधींनी हे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आचरणात आणण्याचा प्रयत्न केला, इतकेच नव्हे तर भारतीय समाजाच्या अंगी हे तत्त्वज्ञान बाणवण्याचा प्रयोग केला आणि त्या तत्त्वज्ञानाच्या आधाराने इंग्रजी साम्राज्यवादी सत्तेविरुद्धच्या जनतेच्या लढ्याचे नेतृत्व केले.

विसाव्या शतकातील संघर्षग्रस्त युरोपच्या दृष्टीने हा एक अभूतपूर्व प्रयोग होता. संघर्ष आणि त्यातून परिणत होणाऱ्या सर्वनाशाच्या कल्पनेने भीतिग्रस्त झालेल्या युरोपीय विचारवंतांना गांधींच्या प्रयोगाने एक नवा साक्षात्कार घडवून आणला. साम्राज्यवादी सत्तास्पर्धेने युरोपला तीनशे वर्षांहून अधिक काळ ग्रासलेले होते. मार्क्सने विरोधविकासवादाचा सिद्धांत मांडला. त्याचाही आधार संघर्ष हाच होता. साम्राज्यवादी स्पर्धेतून निर्माण झालेली दोन महायुद्धे, तसेच मार्क्सवादाच्या प्रभावाखाली आलेल्या कम्युनिस्ट राष्ट्रांतील रक्तरंजित राजकारण आणि वैचारिक मुस्कटदाबी, यांच्या पार्श्वभूमीवर गांधीजींच्या अहिंसामय सत्याग्रहाच्या संकल्पनेने आणि त्याच्या देशव्यापी प्रदर्शनाने, युरोपीय विचारवंत भारले गेले असल्यास त्यात नवल नाही. जगाला सुसंस्कृतपणाच्या उच्च पातळीवर नेणारा हा प्रयत्न आहे अशी सर्वच विचारवंतांची खात्री पटली होती. विरोधकांबद्दल आदर, आपण गृहीत धरलेल्या सत्याचा आग्रह पण त्यात न्यून असण्याची संभवनीयता मान्य करण्याची उदारमनस्कता, या सर्वच गोष्टी तात्त्विकदृष्ट्या उच्च कोटीच्या सुसंस्कृतपणाच्या निदर्शक होत्या. आणि त्यांची

जगाला खरोखरीच नितांत गरज होती. गांधींनी जगाला एका नव्या मार्गाची दिशा दाखवून दिली हे निस्संशय. पण ज्या भारतातील जनतेच्या सहाय्याने त्यांनी जगाला एका अद्‌भुत प्रयोगाचे दर्शन घडवले त्या भारतात आज दुरवस्था का ? याचे उत्तर शोधण्याचा प्रस्तुत लेखात प्रयत्न करणार आहे. पण त्यासाठी गांधींच्या ' सत्य ' आणि ' सत्याग्रह ' या मागील सत्याचा वेध घेणे आवश्यक आहे.

**१. सत्य**

गांधीजींवर लिहिताना त्यांनी जे उदंड लेखन केले आहे आणि भाषणे दिली आहेत त्यांचा उपयोग क्रमप्राप्त आहे. त्यांचे लेखन आणि भाषणे ९० हून अधिक खंडात संकलित केली गेली आहेत. या सर्व साहित्याचा बाज असा आहे, की गांधींनी या लेखनातून फक्त सत्य कथन केले आहे असा भास निर्माण व्हावा. प्रांजलपणा हे या सर्व लेखनाचे बाह्य वैशिष्ट्य. त्यामुळे वाचणारा भारून जातो आणि त्यांनी कथन केलेल्या घटनांच्या विश्वासार्हतेचा प्रश्न सहसा कोणी उपस्थित करीत नाही. वस्तुत: गांधींनी केलेले सर्वच लेखन प्रचारकी आहे आणि प्रचारकी लेखनाची विश्वासार्हता तपासून पाहण्याची नेहमीच गरज असते. पण या लेखनाला प्रांजलपणाचा जो मुलामा दिला आहे त्यामुळे त्याची विश्वासार्हता तपासून पाहण्याचे अवधान नेहमीच राहते असे नाही. परिणामी गांधींच्या बाबतीत सत्यशोधन अधिकच बिकट होते.

गांधींचे लेखन प्रचारकी असल्यामुळे त्याचा उद्देश दुसऱ्यावर ईप्सित परिणाम घडवून आणणे हा असतो आणि त्यासाठी सत्यापलापदेखील करण्यास ते तयार असतात. याचे एक उदाहरण देण्यासारखे आहे. आपला सतरा वर्षे वयाचा मुलगा मणिलाल याला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ' निरागस वयातच म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मौजमजा आणि गंमत करण्यास हरकत नसावी. पण मूल समज येण्याच्या वयाचे झाले म्हणजे त्याने जबाबदारीच्या जाणीवेने वागण्यास शिकले पाहिजे, तसेच चारित्र्यसंवर्धनाचा अखंडपणे जाणीवपूर्वक प्रयास केला पाहिजे... मला आठवतंय जेव्हा मी तुझ्यापेक्षा लहान होतो तेव्हा वडिलांची शुश्रुषा हा माझा सगळ्यात मोठा आनंद होता. माझ्या वयाच्या बाराव्या वर्षापासून मला मौजमजा किंवा गंमत माहीत नाही.'

बाराव्या वर्षापासून आपल्याला मौजमजा माहीत नाही हे आपल्या मुलाच्या मनावर बिंबविण्यासाठी गांधींनी सरळ सरळ सत्यापलाप केला होता. त्यांच्याच शब्दात त्यांनी बाराव्या वर्षानंतर मौजमजा कशी केली याचे दर्शन घडविणे इष्ट होईल. शेख

मेहताब या मित्राच्या संगतीने गांधींना मांसाहाराची सवय लागली होती. त्या संबंधात ते लिहितात 'रोटीचा तिरस्कार मंदावला, बकऱ्याची कीव बुजली, आणि मांसाची म्हणता येत नाही पण मांसमिश्रित पदार्थांची चटक लागली.' याच मित्राच्या नादाने ते वेश्येकडेही गेले. त्याबद्दल ते लिहितात,

'याच मैत्रीमुळे मी व्यभिचारातही पडलो असतो. एक वेळ हा भाई मला वेश्यांच्या वस्तीत घेऊन गेला. तेथे मला योग्य सूचना देऊन एका बाईच्या घरात सोडले. मला तिला काही पैसे वगैरे द्यावयाचे नव्हते. हिशेब चुकवलेला होता. मी फक्त गुजगोष्टी करावयाच्या होत्या. मी घरात अडकलो तर खराच. .पण ईश्वराचीच ज्याला तारण्याची इच्छा तो पडू पहात असला तरी पवित्र राहू शकतो. त्या खोलीत मी तर आंधळाच बनून गेलो. मला बोलण्याचे भान राहिले नाही. शरमेने स्तब्ध होऊन त्या बाईपाशी खाटेवर बसलो. परंतु तोंडातून शब्द निघेना. बाई संतापली आणि चारदोन शेलक्या विशेषणांचा आहेर करून तिने मला दरवाजा दाखविला... अशाच तऱ्हेचे आणखी चार प्रसंग आयुष्यात आलेले आहेत. त्यापैकी बहुतेक प्रसंगी स्वत:च्या प्रयत्नाशिवाय, बाह्यसंयोगामुळे मी बचावलो असे म्हणता येईल.'

पुढे गांधींना विड्या ओढण्याची सवय लागली त्या संबंधात,

'माझ्या चुलत्यांना विड्या ओढण्याची सवय होती, त्यांना व इतरांना धूर काढताना पाहून आम्हालाही विडी फुंकण्याची इच्छा झाली. गाठीला पैसा तर नाही, तेव्हा काकांनी फेकून दिलेली विड्यांची थोटके चोरण्यास आम्ही सुरुवात केली. परंतु विड्याचे तुकडे नेहमी कोठून मिळणार ? शिवाय त्यातून धूरही विशेष निघेना. म्हणून नोकराच्या गाठीला चार दोन दिडक्या असत, त्यातील मधून मधून एखादी लांबविण्यास सुरुवात केली. आणि तिच्या विड्या आणू लागलो.'

वयाच्या एकविसाव्या वर्षी घेतलेला पुढील अनुभव.

'रात्र झाली. आम्ही सभेतून घरी आलो. जेवून पत्ते खेळण्यास बसलो. विलायतेत कुलीन घरामध्येही अशा तऱ्हेने गृहिणी पाहुण्यांबरोबर पत्ते खेळण्यास बसते. खेळताना निर्दोष विनोद कोणीही करतो. येथे बीभत्स विनोद सुरू झाला. माझे जोडीदार त्याकामी पटाईत होते हे मला माहीत नव्हते. मला त्या विनोदात गोडी वाटू लागली. मीही त्यात सामील झालो. शब्दावरून कृतीवर यायला वेळ नव्हता. पत्ते बाजूला राहून जाण्याच्या तयारीत होते... परस्त्रीला पाहून विकारवश झाल्याचा आणि तिच्याबरोबर खेळ खेळण्याची इच्छा झाल्याचा हा पहिलाच प्रसंग होता असे मला आता आठवते.'

असे अनेक प्रसंग उद्धृत करता येतील. प्रश्न असा, की निदान एकविसाव्या

वर्षापर्यंत तरी मौजमजा करणाऱ्या गांधीजींनी, मुलाला पत्र लिहिताना बाराव्या वर्षापासून आपण मौजमजा माहीत नाही असे धडधडीत असत्य विधान का करावे ? या प्रश्नाच्या उत्तरात गांधींच्या लेखनाचे उद्दिष्ट जाहीर होते. वस्तुत: त्यांच्या जीवनातील मौजमजा इतकी अविस्मरणीय होती, की मुलाला लिहिलेल्या पत्रातील मौजमजा माहीत नसल्याचा उल्लेख, अनवधानाने आला असावा असे म्हणता येणार नाही. पत्र लिहिताना त्यांनी जे उद्दिष्ट ठेवले होते त्यानुसार त्यांनी विधान केले. मुलाला चांगले वळण लागावे; त्याच्या मनात वडिलांबद्दल असलेला आदर दुणावा या हेतूने त्यांनी सत्यापलाप केला. याचाच अर्थ असा की त्यांच्या एकूणच लेखनाचा किंवा भाषणांचा हेतू वाचणाऱ्याचे किंवा ऐकणाऱ्याचे नीतिसंवर्धन व्हावे हा होता. साहजिकच ते प्रचारकी किंवा बोधप्रद आहे. ते सत्यच आहे असे गृहीत धरता येणार नाही.

गांधींनी आत्मकथा अथवा सत्याचे प्रयोग लिहिले त्याचाही हेतू प्रचार हाच होता. प्रस्तावनेत ते म्हणतात, 'मला जे करावयाचे आहे ज्याच्यासाठी आज तीस वर्षे माझी धडपड चालली आहे ते म्हणजे आत्मदर्शन, ईश्वराचा साक्षात्कार, मोक्ष हेच होय. माझी सर्व हालचाल याच दृष्टीने होत असते. माझे सर्व लिखाण याच दृष्टीने चालते, आणि राजकीय चळवळीत मनोभावे पडतो तो याचसाठी.' गांधींनींच आपले लेखन हेतुप्रधान असल्याचे अशा तऱ्हेने आग्रही प्रतिपादन केले आहे. हेतुप्रधान लेखन आणि सत्य यांमध्ये अंतराय असण्याचा संभव नेहमीच असतो. साहजिकच 'सत्याचे प्रयोग' मध्ये सत्यच आहे असे निर्विवादपणे म्हणणे शक्य नाही.

आत्मकथेला गांधींनी सत्याचे प्रयोग म्हटले आहे. त्यात असत्यदेखील सापडले म्हणजे त्याचे प्रचारकी स्वरूप अधिकच स्पष्ट होईल. ज्याप्रमाणे मणिलालला लिहिलेल्या पत्रात सत्यापलाप आढळतो. तसाच आत्मकथेतही आहे का याचा त्यासाठी शोध घेतला पाहिजे. आत्मकथेत गांधी लहानपणापासूनच सत्यवादी होते असा एक आभास हेतुत: निर्माण करण्यात आला आहे. 'जाणते अजाणतेपणी मी सत्याचा सेवक तर होतोच' असे गांधी निश्चितपणे सांगतात. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. अनेकांना स्वभावत:च असत्य बोलणे अशक्य असते. गांधी त्यांच्यापैकी एकजण होते एवढेच. अशा व्यक्ती असत्य बोलत नाहीत पण सत्य सांगतातच असे नव्हे. आपले असत्य उघडकीला येईल अशी त्यांना धास्ती वाटत असली म्हणजे ते विलक्षण अस्वस्थ असतात. आणि असत्याची कबुली, ते उघडकीस येण्याच्या आधीच दिली, म्हणजेच त्यांना हलके वाटते. या प्रवृत्ती अनुसार त्यांनी वडीलबंधूंच्या सोन्याच्या कड्यातील एक तोळा सोने विकल्याची कबुली वडिलांकडे दिली. कारण ही चोरी केव्हा ना

केव्हा उघडकीला आलीच असती. परंतु विड्या ओढणे, वेश्येकडे जाणे, मांसाहार करणे यांबद्दलचे सत्य मात्र त्यांनी दडवून ठेवले. कारण या घटना उघडकीस येण्याची शक्यता बरीच कमी होती. अर्थात त्याबद्दल जर वडिलांनी त्यांना विचारले असते तर गांधी निश्चितच असत्य बोलले नसते. याचा अर्थ गांधी सत्यवादी होते असा नव्हे, तर उघडकीस येणारे असत्य दडवणे त्यांना अशक्य होत असे. ते जर खरोखरी सत्यवादी असते तर त्यांनी सर्वच घटना, परिणामांची तमा न बाळगता, वडिलांना सांगितल्या असत्या. आत्मकथा ही प्रचारकी असून त्यात महात्मा पदाच्या पुनर्वसनाच्या हेतूने असत्य कसे पेरले आहे याचे आणखी एक उदाहरण देण्यासारखे आहे. मांसाहाराच्या मागचा हेतू विशद करताना ते म्हणतात, 'मांसाहार ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे मी बलवान व हिंमतवान बनेन. सर्व देश मांसाहार करील, तर इंग्रजांचा पाडाव करता येईल असे मला वाटू लागले....' 'मला बलवान, हिंमतवान व्हावयाचे होते... आणि मग इंग्रजांचा पाडाव करून हिंदुस्थानला स्वतंत्र करावयाचे होते.' या वेळी गांधींचे वय चौदा-पंधराचे होते. १८८५ साली काँग्रेस स्थापन झाली. त्यानंतर २१ वर्षांनी म्हणजे १९०६ साली काँग्रेसने 'स्वराज्य' हा शब्द प्रथम उच्चारला. पण पोरबंदरच्या सरंजामी वातावरणात वाढलेल्या आणि गांधींनी स्वत:च म्हटल्याप्रमाणे 'कामासक्त' असलेल्या गांधींना मात्र स्वातंत्र्याची आच चौदा-पंधराव्या वर्षीच लागली होती ! म्हणजे ज्या दिशेने राष्ट्रीय नेते कित्येक वर्षे चाचपडत होते ती दिशा, विड्या ओढणे, मांसाहार करणे, वेश्येकडे जाणे, चोरी करणे अशा अनेक उचापतींतून आणि काठेवाड्यासारख्या राजकीय दृष्ट्या अत्यंत मागासलेल्या भागात राहूनही गांधींना गवसली होती. केवढे हे द्रष्टेपण ! आणि इतक्या लहान वयात स्वातंत्र्याची ऊर्मी निर्माण झालेल्या गांधीजींनी, पहिले महायुद्ध संपेपर्यंत ब्रिटिश साम्राज्याबद्दल आत्यंतिक निष्ठा बाळगली होती, हाही त्यांच्या स्वातंत्र्यतृष्णेचाच पुरावा नव्हे काय ? खरी मौज तर पुढेच आहे. आपण मांसाहार स्वातंत्र्यासाठी सुरू केला हे आग्रहाने सांगितल्यावर ते लगेच पुढच्याच वाक्यात म्हणतात, 'स्वराज्य हा शब्दही त्या वेळी ऐकला नव्हता.' आणि तरीही स्वातंत्र्याकरिता मांसाहार !

गांधीजी बालपणी सत्यवादी नव्हते. तसेच इंग्लंडमध्ये असतानाही सत्याबद्दल त्यांनी फारसा विचार केला असावा असे दिसत नाही, उलट आपण विवाहित आहोत हे सत्यही काही वेळा त्यांनी दडवून ठेवले होते. वर उल्लेखिल्याप्रमाणे भारतात परतल्यानंतर राजचंद्र यांच्या सहवासात त्यांनी सत्याची संकल्पना प्रथमच निश्चित केली. अर्थात याचा पहिला प्रयोग त्यांनी वकिली व्यवसायात केला. आफ्रिकेतील मुक्कामात दादा

अब्दुल्ला यांच्या वतीने एका दाव्यात त्यांनी वकीलपत्र स्वीकारले होते. सत्य हे निरपेक्ष नसते. त्यामुळे सर्व बाजूंचा साकल्याने विचार आणि मतभेदाच्या बाबतीत लवादाची नियुक्ती, असा सत्याचा व्यावहारिक अर्थ गांधींनी लावला. अहमदाबादमध्ये पुढे ज्या वेळी गिरणी कामगारांचा संप झाला त्यावेळी गांधींनी सत्याग्रहाचा जो मार्ग अवलंबिला त्याचे मूळ आफ्रिकेत त्यांनी चालविलेल्या दाव्यात सापडते. ते लिहितात 'दादा अबदुल्लांच्या दाव्याची तयारी करीत असताना हकीकतीला इतके महत्त्व असते ही गोष्ट माझ्या ध्यानात आली नव्हती. हकीकत म्हणजे सत्य गोष्ट. सत्याला चिकटून राहिल्यास कायदे आपण होऊनच आपल्याला अनुकूल अशी जुळवाजुळव करून घेतात.'

वकिलीच्या व्यवसायाकडेही गांधी सत्त्याचा प्रयोग म्हणूनच पाहात होते ही पुढील उद्गारावरून स्पष्ट होईल.

'माझ्या वीस वर्षातील वकिलीचा बराचसा वेळ स्वत:च्या ऑफिसात बसून शेकडो तडजोडी करविण्यातच गेला. त्यापासून माझे काही नुकसान झाले नाही. द्रव्याचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही. आत्म्याचे नुकसान तर नाहीच झाले.'

## सत्याच्या संकल्पनेचा विस्तार

सुरुवातीला सत्य म्हणजे वस्तुस्थिती किंवा हकीकत एवढेच समीकरण गांधींच्या मनात होते. तथापि आफ्रिकेतील त्यांच्या सार्वजनिक कार्याच्या अनुषंगाने, तसेच या कार्यात जे स्थान त्यांनी प्राप्त करून घेतले होते त्याच्या अनुरोधाने, त्यांच्या सत्याच्या आशयात अनेक घटक मिसळत गेले आणि त्यातून त्यांनी अखेर सत्याग्रहाचे तंत्र विकसित केले. १८९४ साली नाताळमधील भारतीयांचा मताधिकार रद्द करण्याचे तेथील कायदेमंडळाने ठरविले. त्याविरुद्ध चळवळ करण्याचा सल्ला देऊन तिचे नेतृत्व गांधींनी यशस्वीपणाने केले. या संदर्भात आफ्रिकेतील परिस्थिती दादाभाई नौरोजी यांना अवगत करून देताना गांधींनी लिहिले.

'मी जे काय केले आहे त्याच्या आणि माझ्याविषयी थोडेसे. मी अजून अननुभवी आणि तरुण आहे. आणि म्हणून माझ्या हातून चुका होण्याचा संभव आहे... ही समस्या हाताळण्यासाठी मी एकमेव उपलब्ध व्यक्ती आहे.'

सदर आंदोलनाने गांधींच्या सत्याग्रहाच्या दोन वैशिष्ट्यांचे दर्शन घडविले (१) गांधींनी सत्यामधे मताधिकाराचा, म्हणजे राजकीय अधिकाराचा, अंतर्भाव करून त्याला अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे स्वरूप दिले त्यातून पुढे राजकीय सत्याग्रहाच्या

संकल्पनेचा विकास झाला. (२) दादाभाईंना लिहिल्याप्रमाणे गांधींना आंदोलनातील आपल्या एकमेवाद्वितीय स्थानाची जाणीव झाली होती. आफ्रिकेतील वास्तव्यात त्यांनी केलेल्या इतर चळवळींमुळे त्यांचे हे स्थान पक्के झाले. भारतीय राजकारणात एकमेवाद्वितीय स्थान मिळविण्याच्या त्यांच्या भावी महत्त्वाकांक्षेचे बीजारोपण झाले होते.

### तात्त्विक सत्यापासून फारकत : गांधीप्रणीत सत्याचा उद्‌गम

गांधींनी तात्त्विक सत्याची जी संकल्पना स्वीकारली होती त्याला अनुसरून सत्याग्रहाचे तंत्र विकसित झाले असते तर भारताचा इतिहास काही वेगळाच झाला असता. तथापि तात्त्विक सत्यापासून, गांधीप्रणीत सत्याची फारकत सुरू झाल्याची निदर्शक घटना याच कालात, म्हणजे गांधींचे सार्वजनिक जीवनातील अद्वितीय स्थान सिद्ध होण्याच्या नंतर लगेचच घडून आली. गांधी दरबानला असताना त्यांचे कारकून त्यांच्या समवेतच राहात असत. प्रत्येक खोलीत मोरीऐवजी लघवीचे भांडे असे. ते उचलण्याचे काम यजमान-यजमानिणीचे असे. एक कारकून धर्मांतरित पूर्वास्पृश्य होते. त्यामुळे कस्तुरबांना त्यांनी स्वत: किंवा गांधींनी ते भांडे उचलणे पसंत नव्हते. त्यावर बोलाचाली होऊन गांधींनी कस्तुरबांना हाताला धरून घराबाहेर काढण्यापर्यंत पाळी आली. परमत आदर हा तात्त्विक सत्याचा अविभाज्य भाग. परंतु गांधींना स्वमताबद्दल एवढी खात्री निर्माण झाली होती, की यापुढे त्यांचे मत हेच तात्त्विक सत्य असे जे समीकरण रूढ होणार होते, त्याची सुरुवात या घटनेने झाली. गांधी दरबान येथे स्थायिक झालेल्या कुटुंबाचा कर्ता होते व ते ज्याला सत्य समजत होते, ते कुटुंबानेही सत्य मानले पाहिजे. या समजुतीतून त्यांचे प्रस्तुत घटनेतील वर्तन झाले होते. भारतीय राजकारणातील त्यांची भूमिका या वर्तनाचीच तार्किक परिणती होती. अशा परिस्थितीत उदारमतवादी कसा वागतो याचा वस्तुपाठ आगरकरांनी घालून दिला आहे. ते स्वत: नास्तिक होते. पण पत्नीच्या देवदर्शनाला त्यांनी कधी आडकाठी केली नाही. उलट तिच्या या अधिकाराचे समर्थन केले. आधुनिक पाश्चात्य विचार आत्मसात केल्यामुळे ते कुटुंबाचे पॅट्रिआर्क बनू शकत नव्हते.

### २. सत्याग्रह, सत्याग्रहाची प्रेरणा

सत्याग्रहाची प्रेरणा गांधींना कशी मिळाली असावी याचे वर्णन त्यांनी स्वत:च केले आहे. मद्रास बार असोसिएशनपुढे २४ एप्रिल १९१५ रोजी भाषण करताना ते म्हणाले :

"एक सविनय प्रतिकारक म्हणून मला असे आढळून आले आहे, की ब्रिटिश

साम्राज्यामध्ये मला जे स्वातंत्र्य मिळाले, ते अन्यत्र मिळाले नसते. सविनय प्रतिकार करण्याचा आपला हक्क सविनय प्रतिकारकाला स्थापित करावा लागतो. मग तो कोणत्याही परिस्थितीत असो. तसे करताना मला असे आढळून आले, की ब्रिटिश साम्राज्यात काही ध्येये आहेत. त्यांपैकी एक ध्येय असे, की ब्रिटिश साम्राज्यातील प्रत्येक प्रजाजनाला आपल्या विवेकास पटणारे कोणतेही कार्य करण्यास व आपली शक्ती वापरण्यास आणि प्रयत्न करण्यास पूर्ण मोकळीक आहे... मला असे आढळून आले आहे, की ब्रिटिश साम्राज्यामध्ये माझ्यावर कमीत कमी शासन राहील. म्हणून माझी ब्रिटिश साम्राज्यावर निष्ठा आहे. भाषण संपवून... खाली बसण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेसारख्या दूर देशातील आंदोलनात घडलेल्या एका विशेष प्रसंगाचे स्मरण करून देतो. ब्रिटिश साम्राज्याच्या सैन्यातील एक विश्वासू सेनापती जनरल बेअर्स यांनी त्या साम्राज्याविरुद्ध उघड बंड पुकारले. तसे करणे आणि त्यानंतर जागच्या जागी त्याला ठार न करण्यात येणे, या गोष्टी केवळ ब्रिटिश साम्राज्यातच शक्य आहेत. जनरल स्मट्स यांनी त्यांना एक संस्मरणीय पत्र पाठविले आणि लिहिले, 'एकेकाळी मीसुद्धा बंडखोर होतो. आपले प्राण वाचवणे तुम्हाला केवळ ब्रिटिश साम्राज्यातच शक्य आहे' म्हणून माझी ब्रिटिश साम्राज्यावर निष्ठा आहे."

सेनापतीला जागच्या जागी ठार न करण्यात येणे तसेच स्मट्सच्या पत्रातील 'आपले प्राण वाचविणे तुम्हाला केवळ ब्रिटिश साम्राज्यात शक्य आहे' हे दोन उल्लेख गांधींच्या भाषणात लागोपाठ यावे, हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटिश साम्राज्यात जीविताची शाश्वती आहे. मनमानी कारभाराला तेथे स्थान नाही, कारण ते कायद्याचे राज्य आहे, हा दृढ विश्वासच गांधींच्या सत्याग्रहाच्या आचरणामागची मूळ प्रेरणा आहे. कायद्याच्या राज्यात कायदेभंग करणाऱ्याला, प्रत्येक गुन्ह्याला कोणती शिक्षा दिली जाते, याचे आगाऊच ज्ञान असते. तसेच गुन्ह्याचे स्वरूप आणि शिक्षा यात प्रमाणबद्धता असल्यामुळे ज्या गुन्ह्यांसाठी प्राणदंड दिला जातो त्यांची संख्या फारच कमी आहे, या कायदेशीर ज्ञानावरच गांधींच्या सत्याग्रहांचा इमला उभारलेला होता. त्याची स्पष्ट कबुली त्यांनी वरील परिच्छेदात दिली आहे. अशा तऱ्हेने सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान आणि त्याचे आचरण यांना आवश्यक असलेली यथायोग्य चौकट ब्रिटिश साम्राज्याने पुरविली होती. इंग्लंडमधील वास्तव्यात गांधींनी हा अनुभव जमा केला होता.

### सत्याग्रहाची मूलतत्त्वे : उपपत्ती

गांधीप्रणीत सत्याग्रहाची सुरुवात १९०७ साली झाली. ट्रान्सवालमध्ये स्थायिक

झालेल्या भारतीयांनी आपले नाव प्रबंधकाकडे नोंदवून त्या संबंधात सर्टिफिकेट मिळवले पाहिजे असा कायदा तेथील सरकारने मंजूर केला. अशा तऱ्हेने नोंदणी करताना प्रत्येक व्यक्तीला आपल्या शरीरावरील खुणा आणि बोटांचे ठसे देणे क्रमप्राप्त होते. गांधींनी या कायद्याविरुद्ध सत्याग्रह करण्याचे ठरविले. राजकीय सत्याग्रहाची तत्त्वे गांधींनी पुढीलप्रमाणे विशद केली : त्याचा हेतू सहसा अन्याय्य कायदे रद्द करून घेणे हा असतो. अर्ज, विनंत्या आणि इतर मार्गांनी अशा कायद्यामागील असत्य (एरर) सरकारला पटवून देण्यात अपयश आले, तर कायदा मोडून मिळणाऱ्या शिक्षेला सामोरे जाणे एवढाच एक उपाय सत्याग्रह्यासमोर असतो. साहजिकच जनतेला सत्याग्रहाचे दर्शन सविनय कायदेभंगाच्या स्वरूपातच घडते. सविनय कायदेभंग ही संज्ञा थोरोने प्रथम वापरली. पण कदाचित त्याला अहिंसा मान्य नसावी. सत्याग्रहाचे स्वरूप मात्र नेहमीच अहिंसक असते. सत्याग्रही नेहमीच तो ज्या देशाचा नागरिक असतो त्या देशाचे कायदे पाळतो. कारण असे कायदे कल्याणकारी असतात. पण काही वेळा त्याच्या मते काही कायदे अन्याय्य असतात. त्यामुळे त्यांच्यापुढे मान तुकवणे ही त्याच्या दृष्टीने मानखंडना होय.

वर दिलेल्या सत्याग्रहाच्या वैशिष्ट्यांवरून सत्याग्रहाची संकल्पना उत्क्रांत होण्यामागे कोणत्या घटकांचा प्रभाव होता हे स्पष्ट होते. हे घटक म्हणजे — (१) इंग्लंडची राज्यघटना (२) रोमन न्याय-शास्त्र (३) सत्य व अहिंसेचे भारतीय तत्त्वज्ञान. इंग्लंडच्या राज्यघटनेचा एक मूळ सिद्धांत म्हणजे कायद्याचे राज्य. कायदा हा सर्वश्रेष्ठ असून तो शासनकर्त्यावरही बंधनकारक असतो. इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास करीत असताना हे तत्त्व गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनले होते. कायद्याचे राज्य, राजाच्या अनियंत्रित सत्तेच्या तुलनेत, कल्याणप्रद असते हे त्याचे उपप्रमेय. 'आम्ही कायद्याचे गुलाम आहोत, ज्यामुळे आम्ही स्वतंत्र आहोत' हे सिसेरोचे वचन, १९ व्या शतकातील इंग्रजी विचार व्यवहाराचे एक व्यवच्छेदक लक्षण होते. त्याचा प्रभाव गांधींच्यावर पडणे अटळ होते. साहजिकच कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेने गांधींचे वैचारिक क्षेत्र बंदिस्त केले होते. कायदेभंगाच्या चळवळीचा पायाच अशा तऱ्हेने कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेवर आधारलेला होता. त्यामुळेच कायदा कल्याणप्रद असतो हे गृहीतक गांधी मानतात. इंग्रजी न्याय पद्धती कोणत्याही कृतीच्या मागे असलेल्या हेतूला महत्त्व देते. इंग्लंडमध्ये वकिलीच्या अभ्यासात हे तत्त्व त्यांना आत्मसात करावे लागले होते. त्यामुळे कायदेभंगाचे विश्लेषण करताना गांधी तो 'सविनय (सिव्हिल) असतो, म्हणजे गुन्हेगारी (क्रिमिनल) नव्हे या अर्थाने'

असे आग्रहाने प्रतिपादन करतात. इंग्रजी न्याय पद्धतीच्या त्यांच्यावरील प्रभावामुळेच गांधींना सत्याग्रहाच्या मागील हेतूचे स्वरूप निश्चित करण्याची गरज वाटली. त्यासाठी त्यांनी 'सिव्हिल' आणि 'क्रिमिनल' हे इंग्रजी कायद्यातील शब्द वापरले. एरवी शुद्ध हेतू आणि दुष्ट हेतू असाच शब्दप्रयोग केला जातो. पण गांधींनी ते हेतुतः टाळले.

इंग्रजी राज्यघटनेप्रमाणे कोणत्याही कायद्याला तो नीतिनियमांना धरून नाही या कारणास्तव आव्हान देता येणार नाही. रोमन विधिज्ञांनी मात्र कायद्याचे तीन प्रमुख प्रकार मानले. नागरी कायदा (IUS CIVILE), राष्ट्रीय कायदा (IUS GENTIUM) आणि नैसर्गिक कायदा (IUS NATURALE) सुरुवातीला राष्ट्रीय कायदा आणि नैसर्गिक कायदा हे समानार्थी शब्द होते. कारण कोणताही राष्ट्रीय कायदा हा नैसर्गिक कायद्याच्या विरुद्ध असूच शकत नाही असे कायदा करणाऱ्यांचे गृहीतक होते. पण रोमन विधिज्ञांनी, नैतिकदृष्ट्या अन्याय्य गोष्ट, कायद्यानुसार न्याय्य ठरत नाही, या कारणावरून नैसर्गिक कायदा राष्ट्रीय कायद्याहून श्रेष्ठ असा दावा केला. इंग्लंडमध्ये वकिलीचा अभ्यास करीत असताना गांधींनी रोमन कायद्याचे परिशीलन केले होते आणि हा सर्व भेद जाणला होता. साहजिकच सविनय कायदेभंगाचे स्वरूप निश्चित करताना, नीतिनियमांना धरून नसलेल्या कायद्यांना (अनमॉरल स्टॅच्यूटरी एनॅक्टमेंटस) विरोध म्हणजे सत्याग्रह असा सिद्धांत मांडला. 'अनमॉरल' हा शब्द इंग्रजी कायद्यांच्या बाबतीत अवास्तव असतो. तो रोमन न्यायशास्त्रातील नैसर्गिक कायद्याच्या (Ius Naturale) संदर्भातच वापरता येतो. अशा तऱ्हेने अनैतिक कायद्याची संकल्पना गांधींनी रोमन विधिज्ञांकडून उचलली. यानंतर प्रश्न उपस्थित होतो तो 'कायदा 'अनमॉरल' ठरविण्यासाठी पद्धत कोणती आणि अशा कायद्याविरुद्ध उपाययोजना कोणती ?' त्यासाठी गांधींनी भारतीय तत्त्वज्ञानातील सत्य आणि अहिंसा यांचा आधार घेतला आणि सत्याग्रहाची संकल्पना उत्क्रांत केली. सत्य हे निरपेक्ष नसल्यामुळे एकाला जे सत्य वाटते ते दुसऱ्याला असत्य वाटू शकते. त्याचप्रमाणे जो कायदा एखाद्याला कल्याणप्रद वाटेल तो दुसऱ्याला अन्याय्य वाटू शकतो. त्यामुळे सत्याग्रहाचा अवलंब करीत असताना विरोधकाच्या (सरकारच्या) बाबतीत हिंसेचा वापर निषिद्ध ठरतो. कारण कदाचित तो बरोबरही असू शकतो. पण तो चुकीच्या मार्गाने जात असल्याची सत्याग्रहीची खात्री असेल तर त्याला चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी सनहशीलता आणि सहानुभूती यांची गरज असते. आणि त्यासाठी स्वतःच यातना सोसण्याची सत्याग्रहीने तयारी ठेवली पाहिजे.

वरील विवेचनावरून सत्याग्रहाची संकल्पना निव्वळ भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित नाही हे स्पष्ट होईल. इंग्रजी राज्यघटना किंवा लोकशाही, आणि रोमन न्यायशास्त्र, यांच्या चौकटीत गांधींनी सत्य आणि अहिंसा यांचे तत्त्वज्ञान बसविले, आणि सत्याग्रहाचे स्वरूप निश्चित केले. सत्याग्रह हा स्वयंपूर्ण असा मार्ग नसून विशिष्ट चौकटीतच वापरण्याचे ते शस्त्र आहे असा त्याचा अर्थ. आणि त्या पद्धतीनेच गांधींनी सत्याग्रहाचा उपयोग केला. ती चौकट नसेल तर सत्याग्रहाला आत्मघाताचे स्वरूप येईल. तथापि आत्मघातापर्यंत पोचविणारा सत्याग्रह गांधींना मान्य नव्हता. गुन्हेगारी स्वरूपाचा नसलेल्या कोणत्याही कायदेभंगाला ब्रिटिश साम्राज्यात मृत्युदंडाची शिक्षा नसते, या कायदेशीर ज्ञानावरच गांधींचा सत्याग्रह उभा होता. वर उल्लेखिलेल्या बार असोसिएशनपुढे गांधींनी केलेल्या भाषणात, त्याचे पडसाद उमटलेले होते. गुन्हा नसलेल्या कायदेभंगाबाबत जी कायदेशीर परिस्थिती आहे त्यामुळेच गांधींना अनेक अनुयायी मिळाले. माझ्या नेहेमी मनात येते, की सत्याग्रहाला मृत्युदंडाची शिक्षा ठेवली असती तर किती जणांनी सत्याग्रहात भाग घेतला असता ? कायद्याच्या राज्याच्या चौकटीशिवाय सत्याग्रह हे केवळ तत्त्वज्ञान असते. प्रत्यक्षात त्याचा उपयोग नसतो. यामुळेच आपण ब्रिटिश साम्राज्याचे प्रजाजन आहोत याचा आग्रहपूर्वक उल्लेख गांधी सातत्याने करीत असत,

पाश्चात्य लोकशाही संस्था आणि भारतीय तत्त्वज्ञान यांची सांगड घालून सत्याग्रहाची संकल्पना सिद्ध करणे आणि तिचा प्रत्यक्षात उपयोग करून दाखविणे ही संघर्षग्रस्त जगाला गांधींची अनन्यसाधारण अशी देणगी होती. सत्याग्रहाची चौकट पाश्चात्य लोकशाही संस्थांनी पुरवली असल्यामुळे तेथील विचारवंतांनाही या प्रयोगाबाबत आत्मीयता दाखविणे वैचारिक दृष्ट्या शक्य झाले. आणि त्या चौकटीत सत्य आणि अहिंसा यांचा उपयोग करण्याच्या अनोख्या कल्पनेने ते भारून गेले असल्यास नवल नव्हते. संघर्षामुळे विनाशाच्या काठावर उभ्या असलेल्या जगाला गांधींनी एक नवी दिशा दाखवून दिल्याचा साक्षात्कार त्यांना होणे साहजिकच अटळ होते, तथापि गांधी स्वत: मात्र सत्य आणि सत्याग्रह यांच्या तात्त्विक भूमिकेपासून आफ्रिकेतच ढळले होते.

### तात्त्विक सत्याचे गांधीप्रणीत विकृतीकरण

सत्याग्रहाच्या संकल्पनेच्या उगमाचा शोध घेतल्यानंतर सत्याग्रहाची संकल्पना प्रत्यक्षात राबविणाऱ्या गांधींची मानसिक जडणघडण कशी होत होती याचा वेध घेणे आवश्यक आहे. आफ्रिकेत असताना गांधी रस्किन आणि टॉलस्टॉय यांच्या

वैचारिक प्रभावाखाली आले. रस्किनच्या 'अनटू धिस लास्ट' आणि टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' हा दोन पुस्तकांचा त्यांच्यावर विशेष परिणाम झाला होता. या दोन्ही लेखकांची वैचारिक जवळीक औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या कालाशी होती. त्यामुळे त्यांच्या लेखनात पैतृकवादी (पॅटरनॅलिलिस्टिक) अंत:प्रवाह आढळतो. गांधी स्वत: सरंजामी वातावरणात वाढलेले असल्यामुळे साहजिकच पैतृकवादाचा त्यांच्यावर प्रभाव पडणे अपरिहार्य होते. त्याला अनुसरून जोहान्सबर्ग येथे 'टॉल्स्टॉय फार्म' या नावाची वसाहत त्यांनी स्थापन केली होती. तेथे गांधींनी वसाहतीचा 'कर्ता' (पॅट्रिआर्क) म्हणून अंमल गाजविण्यास सुरुवात केली. डरबानला असताना त्यांची जी भूमिका घरात होती तीच, वसाहतीमध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर आणि अधिक आशयघनतेने त्यांनी पार पाडली. टॉलस्टॉय फार्ममधील सामुदायिक जीवनाचे त्यांनी जे लोभसवाणे वर्णन केले आहे त्याने भारावून जाण्याचे कारण नाही. तेथील एक घटना त्यांनी विदित केली आहे त्यावरून ते वसाहतीचे निव्वळ चालक नसून, नीतिमत्तेचेही कठोर नियंता म्हणून अधिकार गाजवीत होते हे स्पष्ट होते. मुले आणि मुली यांनी मोकळेपणी एकत्र राहून अंत:स्फूर्तीने नीतिमत्तेचे पालन करावे अशी त्यांची शिकवणूक होती. म्हणून त्यांना एकत्र पोहोण्यासाठीही ते उत्तेजन देत असत. त्यासंबंधात ते लिहितात :-

'एक दिवस एका तरुणाने दोन मुलींची गंमत (फन) केली आणि त्या मुलींनी किंवा एका लहान मुलाने ते माझ्या नजरेस आणले. चौकशी केल्यानंतर ते खरे असल्याचे समजले. मी त्या मुलाची कानउघाडणी केली. पण मला तेवढे पुरे वाटले नाही. प्रत्येक तरुणाला, त्याने त्यांच्याकडे वाकड्या नजरेने पाहू नये यासाठी ताकीद म्हणून, तसेच प्रत्येक युवतीला तिच्या चारित्र्याला कोणीही कलंक लावू नये यासाठी धडा मिळावा म्हणून, त्या मुलींच्या अंगावर काही तरी खूण असावी असे वाटले. मुलींच्या अंगावर कोणती खूण असली म्हणजे त्यांना सुरक्षित वाटेल आणि त्याच वेळी पापी माणसाच्याही नजरेत अंजन पडेल बरे ? मी रात्रभर विचार केला. सकाळी उठल्यानंतर त्यांचे सुरेख लांबसडक केस कापू द्यावे असे मी त्यांना विनविले. प्रथम त्यांनी माझ्याकडे लक्ष दिले नाही. एकंदर परिस्थिती मी वयस्क बायकांना सांगितली. त्यांना माझा हेतू उमगला, पण माझी सूचना त्यांना मानवली नाही. तरी अखेर त्यांनी मला पाठिंबा दिला. त्या दोघीही मुली चांगल्या होत्या. शेवटी त्याही वळल्या आणि तात्काळ जे हात ही घटना लिहित आहेत त्याच हातांनी त्यांचे केस कापले. माझ्या वर्गात मी नंतर माझ्या पद्धतीने विश्लेषण

करून ती घटना समजावून सांगितली. त्याचा अतिशय चांगला परिणाम झाला. पुन्हा कधीही मस्करी माझ्या ऐकिवात आली नाही. काहीही असो, मुलींचे कोणतेच नुकसान झाले नाही. चांगले किती झाले ते देव जाणे.

वरील घटनेचे विश्लेषण केले म्हणजे पुढील गोष्टी स्पष्ट होतात —
(१) गांधी वसाहतीचे सर्वेसर्वा होते आणि त्या नात्याने तेथील रहिवाशांच्या नीतिमत्तेचे दंडक ते ठरवीत होते. (२) विधवांचे केशवपन करून त्यांना विद्रूप करण्याची पद्धत भारतात होती. त्यामुळे त्यांचे शील शाबूत राहील अशी समजूत त्याच्या मागे होती. मुलींना शिक्षा म्हणून त्याच पद्धतीचा गांधींनी अवलंब केला. पुढे त्यांचा मुलगा मणिलाल याचा अनैतिक संबंध एका विवाहित स्त्रीशी आला. तेव्हाही त्यांनी तिला केशवपन करणे भाग पाडले. (३) ज्या मुलाने मुलींची गंमत केली त्याची, फक्त कानउघाडणी होण्यावरच सुटका झाली. तो कोणत्या धर्माचा होता याचा खुलासा गांधींच्या पुस्तकात नाही. याचा अर्थ जे दुर्बल आहेत, परावलंबी आहेत त्यांच्या बाबतीतच गांधी कठोर होत असत. जसे डरबान येथे ते कस्तुरबांच्या बाबतीत ते झाले होते. (४) गांधींनी स्वत: एकविसाव्या वर्षापर्यंत मौजमजा केली होती. नंतर स्वप्रयत्नाने त्यांनी आपले नैतिक उन्नयन घडवून आणले. पण ते स्वातंत्र्य इतरांना नव्हते. (५) वर उल्लेखिल्याप्रमाणे तात्त्विक सत्याशी फारकत घेण्यास गांधींनी डरबान येथेच सुरुवात केली होती. त्याची पुढची पायरी टॉलस्टॉय फार्मवर गांधींनी गाठली. गांधींनी सत्याची संकल्पना स्वीकारली होती, त्याप्रमाणे 'जे एकाला सत्य वाटते ते दुसऱ्याच्या दृष्टीने चूक असू शकते.' म्हणून अशा व्यक्तीला 'सहनशीलता आणि सहानुभूतीने चुकीच्या मार्गापासून परावृत्त केले पाहिजे.' त्यामुळे 'सत्याचा मार्ग अनुसरताना हिंसेला स्थान नाही.' गांधींचे वर्तन त्यांच्या सत्याच्या संकल्पनेशी संपूर्ण विसंगत होते. गांधींची नीतिमत्तेची कल्पना कदाचित चूक असू शकत होती. मुली त्यांच्या मते चुकल्या असल्या तरी त्यांच्याशी 'सहनशीलतेने आणि सहानुभूतीने' त्यांनी वागावयास हवे होते. पण त्यांचे केशवपन करून त्यांनी हिंसाच केली होती. गांधी 'सत्या'पासून अधिकाधिक दूर जाऊ लागले होते याचीच निदर्शक अशी ही घटना होती. आपल्या 'अद्वितीय' स्थानाच्या प्रेमात ते पडले होते. त्याच्यापुढे 'सत्य' ही दुय्यम होते. त्या स्थानाला अनुसरून गांधी म्हणतील ते सत्य अशा भूमिकेप्रत ते आले होते. त्यामुळेच मुलींचीही, कदाचित मुलींना माहीत नसलेली, बाजू असू शकते या सत्याची दखल घेण्याची त्यांना जरूर वाटली नव्हती. हीच भूमिका गांधीजी भारतातील सत्याग्रहातही आणि राजकारणातही जगणार होते. ते

'पॅट्रिआर्क' होणार होते.

### ३. भारतातील सत्याग्रह

आफ्रिकेतील सत्याग्रहातील गांधींचे एकमेवाद्वितीय स्थान, सत्य आपल्यालाच उमगले आहे अशी त्यांनी करून घेतलेली समजूत, सरंजामी वातावरणाचे लहानपणी झालेले संस्कार, त्यावर पडलेला रस्किन आणि टॉलस्टॉय यांच्या लेखनाचा प्रभाव, या सर्वातून गांधींचे व्यक्तिमत्त्व तयार झाले होते. इंग्लंडमधील वास्तव्यात महंमद पैगंबर यांच्या कर्तृत्वाने ते भारून गेले होते. ते लिहितात 'कार्लाईलचे 'विभूती आणि विभूतीपूजा' वाचण्याची एका मित्राने शिफारस केली; त्यात पैगंबरांविषयी वाचले, व त्यांची थोरवी, शौर्य व तपश्चर्या यांची कल्पना आली.' बुद्धचरित्र, गीता आणि येशूची वचनेही त्यांनी त्या कालात आत्मसात केली. या सर्वांचे आपण वारसदार होऊ शकतो असा आत्मविश्वास गांधींना आफ्रिकेतील लढ्याने दिला होता. महंमद पैगंबरांप्रमाणे 'श्रद्धावान सैनिक' त्यांनी जमा केले होते. येशू आणि बुद्ध यांच्या शिकवणीप्रमाणे त्या सैनिकांना अहिंसेची दीक्षा त्यांनी दिली होती. गीतेच्या उपदेशाप्रमाणे सत्याग्रहाच्या स्वरूपात त्यांनी कर्मयोग आचरला होता.

#### चंपारण्य लढा

भारतात आल्यानंतर सत्याग्रहाचा पहिला प्रयोग गांधींनी चंपारण्य लढ्यात केला. हा एक आदर्श सत्याग्रह होता. गांधींनी सत्याग्रहाची जी तत्त्वे पुरस्कारली होती त्यांचा संपूर्ण आविष्कार या लढ्यात आढळतो. चंपारण्यातील शेतकऱ्यांची काही गाऱ्हाणी होती. त्यांच्यावर मळेवाले अन्याय करीत आहेत असा त्यांचा दावा होता. त्यासंबंधी सत्यशोधन करण्यासाठी सर्व परिस्थितीचा अविश्रांतपणे आणि काटेकोरपणे अभ्यास करण्यात आला. आणि सत्य परिस्थिती अत्यंत काटेकोरपणे मांडण्यात आली. 'अखिल मानवजातीला जी स्वतंत्रता व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे ती शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी शेतकरी व मळेवाले यांच्यामध्ये शांतता निर्माण करणे' हे गांधींनी आपले उद्दिष्ट ठरविले होते व ते त्यात यशस्वी झाले. या लढ्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे गांधींच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेने या लढ्याचे स्वरूप कोणत्याही तऱ्हेने बिघडविले गेले नव्हते. अर्थात भावी घटनांच्या दृष्टीने सूचक असा एक घटक या लढ्यात अंतर्भूत होता. राजकुमार शुक्ल हा चंपारण्यातील एक शेतकरी गांधींनी तेथील शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घ्यावा म्हणून तो अत्यंत आग्रही होता. त्याने त्यासाठी गांधींचा सहा महिने पाठपुरावा केला. व अखेर गांधींना त्यासंबंधी अनुकूल करून घेतले. तथापि हा लढा संपूर्ण आपल्याच तंत्राने चालला पाहिजे याविषयी मात्र

गांधी अत्यंत जागरूक होते. कॉंग्रेस अथवा कॉंग्रेसमधील बुजूर्ग नेते त्या लढ्यापासून दूर राहतील याविषयी संपूर्ण दक्षता घेतली. यासंबंधात लिहिताना त्यांनी ना. गोखले यांच्या मृत्यूनंतर टिळकपंथीयांच्या वर्चस्वाखाली आलेल्या कॉंग्रेसबद्दलची मळमळही व्यक्त केली. आपल्या एकमेवाद्वितीय स्थान मिळविण्याच्या मार्गातील टिळक हे एक धोंड आहेत असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यामुळे वेळोवेळी त्यांच्यासंबंधी गांधींनी आकस व्यक्त केला होता. टिळकपंथीयांचा उल्लेख न करता ते लिहितात :

'सहकाऱ्यांच्याबरोबर विचार करून मी असे ठरविले होते की राष्ट्रीय सभेच्या नावाने काहीच करावयाचे नाही. आपल्याला काम पाहिजे, नावाची जरुरी नाही; मन पाहिजे, बडबडीचा उपयोग नाही. राष्ट्रीय सभेचे (कॉंग्रेसचे) नावच अप्रिय आहे. या भागात राष्ट्रीय सभेचा अर्थ वकिलांची मारामारी व कायद्याच्या फटीतून निसटून जाण्याचे प्रयत्न असा होता. राष्ट्रीय सभा म्हणजे बॉंबगोळे, राष्ट्रीय सभा म्हणजे बोलावयाचे एक, करावयाचे दुसरेच, असली समजूत सरकारची, व सरकारचे सरकार जे निळीचे मळेवाले, त्यांची होती... म्हणून आम्ही कोठेही राष्ट्रीय सभेचे नाव उच्चारण्याचे व तिच्या भौतिक देहाचा परिचय न करविण्याचे ठरविले. लोकांनी तिच्या अक्षराकडे न पाहता तिचा आत्मा ओळखला व त्याला अनुसरले म्हणजे पुरे, आणि तेच खरे होय.'

राष्ट्रीय सभेचा आत्मा बदलण्याचा गांधी पुढे प्रयत्न करणार होते त्याचेच हे सूतोवाच होय. पुढे "अशा नाजूक स्थितीमध्ये बातमीदारांना येण्यास मी तिळमात्र उत्तेजन दिले नाही. पुढाऱ्यांना बोलाविले नाही. मालवीयजींनी मला सांगून पाठविले होते की 'जरूर लागेल तेव्हा मला बोलवा. मी यायला तयार आहे.' त्यांनाही तसदी दिली नाही." या शब्दात जाणत्या पुढाऱ्यांना ते किती टाळत असत याचा पुरावा दिला आहे. चंपारण्य लढ्याने काय साधले याबद्दल गांधी म्हणतात -

'दुसऱ्या बाजूने विचार करावयाचा झाला तर उभ्या हिंदुस्थानला सत्याग्रहाचा अथवा सविनय कायदेभंगाचा वस्तुपाठ मिळावा. वर्तमानपत्रात या गोष्टीची खूप चर्चा झाली व चंपारण्याला आणि माझ्या चौकशीला कल्पनातीत प्रसिद्धी मिळाली.'

सत्याग्रहाचा प्रयोग आणि त्याला मिळालेली प्रसिद्धी हे गांधींच्यादृष्टीने या लढ्याचे दोन गुणविशेष होते. त्यांच्या भारतीय राजकारणातील प्रवेशाच्या दृष्टीने ते अत्यंत आवश्यक होते. अशा तऱ्हेने 'एकमेव मी' ही परंपरा या सत्याग्रहात गांधींनी कटाक्षाने पाळली. सत्याग्रहाच्या मूलतत्त्वाचे पालन आणि गांधींचे निरपवाद नेतृत्व ही लढ्याची दोन सूत्रे होती. यापैकी कोणत्या सूत्राचा वरचष्मा होणार यावर

भावी सत्याग्रहाचे स्वरूप अवलंबून राहणार होते.

**अहमदाबाद येथील गिरणीकामगारांचा संप**

चंपारण्य लढा संपत असतानाच अहमदाबाद येथील कामगारांची गाऱ्हाणी, आणि खेडा जिल्ह्यातील शेतीचे नुकसान व सारामाफीची मागणी, या समस्यांमध्ये गांधी गुंतले गेले. चंपारण्यलढा आणि कामगारांचा, तसेच खेडा शेतकऱ्यांचा लढा, यांत काही साम्यस्थळे आहेत. तीनही लढे स्थानिक स्वरूपाचे होते. कॉंग्रेस नेते त्यासंबंधी उदासीन होते. या लढ्याचे नेतृत्व गांधींनी निमंत्रणावरून केले. मोहनलाल पंड्या आणि रसिकलाल पारीख यांनी खेडा जिल्ह्यात, तर अनसूयाबेन साराभाई यांनी अहमदाबादच्या लढ्यात नेतृत्व स्वीकारण्याची गांधींना विनंती केली होती. अखिल भारतीय राजकारणात पदार्पण करण्यापूर्वी सत्याग्रहाचे प्रयोग भारतात करून दाखविण्यासंबंधी गांधी विशेष उत्सुक होते. 'सत्याग्रहाचे अद्भुत सामर्थ्य प्रत्यक्षात सिद्ध करून दाखविण्याचा प्रत्येक प्रसंग साधणे हे आपले कर्तव्य आहे' असे एका सार्वजनिक कार्यकर्त्याला उद्देशून लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात. साहजिकच या लढ्याचे संपूर्ण यश त्यांना स्वत:ला हस्तगत करता आले तरच त्याचा लोकांवर अनुकूल परिणाम होऊन गांधींची भारताच्या निरपवाद नेतृत्वाकडील वाटचाल सुकर होणार होती. त्यामुळे या सर्व लढ्यांची सूत्रे गांधींनी आपल्या हातात एकवटली होती. या सर्व लढ्यातील त्यांचे सर्व सहकारी हे त्यांचे दुय्यम होते.

युद्धकाळात मिळत असलेला खास भत्ता गिरणीमालकांनी बंद केला होता. या भत्त्याच्या अनुषंगाने पुरेशी वेतनवाढ मिळावी अशी अहमदाबादच्या गिरणीकामगारांनी मागणी केली. मालक त्याला तयार नव्हते. गांधींनी गिरणीमालकाबरोबर वाटाघाटी करून कामगारांच्या मागणीसंबंधी लवाद नेमण्यास विनविले. परंतु मालक त्याला तयार नसल्यामुळे गांधींनी अखेर कामगारांना संपाचा सल्ला दिला. गिरणीमालक आणि कामगार यांच्यातील लढा नेहमीच विषम असतो. त्यात कामगारांना, बाह्य दडपणाशिवाय, यश मिळण्याची शक्यता कधीच नसते. या वस्तुस्थितीनुसार कामगारांचा संप बारगळू लागला. नामुष्कीने त्यांना कामावर जावे लागेल अशी परिस्थिती निर्माण झाली. कामगारांच्या दृष्टीने वेतनवाढ एवढेच संपाचे उद्दिष्ट होते. पण गांधींच्या हिशेबात हा संप अथवा सत्याग्रह त्यांच्या स्वत:च्या राजकीय जीवनमरणाचा लढा होता. तो जर अयशस्वी झाला तर सत्याग्रह आणि त्याचबरोबर गांधीजी काही काळतरी निष्प्रभ होण्याची शक्यता होती. त्यामुळे सत्याग्रह यशस्वी झालाच पाहिजे अशा अटीतटीला गांधी आले होते. आणि त्यांनी उपवासाचा निर्णय जाहीर केला. उपवासाच्या

दडपणामुळे अखेर गिरणीमालक लवादास तयार झाले, आणि सत्याग्रहाची यशस्वी सांगता झाली. खेडा सत्याग्रह संपूर्णपणे यशस्वी झाला नाही. पण त्यातही तडजोड काढण्यात येऊन सत्याग्रहाला अपयशाचा डाग लागणार नाही याची काळजी घेण्यात आली.

या सत्याग्रहाला गांधी किती महत्त्व देत होते हे एका गोष्टीवरून स्पष्ट होईल. कोणत्याही लढ्याचा नेता, तो नैतिक मूल्ये पाळणारा असेल तर, तो अपयशाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारतो. पण या लढ्यातील अपयशाचा भाग होता त्याची जबाबदारी गांधींनी कामगार आणि शेतकऱ्यांवर टाकली.

'मजुरांनी पहिले दोन आठवडे खूप हिंमत दाखविली... पण पुढे ते नरम पडू लागले. निर्बल मनुष्य ज्याप्रमाणे हिंसक असतो, त्याप्रमाणे ते कमकुवत झाले आणि गिरण्यात कामावर जाणाऱ्यांचा द्वेष करू लागले. ते एखाद्या वेळी कोणावर शक्तीचाही प्रयोग करतील अशी मला धास्ती वाटू लागली. मला बातमी लागली की मजूर डगमगू लागले आहेत. दक्षिण आफ्रिकेतील मजुरांच्या संपाचा मला अनुभव होता. पण हा अनुभव नवीन होता.'

खेडा जिल्ह्यातील सत्याग्रहाबद्दल ते लिहितात...

'दुसऱ्या बाजूने सत्याग्रही सेनेलाही साधेपणाचा नवीन धडा शिकला पाहिजे होता. तो धडा ते पूर्णपणे शिकले असे मी म्हणू शकत नाही.' 'विनयासंबंधीची शिकवण पाटीदारांमध्येही पुरी भिनली नव्हती हे मागाहून माझ्या लक्षात आले.' 'खेड्याचे लोक सत्याग्रहाचा अर्थ बरोबर समजले नव्हते त्यामुळे त्यांना कसकसे कटू अनुभव घ्यावे लागले ते आपण पुढे पाहू.'

तथापि स्थानिक स्तरावरील सत्याग्रह हे गांधींच्या हिशेबी त्यांच्या अखिल भारतीय राजकारणात पदार्पण करण्याची केवळ रंगीत तालीम होती. त्यांची खरी महत्त्वाकांक्षा हिमालयासारखी उत्तुंग होती. महंमदाचे जे स्थान अरबी टोळ्यांमध्ये होते, ते त्यांना भारतीय राजकारणात मिळवावयाचे होते. त्यासाठी भारतीय राजकारणातील जुन्या नेतृत्वाला आपले मार्गदर्शन स्वीकारावयास लावून अथवा त्यांना नेस्तनाबूत करून आपले एकाधिकारित्व प्रस्थापित करण्याची गरज होती. अर्थात येशूच्या मार्गाने म्हणजे अहिंसेनेच त्यांना हे उद्दिष्ट साध्य करावयाचे होते. 'राष्ट्रीय सभेचा अर्थ म्हणजे वकिलांची मारामारी' 'राष्ट्रीय सभा म्हणजे बॉंबगोळे, राष्ट्रीय सभा म्हणजे बोलायचे एक करायचे दुसरेच.' अशी जी गांधींच्या मते परिस्थिती होती ती कॉंग्रेस गांधींच्या स्वामित्वाखाली आली तरच बदलणार होती आणि त्यांच्या

एकछत्री अंमलाखाली एकमेकांशी मारामारी करणारे वकील शांततेने नांदणार होते. सत्य, अहिंसा आणि शांतता यांचे साम्राज्य अशा तऱ्हेने भारतात अवतरणार होते. उणीव होती ती फक्त कॉंग्रेसने गांधींचे एकमुखी नेतृत्व मान्य करण्याची. त्यात प्रमुख अडथळा होता तो कॉंग्रेसवर वजन असलेल्या लो. टिळकांचा आणि इतर जुन्या जाणत्या पुढाऱ्यांचा. गांधींनी त्यांची ही व्यथा अत्यंत निंदाव्यंजक भाषेत मांडली होती.

'आजकाल भारतात एकच असे गृहस्थ आहेत की ज्यांच्याविषयी कोटचवधी लोक भारून गेलेले आहेत. हे गृहस्थ म्हणजे टिळक महाराज... त्यांनी गीतेच्या रहस्याविषयी एक ग्रंथ लिहिलेला आहे. परंतु मला सदैव वाटत आलेले आहे, की त्यांना भारताचा युगानुयुगापासून बनलेला स्वभावधर्म समजून आलेला नाही, भारताचा आत्मा त्यांनी जाणलेला नाही... आणि आमचा देश या अवस्थेला पोचला आहे. त्यांच्या अंत:करणात खोल डोकावून पाहता असे वाटते, की त्यांच्या मनात, आपण सगळ्यांनी युरोपिअन लोक आहेत तसे व्हावे असे आहे. युरोपिअन कल्पनांनी ज्यांची मने भारून गेली आहेत त्यांना आज युरोपखंड सगळ्याहून उच्चस्थानी आहे असे वाटतेसे दिसते. टिळक महाराजांना भारताने त्या जागी पोचावे असे वाटते. सहा वर्षांची कैद त्यांनी भोगली. पण ती केवळ युरोपिअनांच्या जातीचे धैर्य आमच्या ठिकाणी आहे हे दाखविण्यासाठी... टिळकांनी तुरुंगवासाचे कष्ट जर आध्यात्मिक हेतूने पत्करले असते तर परिस्थिती आज आहे तशी राहिली नसती. आणि त्यांच्या कैदेचे परिणाम फारच निराळे झाले असते, हे मला त्यांना एकदा समजून द्यायचे आहे... माझी ही कल्पना मी त्यांना ओझरतीच लिहिली असावी. पण टिळक महाराजांची बुद्धी इतकी तीक्ष्ण आणि भेदक आहे, की त्यांना ते चांगले समजून येणे शक्य आहे. पण त्यांना त्याचा प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी मला त्यांच्यापुढे जिवंत उदाहरण ठेवावयास हवे... तशी ही संधी येथे (कामगारांच्या सत्याग्रहाने) मिळाली आहे.'

'असेच आणखी एक गृहस्थ म्हणजे पंडित मदनमोहन मालवीय. भारताच्या हल्लीच्या पुढाऱ्यांमध्ये सर्वात विशुद्धतम चारित्र्याचे ह गृहस्थ आहेत... संसारामध्ये ते इतके विशुद्ध आहेत आणि धर्माच्या बाबतीत इतके मोठे बहुश्रुत आहेत, तरी भारताच्या आत्म्याचे सर्व प्रकारचे वैभव, ज्ञान त्यांना योग्य तऱ्हेने उमगलेले नाही असे मला वाटते. मी जे बोलतो आहे ते बोलायला मला मुळीच भीती वाटत नाही. कारण ते पूर्ण सत्य आहे... म्हणून त्यांनासुद्धा हे प्रत्यक्ष दर्शन घडविण्याची मी ही संधी घेत आहे. या दोघांना भारताचा आत्मा कोणत्या प्रकारचा आहे हे दाखविण्याला

मी बांधलेला आहे.''

अहमदाबाद येथे कामगारांचा संप चालू असता १७ मार्च १९१८ रोजी आश्रमात गांधींनी प्रवचन केले त्यातील उतारे वर दिले आहेत. त्यावरून गांधींचा उद्देश स्पष्ट होतो. भारताचा आत्मा कोणत्या प्रकारचा आहे हे दाखविण्याची आणखी एक संधी गांधींना लवकरच मिळाली.

**रौलट कायदेविरुद्ध आंदोलन**

भारत संरक्षण कायद्याची मुदत पहिल्या महायुद्धानंतर संपत होती. म्हणून त्याची जागा घेण्यासाठी मध्यवर्ती कायदेमंडळाने दोन कायदे संमत केले. जस्टिस रौलट यांच्या अहवालावर ते आधारीत असल्यामुळे त्यांना रौलट कायदे म्हटले जाते. ते अत्यंत अन्यायी असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध जनमत अत्यंत प्रक्षुब्ध झाले. अखिल भारतीय राजकारणात पदार्पण करण्यास गांधींना ही वेळ योग्य वाटली. त्यांनी त्या कायद्याविरुद्ध आंदोलन करण्याचे ठरविले. पण त्यांना भारताच्या आत्म्याचे प्रदर्शन घडवावयाचे होते. म्हणून हे आंदोलन केवळ राजकीय न ठेवता त्याला अध्यात्माचीही जोड देण्याचे ठरविले. महंमद पैगंबरांना परमेश्वरी साक्षात्कार होत असे, असे म्हणतात. पण विसाव्या शतकात ते शक्य नसल्यामुळे गांधींनी साक्षात्कारासाठी झोपेची निवड केली. साक्षात्कार एकालाच होत असतो आणि त्यात विचारविनिमयाला जागा नसते. गांधीच्या राजकारणाची दिशा स्पष्ट झाली होती.

'मला रात्री झोपेमध्ये विचार आला, की आपण कायद्याच्या विरोधादाखल उभ्या देशाला हरताळाची हाक द्यावी. सत्याग्रह हा आत्मशुद्धीचा लढा आहे. हा धार्मिक लढा आहे. धर्मकार्याची सुरुवात आत्मशुद्धीपासून करावी हे योग्य दिसते. त्या दिवशी सर्वांनी उपवास करावा व कामधंदा बंद ठेवावा... यात सर्व प्रांत भाग घेतील की नाही हे सांगता येत नाही. मुंबई, मद्रास, बिहार व सिंध एवढ्यांची मला आशा आहे. एवढ्या ठिकाणी हरताळ पडला तरी आपण संतोष मानला पाहिजे.'

सत्याग्रहाचा हा अखिल भारतीय प्रयोग होता. पण गांधींना सीमित यशाचीच शक्यता वाटत होती. प्रत्यक्षात मात्र या आवाहनाला कल्पनातीत यश मिळाले. या यशाचे अत्यंत हर्षपूर्ण वर्णन गांधींनी केले आहे. 'कसे कोणाला माहीत. सर्व व्यवस्था नीट लागली. हिंदुस्थानभर, शहरात, खेडोपाडी, हरताळ पडले. ते दृश्य अद्भुत होते.' रौलट आंदोलनाच्या रूपाने या आधुनिक वामनाने भारतीय राजकारणात पहिले पाऊल कल्पनातीत यशस्वीपणाने टाकले होते. या आंदोलनाने त्यांना दुर्दम्य असा आत्मविश्वास दिला आणि त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा अधिकच प्रज्वलित

झाली. ' एकोऽहं ' ही मूळची प्रवृत्ती अधिक बळकट करण्यास या आंदोलनाने फार मोठा हातभार लावला. एका पत्रावरून हे स्पष्ट होते. हरताळ पडल्यानंतर अनेक ठिकाणी दंगली झाल्या. पोलीस गोळीबारात काही जण ठार झाले. कित्येक जखमी झाले. जाळपोळ झाली. गांधींनाही अटक झाली. त्यासंबंधात एस्थर फेअरिंगला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात-

' आज मी जगातील कदाचित सर्वात सुखी माणूस असेन. गेल्या दोन महिन्यात मला अमर्याद प्रेमाचा अनुभव लुटता आला. जरी कोणाबद्दल दुष्ट भावना बाळगत नसलो आणि कोणालाही शक्य नाही अशा तऱ्हेने आज भारतात शांतता राखू शकेल असा मी एकमेव माणूस असलो, तरी मला पकडण्यात आले आहे. माझ्या अटकेमुळे ज्याने हा अन्याय केला आहे त्याचाच उघडेनागडेपणा स्पष्ट दिसून येईल. तो माझी कोणतीही हानी करू शकणार नाही. कारण माझा आत्मा शांत आणि अक्षुब्ध आहे.'

हे पत्र १० एप्रिल १९१९ चे आहे. त्या वेळपर्यंत दंगली झाल्या होत्या, अत्याचार झाले होते. हिंसा झाली होती. तरी गांधी सर्वात सुखी माणूस होते. आपल्याखेरीज दुसरा कोणीही शांतता राखू शकणार नाही. या आत्मविश्वासाने ! आणि त्यामुळे त्यांचा आत्मा शांत आणि अक्षुब्ध होता.

गांधी यानंतर दुसरे पाऊल उचलणार होते ते मुसलमानांना वश करण्यासाठी आणि त्यानंतर त्यांच्या सहाय्याने तिसऱ्या पावलाने कॉंग्रेस काबीज केली म्हणजे गांधींचे अधिराज्य भारतीय राजकारणात प्रस्थापित होणार होते.

**१९२० चे आंदोलन**

१९१९ साली ब्रिटिश पार्लमेंटने भारतासंबंधी सुधारणा कायदा मंजूर केला. त्यासाठी भरलेल्या कॉंग्रेसच्या अमृतसर अधिवेशनात त्यासंबंधी विचारविनिमय करण्यात आला. रौलट आंदोलनात मिळालेल्या प्रसिद्धीनंतर कॉंग्रेसमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास गांधींनी अचूक वेळ निवडली होती. अमृतसरमध्ये सुधारणांसंबंधी जो ठराव मंजूर झाला, त्याच्या शिल्पकारांपैकी गांधी एक होते. तथापि अनेकांपैकी एक आणि ' एकमेव ' यात अंतर आहे. आणि अनेकांपैकी एक राष्ट्रीय पुढारी हे स्थान गांधींच्या कार्यपद्धतीला मानवणारे नव्हते. एकमेवद्वितीय भारतीय पुढारी होण्यासाठी गांधींनी एका धोकादायक मार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले. तो म्हणजे राष्ट्रनिष्ठ मुसलमानांची उपेक्षा करून जातीयवादी मुसलमानांचा अनुनय करण्याचा. जागतिक इस्लामवादाचा (पॅन इस्लामिझम) हिस्सा असलेल्या भारतातील खिलाफत चळवळीला पाठिंबा देऊन मुसलमान आणि कॉंग्रेस या दोघांना एकाच फटक्यात अंकित करण्याचा अजब मनसुबा

त्यांची रचला. वास्तविक मुसलमानांचा अनुभव त्यांना आफ्रिकेपासून होता. ते लिहितात, 'हिंदू-मुसलमानात खरी मैत्री नाही हे दक्षिण आफ्रिकेतच माझ्या लक्षात आले होते.' तरीही खिलाफतीला पाठिंबा देण्याचा जुगार खेळण्याचे त्यांनी ठरविले. खिलाफतीला पाठिंबा देण्यामागे कोणतीही तात्त्विक भूमिका नसल्यामुळेच जुगार हा शब्द मी वापरला आहे. गांधींनी स्वत:च हे कबूल केले. 'खिलाफतीचा प्रश्न माझ्या दृष्टीने सोपा होता. त्याचे स्वतंत्र गुणदोष मला पाहावयाचे पण नव्हते. मुसलमानांची त्या बाबतीतील मागणी नीतिविरुद्ध नसेल तर ती मदत दिली पाहिजे असे माझे मत होते... खिलाफतची मागणी मला नीतिविरुद्ध वाटली नाही. एवढेच नव्हे तर ती मागणी ब्रिटिश प्रधान लॉइड जॉर्ज यांनी मान्य केली होती. अर्थात त्यांनी आपले वचन पाळावे एवढ्यापुरताच प्रयत्न करण्याचे काम माझे होते व वचन इतक्या स्पष्ट शब्दांमध्ये दिलेले होते की त्या प्रश्नाचे मर्यादित गुणदोष तपासण्याचे काम माझ्या स्वत:च्या अंतरात्म्याला प्रसन्न करण्यासाठी करावयाचे होते.' गांधींना गुणदोष पाहावयाचे पण नव्हते. केवळ स्वत:च्या समाधानासाठी त्यांनी ते तपासून पाहिले. तसेच खिलाफतीची मागणी नीतिविरुद्ध वाटली नाही असे नकारार्थी विधान ते करतात. लॉइड जॉर्ज यांनी मागणी मान्य केली असल्यामुळे त्यांनी ते वचन पाळले पाहिजे असा गांधींचा आग्रह होता. हे सर्व सत्याग्रहाच्या तत्त्वांशी कितपत सुसंगत होते ? गांधींच्या सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे कोणतीही कृती नीतिविरुद्ध असेल तरच सत्याग्रह संभवतो. 'सत्याग्रहाचा मूळ अर्थ सत्याला धरून राहणे' असा आहे. असे असेल तर खिलाफतीच्या मागणीमागील सत्य शोधणे अपरिहार्य ठरते. त्यासाठी इस्लामचा गेल्या हजाराहून अधिक वर्षांचा इतिहास तपासावा लागेल. पण ते अडचणीचे ठरले असते. कारण इस्लामी सत्तेचा प्रसार हिंसा आणि अत्याचार यांचीच गाथा आहे. त्यामुळे खिलाफतच अनैतिक पायावर उभी होती. म्हणून गांधींना खिलाफतीच्या मागणीचे गुणदोष पाहण्याची गरज वाटली नाही. इतकेच नव्हे तर ती नीतीला धरून आहे याची खातरजमाही करून घेण्याची आवश्यकता वाटली नाही. सत्याग्रहासाठी ती कृती नीतिविरोधी नाही असे शिफारसपत्र गांधींनी दिले. पण त्यासाठी सत्याग्रह होऊ शकत नाही. सत्याग्रहासाठी ती कृती नीतिविरोधीच (अनमॉरल) असावयास पाहिजे. लॉईड जॉर्जने आश्वासन दिले असले तरी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा तोच एकटा नियंता नव्हता. बदललेल्या परिस्थितीत जे वचन पूर्ण करणे अशक्य असते, ते वचन बंधनकारक नसते हा सार्वकालिक नीतिनियम आहे. वचनपूर्तीची अशक्यता वचनाची बंधनकारकता नष्ट करते. त्यामुळे लॉइड जॉर्जवर वचनभंगाचा आरोप करणार

येणार नाही.

तथापि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गांधींनी सत्याग्रहाची व्याख्या केली आहे त्याप्रमाणे आपल्यावर बंधनकारक असलेल्या कायद्यांपैकी जे कायदे नीतीला धरून नसतात ते मोडणे म्हणजे सत्याग्रह. कोणताही तह हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा एक भाग असतो. त्यामुळे तो तह ज्यांच्यावर बंधनकारक असतो, त्यांना नीतिविरुद्ध वाटल्यास तेच त्याविरुद्ध सत्याग्रह करू शकतात. साहजिकच व्हर्सायच्या तहाने होणाऱ्या तुर्की साम्राज्याच्या विभाजनामुळे ग्रस्त होणाऱ्या विभागातील लोकांनाच सत्याग्रहाचा अधिकार राहील. गांधींना जर त्या लोकांबद्दल आस्था असली तर त्या प्रदेशात जाऊन गांधींनी सत्याग्रहाची हाक द्यावयास हवी होती. शिवाय तुर्कस्थानमधील लोकांना खिलाफत हवी होती का हेही 'सत्य' शोधावयास हवे होते. खुद्द गांधींनी याच तत्त्वानुसार आफ्रिकेतील सत्याग्रहाचे संचालन केले होते. तेथे स्थायिक असलेल्या भारतीयांनीच सत्याग्रह केला होता. त्यांच्या गाऱ्हाण्यासाठी भारतात सत्याग्रह झाला नाही. खिलाफतीमध्ये फक्त आठ कोटी मुसलमानांच्या भावना गुंतलेल्या होत्या. तर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या समस्यांच्या बाबतीत तीस कोटी भारतीयांच्या भावना तीव्र होत्या. तरीही आफ्रिकेतील अन्यायाविरुद्ध भारतात गांधींनी चळवळ केली नाही. पण आठ कोटी मुसलमानांच्या निव्वळ भावनिक असंतोषासाठी प्रथम असहकाराचे आंदोलन आणि नंतर कायदेभंगाची चळवळ गांधींनी का सुरू केली ? स्वत:चे एकमेवाद्वितीय स्थान पक्के करण्यासाठी कोणतीही किंमत देऊन त्यांना मुसलमानांचा पाठिंबा हवा होता.

या ठिकाणी एक खुलासा केला पाहिजे, असहकाराची हाक देताना खिलाफतीबरोबर पंजाबवरील अन्यायाचाही (पंजाब रॉंग) त्यांनी उल्लेख केला होता. एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. एप्रिल १९१९ मध्ये जालियनवाला बाग अत्याचार घडून आला होता. त्यानंतर आठ महिन्यांनी अमृतसर अधिवेशनामध्ये नव्या सुधारणा राबवून सरकारशी सहकार्य करावे असा आग्रह गांधींनी धरला होता. यावरून स्पष्ट होते की पंजाबवरील अन्याय खिलाफतीबरोबर घुसडणे ही केवळ पश्चातबुद्धी होती आणि हिंदूंना या चळवळीकडे आकृष्ट करण्यासाठी ती एक क्लृप्ती होती एवढेच.

गांधी कॉंग्रेसवर कब्जा मिळविण्यासाठी किती आतुर झाले होते हे यंग इंडियामधील एका लेखावरून स्पष्ट होईल. टिळक हे गांधींच्या मार्गातील प्रमुख अडथळा होते. त्यामुळे त्यांच्याविषयी लिहिताना गांधी जास्तीत जास्त कडवट भाषेचा उपयोग

करीत असत. त्यांना आध्यात्मिक मार्ग शिकविण्याची भाषा त्यांनी एका भाषणात केली होती. त्याचा उल्लेख वर आलाच आहे. यंग इंडियातील लेख १८ जानेवारी १९२० सालचा आहे. टिळक रोगजर्जर झाले होते. त्यांच्या मृत्युपूर्वी केवळ सहा महिने लिहिलेल्या या लेखावरून टिळकांबाबत गांधींची असूया कोणत्या थराला गेली होती ते स्पष्ट होईल. राजकारण हा संसारी लोकांचा खेळ आहे, साधूंचा नव्हे असे टिळकांनी एका पत्रात लिहिले होते. त्या संबंधात गांधी लिहितात,

'आपण क्रोधाला क्रोधाने उत्तर न देता, क्षमेने दिले पाहिजे. आणि हा नियम मुख्यत: संसारी लोकांसाठी आहे. पारमार्थिकांसाठी नाही. हे जग साधूंसाठी नाही असे मानणे म्हणजे आपले बौद्धिक मांद्य प्रकट करणे होय, असे लोकमान्यांविषयी आदरभाव बाळगून म्हणण्याचे धाडस मी करतो... शेवटी लोकमान्यांच्या तत्त्वाप्रमाणे राजकारणात 'सर्व काही क्षम्य' असते, हे वाक्य जेव्हा मी लिहिले, तेव्हा माझ्या मनात 'शठं प्रति शाठ्यं' हे त्यांनी वारंवार उच्चारलेले वाक्य घोळत होते. माझ्या दृष्टीने त्या वाक्याने एक वाईट नियम घालून दिला आहे. त्या नियमाचे वैय्यर्थ खुद्द लोकमान्यच, आपल्या बुद्धिसर्वस्वाने सिद्ध करण्यासाठी, एखादा तात्त्विक ग्रंथ लिहून एखादे दिवशी भारताला सानंद आश्चर्यचकित करतील, याविषयी मला निराशा वाटत नाही. 'शठं प्रति शाठ्यं' याच्या बुडाशी असणाऱ्या तत्त्वाविरुद्ध माझा तीन तपांचा अनुभव उभा करीत आहे. 'शठं प्रति सत्यम्' हाच खरा नियम आहे.'

'राजकारणात सर्व काही क्षम्य असते' असे मी मानीत असल्याचे आपण दाखविले आहे. त्यामुळे माझे मन अचूकपणे व्यक्त झालेले नाही.' असा खुलासा आपल्या पत्रात टिळकांनी केला असूनही त्यांच्या भूमिकेचा हेतुपर:सर विपर्यास करून गांधींनी त्यांच्या बाबतीत बोचरी भाषा वापरली. टिळकांबरोबरचे आपले मतभेद त्यांना सौजन्यपूर्ण भाषेत व्यक्त करता आले नसते का ? जालियनवाला बाग हत्याकांडाची चौकशी करण्याकरिता काँग्रेसने जो आयोग नेमला होता, त्यावेळी अहवाल लिहिताना काटेकोरपणे सौम्य भाषा वापरली पाहिजे याबद्दल गांधी अत्यंत आग्रही असत अशी आठवण बॅरिस्टर जयकर यांनी लिहिली आहे. मग टिळकांच्या बाबतीत अशी भाषा का ? गांधींच्या भाषणातील एक उतारा वर उद्धृत केला आहे. त्यातीलही टिळकांच्या संबंधात वापरलेली भाषा अशीच अश्लाघ्य आहे. एका ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि अत्यंत आदरणीय अशा राष्ट्रीय पुढाऱ्याबाबत गांधी इतके कडवे का झाले होते याचे उत्तर कठीण नाही.

टिळकांना तात्त्विक चर्चेमध्ये एवढे धारेवर धरणाऱ्या गांधींनी मात्र सत्याग्रहाच्या

आणि सत्याच्या त्यांच्या स्वत:च्या संकल्पनेच्या संपूर्ण विरोधात खिलाफत चळवळीला पाठिंबा देऊन 'राजकारणात सर्व क्षम्य असते' या वचनाचा वस्तुपाठच दिला होता. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपोटी त्यांनी जी दोन पावले उचलली होती त्यात रौलट आंदोलनात अहिंसा धुळीला मिळाली तर खिलाफत चळवळीने सत्य आणि सत्याग्रह यांची वासलात लावली. जे काय उरले सुरले होते त्याची विल्हेवाट मोपल्यांनी केलेल्या हिंदूंच्या कत्तलीने लागली. १९२० च्या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. किमान मागणी करावयाची व त्याला चिकटून रहावयाचे हा गांधीप्रणीत सत्याग्रहाचा आणखी एक पैलू. पण एका वर्षात स्वराज्याची घोषणा करून गांधींनी त्यालाही सोडचिठ्ठी दिली. हा सर्व खटाटोप मुसलमानांचा पाठिंबा मिळविण्याकरिता. तो मिळविल्यानंतर गांधी कॉंग्रेस काबीज करण्याच्या मागे लागले. १९२० मध्ये कलकत्ता कॉंग्रेसचे खास अधिवेशन बोलावण्यात आले. खिलाफत स्पेशल मुंबईहून सुटली. खिलाफतवाद्यांच्या आणि जुन्या नेत्यांपैकी ज्यांचे मतांतर घडवून आणण्यात गांधींना यश आले त्यांच्या सहाय्याने अधिवेशनात असहकाराचा ठराव मंजूर करून घेण्यात आला. जे गांधींना अनुकूल नव्हते त्यांचे राजकीय अवमूल्यन झाले. त्यानंतर घाईघाईने मुंबईला जाऊन गांधींनी घटनाबाह्य पद्धतीने (राजकारणात सर्व क्षम्य असते याचा आणखी एक वस्तुपाठ) होमरूल लीग कब्जात घेतली, आणि जीना प्रभृतींना राजकीय दृष्ट्या निष्प्रभ करण्यात यश मिळविले. १९२१ मध्ये नागपूर येथे कॉंग्रेस अधिवेशन ठरले. गांधींच्या विरोधकांना या अधिवेशनाने राजकीयदृष्ट्या नेस्तनाबूत केले. गांधी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा झाले. १९१८ पासून १९२१ पर्यंत म्हणजे अवघ्या तीन वर्षांत केवळ तीन पावलात गांधींनी संपूर्ण भारतीय राजकारण व्यापून टाकले.

गांधी आपल्या एकाधिकाराला किती जपत असत हे एका घटनेवरून स्पष्ट होईल. चौरीचौरा प्रकरणानंतर गांधींनी सविनय कायदेभंगाची मोहीम निलंबित करण्याचा निर्णय घेतला. त्याचा तीव्र निषेध करणारी पत्रे लाला लजपतराय आणि मोतीलाल नेहरू यांनी तुरुंगातून पाठविली. त्यासंबंधी बोलताना गांधी म्हणाले, जे तुरुंगात आहेत ते नागरी दृष्ट्या (सिव्हिली डेड) मृत आहे. त्यामुळे तुरुंगाबाहेर जे आहेत त्यांना सल्ला देण्याचा अधिकार नाही. तुरुंगातील आपले सहकारी मृत आहेत अशी अश्लाध्य भाषा काढणाऱ्या गांधींनी स्वत: मात्र पुढे तुरुंगातून वाटाघाटी केल्या. कारण वाटाघाटी करण्याचा अधिकार एकमेव त्यांचा होता. त्यामुळे त्यांना 'मृत' होऊन कसे चालेल ? बुजुर्ग नेत्यांना अशा तऱ्हेने गांधींनी मोडीत काढले असले तरी जे पुढारी बाहेर होते त्यांनी गांधींच्या सत्याग्रह निलंबित करण्याच्या निर्णयाला

अखिल भारतीय कॉंग्रेस समितीमध्ये विरोध केला. डॉ. मुंजे यांनी तर गांधींच्या विरुद्ध अविश्वासाचा आणि ठपका ठेवणारा ठराव मांडला. अखेर या चकमकीत गांधी विजयी ठरले. तथापि आपल्याला विरोध व्हावा या घटनेने गांधी उद्विग्नतेच्या कोणत्या पातळीवर घसरले होते याची कल्पना त्यांच्या एका लेखावरून येईल. 'विचार करू न शकणाऱ्या गर्दीच्या प्रशंसेचा मला वीट आला आहे. ते जर माझ्यावर थुंकले तर मला माझ्या भूमिकेची खात्री वाटेल.... माझी सुरक्षितता माझ्या कोडगेपणात आहे. मी बनचुका आहे हे समितीवरील माझ्या मित्रांना बजावून सांगितले आहे. लोकांनी प्रमाद केला तर दर वेळेला मी तो कबूल करीत राहणार.' पण आपण प्रचंड बहुमतात पुन्हा येणार हे बजवायला ते विसरत नाहीत. 'आफ्रिकेत मी सुरुवात एकमताच्या पाठिंब्याने केली. प्रथम ६४ आणि नंतर १६ अशा अल्पमतात मी गेलो. आणि पुन्हा प्रचंड बहुमत मिळवले.' समितीवरील अल्पमतातील विरोधकांना उद्देशून ते लिहितात, 'अहिंसा आणि सत्य यांच्याशी एकनिष्ठा आणि त्यांचे कठोर पालन ही राष्ट्रभक्तीच्या प्रेरणेची मागणी आहे. त्याच्यावर ज्यांचा विश्वास नाही त्यांनी कॉंग्रेसमधून निवृत्त व्हावे.' गांधींच्या संकल्पनेप्रमाणे त्यांना मान्य नसलेला मतप्रवाहही बरोबर असू शकतो. तसेच विरोधकाला 'चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठी सहनशीलता आणि सहानुभूती यांची गरज असते.' पण गांधीजी सत्याचे आणि कॉंग्रेसचेही महंत झाले होते. त्यामुळे ते म्हणतील ते सत्य अशी त्यांनी स्वत:ची खात्री करून घेतली होती. साहजिकच विरोधकांनी स्वत:ला कॉंग्रेसमधून बहिष्कृत करून घ्यावे म्हणून गांधींनी त्यांना समज दिली.

गांधींनी कॉंग्रेसमधील स्वत:च्या स्थानाबद्दल अशा तऱ्हेचे गृहीतक ठरविल्यानंतर कायदेभंगाच्या चळवळीनंतर जेव्हा मोतीलाल नेहरू आणि चित्तरंजन दास यांनी त्यांच्याविरुद्ध बंड उभारले तेव्हा गांधींची मन:स्थिती काय झाली असेल याची कल्पना करणे अवघड नाही. त्यांनी राजकीय विजनवास पत्करला. आणि स्वत:चे प्रभुत्व कॉंग्रेसवर स्थापन करण्यासाठी योग्य संधीची वाट पाहण्याचे ठरविले. ती संधी दास यांच्या मृत्यूनंतर आली. १९२९ च्या सुमारास गांधींच्या राजकीय पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण होत आली होती. १९२३ ते १९२६ या कालात कौन्सिल प्रवेशाचे राजकारण सुरू झाल्यानंतर गांधी तेजोहीन झाले होते. हा कटू धडा गांधी विसरले नव्हते. संघर्ष चालू असेपर्यंतच, त्यांचे एकमेवाद्वितीय स्थान अबाधित राहून, त्याला आव्हान देण्याचे कोणाला धाडस होणार नाही, ही खूणगाठ त्यांनी बांधली होती. संघर्षाशिवाय सत्याग्रहाला स्थान नाही आणि सत्याग्रहाशिवाय गांधींचे एकाधिकारत्व नाही, या

त्रैराशिकाद्वारेच त्यांच्या १९४२ पर्यंतच्या राजकारणाचे गणित सोडविता येते.

१९२९ च्या सुमारास काँग्रेसमधील तरुण रक्त संघर्षासाठी उतावीळ झाले होते. गांधींनी आलेली संधी अचूक ओळखली. तरुण पुढाऱ्यांचे नेतृत्व स्वीकारून गांधींनी काँग्रेसमधील आपले एकमेवाद्वितीय स्थान पुन्हा प्रस्थापित केले. एरवी १९३० चा लढा का पुकारण्यात आला याचे कारण मला सापडले नाही. १९३० चा मिठाचा सत्याग्रह ही, राजकीय गरज असण्यापेक्षा, गांधींच्या एकमुखी नेतृत्वाचीच ती खरी गरज होती. त्याचा पडताळा लवकरच आला. लढा चालू असतानाच गोलमेज परिषद भरली. त्याला काँग्रेसचे 'एकमेव' प्रतिनिधी म्हणून गांधी गेले. त्यांना भारताचे एकमेव प्रतिनिधी म्हणून जायला आवडले असते. पण ते शक्य नव्हते. परिषदेत राखीव जागाबद्दल एकमत झाले नाही. त्यामुळे पंतप्रधान मॅक्डोनाल्ड यांच्यावर निर्णय सोपविण्यात आला. त्यांनी मागासवर्गीयांसाठी वेगळे मतदारसंघ ठेवण्याचा निवाडा दिला. तो रद्द करून घेण्याचे श्रेय गांधींचे 'एकट्याचे' होते. १९३५ चा कायदा मंजूर झाल्यानंतर १९३७ ते १९३९ च्या दरम्यान प्रांतिक स्वायत्तता राबविली गेली. ती अधिक काळ राबविली गेली असती तर कदाचित गांधींचे महात्म्य कमी होण्याचा धोका होता. परंतु त्यांच्या सुदैवाने काँग्रेस मंत्रिमंडळांनी लवकरच राजीनामा दिला. १९३९ मध्ये युरोपात युद्ध सुरू झाले व युद्धात भारताचा सहभाग घोषित करण्याच्या व्हाइसरॉयच्या विरोधात मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. नंतर ४२ साली भारत छोडो आंदोलन सुरू झाले आणि गांधींच्या एकमुखी नेतृत्वाला पर्याय उरला नाही. युद्ध संपण्याच्या सुमारास पुन्हा वाटाघाटी सुरू झाल्या. गांधींच्या नेतृत्वाचा सूर्य आता उतरणीस लागला होता. नेहरू आणि पटेल यांनी गांधींना थोडेसे दूर ठेवूनच वाटाघाटी केल्या. स्वातंत्र्यासाठी नंतर जी बोलणी झाली त्यात, आणि भारताचे विभाजन करण्याचा निर्णय घेतला गेला त्यात, गांधींचा सहभाग अत्यल्प होता. गांधींना ही दुय्यम भूमिका खचितच खटकली असणार. पण लवकरच असे एक क्षेत्र निर्माण झाले, की जेथे गांधींना पर्याय नव्हता. हिंदु-मुस्लिम दंगली सुरू झाल्या त्या वेळी बंगाल, बिहारमध्ये ठाण मांडून शांततेसाठी प्रयत्न करणारे ते 'एकमेव' नेते होते. गांधींची शेवटची कृतीही त्यांचे अद्वितीय स्थान सिद्ध करणारीच होती. पाकिस्तानला भारताने पंचावन्न कोटी रुपये देणे होते. पाकिस्तानच्या युद्धखोरीमुळे पटेल-नेहरू यांनी ते न देण्याचे ठरविले. परंतु या प्रश्नावर उपोषण करून पाकिस्तानला पैसे देण्याबद्दल गांधींनी सरकारवर दडपण आणले. नेहरू, पटेल ज्या सरकारमधे नेते होते त्या सरकारला नमविणारे ते 'एकमेव' होते. त्यांचा शेवट देखील त्यांच्या एकमेवाद्वितीय महत्त्वाकांक्षेला

अनुरूप असाच होता. दुर्दैवाने हत्या झालेले स्वातंत्र्यपूर्व काळातील ते 'एकमेव' सर्वोच्च नेते होते. १९२० ते १९४७ या कालखंडात, अशा तऱ्हेने, भारतीय राजकारण गांधींच्या एकमुखी नेतृत्वाच्या महत्त्वाकांक्षेभोवतीच फिरत राहिले होते. सत्य, सत्याग्रह आणि उपोषण त्यासाठीच राबविली गेली. स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे होऊन गेली तरी त्याचे परिणाम अजूनही जाणवतात.

**समारोप**

गांधींच्या एकमुखी नेतृत्वाची प्रतिक्रिया म्हणून जीनांनी, मुस्लिम लीग मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था आहे असा दावा केला. आणि त्या दोघांच्या सत्ता झुंजीत भारताची शकले उडाली. भारताचे विभाजन होऊनही हिंदू-मुसलमानांचा प्रश्न सुटला नाहीच उलट त्याला आता आंतरराष्ट्रीय मिती प्राप्त झाली आहे. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी जातीयवादी मुसलमानांचा अनुनय करण्याची आत्मघातकी परंपरा गांधींनी सुरू केली. ती आज विश्वनाथप्रताप सिंग यांच्यापर्यंतच्या नेत्यांनी प्रामाणिकपणे चालविली. गांधींनी एकमेवाद्वितीय नेत्यांची परंपरा सुरू केली ती राजीव गांधींपर्यंत अस्तित्वात होती. त्यात लोकशाहीला आवश्यक असलेल्या सामुदायिक नेतृत्वाच्या संकल्पनेला तिलांजली मिळाली. एक वटवृक्ष आणि त्याच्या छायेत खुरटलेली झुडुपे अशी कळा भारतीय राजकारणाला आली. सत्य आणि सत्याग्रह याचे आचरण खुद्द गांधींना करता आले नाही तेथे सामान्य जनतेकडून त्याची अपेक्षा करणेच चुकीचे होते. साहजिकच आचार आणि उच्चार यात अंतराय निर्माण झाला आणि आत्यंतिक दांभिकता हे भारतीय राजकारणाचे व्यवच्छेदक लक्षण बनले.

१९२० ते १९४७ या कालखंडात सतत संघर्षाचे वातावरण ठेवल्यामुळे राजकारणातील विधायक प्रवृत्ती दबल्या गेल्या. वर गांधींचे एक भाषण उद्धृत केले आहे. त्यात टिळकांनी भारताचा आत्मा जाणला नाही, असे विधान गांधींनी केले होते. खरे तर टिळक आणि गांधी या दोघांनीही भारताचा आत्मा योग्य तऱ्हेने ओळखला होता. भारताला विधायक राजकारणाची, अर्थकारणाची आणि समाजकारणाची जाण नाही हे टिळकांनी व त्यांच्या पूर्वसुरींनी यथार्थपणे जाणले होते आणि भारतीयांच्यातील ही उणीव दूर करणे हे त्यांच्या राजकारणाचे उद्दिष्ट होते. त्यामुळे टिळकांनी गीतारहस्य मुद्दाम मराठीत लिहून भारतीयांना कर्मयोगाचा संदेश दिला. लोकशाही संस्था प्रत्यक्षात राबवूनच भारतीयांच्या मुळातच अधू असलेल्या, विधायक प्रेरणांना पुनरुज्जीवित करता येईल असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळे १९१९ चा कायदा मंजूर झाल्यानंतर निवडणुका लढविण्यासाठी टिळकांनी कॉंग्रेस

डेमॉक्रॅटिक पार्टीच्या स्थापनेची घोषणा केली.

गांधींनीही भारताचा आत्मा पुरेपूर जाणला होता. पण त्याचा उपयोग त्यांनी आपली वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी करून घेतला. भारताचे भले कशात आहे याचा वेध घेऊन त्याप्रमाणे भारतीय समाजकारणाला गती देण्याऐवजी आपले एकमेवाद्वितीय नेतृत्व हे वैयक्तिक उद्दिष्ट ठरवून, त्याला अनुरूप अशा तऱ्हेने, भारतीय राजकारणाला वेगळे वळण लावले. व्रतवैकल्ये, उपासतापास, आत्मपीडन यांचे भारतीय व्यक्तिमत्वाला शतकानुशतके आकर्षण वाटत आले आहे. स्वत:ला काहीतरी नाकारण्यात सार्थकता मानण्याची प्रवृत्ती त्यातून बळावली. गांधी स्वत: त्याच परंपरेतले. त्याचाच उपयोग करून सत्याग्रहाचे तत्त्व नव्हे तर तंत्र गांधींनी विकसित केले. साहजिकच भारतीय मनाला त्याची भुरळ पडली. नाहीतरी हजारो वर्षे भारत परकीय आक्रमकांकडून मार खात आहेच. त्याला सत्याग्रह म्हटले म्हणजे मार खाण्याचे तत्त्वज्ञान तयार होते. आणि डोकी फोडून घेण्यात भूषण वाटू लागते. रस्ते स्वच्छ ठेवणे, गटारे तुंबू न देणे, नागरिकांना नागरी सोयी पुरवणे, यात फार मोठी समाजसेवा आहे याचे भान नष्ट होते आणि बहिष्कार हेच जीवनसाफल्य ठरते. अशा तऱ्हेने भारताची सांस्कृतिक परंपरा आणि ऐतिहासिक वस्तुस्थिती यांचा मेळ सत्याग्रहात आणि असहकारात पडला, आणि त्याचा सांधा भारतीय व्यक्तिमत्त्वाशी यथास्थित जुळला. मात्र या ठिकाणी हे लक्षात ठेवणे आवश्यक की गांधींच्या सत्याग्रहाचे केवळ तंत्रच भारतीयांनी आत्मसात केले. त्याच्यामागे सत्याचे तत्त्वज्ञान होते, ते मात्र कधीच आपल्या अंगवळणी पडले नाही. खुद्द गांधींनाही ते सुसंगतपणे आचरता आले नाही. त्यामुळे विनोबा, शंकरराव देव यांसारखे सत्याग्रही, वेळ आली तेव्हा, बिनकण्याचेच असलेले आढळून आले. कारण त्यांनाही फक्त तंत्रच माहीत होते. पण गांधींना अशाच अनुयायांची गरज होती. जे केवळ आदेशांचे पालन करतील, अशा अनुयायांची. विरोध झाला म्हणजे गांधी किती संतप्त होत असत याचे उदाहरण वर दिले आहेच. अशा अनुयायांच्या सहाय्याने त्यांनी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपोटी २७ वर्षे संघर्षांचे वातावरण तेवत ठेवले. त्यात विधायक राजकारणाची धूळधाण झाली. साध्या नगरपालिकादेखील आपल्याला योग्य तऱ्हेने चालविता आल्या नाहीत. अशा परिस्थितीत स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बिनकण्याचे नीतिवादी, आणि राज्यकारभाराविषयी अनभिज्ञ लोकप्रतिनिधी यांच्या हाती भारताचे भवितव्य आले. विधायक राजकारणाची सवय नसल्यामुळे राज्यकारभाराने दिशा हरवली, आणि स्वार्थाचा नंगा नाच सुरू झाला. गांधींनी भारतीय आत्म्याचा जो पैलू ओळखला होता, आणि ज्याचा उपयोग त्यांनी

आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी करून घेतला, त्याची आजचे राजकारण म्हणजे तार्किक परिणती होय. सत्याग्रहाचे देदीप्यमान तत्त्वज्ञान भारताने आणि गांधींनी जगाला दिले, पण भारत मात्र त्या बाबतीत भिकारीच राहिला. आजच्या दुरवस्थेचे मूळ त्यात आहे.

# ८

# जातीयवाद

●

## - स्वातंत्र्योत्तर काल -

स्वातंत्र्योत्तर जातीयवादाचा शोध ५ भागात घेणे इष्ट होईल.

१) मुस्लीम जातीयवादी आणि तथाकथित हिंदू जातीयवादी यांची तात्त्विक भूमिका.

२) वास्तव घटनांनी अधोरेखित केलेले हिंदू आणि मुस्लीम जातीयवादाचे व्यक्त स्वरुप.

३) भारतीय राजकारणाला पडलेला जातीयवादाचा पीळ.

४) हिंदूंची सामाजिक मानसिकता.

५) जातीयवादाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण.

(१)

''आम्ही समजत होतो, प्रत्येकाने आपले धर्म घरात सांभाळावे... या देशाच्या विकासाच्या आड कोणताही धर्म येता कामा नये... आमचे शंकराचार्य आता सतीपर्यंत मागे जात आहेत. असले शंकराचार्य आम्हाला नकोत.''

- बाळासाहेब ठाकरे.

''एखादी व्यक्ती घरामध्ये किंवा मशिदीमध्ये मुसलमान आहे, पण बाजारात किवा इतरांशी व्यवहार करताना मुसलमान नाही असे म्हणणे स्वधर्मत्यागच होय.''

- बनातवाला.

''मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या सूत्रधारानेच गेल्या डिसेंबर व जानेवारी महिन्यांतील दंगलीचा कट आखला असावा असा निष्कर्ष पोलीस तपासावरून निघत आहे. बॉम्ब स्फोट प्रकरणी अटक केलेल्या व्यक्तींच्या जाबजबावावरुन हा कट सहा महिन्यांपूर्वीच आखण्यात आला असावा असा अंदाज पोलीस आयुक्त अमरजितसिंग सामरा यांनी दिला. डिसेंबरमधील दंगल हा एका कटाचा भाग होता. अयोध्येतील घटनांचा उस्फूर्त पडसाद नव्हता असे ते म्हणाले.''

- (महाराष्ट्र टाइम्स २५-३-९३)

कट्टर हिंदुत्ववादी म्हणून पुरोगामी विचारवंत ज्यांचा नेहमी अधिक्षेप करतात त्या बाळासाहेब ठाकरे यांची, आणि ज्या मुस्लीम लीगशी राजकीय जवळीक साधण्यात पुरोगामी पक्षांना नेहमीच इतिकर्तव्यता वाटते त्या लीगचे नेते बनातवाला यांची तात्त्विक भूमिका वर दिली आहे. या दोहोंमधील इहवादाशी मिळती जुळती भूमिका कोणती याबद्दल पुरोगामी विचारवंतांनी वस्तुनिष्ठ प्रदर्शन केलेले माझ्या तरी वाचनात आले नाही.

मुस्लीम जातीयवादाचे अतिरेकी स्वरुप मुंबईचे पोलीस आयुक्त सामरा यांच्या मुलाखतीवरुन स्पष्ट होते. हिंदू जातीयवादाच्या अतिरेकी स्वरुपाचे दर्शन बाबरी मशीद उध्दवस्त करण्याच्या घटनेत घडते. या दोहोंपैकी भारताच्या दृष्टीने राष्ट्रविघातक प्रवृत्ती कोणती ?

(२)

हिंदु आणि मुस्लीम जातीयवादाचे वस्तुनिष्ठ विवेचन करताना काही निर्विवाद वास्तवांचे भान ठेवणे आवश्यक आहे.

१) हिंदु आणि मुस्लिम मानसिकतेवर भारताच्या फाळणीचे सावट अनिवार्यपणे पडलेले आहे.

२) हिंदुत्ववाद ही मुस्लीम जातीयवादाची केवळ प्रतिक्रिया आहे, आणि त्यामुळे उसने अवसान आहे. ती मूळ प्रवृत्ती नव्हे. मध्यंतरी मुंबईला महा आरतीचा प्रयोग झाला. त्यावेळी दर आरतीला रोडावणाऱ्या संख्येवरून हे निखालसपणे स्पष्ट होते.

३) इस्लामला प्रबोधनाचे वावडे आहे. त्यामुळे मुस्लीम व्यक्तिमत्त्वावर धर्माचा सर्वंकष प्रभाव जाणवतो. साहजिकच इस्लामी देशांबद्दल आत्मीयता वाटणे ही मुसलमानांची सहजप्रवृत्ती आहे. तथापि पाकिस्तान वगळता इतर देशाबद्दलची आत्मीयता ही संदिग्ध आहे. पाकिस्तानबद्दल वाटणाऱ्या जवळिकीचे स्वरुप वेगळे

आहे. अनेक मुसलमानांचे जवळचे नातेवाईक पाकिस्तानमध्ये आहेत. कुटुंबातील काही व्यक्ति पाकिस्तानमध्ये आणि उरलेल्या भारतात अशी परिस्थिती काही ठिकाणी आढळते. पाकिस्तानच्या निर्मितीला त्यांचा हातभार लागला त्यांच्यापैकी अनेकजण अजून भारतात आहेत. धर्माच्या नावावर फाळणी झाली हे त्यांच्यापैकी कोणी विसरू शकत नाहीत. आपण उपरे आहोत अशी आजही कित्येक मुसलमानांची भावना आहे. त्यामुळेच मुसलमान राष्ट्रीय प्रवाहात सामील होत नाहीत. मुसलमानांमधील ही अलगतेची भावना पोसली ती मुसलमानांची मते एकगठ्ठा मिळविण्याच्या हव्यासपायी पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या राजकीय पक्षांनी. आजही त्याबाबतीत जनता दल आणि कॉंग्रेस यांच्यामध्ये चुरस आहे. फाळणी झाल्यापासून आजतागायत, मुस्लीम सत्यशोधक समाजाचा अपवाद वगळता, मुस्लीम विचारवंतही अलगता जोपासत राहिले. बाबरी मशीद प्रकरणानंतर हिंदु संघटित होत आहेत, याची जाणीव त्यांना झाली. सर्वसामान्य मुसलमानाला येथेच रहावायाचे आहे, येथील समाजाशी एकरुप होणे आवश्यक आहे, त्यासाठी मुल्ला मौलवींचा त्यांच्या वरील प्रभाव नष्ट केला पाहिजे, अशा तऱ्हेचा विचार करण्याची गरज मुस्लीम विचारवंतांवर प्रथमच लादली गेली. अयोध्याप्रकरणानंतर त्यांच्यापैकी अनेकांनी या दिशेने परखड मतप्रदर्शन केले. याचा स्पष्ट अर्थ असा की मुस्लमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणावयाचे असेल तर हिंदु संघटन हा त्यावर एकमेव उपाय आहे.

४) मुसलमानांना हिंदु-मुस्लीम ऐक्याची खरीच ओढ आहे का ? 'हिंदु-मुस्लिम भाई भाई' अशा घोषणा देणारे अनेक लोक हिंदू वस्तीमध्ये आढळतात. 'पण मुसलमान वस्तीमध्ये मुसलमानांनी याबाबतीत पुढाकार घेतल्याचे कधी वाचनात आले नाही. मुसलमानांच्या हिंदु मुस्लीम ऐक्याबाबतच्या उदासीनतेची अशी कितीतरी उदाहरणे आढळतात.

५) मुसलमान व्यक्ती आणि मुस्लीम सामाजिक मन यामध्ये फरक करणे आवश्यक आहे. मुसलमान व्यक्तीने खऱ्या धर्मपरायणतेने कितीही कर्मठपणे धर्मपालन केले तरी त्यामुळे राष्ट्राला कोणताही धोका संभवत नाही. धोका आहे तो धार्मिक भावनेचा फायदा घेऊन राजकीय महत्त्वाकांक्षेपायी त्यांच्यात अलगतेची जाणीव निर्माण करणारे मुस्लीम नेते आणि त्याला कारणीभूत होणारे पुरोगामी (!) राजकीय पक्ष यांच्यापासून.

६) भारत हे इदवादी राज्य असावे म्हणून मुस्लीम नेत्यांचा आग्रह असतो. पण पाकिस्तान हे इस्लामी प्रजासत्ताक असल्याबद्दल त्यांच्यापैकी कोणीही खंत व्यक्त

करीत नाही. मुस्लीम नेत्यांच्या या दुटप्पीपणाची दखल कोणत्याही राजकीय पक्षाने अथवा विचारवंतांनी घेतलेली आढळत नाही.

७) दूरदर्शनने माजी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्यावर चित्रफीत तयार केली आहे. त्यात त्यांनी आपण मुसलमान असल्याचे (I am a Muslim, every inch of me) अगदी साहजिकपणे पण आवर्जून सांगितले. तथापि एकाही हिंदु उच्चपदस्थाने आपण हिंदू आहोत असे दूरदर्शनवर सांगितलेले मी ऐकले नाही. 'गर्व से कहो, 'हम हिंदु है' ही घोषणा देखील विश्व हिंदु परिषदेने स्वातंत्र्यानंतर चाळीस वर्षांनी दिली. जी वस्तुस्थिती इतरधर्मीय सहजगत्या सांगतात, ती सांगण्यास हिंदूंना सर्व अभिमान एकवटावा लागतो.

८) हिंदू जास्तीत जास्त कट्टरवादी झाला म्हणजे हिंदूबरोबर इतरांनीही आपले धर्म घरात ठेवावे असे निकराने सांगतो. मुसलमान राजकारणात, समाजकारणात, आंतरराष्ट्रीय संबंधात, खेळात, लेखक म्हणून, नट म्हणून, नागरिक म्हणून, मुसलमान या नात्यानेच व्यवहार करणार.

९) विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान असताना त्यांनी बुद्धिमंतांची परिषद बोलावली होती. त्यावेळी बोलताना प्रसिद्ध नट दिलीपकुमार यांनी अयोध्या प्रकरणामुळे मुसलमानात धास्ती निर्माण होत आहे असे उद्‌गार काढले होते. पण काश्मीरमधील हिंदूंना धास्तीमुळे प्रत्यक्षात परागंदा व्हावे लागले आहे त्याचा उच्चारही त्यांनी केला नाही.

(३)

'गर्व से कहो' या विश्वहिंदु परिषदेने दिलेल्या निखालस निरुपद्रवी घोषणेने पुरोगामी राजकीय पक्ष आणि विचारवंत यांच्यात हलकल्लोळ माजला. याचे इंगित काय ते कॉंग्रेसच्या एका मराठी खासदाराने प्रकट केले. 'पूर्वी रा. स्व. संघ, हिंदू महासभा हे हिंदुत्वाचे आवाहन करीत, पण ते प्रभावी नसे. शिवसेनेचे हिंदुत्ववादाचे आवाहन आक्रमक आहे आणि मध्यमवर्गीयांना त्याचे आकर्षण आहे हे नाकारून चालणार नाही.' मध्यमवर्ग हळूहळू हिंदुत्ववादाने भारला जात आहे आणि पुढील निवडणुकीवर त्याचा परिणाम अटळ आहे. या धास्तीने राज्यकर्ता पक्ष आणि इतर पुरोगामी पक्ष पोखरले जात आहेत. या पक्षांना देशाच्या भवितव्याबद्दल बेताचीच काळजी आहे. त्यांना खरी चिंता आहे ती निवडणूक जिंकण्याची. आणि त्याबाबतीत संदेह निर्माण झाल्यामुळेच हे सर्व पक्ष व्याकुळ झाले आहेत. देशहिताला जर ते प्राधान्य देत असते तर बनातवाला यांच्या भूमिकेचा निषेध करून त्याविरुद्ध उपाययोजना

करण्याबद्दल ते अधिक तत्पर राहिले असते. तथापि त्याऐवजी अल्पसंख्याकांना राजी ठेवण्यासाठी हिंदुत्ववाद्यांविरुद्ध त्यांनी आघाडी उघडली. त्यामागील तर्कसंगती उलगडण्यासाठी 'गर्वसे कहो' या घोषणेचे आकर्षण प्रामुख्याने कोणत्या वर्गाला आहे आणि का आहे याचा शोध घेतला पाहिजे.

**मुसलमानांचा जाच का सहन करायचा ?**

देशाच्या भवितव्याबद्दल फक्त मध्यमवर्गच सचिंत असतो. मुसलमानांच्या अनुनयाचे जे धोरण अनुसरले जात आहे त्यामुळे आपण ज्या देशात बहुसंख्य आहोत त्या देशातच आपल्याला दुय्यम नागरिकाची वागणूक मिळत आहे का या शंकेने त्याला ग्रासले आहे. मुसलमानांना पाहिजे म्हणून देशाची फाळणी झाली, तरीही त्यांच्या जाचाखाली या देशातील सर्वच पक्ष का राहतात याच्या मागची तर्कसंगती त्याला समजत नाही. 'सर्वात्मका सर्वेश्वरा' ही प्रार्थना पाठ्यपुस्तकातून काढून टाकली जाते. शहाबुद्दीन प्रजासत्ताकदिनावर बहिष्कार घालण्याचे आवाहन करतात, तरी सर्वजण मख्ख का हे त्याला उमजत नाही. मुसलमानांची अरेरावी अखेर किती काळ चालू राहणार आणि पुरोगामी म्हणवून घेणारे, ती कोठपर्यंत चालू देणार याबाबतीत तो संभ्रमात आहे. अशा परिस्थितीत हिंदुत्ववादाकडे मध्यमवर्ग साहजिकच आकर्षित होऊ लागला. यांपैकी अनेकजण एकेकाळी हिंदुत्ववादाचे कट्टर विरोधक होते. त्यांच्या या परिवर्तनाचा शोध घेताना मला असे आढळले की, हिंदूंनी संघटित होऊन इहवादी राज्याची तत्त्वे इतर धर्मीयांवर विशेषत: मुसलमानांवर लादल्याखेरीज ते ती स्वीकारणार नाहीत, तसेच जोपर्यंत त्यांच्यातील प्रथम मुसलमान आणि नाईलाजाने भारतीय ही वृत्ती नष्ट करण्यात येत नाही, तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता हे केवळ मृगजळच ठरणार आहे असे त्यांना मनोमन वाटू लागले आहे. 'गर्व से कहो' चे आकर्षण त्यातून निर्माण झाले आहे. त्यांच्या शंका आणि त्यांचे विचार हिंदुत्ववादी निदान स्पष्टपणे मांडण्याची तरी हिंमत दाखवत असल्यामुळेच 'गर्वसे कहो' या घोषणेचे औचित्य त्यांना जाणवू लागले आहे.

'गर्व से कहो' ही घोषणा दिली गेल्यानंतर आणि तिचा प्रभाव निवडणुकींच्या निकालांद्वारे दिसू लागल्यानंतर पुरोगामी पक्षांना आपल्यापायाखालची वाळू सरकू लागल्याची जाणीव झाली आणि हिंदू जातीयवादाच्या नावाने एकच हाकाटी सुरू झाली. धार्मिक पुनरुज्जीवनवाद म्हणजे नेमके काय यासंबंधी कोणताही विचार न करता त्याविरुद्ध डांगोरा पिटण्यात येऊ लागला. अनेक राजकारणी विद्वान आणि विचारवंत शौर्याचा आव आणून तथाकथित हिंदू जातीयवादाचा मुकाबला करण्यास

ठाकले. कारण हिंदूंना ठोकण्यास कोणतेही धाडस लागत नाही हे त्यांनी पुरेपूर हेरले आणि त्यांनी एकच हंगामा उडवून दिला. हा जो वैचारिक गदारोळ निष्कारण उठविला गेला आहे त्याचे वस्तुनिष्ठ आकलन करून घ्यावयाचे असेल तर धार्मिक पुनरुज्जीवनवाद, हिंदू, हिंदुत्व, हिंदुत्ववाद या संकल्पना यथार्थपणे समजून घेणे आवश्यक आहे आणि या सर्वांचा विचार भारतीय लोकशाहीच्या संदर्भात केला पाहिजे. सर्वप्रथम भारतीय लोकशाहीला पायाभूत असलेल्या भारतीय शासनाचे स्वरूप नीट जाणून घेतले पाहिजे.

**हिंदू राज्याची स्थापना**

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि 'हिंदू' राज्याची स्थापना झाली. हिंदु राज्य ही मध्ययुगीन संकल्पना असल्याचे नेहरूंनी कितीही तावातावाने सांगितले असले तरी वास्तवात १९४७ साली भारतात स्थापन झालेले राज्य हिंदु राज्यच होते. या राज्यात बहुसंख्य राज्यकर्ते हिंदूच होते एवढ्याच कारणामुळे मी त्याला हिंदू राज्य म्हणत नाही. तर हिंदुत्वाची सर्व वैशिष्ट्ये आत्मसात केलेले ते राज्यकर्ते होते आणि प्रत्यक्ष राज्यकारभारात हिंदुत्वाचीच सर्व लक्षणे आजपर्यंत दृगोचर होत आहेत. इतकेच नव्हे तर घटना आणि कायदेकानू यातही हिंदुत्वाचेच प्रतिबिंब आढळून येते. नेहरू सरकार जरी इहवादी राज्याचे पुरस्कर्ते असले तरी राज्यकर्त्यांच्या नेणीवेत हिंदुत्व इतके घट्ट रुतून बसले होते की, शेवटी जी राज्यघटना प्रत्यक्षात तयार झाली ती इहवादी न होता परधर्मपरायण हिंदू राज्याचीच घटना निर्माण झाली. इहवादी राज्यात धार्मिक अल्पसंख्य आणि बहुसंख्य हा शब्दप्रयोग वापरला गेल्यामुळे भारत हे हिंदु राज्यच असल्याचे घटनेमध्ये कशा तऱ्हेने अनुस्यूत आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे. धार्मिक अल्पसंख्य म्हटले की धार्मिक बहुसंख्य हे ओघानेच येते. भारतात हिंदु बहुसंख्य आहेत आणि भारत हे लोकशाही राज्य असल्यामुळे तेथे धार्मिक बहुसंख्य राज्य करणार हे निश्चित. म्हणजेच भारत हे बहुसंख्यांकाचे राज्य म्हणजे हिंदूंचे राज्य घटनेनेच ठरविले गेले. भारताला खरोखरीच इहवादी राज्य व्हावयाचे असते तर भारत कोणत्याही धर्माला मान्यता देणार नाही आणि धर्मावर आधारित दर्जा ओळखणार नाही असे घटनेत ग्रंथित करण्यात आले असते. हिंदूंचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सहिष्णुता. तो निधर्मी नसला तरी सहिष्णु आहे आणि ही सहिष्णुता आत्मघातकी आहे. भारतातील पारशी वगळता बहुसंख्य अन्यधर्मीय मूळ हिंदूच होते. त्यांच्या धर्मांतरामुळेच जातीयवादाची समस्या निर्माण झाली. त्या समस्येने गंभीर स्वरूप धारण करू नये म्हणून, ज्यांना आपल्या धर्मात परत जावयाचे आहे, आणि परकीय नागरिक, यांचा अपवाद वगळता, कोणत्याही धर्मांतरावर कायद्याने बंदी घालण्यात

आली असती. परंतु तसे न करता धर्मांतराला सर्वस्वी मुभा देण्यात आली. भारतातील परिस्थितीमध्ये कोणत्याही इहवादी सरकारने अशी अवसानघातकी तरतूद घटनेत केली नसती. पण एवढ्यावरच न थांबता धार्मिक अल्पसंख्याकांना निरपवाद सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्य देऊन धार्मिक अलगतावाद जोपासला जाईल आणि इहवादाचे संपूर्ण उच्चाटन होईल याचीही खातरजमा करून घेतली. कारण मुळात हिंदु समाजातील निरनिराळे गट सामाजिक जीवनात अलगताच जोपासत आहेत. तेव्हा त्याचे प्रतिबिंब घटनेत पडल्यास नवल नाही. भारत सरकार जर खरोखरीच इहवादी असते तर सर्व भारतीयांना समान सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार राहतील असे घटनेत नमूद केले असते. पण वेगळे अधिकार देऊन, हिंदुराज्यातील अल्पसंख्य, असे अन्यधर्मीयांचे भारतातील स्थान पक्के केले.

### अनुनयाचे राजकारण

अल्पसंख्य हा दर्जा निश्चित झाल्यानंतर सत्तेसाठी अल्पसंख्याकांना राजी ठेवणे हे बहुसंख्याकातील निरनिराळ्या गटांना आवश्यक होऊन जाते. त्यानुसार विरोधकांना नामोहरम करण्यासाठी हिंदु राज्यकर्त्यांनी मुसलमान, ख्रिश्चन इत्यादींचे लाड करून त्यांच्या एकगठ्ठा मतावर निवडून येण्याचे राजकारण सुरू केले. विरोधी हिंदु गटांनी तेच धोरण अनुसरले. अशा तऱ्हेचे निरनिराळे हिंदु गट अल्पसंख्याकांचा अनुनय करू लागले परिणामी सार्वजनिक क्षेत्रात सर्व अल्पसंख्याकांचे लाड करण्याची प्रवृत्ती बोकाळली आणि भारताला इहवादी राज्य बनविण्याचे स्वप्न विरले. ते सत्यात अवतरण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन, राजकारणात कोणताही पक्ष, उघड अथवा छुप्या रीतीने धर्माला स्थान देणार नाही, अशा तऱ्हेची आचारसंहिता तयार करावयास हवी होती, पण हिंदु राज्यात ते कसे शक्य आहे.

भारत हे इहवादी राज्य आहे ही 'मिथ' आपण इतकी घट्ट कवटाळून बसलो आहोत की वरील विवेचन अनेकांना कल्पनाविलास वाटण्याचा संभव आहे. तथापि भारत हे हिंदु राज्य असून ते हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करते याचा सज्जड पुरावा पं. नेहरूंनीच पुरविला आहे. ज्या वेळी हिंदू कोड बिलावर संसदेत चर्चा चालू होती त्यावेळी आचार्य कृपलानी यांनी समान नागरी कायदा करावा अशी आग्रहाने मागणी केली. तसेच हा कायदा मुसलमानांनाही लागू करावा असा आग्रह धरला. त्यावेळी पं. नेहरू म्हणाले, त्याचा निर्णय मुसलमानांना करू दे. म्हणजेच नेहरुंनी हिंदू कोडची मागणी केली ती हिंदूंचे पुढारी म्हणूनच, राष्ट्राचे नेते म्हणून नव्हे. नेहरू हे एकाच वेळी हिंदूंचे पुढारी आणि राज्यकर्तेही होते. स्वत:ला हिंदूंचे पुढारी

समजणारी व्यक्ती ज्यावेळी राज्याची प्रमुख असते त्यावेळी ते हिंदु राज्यच असते. भारत सरकार जर खरोखरी इहवादी असते तर राज्यकर्ते स्वत:चा धर्म विसरले असते आणि मानवतावादी तसेच सर्व नागरिक समान आहेत, या भूमिकेतून त्यांनी नागरी कायदा संमत केला असता. भारताचे हिंदू राज्य हे आजतागायत टिकून आहे. मुस्लिम महिला विधेयक संमत करण्यामागची भूमिका तीच आहे. मुस्लीम स्त्रीचे अधिकार, भारतीय नागरिक म्हणून निश्चित न होता, ती मुस्लीम आहे या वस्तुस्थितीला, पर्यायाने तिच्या धर्माला अनुसरून, ठरविण्यात आले. याचाच अर्थ वैयक्तिक कायद्याच्या संदर्भात मुस्लीम हे भारतीय नागरिक नसून हिंदू राज्यातील परकीय रहिवाशांसारखा त्यांचा दर्जा आहे. भारतीय लोकशाहीचे हिंदु राज्य हे स्वरूप समजावून घेतल्यानंतर हिंदू, हिंदुत्व, हिंदुत्ववाद आणि धार्मिक पुनरुज्जीवनवाद यांचा विचार भारतीय लोकशाहीच्या संदर्भात करणे आवश्यक आहे.

‘ हिंदू कोण ?

साहजिकच हिंदू कोण असा प्रश्न उपस्थित होतो. हिंदुधर्म पाळणारा तो हिंदू असे उत्तर देण्यात येईल. पण हिंदुधर्म म्हणजे काय याचे उत्तर निश्चित नाही. त्यामुळे हिंदू या शब्दांची अखेर नकारात्मक व्याख्या करावी लागते. जो भारतात राहतो पण ख्रिश्चन, मुस्लीम अथवा पारशी नाही तो हिंदू असे नकारात्मक स्पष्टीकरण करावे लागणारा हिंदू धर्म हा एकच धर्म आहे. कारण जो हिंदूधर्म मानीत नाही अथवा नास्तिक आहे तोही हिंदूच. अशा परिस्थितीत ‘ गर्वसे कहो ’ या घोषणेचा परिणाम झालाच तर तो फक्त स्वत:ला हिंदू मानतात त्यांच्या पुरताच मर्यादित राहील. पण जे स्वत:ला हिंदू समजतात त्यांच्यापैकी बहुसंख्य राज्यकर्ते आहेत किंवा पुरोगामी पक्षांचे सभासद आहेत. आणि त्यांचे धोरण इतर धर्मातील जातीयवाद्यांचे लांगूलचालन करणे हे होय. त्यांचा या घोषणेला विरोध असल्यामुळे त्यांच्यावर या घोषणेचा परिणाम होणे शक्य नाही. राहता राहिला एक लहान असा, राजकारणापासून अलिप्त असणारा पण भारताच्या भवितव्याविषयी जागरूक असल्यामुळे, राजकारणाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणारा वर्ग. या वर्गाला आता ‘ गर्वसे कहो ’ या घोषणेचे आकर्षण वाटू लागले आहे. आणि ते एवढ्यापुरतेच की त्यामुळे हिंदूंचा एक दबावगट निर्माण होऊन त्याच्या प्रभावामुळे भारताचे हिंदूराज्य हे स्वरूप बदलून तेथे खरोखरीचे इहवादी राज्य निर्माण होईल. भारताच्या राजकारणातील हा एक विलक्षण उपरोध आहे की हिंदुत्ववादाकडे आकर्षित झालेला हा वर्ग खराखुरा इहवादी आहे, आणि जातीयवाद्यांचा अनुनय करण्याचे जे धोरण हिंदू राज्यकर्त्यांनी आणि पुरोगामी पक्षांनी

अनुसरले आहे त्याला त्याचा विरोध असून सर्वांना नागरिक म्हणून समान वागणूक मिळावी याबात तो आग्रही आहे. याउलट स्वत:ला इहवादी राज्याचे पुरस्कर्ते म्हणवणारे हिंदु राज्यकर्ते आणि पुरोगामी पक्ष इतर धर्मातील जातीयवाद्यांना ' मोस्ट फेवर्ड सिटिझन्स ' म्हणून वागणूक देऊन जातीयवादाच्या प्रेरणा बळकट करीत आहेत आणि भारतीय लोकशाहीचा पाया खिळखिळा करीत आहेत.

**हिंदुत्व**

प्रस्तुत विवेचनाच्या संदर्भात हिंदुत्व आणि हिंदुत्ववादी यांचाही अर्थ निश्चित करणे आवश्यक आहे. हिंदुत्व म्हणजे हिंदूंचे परंपरागत गुणावगुणविशेष आणि त्यांचा आविष्कार ज्यांच्या ठिकाणी आढळतो त्यांना हिंदू म्हणणे युक्त ठरेल. जरी ते आपण हिंदू आहोत हे नाकारत किंवा छपवीत असले तरी.

हिंदुत्वाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे जातिभेद. हिंदू धार्मिक बाबतीत सहिष्णु असला तरी जातिभेदाच्या संबंधात कडवा असतो. साहजिकच स्वातंत्र्यानंतर भारतात स्थापन झालेले हिंदुराज्य जातिभेदावर आधारलेले होते. हिंदूंना परजातीयांपेक्षा परधर्मीय जवळचा वाटतो. त्यामुळे ज्यांच्याजवळ विशेष बुद्धिमत्ता आहे, त्यांच्याऐवजी समाजकारणात परधर्मीयांना प्रतिनिधित्व मिळू लागले. उदा. स. गो. बर्वे यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आले पण मुसलमानांना मात्र महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात सतत प्रतिनिधित्व देण्यात येते. साहजिकच धार्मिक अल्पसंख्याकांना सर्वच राजकीय पक्ष जवळ करू लागले.

जातिभेद हिंदूंच्या हाडीमासी किती खिळला आहे हे एका उदाहरणावरून स्पष्ट होईल. मध्यंतरी ' सोबत ' मध्ये जोतिबा फुले यांच्यावर प्रसिद्ध झालेल्या लेखनामुळे महाराष्ट्रात त्या लेखाच्या निषेधाची एकच लाट उसळली होती. सभा, मोर्चे यांच्याबरोबरच कोल्हापूर बंदही पाळण्यात आला. तथापि जोतिबा फुले ज्या तत्त्वासाठी झगडले ते लक्षात घेऊन सोबतमधील लेखाचा सक्रिय निषेध म्हणून किती खेड्यातील सवर्णांच्या विहिरी दलितांसाठी मुक्त करण्यात आल्या ? तोंडाने जातिभेदाचा निषेध प्रत्यक्षात मात्र जातिभेदावर आधारित व्यवहार हे हिंदुत्वाचेच लक्षण आहे.

**दांभिकतेचा वारसा.**

या प्रवृत्तीवरून हिंदुत्वाच्या दुसऱ्या वैशिष्ट्याचा उगम पडतो. तो म्हणजे दांभिकता. मी हिंदु संस्कृतीला ' अक्षदां समर्पयामि ' संस्कृती म्हणतो. ' वस्त्रालंकरा ऐवजी अक्षदां समर्पयामि ',' सवत्स धेनु अथवा सुवर्णऐवजी अक्षदां समर्पयामि ' या परंपरेत हिंदु वाढतो. दांभिकतेचे संस्कार त्यांच्यावर लहानपणापासूनच घडत

असतात. प्रत्यक्ष काहीही न करता ते केल्याच्या समाधानात हिंदू जगत असतो. आज भारतात असे एकही क्षेत्र नाही की जेथे दांभिकता आढळत नाही. भ्रष्टाचाराविरुद्ध ओरड करणारे स्वत:च भ्रष्टाचारी असतात. मूल्याधिष्ठित राजकारणाचा पुरस्कार करणारे कोणतीही नैतिक मूल्ये पाळताना आढळत नाही. लोकशाहीच्या नावाखाली घराणेशाही आणली जाते. या दांभिकपणाचे अतिशय मनोरंजक उदाहरण आर. के. नारायण यांच्या 'व्हेंडॉर ऑफ स्वीट्स' या कादंबरीत आढळते. त्यातील जगन हालवाई कट्टर गांधीवादी आहे. तो विक्रीकर चुकवतो. आणि गांधीजींनी विक्रीकर देण्याचा आदेश केव्हाच दिला नव्हता अशा तऱ्हेचे समर्थन करतो. दारूबंदी हे काँग्रेसचे एक ध्येय. पण अनेक काँग्रेसवाल्यांचे दारूचे गुत्ते आहेत. ही दांभिकता इतर समाजात आढळत नाही असे नाही. पण हिंदुसमाजात दांभिकता हा व्यक्तिमत्त्वाचा स्वभावविशेष झाला आहे. आपल्याला जाणवतही नाही इतक्या सहजपणे आपली उक्ती आणि कृती यामध्ये विसंगती निर्माण होते.

## हिंदू नेहमीच एकाकी

संघटित समाजाची दहशत हे हिंदुत्वाचे आणखी एक वैशिष्ट्य. हिंदू धर्म व्यक्तिवादी असल्यामुळे हिंदु नेहमीच एकाकी असतो. विशेषत: मुसलमानांच्या बाबतीत तो भयग्रस्त असतो. ही धास्ती किती खोल रुतून बसली आहे याची कल्पना सुधीर कक्कर यांच्या एका पुस्तकावरून येते. भूतबाधा आणि त्यावरील उपचार यांचे मानसशास्त्रीय विश्लेषण करताना, भुतांमध्ये मुसलमान भुते अत्यंत कडवी समजली जात असल्याचा, ते उल्लेख करतात. एक नेहमीचे उदाहरण. भर हिंदु वस्तीमध्ये एखादा मुसलमान हिंदूला अद्वातद्वा बोलून जाऊ शकतो. मुस्लीम मोहल्यात हिंदूला हे धाडस होईल का ? एकाकी असल्यामुळे तो स्वत:ला नेहमीच असुरक्षित समजतो. आणि संघर्ष टाळण्याची त्याची प्रवृत्ती असते. त्याचे संघर्ष मालमत्ता, वतन आणि जहागीर यांपुरतेच मर्यादित असतात. कारण तेवढेच त्याचे सर्वस्व असते. धर्म, राष्ट्र किंवा अन्याय प्रतिकार यासाठी तो संघर्षास तयार नसतो. शिवाजी महाराज हे या संदर्भात एकमेव अपवाद. असुरक्षिततेच्या भावनेचा एक परिणाम म्हणजे दुसऱ्यास नामोहरम करण्याची प्रवृत्ती (किलर इन्स्टिंक्ट) हिंदूमध्ये अजिबात आढळत नाही. त्यामुळे त्यांचा सर्व भर बचावावर असतो. आंतरराष्ट्रीय खेळस्पर्धांमध्ये आपणास याचेच दर्शन भारतीय खेळाडूंकडून घडते. त्यातून निर्माण होते ती आक्रमक समाजाबरोबर तडजोड करण्याची वृत्ती. भारतात आलेल्या प्रत्येक आक्रमकाबरोबर आपण जमवून घेतले. आधुनिक भारताच्या इतिहासातही गांधीयुगापासून आजतागायत अन्यधर्मीय

आक्रमक जातीयवाद्यांशी आपण सतत तडजोड करीत आलो आहोत. त्यातूनच फाळणी झाली आणि आता खलिस्तानचा प्रश्न निर्माण झाला आहे. एखाद्या धार्मिक गटातील जे नेमस्त नेतृत्व असते त्याच्याशी मात्र आपण फटकून असतो. कारण ते नेतृत्व आक्रमक नसते.

हिंदुधर्म व्यक्तीवादी असल्यामुळे त्यातून सहिष्णुता आणि सामाजिक बेफिकिरीही उद्‌भवतात. सहिष्णुता हे हिंदु धर्माचे वैशिष्टच असले तरी ते हिंदु समाजाने जाणीवपूर्वक स्वीकारलेले तत्त्व नव्हे. व्यक्तिवादी धर्मात प्रत्येकाला आपापल्या मार्गाने स्वर्गात अथवा नरकात जाण्याचे स्वातंत्र्य असते. म्हणूनच माझा शेजारी माझ्या मते नरकाचा मार्ग चोखाळत असेल तरी त्याला त्याच्यापासून वाचवण्याची माझी कोणतीही जबाबदारी असत नाही. चार्वाकाचा छळ हिंदू समाजाने केला नाही याचे कारण धर्माच्या बाबतीत औदार्य नव्हे तर औदासिन्य. तो नरकात गेला तरी त्याचे सोयरसुतक कोणालाच नव्हते. जेव्हा समाज धर्मावर आधारित असतो त्यावेळी असे धार्मिक औदासिन्य इतर सर्व क्षेत्रासंबंधीच्या औदासिन्यात परिणत होते आणि त्यातून उद्‌भवते सामाजिक आणि राजकीय बेफिकिरी. या बेफिकिरीमुळे समाज अखेरीस विस्कळीत होतो आणि त्याला कोणतेही सामाजिक अथवा राजकीय उद्दिष्ट राहात नाही. याउलट धार्मिक बाबतीत कडवे असणारे मुस्लीम आणि ख्रिश्चन समाज नेहमीच संघटित राहिले. आणि त्यातून त्यांची राजकीय आणि धार्मिक उद्दिष्टे निश्चित झाली. धार्मिक एकवाक्यता राखण्याच्या हव्यासापायी या धर्मांची अनेक शकले झाली तरीही प्रत्येक पंथाने आपापली संघटना बांधली आणि आजही ते राजकीय आणि धार्मिक महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. या संदर्भात ज्यू आणि पारशी धर्माचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पारशी समाज अतिशय लहान. पण संघटन टिकवून धरल्यामुळे त्या समाजाने अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती साधली आहे. ज्यू समाज हजारो वर्षे देशोधडीला लागला होता. पण त्याने आपली राजकीय आणि धार्मिक उद्दिष्टे कधीच दृष्टिआड होऊ दिली नाहीत आणि अखेरीस आपले स्वतंत्र राज्य स्थापण्याचे स्वप्न प्रत्यक्षात अवतीर्ण केले. अल्पसंख्य असूनही आजही भारतात मुसलमान अलग राजकीय, धार्मिक आणि सामाजिक महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. तर भारतात हिंदूंच्या पुढे सत्ता मिळवून वैयक्तिक उत्कर्ष साधण्यापलिकडे दुसरे काय ध्येय आहे ? इहवादी राज्य, समाजवाद, लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता, आर्थिक प्रगती यांचा जरी तोंडाने घोष चालत असला तरी हिंदू समाजाची ती उद्दिष्टे नव्हेत. उलट असा घोष करीत सत्तेसाठी त्यांचाही बळी देण्यास सत्ताधारी आणि विरोधी पक्ष तयार असतात.

## सहिष्णुता डोळस हवी

आतापर्यंत जे विवेचन केले आहे ते कडवेपणातून निर्माण होणाऱ्या असहिष्णुतेचे समर्थन नव्हे तर सहिष्णुता डोळस नसेल तर कोणते धोके संभवतात याचे दिग्दर्शन. वस्तुत: सहिष्णुता ही समाजाच्या धारणेची पूर्वअटच आहे. पण ती आंधळी नसेल आणि दौर्बल्याचे लक्षण नसेल तरच. आज भारतातील काही गंभीर समस्यांचा उगम सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी आंधळ्या सहिष्णुतेचे तत्त्व स्वीकारलेले आहे, त्यात शोधावा लागेल. याउलट पाश्चात्य देशांनी धार्मिक सहिष्णुतेचे तत्त्व डोळसपणे अनुसरले. राष्ट्रीय विघटन, धार्मिक संघर्ष यांसारख्या समस्या त्यामुळे त्यांना भेडसावत नाहीत. आणि यदाकदाचित संघर्ष उद्भवले तरी त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा येत नाही. कारण सर्व धर्मांचे किंवा पंथांचे लोक राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत.

इतिहासाचे भान नसणे हा हिंदूंचा आणखी एक जीवघेणा दोष. आपल्याला फक्त पुराणे प्रिय. असे म्हटले जाते की जे इतिहास विसरतात त्यांच्या बाबतीत इतिहासाची पुनरावृत्ती होते. भारतावर एवढी आक्रमणे झाली, फाळणी झाली, पण आपण त्यापासून काही शिकलो आहो असे दिसत नाही. फाळणीपूर्व राजकारण, मुसलमानांनी पुन्हा भारतात सुरू केले असले तरी राजकीय पक्षांना त्याची यत्किंचितही दखल घ्यावीशी वाटत नाही. उलट अशी जाणीव करू देणाऱ्यांना जातीयवादी संबोधून त्यांचा बीमोड करण्याचा विडा सर्व पुरोगामी पक्षांनी उचलला आहे.

कोणत्याही तऱ्हेच्या सामाजिक शिस्तीचा अभाव हेही हिंदूंचे एक वैशिष्ट्य. सामाजिक बेफिकिरीतच त्याचा उगम होतो. सहजच एक तुलना करावीशी वाटते. धार्मिक बाबतीत मुसलमान किंवा ख्रिश्चन ज्या शिस्तीचे दर्शन घडवितात तिचे कौतुक करावे तेवढे थोडेच. सार्वजनिक प्रार्थनेच्या वेळी उभे राहणे, बसणे, वाकणे या क्रिया मुसलमान ज्या शिस्तीने करतात त्या पाहुन अथांग जनसमुदायावर लहरी निर्माण झाल्याचा भास होतो. तसेच ख्रिश्चन चर्चमधे एकसुरात म्हटली जाणारी सार्वजनिक प्रार्थना ऐकणे हा एक सुखद अनुभव असतो. उलट हिंदूंना आरत्यादेखील नीट म्हणता येत नाहीत. कोण जास्तीत जास्त किंचाळू शकतो याचीच ती स्पर्धा असल्याचे भासते. ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मस्थळांची निगा ज्या तऱ्हेने राखली जाते तोही धार्मिक शिस्तीचाच भाग. प्रतापगडावरील, धर्मस्थळ नसूनही, दिमाखाने मिरवणाऱ्या अफझलखानाच्या कबरीच्या तुलनेत तेथील देवीचा केविलवाणेपणा हा नेहमीच विषण्ण करणारा असतो. जेथे बेशिस्त नाही असे एकही क्षेत्र आज भारतात

आढळत नाही. राजकीय पक्षांची अधिवेशने, पक्षातील अंतर्गत शिस्त, सरकारी कार्यालये, ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत प्रातिनिधिक संस्था, देवालयातील दर्शनेच्छूंची झुंबड, सार्वजनिक ठिकाणी होणारी नागरिकांची वागणूक, या सर्वांमध्ये जी बेशिस्त आढळते तिचे मूळ धार्मिक बेशिस्तीमध्ये शोधता येईल का ?

वर हिंदुत्वाची वैशिष्ट्ये उल्लेखिली आहेत ती अवनत हिंदुत्वाची लक्षणे आहेत. ती ज्यांच्या ठिकाणी आढळतात त्यांना खरेखुरे हिंदु म्हणता येईल. सर्वच राजकीय पक्षांना या वैशिष्ट्यांनी ग्रासले आहे. आणि त्या अर्थी त्यांना हिंदू राजकीय पक्षच म्हटले पाहिजे. हिंदू कॉंग्रेस पक्ष, हिंदू समाजवादी पक्ष, हिंदू कम्युनिस्ट पक्ष असेच या सर्वांचे वास्तव आणि यथार्थ स्वरूप आहे. उदा ब्राह्मण कम्युनिस्ट, भंडारी कम्युनिस्टाला हलक्या जातीचा समजतो. या सर्व पक्षांची अवनती अशा थराला पोचली आहे की आपण अवनत हिंदुत्वाचे प्रतिनिधीत्व करीत आहोत याची त्यांना यत्किंचितही जाणीव नाही. उलट या अवनतीलाच ते पुरोगामित्व समजतात, आणि ही अवनती काही प्रमाणात तरी दूर व्हावी म्हणून प्रयत्न करणारांना ते जातीयवादी म्हणून झोडपीत असतात. साहजिकच आज भारतात सर्वत्र अवनत हिंदुत्वाचेच उदात्तीकरण चालू आहे.

तथापि, या अवनत हिंदुत्वाला एक रूपेरी किनार आहे. त्यामुळेच हिंदुत्वातील दोष नष्ट करून हिंदु समाजातील राष्ट्रवादी प्रेरणा बळकट करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. हिंदुत्वातील सर्वात प्रबळ प्रेरणा म्हणजे सहिष्णुता. फक्त ती डोळस व्हावयास पाहिजे. धर्मद्वेषाचा अभाव ही आणखी एक प्रेरणा. हिंदू आपल्या धर्मावरील टीका सहन करतात. हिंदू देवतांवर टीका केल्याबद्दल सलमान रश्दी यांना देहांताची शिक्षा हिंदू धर्म कधीच देणार नाही. आपल्या धर्मात दोष आहेत हे ते मान्य करतात. धर्म परिवर्तनशील आहे यावर हिंदूंचा अविश्वास नाही. साहजिकच मुक्त होण्याची क्षमता याच समाजात आहे.

मानवतावादावर आधारलेल्या समाजाकडे करावयाच्या वाटचालीची ही पूर्वअट भारतात केवळ हिंदू समाजच पूर्ण करतो आणि तेच हिंदुधर्माच्या अस्तित्वाचे आणि सातत्याचे (कंटिन्युईटी) समर्थन आहे. तथापि या वाटचालीतील जीवघेणा अडथळा म्हणजे हिंदुसमाजातील अंतर्गत दौर्बल्य आणि त्यातून निर्माण होणारे अन्यधर्मीयांच्या बाबतीतील अनुनयाचे धोरण. सहिष्णुता आणि अनुनय यांना विभागणारी रेषा अतिशय धूसर आहे. सहिष्णुता सामर्थ्याच्या भूमिकेतून उत्पन्न होते, तर अनुनय हे दौर्बल्याचे लक्षण आहे. आज साठांहून अधिक वर्षे अनुनयालाच आपण सहिष्णुता समजत

आलो आणि त्याबरोबरच हिंदुसमाजातील दुबळेपणाचेच संवर्धनही करीत आलो. त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केल्यानंतर आता हिंदू समाजाच्या दुबळेपणाची आणि त्यातून भारतीय लोकशाहीला उद्‌भवलेल्या धोक्यांची संदिग्ध जाणीव विशेषकरून मध्यमवर्गाला होऊ लागली आहे. आणि 'गर्व से कहो' म्हणजे 'हिंदू समाज उणे दौर्बल्य' असे समीकरण मध्यमवर्गाच्या मनात सहजच तयार झाले. सर्वच पुरोगामी पक्ष अवनत हिंदुत्वाच्या नबळाईने ग्रस्त झालेले दिसत असल्याने साहजिकच त्यांचा दुबळेपणा चव्हाट्यावर आणणाऱ्या या घोषणेचे आकर्षण निर्माण झाले. तथापि आजतरी या घोषणेचे स्वरूप प्रतिक्रियात्मक असून अन्यधर्मीयांच्या अेरावीत तिचा उगम आढळतो. त्याची जाणीव होणे हे भारतीय लोकशाही बळकट करण्याच्या दिशेने केवळ पहिले पाऊल आहे. तिला समाजातील दोष नाहीसे करण्याच्या दिशेने सघन आशय प्राप्त झाला तरच भारतीय लोकशाहीला काही भवितव्य आहे. एरवी 'गर्व से कहो' घोषणा देणाऱ्यांनाही अवनत हिंदुत्व आत्मसात करील आणि भिन्न धर्मीयात चालू असलेला संघर्ष अधिकच तीव्र बनून आधीच दुबळी असलेली भारतीय लोकशाही दिशाहीन संघर्षाच्या खाईत होरपळून निघेल.

**हिंदुत्ववाद**

हिंदुत्ववाद म्हणजे हिंदुत्वाच्या प्रेरणा बळकट करणारी चळवळ असे समजले जाते. पण ते सर्वस्वी चुकीचे आहे. आजचे हिंदुत्व हे अवनत हिंदुत्व आहे हे आधी स्पष्ट केले आहेच. वर दिलेले समीकरण ग्राह्य धरले तर अवनत हिंदुत्वाला बढावा देणारी चळवळ म्हणजे हिंदुत्ववाद असा अर्थ निघतो. पण हे कार्य कॉंग्रेस आणि पुरोगामी पक्ष अतिशय मनोभावे करीत आहेत आणि ते स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवून घेत नाहीत. मग हिंदुत्ववादी कोण ? अवनत हिंदुत्वाला नाकारणारे ते खरे हिंदुत्ववादी, म्हणजे हिंदुत्वाचा आणि हिंदुत्ववादाचा संबंध असलाच तर तो विरोधाचा आहे. हिंदुत्ववादाच्या मागची प्रेरक शक्ती सावरकर होत. पण त्यांचे मार्ग मात्र अहिंदु होते, कारण ज्यांना हिंदू परंपरेत स्थान नाही त्या मार्गांनी त्यांना हिंदुसमाजाला अवनत हिंदुत्वातून बाहेर काढावयाचे होते. हिंदूंना एक राष्ट्र बनवायचे होते. आणि अशा तऱ्हेने हिंदूंच्या राष्ट्रवादी प्रेरणा बळकट झाल्यानंतर अन्य धर्मीयांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यावाचून अन्य पर्याय रहाणार नव्हता. त्यांनी सुरुवात केली तीच 'हिंदू'ची सर्वस्वी निधर्मी व्याख्या करून. ज्यांनी आपल्या निष्ठा या राष्ट्राला वाहिल्या आहेत ते हिंदू. ही संकल्पना अत्यंत क्रांतिकारी होती. पण जातिभेद आणि धर्मभेद यावरच ज्यांचे अस्तित्व अवलंबून होते त्यांना ही

निधर्मी व्याख्या परवडणारी नव्हती. सावरकरांना जातिभेद मान्य नव्हता. 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हिंदुधर्माचा त्यांनी अधिक्षेप केला. आणि भारताला 'अद्यतन' करण्याची मनीषा बाळगली. अवनत हिंदुत्वावर कठोर हल्ले चढविले. तथापि त्यांना आढळलेला हिंदुत्वातील जीवघेणा दोष म्हणजे असंघटितपणा आणि त्यातून निर्माण होणारा न्यूनगंड, 'मला काय त्याचे' ही वृत्ती आणि आक्रमक वृत्ती धरणाऱ्यांचा अनुनय करण्याची सवय. सावरकरांचेही पूर्वायुष्यात हिंदु-मुस्लीम संबंधाबाबतचे विचार 'रोमँटिक'च होते. पण अंदमानच्या बंदिवासात त्यांना मुस्लीम व्यक्तिमत्त्वाचे अगदी जवळून दर्शन घडले आणि त्याच्या तुलनेत हिंदू व्यक्तिमत्त्वाची वैगुण्ये प्रकर्षाने जाणवली. ती दूर झाल्याखेरीज भारत राष्ट्र म्हणून उभे राहू शकणार नाही अशी त्यांची खात्री पटली. तथापि अवनत हिंदुत्वाच्या विळख्यातून हिंदू समाज बाहेर पडणे दुरापास्त आहे हे ते अनुभवांती समजून चुकले होते. त्यामुळेच 'मी हिंदुत्वाची शेवटची किंकाळी आहे' असे उद्गार त्यांना काढावे लागले होते. त्यांची भीती अनाठायी नव्हती, हे परिस्थितीनेच सिद्ध केले. रा. स्व. संघाने संघटना केली पण ती तात्पर्यशून्य ठरली. भारतीय जनता पक्षाने गांधीवादी समाजवादाची घोषणा केली. त्यात गांधीवाद किती आणि समाजवाद किती हा प्रश्न होता. पण त्याचा व्यावहारिक अर्थ गांधीप्रणीत अवनत हिंदुत्वाला कवटाळणे एवढाच निघाला. सावरकरांचा हिंदुत्ववाद अखेर पोरकाच ठरला. तथापि स्वातंत्र्यानंतर चाळीस वर्षांनी सावरकरवादला पुन्हा एकदा नवा संदर्भ प्राप्त होऊ लागला आहे, त्याचेच प्रतिबिंब 'गर्वसे कहो' या घोषणे संबंधात निर्माण झालेल्या आकर्षणात सापडते. पण या घोषणेचे पाठीराखे हिंदुत्ववादातील एकाच दोषावर मात करू पाहतात. तो दोष म्हणजे जबरदस्तांपुढे पडते घेणे. मुसलमानांनी आता जो आक्रमक अविर्भाव धारण केला आहे त्याच्या संदर्भात या पवित्र्याची अत्यंत गरज आहेच. पण त्याच्या इतकीच हिंदुत्वातील इतर वैगुण्ये दूर करण्याचीही गरज आहेच. ते न करता नुसतीच आक्रमकता बाणवून घेतली तर तिला गुंडगिरीची कळा येणे अपरिहार्य आहे. सावरकरांच्या मार्गाने अवनत हिंदुत्वाचे राष्ट्रवादात परिवर्तन करणे ही आजची गरज आहे. ते न झाले तर रा. स्व. संघ आणि भा. ज. प. यांच्याप्रमाणेच 'गर्व से कहो' वालेदेखील अवनत हिंदुत्वाचेच संवर्धन करतील. आज या घोषणेबाबत जी आत्मीयता निर्माण झाली आहे तिचा उपयोग करून हिंदू समाजला अद्यतन बनवणे आणि त्यातून राष्ट्रोद्धाराचा म्हणजे सर्व भारतीयांच्या उद्धाराचा मार्ग चोखाळणे हे सावरकरवादाला अभिप्रेत आहे. पण त्यासाठी गरज आहे ती विधायक नेतृत्वाची. त्याचीच खरी वाण आहे. याची लक्षणे मुबलक आढळतात.

हिंदुत्वाचे नारे देऊन निवडणुका जिंकणे, निवडून आल्यानंतर 'इतके दिवस इतरांनी खाल्ले, आता आम्हाला खाऊ द्या', असे म्हणणे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शिबिरावर हल्ला करणे, इतर धर्मीयांतील दोष दाखवून हिंदू समाजातील दोष उपेक्षणीय आहेत असे खोटे समाधान बाळगणे, हे सर्व प्रकार अवनत हिंतुत्वातून बाहेर पडणे किती कठीण आहे हेच दर्शवितात. हिंदुत्व हिंदूंना सोडत नाही हेच खरे. 'गर्व से कहो'चा प्रामाणिकपणे पाठपुरावा झाला, तरच तो लोकशाहीला पोषक आहे.

**धार्मिक पुनरुज्जीवनवाद**

'गर्व से कहो' या घोषणेमुळे धार्मिक पुनरुज्जीवनवादाला चालना मिळून देशातील वातावरण धार्मिक कलहांनी दूषित होऊन जाईल अशी हाकाटी सुरू झाली. तथापि धार्मिक पुनरुज्जीवनवाद म्हणजे नेमके काय याचा कोणीही खल केला नाही. लांडगा आला रे आला म्हटले की कोणी फारसा विचार करीत नाही, हा अनुभव जमेला धरूनच ही हाकाटी करण्यात आली हे निश्चित. ती झाल्याबरोबर बहुसंख्य 'हिंदु' विचारवंत सांप्रत हे काय अरिष्ट निर्माण झाले या चिंतेने ग्रस्त होऊन अवनत हिंदुत्वाचे दर्शन घडवू लागले. साहजिकच धार्मिक पुनरुज्जीवनवाद म्हणजे नेमके काय याचा प्रथम शोध घेतला पाहिजे.

धार्मिक पुनरुज्जीवनवाद म्हणजे धर्माची जी मूलतत्त्वे आहेत किंवा ज्या प्राचीन परंपरा आहेत त्यांची पुनर्स्थापना करणे. पण आज या बाबतीत खरोखरीच कोणी आग्रही आहे का ? इस्लामने सर्व मुसलमानांत समता आणली म्हणून भारतातील बोहरा, कच्छी मेमन, इस्मायली खोजा, दक्खनी मुसलमान, शिया, सुन्नी हे सर्वजण आपापसातले भेद विसरणार आहेत काय ? कुराणचा व्याज देण्याघेण्याला प्रतिबंध आहे म्हणून सर्व मुसलमान आपली बँकेतील खाती बंद करणार आहेत का ? दारू पिण्याला इस्लामचा विरोध आहे म्हणून मुसलमानांपुरती दारूबंदी केली पाहिजे अशी मुसलमानांनी मागणी केली आहे का ? प्रार्थनेची वेळ झाली असताही महंमद अझरुद्दीन क्रिकेट खेळत राहिला म्हणून मुसलमानांनी त्यांच्याविरुद्ध कृती केली का ? मुसलमान चोरांचे हात तोडले जावेत म्हणून मुसलमानांनी मोर्चे काढले काय ? कलमा, नमाज, जकात, हज आणि रोजा याबाबतचे धर्मादेश न पाळणाऱ्यांविरुद्ध मुसलमान गहजब करीत आहेत का ? वस्तुत: मुसलमानानी वरील मागण्या केल्या तरच त्याला धार्मिक पुनरुज्जीवनवाद म्हणता येईल. पण मुसलमानांच्या या मागण्या नाहीत आणि त्या सर्व मान्य झाल्या तरी त्यापासून देशहिताला कोणताही धोका नाही. मुस्लिम सत्यशोधक समाजाचे अन्वर राजन यांच्याशी एकदा बोलत असताना त्यांनी मला विचारले की,

एखादा मुसलमान अत्यंत कर्मठ असेल तर त्याची वर्तणूक देशहितविघातक आहे असा गैरसमज का करून घेतला जातो ? अन्वर राजन यांचा प्रश्न अत्यंत संयुक्तिक आहे. एखाद्या मुसलमानाने महिन्याऐवजी वर्षभर जरी रोजे पाळले किंवा दिवसात पाच ऐवजी सात वेळा प्रार्थना म्हटली तर त्यापासून कोणतेच नुकसान नाही. तथापि मुस्लीम पुनरुज्जीवनवाद म्हणून ज्याला समजले जाते त्याच्या मागची भूमिका धर्मादेशांचे पालन करण्याचे स्वातंत्र्य ही नव्हे. तर अगदी वेगळी आहे. आणि तिला सर्वस्वी राजकीय संदर्भ आहे. राजकीय महत्त्वाकांक्षेतून धार्मिक भावनेला केलेल्या आवाहनाचा धोका धार्मिक पुनरुज्जीवनवादापेक्षा अधिक असतो. आणि इस्लामला आंतरराष्ट्रीय लागेबांधे असल्यामुळे असा धोका राष्ट्रहिताच्या दृष्टीने अधिकच गंभीर होतो. काश्मीरमध्ये ज्या घटना घडत आहेत त्यावरून या धोक्याचे स्वरूप स्पष्ट होते. याउलट 'गर्व से कहो' या घोषणेला भारतविरोधी असा कोणताही आशय नाही. तर भारत बलशाली व्हावा हीच इच्छा त्याच्यामागे आहे. त्यामुळे त्याच्या पासून कसलीही भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही. अन्य धर्मीयांच्या अवास्तव मागण्यांना विरोध करण्यामुळे भारताला कशा तऱ्हेने धोका पोहोचतो हे पुरोगामी पक्षांनी दाखवूनच द्यावे.

वस्तुत: धार्मिक पुनरुज्जीवनवादाला आज कोणत्याही देशात थारा नाही. अगदी इराणचे उदाहरण घेतले तरी तेथील पुनरुज्जीवनवाद हा इराणच्या शहांनी जे धोरण स्वीकारले होते त्याची प्रतिक्रिया आहे. खुमेनी यांच्या पश्चात त्याला काही भवितव्य असेल असे वाटत नाही. कोणतीही जाचक बंधने, धार्मिक अथवा इतर, एखादा समाज बिकट आणि आणीबाणीच्या परिस्थितीतच, तसेच परंपरेच्या दबावामुळे सहन करतो. परंतु ती परिस्थिती बदलल्यानंतर स्वातंत्र्याच्या लहानशा झुळुकीने देखील तो समाज ते जाचक निर्बंध झुगारून देण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळे इस्लामी पुनरुज्जीवनापासून कोणताही धोका संभवत नाही. खरा धोका आहे तो, मुसलमानांच्या दृष्टीने भारतात बिकट आणि आणीबाणीची परिस्थिती आहे असा मुसलमानात प्रचार करून त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण करणारे आणि राजकीय महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेले पुढारी जे मुस्लिम अलगतेच्या वृत्तीला जोपासत आहेत, त्यांच्यापासून. पण तेच पुरोगामी पक्षांचे मित्र आहेत. आणि जे मुसलमान खरोखरीच राष्ट्रनिष्ठ आहेत त्यांची परिस्थिती मात्र 'न घरका न घाटका' अशी या सर्व पुरोगामी पक्षांनी करून टाकली आहे.

तथापि धार्मिक पुनरुज्जीवनापेक्षाही महत्त्वाच्या असतात त्या प्रत्येक संस्कृतीच्या अंत:प्रेरणा. आक्रमकता ही इस्लामच्या स्थापनेपासूनच बलवत्तर अशी प्रेरणा राहिली

आहे. अधिक आक्रमकताच केवळ मुस्लिम आक्रमकतेला काबूत ठेवू शकते याची जाणीव झालेले हिंदू 'गर्व से कहो' या घोषणेने आकृष्ट झाले असल्यास नवल नाही. भारतीय लोकशाहीला पायाभूत असणारी राष्ट्रीय एकात्मता साध्य करावयाची असेल तर मुस्लिम अलगतावाद संपुष्टात आणण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी बचाव अथवा कच खाणे ही जी हिंदूंची अंत:प्रेरणा त्यापासून सुटका करून घेतली पाहिजे याचे भान आता हिंदू समाजाला येऊ लागले आहे. मुसलमानांना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील होणे भाग पाडणे हे अनुनयाच्या नव्हे तर सामर्थ्याच्या भूमिकेतूनच शक्य आहे हे त्यांना पटू लागले आहे. 'गर्व से कहो' या घोषणेतून हे सर्व ध्वनित होते. पण त्याचा संबंध हिंदू धार्मिक पुनरुज्जीवनवादाशी जोडणे तर्कदुष्ट आहे.

इस्लामी पुनरुज्जीवनवाद म्हणजे धार्मिक पुनरुज्जीवनवाद नव्हे तर ती एक राजकारणप्रेरित अलगतावादी चळवळ आहे. हे वर पाहिले आहे. हिंदू धार्मिक पुनरुज्जीवनवादाचा अर्थ शोधणे तर अशक्यप्राय आहे. एकेश्वरी, एक प्रेषित आणि एक धर्मग्रंथ नसलेल्या हिंदु-समाजातील धार्मिक पुनरुज्जीवनवादाचा अर्थ इतर समाजातील धार्मिक पुनरुज्जीवनाप्रमाणे सरळ लावता येणार नाही. आणि तरीही त्याच्या नावाने पुरोगामी पक्षांचा डॉन किक्झोटी आक्रोश चालू आहे. त्यांच्या मते, धार्मिक पुनरुज्जीवनाने हिंदू नेमके काय साधू इच्छिणार आहेत ? नियोग पद्धतीने स्त्रिया अपत्यप्राप्ती करून घेणार आहेत की ऋग्वेदिक कालाप्रमाणे मुलींच्या मुंजी करणार आहेत ? वैदिक कालाप्रमाणे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क देणार आहेत का ? अर्थात तसे असेल तर फारच चांगले. वैदिक काळात सतीची चाल नव्हती. पुढे ती सुरू झाली. मग सतीची चाल सुरू करणे अथवा त्याला प्रतिबंध करणे यापैकी कोणती गोष्ट धार्मिक पुनरुज्जीवनाशी सुसंगत धरावयाची ? देवराला येथे रूपकंवर सती गेल्यापासून भारतात जणू काय सतीची प्रथा पुन्हा सुरू होणार आहे म्हणजे मेला पती, की चढव त्याच्या पत्नीला सरणावर, अशा आविर्भावात बोलले, लिहिले जाऊ लागले. अनेक राजकीय पुढारी, निवृत्त सरकारी अधिकारी, न्यायाधीश, उच्चपदस्थ यांनी सतीच्या 'हक्काचे' उघड अथवा छुपे समर्थन केले. लाखो लोक नंतर झालेल्या सतीच्या सोहळ्याला हजर राहिले. श्रीमती विजयाराजे शिंदे याही 'सती' संबंधी गौरवाने बोलल्या असे वृत्तपत्रात वाचले. पण नीट विचार केला तर हे सर्व अवनत हिंदुत्वाचे लक्षण होते आणि त्याचा धार्मिक पुनरुज्जीवनाशी कोणताही संबंध नव्हता हे लक्षात येईल. ज्यांनी 'सतीचा' गौरव केला त्यांच्यापैकी कोणीही आपल्या मुलींना विधवा झाल्यानंतर

सरणावर चढविणार नव्हते. विजयाराजे शिंदे यांना पूर्ण अधिकार असूनही त्या सती गेल्या नाहीत. उशीरा का होईना आताही तो अधिकार बजवावयास त्यांना हरकत नव्हती. उलट हिंदू परंपरेप्रमाणे पतिनिधनानंतर एकांतवासात जीवन व्यतीत न करता त्या सभासंमेलने गाजवीत आहेत. या सर्वांचा अर्थ काय ? धर्माच्या नावाखाली असहाय्य व्यक्तीचा बळी पाहून निर्घृण आनंद मानण्याची रानटी प्रवृत्ती आपण आजही टिकवून धरली आहे.

हिंदुधर्मातील पुनरुज्जीवनवादाच्या स्वरूपाविषयी ही जी अडचण उपस्थित होते तिचे कारण म्हणजे हिंदुधर्माचे सतत बदलत जाणारे स्वरूप. हिंदुधर्माचे आज जरी डबके झाले असले तरी मुळात तो एक प्रवाह आहे. वैदिक संस्कृती त्याचे उगमस्थान. या प्रवाहाला असंख्य नद्या, नाले, ओहोळ मिळत जाऊन त्याचे स्वरूप पालटत गेले. यवन, शक, कुशाण, हूण अशा अनेकांना त्यांच्या इष्ट अनिष्ट प्रवृत्तींसह या प्रवाहाने सामावून घेतले. साहजिकच हिंदुधर्माची तुलना एखाद्या पोतडीशी करता येईल. त्यात सर्व चीजा सापडतात. एका बाजूला अहिंसेचे तत्त्व तर दुसऱ्या टोकाला दगडधोंड्यांच्या देवांना केलेला रुधिराभिषेक, अशा अनेक विसंगती आढळतात. प्रवाह असलेल्या हिंदुधर्माच्या नेमक्या कोणत्या वळणाला हिंदुधर्म म्हणावे या प्रश्नाला उत्तर नाही. दयानंद सरस्वती यांनी त्याची व्याप्ती वैदिक कालापुरतीच मर्यादीत ठेवली तर राजा राममोहन रॉय यांनी त्याची व्याप्ती उपनिषत्कालापर्यंत वाढविली. खरे तर हिंदुधर्माला धर्म (रिलीजन) म्हणता येईल का हा प्रश्नच आहे. कन्साइज ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये धर्म याचा अर्थ श्रद्धा (फेथ) आणि आराधना (वरशिप) यांची प्रचलित पद्धत असा दिला आहे. या व्याख्येत हिंदुधर्म बसणे कठीण आहे. असे दिसते की इस्लाम आणि ख्रिश्चानिटी हे धर्म, म्हणून हिंदुधर्मालाही धर्म (रिलीजन) म्हणून गणले जाऊ लागले. एखादी व्यक्ती मुस्लीम अथवा ख्रिश्चन असेल तर ती इतर कोणत्याही धर्माची असू शकत नाही. तर इतर कोणत्याही धर्माचा नाही म्हणून तो हिंदू अशी हिंदुधर्माची अवस्था आहे. त्यामुळेच हिंदू संस्कृतीचा इतिहास पाहिला तर इतर धर्मात ज्याप्रमाणे पृथकता आढळते ती हिंदुधर्मात आढळत नाही. बिंबिसार आणि अजातशत्रू यांचा जैन धर्मग्रंथ जैनधर्मीय, आणि बौद्ध धर्मग्रंथ बौद्धधर्मीय असा उल्लेख करतात. कनिष्काच्या नाण्यांवर निरनिराळ्या धर्मांच्या देवतांच्या प्रतिमा आढळतात. बौद्धधर्मीय म्हणून समजल्या जाणाऱ्या हर्षवर्धनने प्रयाग येथे कुंभमेळ्याच्या वेळी सूर्य, शिव आणि बुद्ध यांच्या प्रतिमांचे पूजन केले होते. याचा स्पष्ट अर्थ असा की, इतर धर्म ज्या प्रमाणे त्या त्या धर्माच्या अनुयायांकडून संपूर्ण निष्ठेची

मागणी करतात त्याप्रमाणे हिंदू धर्म करीत नाही. तथापि इस्लाम व ख्रिश्चानिटी यांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांच्या अनुकरणाने हिंदुधर्म हाही संपूर्ण निष्ठा मागणारा धर्म (रिलीजन) आहे असा समज निर्माण झाला. ज्या धर्माचे स्वरूप अशा तऱ्हेने निश्चित नाही त्या धर्माच्या बाबतीत धार्मिक पुनरुज्जीवनवाद म्हणजे नेमके काय ?

वर उल्लेखिलेल्याप्रमाणे प्रत्येक संस्कृतीच्या अंत:प्रेरणा असतात. आक्रमकता ही इस्लामची प्रेरणा त्यानुसार इराणमधील धार्मिक पुनरुज्जीवनवादाने शियापंथाच्या फैलावाचे स्वरूप धारण केले आहे. याउलट धार्मिक सहिष्णुता ही हिंदु संस्कृतीची अंत:प्रेरणा. त्यानुसार १९ व्या शतकातच हिंदु धर्मीय पुनरुज्जीवनाला सुरुवात झाली, 'गर्व से कहो' घोषणेनंतर नव्हे. त्याचे प्रेणेते रामकृष्ण परमहंस. ब्रह्मसमाजिस्ट आणि आर्यसमाजिस्ट यांनी पारंपारिक हिंदुधर्मावर जेव्हा कठोर हल्ले चढविले त्यावेळी त्या धर्माचे मंडन रामकृष्णांनी केले. बौद्धिक, पौराणिक, तांत्रिक इतकेच नव्हे तर ख्रिश्चानिटी आणि इस्लाम हे सर्व धर्म सत्य असून त्यांच्या मूलतत्त्वांचा अंगिकार कोणी केला तर त्याला मुक्ती निश्चित मिळेल अशी त्यांची शिकवणूक होती. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन विवेकानंदांनी धर्मप्रसाराचे कार्य पुढे चालविले. पण ते करीत असताना अनिष्ठ रूढींचाही अधिक्षेप केला. अध्यात्म आणि भौतिकवाद यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. खुमेनींच्या धार्मिक पुनरुज्जीवनवादाने एक प्रकारची दहशत निर्माण केली तर रामकृष्ण, विवेकानंद यांच्या धार्मिक पुनरुज्जीवनवादाने संबंध जगात त्या विषयी आकर्षण निर्माण केले. धार्मिक पुनरुज्जीवनवादाचे स्वरूप संस्कृती-निहाय वेगळे असते हे लक्षात न घेता निव्वळ धार्मिक पुनरुज्जीवनवाद हे नाव उच्चारले गेले की पुरोगामी म्हणवून घेणाऱ्यांचा मस्तकशूळ उठतो हे केवळ बौद्धिक खुजेपणाचे लक्षण आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, निखळ धार्मिक पुनरुज्जीवनाने कोणतेच नुकसान होणारे नाही. पण ते जर राजकीय महत्त्वाकांक्षेचे साधन ठरणार असेल तर त्याची परिणती धार्मिक संघर्षात होणे अटळ आहे. मुस्लीम पुनरुज्जीवनवादाचे स्वरूप संपूर्णपणे राजकीय आहे. रस्त्यावर प्रार्थनेचा हक्क सांगणे, शिवप्रतिमेची मिरवणूक निघाली तर रक्ताचे पाट वाहतील अशी धमकी देणे, परदेशातून पैसा आणून ठिकठिकाणी मशिदी उभारणे, धर्मांतरासाठी प्रयत्न करणे, सोयिस्कर प्रागतिक कायद्यांचा लाभ घेत असता- मुसलमानांसाठी हात तोडणे, ठेचून मारणे या शिक्षांची वेगळी तरतूद भारतीय दंडसंहितेत केलेली नाही... तशाच प्रागतिक सुधारणांना विरोध करणे, याचा धार्मिक पुनरुज्जीवनवादाशी कसा काय संबंध पोहोचतो ? अलगतावाद जोपासणाऱ्यांची ही सर्वस्वी राजकीय दंडेली आहे. त्याला शह देण्यासाठी म्हणून 'गर्व से कहो'

ची घोषणा झाली आणि साहजिकच त्या बाबतीत आकर्षण निर्माण झाले. पण घोषणाकर्ते एवढ्यावरच थांबवणार आहेत की राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या योजनेतील ती पहिली पायरी ठरवणार आहेत हा खरा यक्षप्रश्न आहे. तथापि अवनत हिंदुत्वाचा गळफास किती जालीम आहे हे लक्षात घेतल्यानंतर हे आवश्यक पण अवघड काम झेपणारे नाही एवढेच म्हणावेसे वाटते.

निबंध ३५६० २८००९ ८१८१८३

REFBK-0027081

## शोध आधुनिक भारताचा / अरुण सारथी

स्वातंत्र्य आले तेव्हा भारतापुढे एवढ्या समस्या व आव्हाने होती की स्वातंत्र्यपूर्वकाळापेक्षाही अधिक ईर्षेने व स्वार्थत्यागाच्या उर्मीने सर्वांनी पुढे सरसावायला हवे होते. पण घडले विपरित. भारतीयांत जे हीण होते त्याचाच तवंग आणि दुर्गंधी पुढील तीन तपात सर्वत्र पसरली आहे. हे असे का घडले ? काही विचारवंत सांगतात - 'टिळक, गांधी, सावरकरांसारखे आदर्शच राहिले नाहीत.' हे फारच वरवरचे कारण झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात जे भारतीय व्यक्तिमत्व होते ते स्वातंत्र्योत्तर काळात जसेच्या तसे राहिले हे तर कारण नसेल ?

व्यवहार आणि परमार्थ यांची संपूर्ण फारकत, मोबदला आणि श्रम यांचा मेळ नसणारी अर्थव्यवस्था, विज्ञानाकडे पाठ व यामुळे नव्या संशोधनाचा अस्त, जातीभेदांचा विलक्षण पगडा, न्यूनगंडामुळे सत्ताधीशांच्या लांगूलचालनाची व दांडग्यांच्या अनुनयाची वृत्ती, कमालीचे दारिद्र्य, गुरु, गोसावी, बैरागी, मांत्रिक, बुवा यांचे अज्ञानी समाजावरील प्राबल्य ही भारतांतील बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाची शोकांतिका होती. न्या. रानडे, फेरोजशहा मेहता, गोखले, टिळक, आंबेडकर यांच्या प्रयत्नाने भारतीय व्यक्तिमत्वात बदल करण्याची व वरील शोकांतिकेतून बाहेर पडण्याची निकड समाजाला पटत चालल्याचे चिन्ह तरी काही काळ दिसत होते. पण १९२० साली वास्तवाशी फारकत सुरू झाली. १९२० नंतरच्या नेतृत्वाने नेमके काय केले ? आपल्या सद्यस्थितीतील दूरावस्थेची मुळे कोठे आहेत ?

या आणि अशा प्रश्नांचा भारतीय व्यक्तिमत्वाच्या अनुरोधाने वेध घेणारा लेखसंग्रह.

रविराज प्रकाशन